# वाङ्मयीन विद्वत्ता

दुर्गादास काशिनाथ

**डॉ. दु. का. संत**
एम्.ए., पीएच्.डी.,
कोल्हापूर.

JAYAKAR LIBRARY
Poona 7
POONA UNIVERSITY

पुणे विद्यापीठ प्रकाशन
जुलै १९७६

## डॉ. दु. का. संत यांचे महत्त्वाचे ग्रंथलेखन

- साहित्य आणि संस्कृति .. १९५
- मराठी स्त्री .. १९५७
- साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न .. १९६०
- संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग .. १९६६
- स्त्रीजीवन : अन्वय आणि अर्थ .. १९७६
- वाङ्मयीन विद्वत्ता .. १९७६

# वाङ्मयीन विद्वत्ता

दुर्गादास काशिनाथ

**डॉ. दु. का. संत**
एम्.ए., पीएच्.डी.,
कोल्हापूर.

JAYAKAR LIBRARY
Poona 7
POONA UNIVERSITY

पुणे विद्यापीठ प्रकाशन
जुलै १९७६

T O152:9
K6
199271
L

प्रकाशक : ग. ज. अभ्यंकर,
कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७.

मुद्रक : वा. र. देशपांडे,
उपकुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ७.

मुद्रण-स्थळ : पुणे विद्यापीठ मुद्रणालय, गणेशखिंड, पुणे ७.

© पुणे विद्यापीठ, पुणे ७.

मुद्रणकाळ : १९७५-७६

पहिली आवृत्ती : जुलै १९७६

प्रती : ११०० (१०९७)

मूल्य : रुपये बारा

साहित्य आणि संस्कृति-मंडळाच्या
संस्थापनेने -
विद्या व वाङ्मय यांना
उत्तेजन देणारे
नवे सुवर्णयुग
महाराष्ट्रात निर्माण करणारे
महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री
व भारताचे परराष्ट्रमंत्री
वाङ्मय व विद्याप्रेमी

**माननीय ना. यशवंतरावजी चव्हाण**

यांना स्नेहादरपूर्वक--

□ ही व्याख्याने

दि. १५ ते २० ऑक्टोबर १९७३

ह्या दिवशी रोज एक

या प्रमाणे झाली. □

# पुरस्कार

डॉ. दु. का. संत यांनी ' वाङ्मयीन विद्वत्ता ' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेत १९७३ मध्ये दिलेली व्याख्याने आता ग्रंथरूपाने प्रकाशित होत आहेत.

मराठीत या स्वरूपाचा हा पहिलाच ग्रंथ असावा. ' वाङ्मयीन विद्वत्ता ' हा शब्दप्रयोग डॉ. संत यांनी अमेरिकाप्रणीत इंग्रजी वाङ्मयसमीक्षेतील ' लिटररी स्कॉलरशिप ' या संज्ञेखाली येणाऱ्या विषयविवेचनाला अनुलक्षून केला आहे. प्रज्ञा व प्रतिभा या दोहोंचेही आविष्कार त्यांना या विद्वत्तेत अभिप्रेत आहेत. ' वाङ्मयाचा इतिहास ', ' वाङ्मयसमीक्षा ', ' भाषा व भाषाभ्यास ' या परिक्षेत्रांच्या संदर्भात ' विद्वत्ता ' हे अभिधान सहजपणे शोभून दिसते. ललितवाङ्मयाचे समीक्षण, परीक्षण, विवेचन या क्रियाही विद्वत्तेत समाविष्ट व्हावयास हरकत नाही. परंतु ललितवाङ्मयाची निर्मिती हे विद्वत्तेचे परिक्षेत्र मानावे की नाही याविषयी वाद होऊ शकेल. टीकाकार हा सर्जनशील साहित्यिक होऊ शकतो की नाही याविषयीच अनेकांच्या मनात शंका येऊ शकेल. माझ्या मनातही ती शंका मी टीकाकार व सर्जनशील साहित्यिक यांपैकी काही नसतानाही उगाचच घर करून आहे. डॉ. संत ललितवाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेलाही वाङ्मयीन विद्वत्तेतच समाविष्ट करू पाहतात. त्यांनी त्याचे विवेचन केले आहे. काहींचे कदाचित् त्यामुळे समाधान होईल, काहींचे होणार नाही. परंतु सर्वांचे संपूर्ण समाधान झालेच पाहिजे असा कोणत्याच खऱ्या विद्वत्तेचा आग्रह नसतो.

विद्यापीठाच्या क्षेत्रात मराठीला मान्यता मिळून आता अनेक दशके झाली. मराठी भाषेच्या साक्षेपी अभ्यासक्रमाला इंग्रजी व संस्कृत या दोनही भाषा उत्तम अवगत असल्या पाहिजेत व त्यातील वाङ्मयधनाचा निकटचा परिचयही असावयास हवा. परंतु हे जरी खरे असले तरी या व अन्य भाषांतील विचारधन मराठीत आणण्याचे काम विलंबावर पडता कामा नये. या दृष्टीनेच विद्येच्या–केवळ मराठी भाषेच्याच नव्हे–सर्व शाखांत उपशाखांत

मराठीत विवेचक ग्रंथरचना होणे, सतत होत राहणे निकडीचे आहे. हे करीत असताना त्यात त्या शाखेच्या आधीच्या विकासात सर्वमान्य झालेले विवेचन तर अर्थात् येईलच. परंतु काही नव्या वादविवादाला चालना देणारे विवेचनही येत राहील. असा समन्वय डॉ. संत यांच्या या व्याख्यान-मालेतील विवेचनात आढळून येतो.

भारताच्या शिक्षणव्यवस्थेत आजचा काळ हा एक महत्त्वाचा संक्रमण-काळ आहे. उच्च शिक्षणाचा कस कसा वाढविता येईल व त्याचबरोबर उच्च शिक्षण समाजातील विविध स्तरांपर्यंत कसे पोहोचविता येईल असा एक दुहेरी प्रश्न भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभा आहे. हा एक दुहेरी पेचच आहे असे म्हटले तरी चालू शकेल. परंतु शिक्षणाच्या सर्वोच्च स्तरांत डॉ. संत यांनी विवेचन केल्याप्रमाणे शोधसाक्षेप व अनुशासनसन्मुखता आवश्यक आहेत, या विषयी दुमत व्हावयाचे कारण नाही. ( डॉ. संत यांचा अनुशासनसन्मुखता हा शब्द अनुशासन-पर्वाच्याही आधीचा आहे, हे या ठिकाणी लक्षात ठेवणे उचित होईल. ) सर्वोच्च स्तरावरचा हा अभ्यास केवळ एकाच अभ्यासक्षेत्राशी निगडीत न राहता विविध अभ्यासक्षेत्रांशीही त्याचा अनुबंध राहिला पाहिजे, ही भूमिकाही आता मान्य झालेली आहे. आपल्याला वाटल्यास आंतर-अनुशासनाधिष्ठितता असाही एक काहीसा अवजड शब्दप्रयोग त्यासाठी करता येईल. मराठी वाङ्मयीन विद्वत्तेच्या आंतरअनुशासनाशी (Inter-disciplinary relationship) संबंधित असणाऱ्या अंगांचेही विवेचन मराठीत केव्हा तरी साक्षेपाने होणे आवश्यक आहे. असो.

डॉ. संत यांचा हा ग्रंथ प्रकाशित करताना पुणे विद्यापीठास आनंद होत आहे. या विषयाचे अभ्यासू या ग्रंथाचे हार्दिक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**दे. अ. दाभोलकर**
कुलगुरु,
पुणे विद्यापीठ, पुणे–७.

दि. ४ जून, १९७६

# लेखकाचे निवेदन

'वाङ्मयीन विद्वत्ता, तिची परिक्षेत्रे व मराठीतील तिचे विकसन' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या न. चिं. केळकर व्याख्यानमालेत १९७३ मध्ये मी दिलेल्या सहा व्याख्यानांचे हे परिपूर्ण असे संकलन आहे. ते ग्रंथरूपात सादर होत आहे.

मी निवडलेला 'वाङ्मयीन विद्वत्ता' हा विषय अगदी नवीन प्रकारचा आहे. केवळ, समीक्षाशास्त्रावरील किंवा समीक्षाशास्त्रातील काही समस्यांची पाहणी करणारा हा ग्रंथ नसून समीक्षाशास्त्र ज्या व्यापक अशा वाङ्मयक्षेत्राचा भाग आहे त्या वाङ्मयशास्त्रामधील काही महत्त्वाच्या आधिवैद्यिक (ॲकॅडेमिक) प्रश्नांची पाहणी करणारा हा प्रबंध आहे. विद्यापीठे विद्वान् (स्कॉलर्स) तज्ज्ञ तयार करतात. ते करीत असताना त्यासाठी विद्वत्तेची किंवा प्रावीण्याची कोणती तरी प्रतिमा दृष्टीपुढे ठेवणे अवश्य असते. त्यादृष्टीने येथल्या चर्चेसाठी मी 'वाङ्मयीन विद्वत्ता' ही संकल्पना मांडली आहे. तिची आवश्यकता व वैशिष्टचे पहिल्या व्याख्यानात तिच्या सामाजिक अनुबंधासह स्पष्ट केली. नंतरच्या चार व्याख्यानांतून वाङ्मयेतिहास, वाङ्मय-समीक्षा, भाषा आणि भाषाभ्यास आणि ललित-वाङ्मयलेखन ही चार वाङ्मयीन विद्वत्तेची परिक्षेत्रे मानून त्यांतील काही महत्त्वाच्या प्रश्नांचा ऊहापोह प्रत्येक व्याख्यानात केला आहे. शेवटच्या व्याख्यानातून माझ्या दृष्टिकोनाप्रमाणे मराठीतील वाङ्मयीन विद्वत्तेचा विकासक्रम दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी शेवटी त्यात विद्यापीठ प्रबंध-लेखनाची चर्चा केली आहे. असा हा वाङ्मयविद्याविषयक अध्ययन, अध्यापन-संशोधन या क्षेत्रांशी संबद्ध असणाऱ्या प्रश्नांची चर्चा करणारा स्वयंपूर्ण प्रबंध आहे.

उच्च स्तरावरून केल्या जाणाऱ्या अध्ययन-अध्यापनात शोधसाक्षेप व अनुशासन-मनस्कता ही आवश्यक आहेत, हे आज सर्वमान्य झाले आहे. वाङ्मयाच्या संदर्भात त्यांचे स्थान, स्वरूप व महत्त्व प्रत्येक व्याख्यानात आलेले आहे. त्याप्रमाणेच विचार साधार मांडले आहेत. कोणाच्याही मार्गदर्शनाविना, स्वतंत्रपणे मी हा प्रबंध तयार केला आहे.

विवेचन करताना माझ्या दृष्टीपुढे प्रामुख्याने ह्या क्षेत्रातला नवप्रविष्ट अभ्यासक-वर्ग आहे. त्याच्यासाठी काही तरी विधायक स्वरूपाचे उपक्रम व्हावयास हवेत असे मला वाटते. ते होत असताना वाङ्मयक्षेत्रातील अध्ययन, अध्यापन, संशोधन यांचा दर्जा वाढावा, ते खऱ्या अर्थाने आधिवैद्यिक, उच्चस्तरीय, प्रवाही आणि उपयुक्त व्हावे, यासाठी मी काही कल्पना, योजना सुचविल्या आहेत. आस्था बाळगणारांना त्या महत्त्वाच्या वाटतील. हा सामाजिक अनुबंध हा या प्रबंधाचा एक महत्त्वाचा विशेष आहे, असे मला वाटते. तथापी तो अनुबंध सोडून दिला तरी, हे स्वतंत्र वाङ्मयविषयक चिंतन आहे हे मान्य व्हावयास अडचण येऊ नये.

हे सारे पूर्णतया आधिवैद्यिक विवेचन असून ते एखाद्या विद्यापीठानेच प्रकाशित करावे असे आहे. साहजिकच पुणे विद्यापीठातर्फे हे प्रकाशित होत आहे याबद्दल मला अत्यंत समाधान वाटत आहे. पुणे विद्यापीठास मनःपूर्वक धन्यवाद.

मराठीत या विषयावर दूरान्वयानेही लेखन झालेले नाही. (आणि किती भारतीय भाषांत या विषयावर ग्रंथलेखन झाले आहे हे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.) विषयाशी ओझरता संबंध असणारे लेखन त्रुटित स्वरूपात कोठे झालेही असेल, पण ते शोधून काढावे लागेल इतके अपवादात्मक. त्यादृष्टीने माझी भूमिका सर्वस्वी नवी आहे.

विषयविशिष्ट विद्वत्तेच्या, प्रावीण्याच्या संकलपनेचा वापर इतर विद्याशाखांसाठी किंवा ज्ञानशाखांसाठी केला जाणे शक्य आहे. प्रत्येक क्षेत्रातील प्रावीण्य, विद्वत्ता, तज्ज्ञता यांची आधिवैद्यिक भूमिका वा ध्येये यांची नव्या संदर्भात चर्चा होणे अवश्य आहे, असे वाटते.

"संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग" या पुस्तकाच्या प्रकाशनापासून हा विषय माझ्या डोक्यात घोळत होता. आधारग्रंथांत उल्लेखिलेल्या ग्रंथांनी विचारांना निश्चित दिशा मिळाली व केळकर व्याख्यानमालेच्या निमित्ताने त्यांचे शब्दांकन करण्याची संधी प्राप्त झाली.

पुणे विद्यापीठाचे मान्यवर कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोलकर यांनी विवेचक पुरस्कार लिहिला आहे. प्रा. दाभोलकर हे एक ख्यातनाम विचारवंत असून त्यांना विद्यापीठीय शिक्षणाविषयी विशेष आस्था आहे. त्यामुळे त्यांचा हा

पुरस्कार मला विशेष मोलाचा वाटतो. ह्या मर्मग्राही पुरस्काराने ह्या प्रबंधाचे महत्त्व वाढले आहे असे मला वाटते. माननीय प्रा. दाभोलकर यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. या व्याख्यानमालेचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू माननीय डॉ. ग. स. महाजनी यांनी केले व समारोप पुणे विद्यापीठाचे मराठीचे विभागप्रमुख डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी केला. त्या दोघांचे मी आभार मानतो. ग्रंथाच्या मुद्रण व प्रकाशनाबाबत पुणे विद्यापीठाच्या प्रकाशन–विभागाचे प्रमुख श्री. दि कों. शेवाळकर यांचे विशेष सहाय्य झाले आहे. त्यांचे हार्दिक आभार. तसेच अगदी वेगळ्या प्रकारचा हा ग्रंथ तयार होत असताना अनेकांनी अनेक प्रकारचे सहाय्य केले आहे, उत्तेजन दिले आहे, ती यादी फार मोठी आहे. मी त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. तथापी त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

ग्रंथातील प्रतिपादनाविषयी, तसेच वापरलेले विशिष्ट शब्द किंवा संज्ञा इ. यांविषयी अनेक मतभेद झाले तरी अभ्यासकांनी ह्या उपक्रमाकडे सहानुभूतीने पाहावे अशी मी त्यांना नम्र विनंती करतो.

संकेत, ९३ शिवाजी पार्क,<br>कोल्हापूर, ४१६ ००१<br>२६ जून १९७६

— दु. का. संत

# विषयानुक्रम

*व्याख्यान पहिले :* *पृ. १ ते ३२*

**वाङ्मयीन विद्वत्ता : स्वरूप आणि परंपरा**

१. विषय-प्रस्ताव व व्याख्यानांची स्थूल रूपरेषा-
२. विषय-स्वरूप व व्याप्ती-
३. हा विषय का निवडला-
४. वाङ्मय आणि त्याच्या अभ्यासाची प्रदीर्घ परंपरा-
५. 'स्कॉलर'-प्राचीन आदर्श—विद्यांच्या पुनरुज्जीवनाने केलेली विद्वत्क्षेत्रातील क्रांती-मनुष्याची नवी प्रतिमा-
६. स्वच्छंदवादी क्रांतीचा वाङ्मयीन विद्वत्तेवर पडलेला प्रभाव-ऐतिहासिक दृष्टिकोणाची निर्मिती—अभ्यासकांचे कार्य-
७. विज्ञान व इतर शास्त्रे : स्वरूप-चर्चा—वैज्ञानिक पद्धतींचे संस्करण-वाङ्मयक्षेत्रीय संशोधनाचे वैशिष्टय-
८. सर्जनशील वाङ्मयनिर्मिती-हे एक वाङ्मयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र-
९. शोधानुशासनाचा प्रश्न—विविध परिक्षेत्रे—वाङ्मयीन विद्वत्तेचे निराळेपण-मूल्यांचे क्षेत्र-

*व्याख्यान दुसरे :* *पृ. ३३ ते ६४*

**वाङ्मयेतिहास : स्वरूप, समस्या, पद्धती**

१. वाङ्मयेतिहासाचे वेगळेपण-' वाङ्मयाला इतिहास नसतो ' या मताची पाहणी-वाङ्मयेतिहास हा एक सुसंघटित असा ज्ञानसंचय-
२. तेंचा सिद्धान्त व त्याचे परीक्षण—वाङ्मयेतिहासविषयक विविध मते-
३. वाङ्मयेतिहास-स्वरूप-चर्चा—भाषेच्या इतिहासाशी अविभाज्य-—राष्ट्रीय इतिहासाचा एक भाग—विविध मतांचा परामर्श-
४. वाङ्मय हे जीवनाचे प्रतिबिंब असते का ?-चर्चा—एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून वाङ्मयाचे अध्ययन-ललित-कलांशी जवळीक-

५. वाङ्मयेतिहासातील यक्षप्रश्न : सविस्तर पाहणी–मूल्यावलंबन व मूल्यनिदान अवश्य–

६. ऐतिहासिक दृष्टीचा उद्भव–तिचा अतिरेक–मर्यादा—सम्यक्-दृष्टिक्षेपणवाद—अनुशासनाचा प्रश्न–

७. वाङ्मयीन कलाकृतीची अखंड विकसनशीलता–

८. चरित्राभ्यास–वाङ्मयेतिहासाचे अंग या दृष्टीने विवेचन–

९. 'विकास' कल्पनेची पाहणी–मूलाधार अवश्य–वाङ्मयाभिबंधास प्राधान्य देण्याची प्रवृत्ती–

१०. कालखंडांचा प्रश्न—व्यापक सांस्कृतिक अनुबंध—लेखकांच्या नावांची युगे—वाङ्मयीन प्रवृत्तीवर आधारलेले कालखंड–अनुशासनाचा प्रश्न–

११. पाठचिकित्साशास्त्र व तत्सम क्षेत्रे–समारोप–

*व्याख्यान तिसरे :* *पृ. ६५ ते ९६*

**वाङ्मय-समीक्षा**

प्रास्ताविक–वाङ्मयाला समीक्षेची गरज का असते–समीक्षाविषयक विविध अभिक्रिया–

समीक्षा विचारांची उत्क्रांती—तीन कालखंड–

१. प्राचीन समीक्षा–विचार, स्वरूप व प्रभाव—विद्यांच्या पुनरुज्जीवनाचा काल–

२. एकोणिसावे शतक—दोन प्रमुख विचारधारा—समन्वय अवश्य–

३. विसाव्या शतकातील समीक्षाविचाराचे वैशिष्टच—अभिग्रहणाकडे वाटचाल–

समीक्षा व निरनिराळी शास्त्रे : समीक्षेने घेतलेले पाथेय–वाङ्मयीन अनुभवांशी अविभाज्यता–

समीक्षेचे स्वतंत्र अनुशासन : विविध उपक्रम–त्यांची फलश्रुती–व्याख्या—मूल्याधिष्ठितता—तारतम्याची गरज.

## व्याख्यान पहिले

# वाङ्मयीन विद्वत्ता : स्वरूप आणि परंपरा

: १ :

**माननीय कुलगुरु डॉ. महाजनी**

**व साहित्यप्रेमी सभ्य स्त्रीपुरुषहो !**

कै. साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या नावाने त्यांच्या पुण्यस्मृतीप्रीत्यर्थ चालविल्या जाणाऱ्या ह्या व्याख्यानमालेची पुष्पे गोवण्याचा सुयोग ह्या वर्षी मजसारख्या प्रसिद्धीच्या झोतापासून अलिप्त असणाऱ्या सामान्याला प्राप्त झाला, याबद्दल पुणे विद्यापीठाविषयी मी कृतज्ञता व्यक्त करतो. ह्या विख्यात व्याख्यानमालेत आजपर्यंत अनेक महनीय व्यक्तींनी आपली विचारपुष्पे गुंफली आहेत, त्या थोरामोठ्यांच्या जाणिवेने मी अगदी संकोचून गेलो आहे. त्या सर्वांना आदरभावाने नमस्कार करतो.

त्याचप्रमाणे ज्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी ह्या व्याख्यानमालेचा प्रारंभ होत असतो, त्या साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांच्या पुण्य स्मृतीला मी अभिवंदन करतो. त्यांचा माझा अल्प परिचय झाला होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्.डी. पदवीसाठी प्रबंध लिहिण्यासाठी मी माझे नावही नोंदविले होते, पण ते तेवढेच राहिले. या गोष्टीची आज मला आठवण होत आहे. त्यांचे वाङ्मयक्षेत्रातील चौरस कर्तृत्व लक्षात घेऊन व त्यांच्या 'जन्मभरच्या एका उद्योगास' शोभून दिसणारा 'वाङ्मयीन विद्वत्ता' हा अगदी सर्व प्रकारे नवा असणारा विषय मी या व्याख्यानांसाठी निवडला आहे. आजच्या परिस्थितीत अशा विषयाची चर्चा होणे, हे निरनिराळ्या कारणांनी अतिशय आवश्यक आहे, अशा जाणिवेने हा विषय मी मुद्दाम घेतला आहे.

या व्याख्यानमालेत 'वाङ्मयीन विद्वत्ता' या विषयावर मी सहा व्याख्याने देणार आहे. पहिल्या व्याख्यानात वाङ्मयीन विद्वत्ता म्हणजे काय, ती इतर क्षेत्रीय विद्वत्तेपासून कशी भिन्न आहे, तिची परंपरा व उद्दिष्टे यांचे सविस्तर विवेचन करणार आहे, त्याचप्रमाणे तिच्या अभिवृद्धीसाठी म्हणजे पद्धतशीर विकसनासाठी काय करावयास हवे याची चर्चा करण्याचे ठरविले आहे. तसेच तिची निरनिराळी परिक्षेत्रे कोणती आहेत, त्याप्रमाणे उच्च ज्ञानक्षेत्रास आज जी विशिष्ट शोधदृष्टी अपेक्षित असते ती वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात कशी आणता येईल याचे पण विवरण करण्याचे ठरविले आहे. अशारीतीने या व्याख्यानांमागील व विषयाची तात्त्विक भूमिका विशद करणे हे पहिल्या व्याख्यानात प्रयोजित आहे.

पुढल्या तीन व्याख्यानांतून वाङ्मयीन विद्वत्तेचा प्रमुख परिक्षेत्रांची पाहणी योजिली आहे. दुसऱ्या व्याख्यानात 'वाङ्मयेतिहास' हे परिक्षेत्र विचारात घेण्याचे योजिले आहे. त्यात वाङ्मयेतिहासाशी संबद्ध प्रश्नांची, निरनिराळ्या विषयांची आणि अपेक्षित प्रपद्धती (मेथॉडॉलॉजीस) ची चर्चा करण्याचे ठरविले आहे. इतर विषयांच्या इतिहासापेक्षा वाङ्मयेतिहास हा प्रकृतीने सर्वस्वी भिन्न आहे. त्यामुळे हे विवेचन आवश्यक आहे असे मला वाटते. कारण वाङ्मयकृतींना व वाङ्मय-लेखकांच्या कार्याला प्रथम समकालीन नंतर ऐतिहासिक व त्यानंतर सार्वकालिक महत्त्व असते त्यामुळेच वाङ्मयेतिहासाचे स्वतंत्र व्यासंगक्षेत्र मानावे लागते.

तिसऱ्या व्याख्यानात महत्त्वाचे दुसरे परिक्षेत्र 'वाङ्मयसमीक्षा' हे विचारात घेणार आहे. वाङ्मयीन व्यासंगाचा म्हणजेच विद्वत्तेचा गाभा असणारे हे क्षेत्र अपार महत्त्वाचे आहे. त्याची वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने पाहणी करण्याचे योजिले आहे. त्यात समाविष्ट होणारे निरनिराळे महत्त्वाचे विषय व त्यांच्या निरनिराळ्या भूमिका, त्यामुळे निर्माण होणाऱ्या त्यांच्या प्रपद्धती यांचे विवेचन आयोजिले आहे. तसेच समीक्षण, संशोधन व या दोहोंपेक्षा वेगळे असणारे पण वाङ्मयीन विद्वत्तेत समाविष्ट असणारे लेखन ह्यातील वेगळेपणा दाखविण्याचे ठरविले आहे, या सर्वच अभिक्रिया (अॅक्टिव्हिटीज्) वाङ्मयीन विद्वत्तेला कशा पोषक आहेत हे दाखविण्याचे ठरविले आहे.

चवथ्या व्याख्यानात 'भाषा व भाषाभ्यास' ह्या व्याख्यानविषयाशी संबद्ध असणाऱ्या परिक्षेत्राची चर्चा केली आहे. भाषेच्या अभ्यासाच्या प्राचीन, मध्यकालीन व अलीकडील भूमिकांचे विशदीकरण करून वाङ्मयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र या दृष्टीने भाषाक्षेत्राची व त्यात समाविष्ट होणाऱ्या विविध विषयांची पाहणी केली आहे. निरनिराळ्या दृष्टींनी महत्त्वाचे हे क्षेत्र विविध अभिक्रियांनी गजबजलेले असले तरी प्रकृतीने ते वाङ्मयीन आहे, इकडे लक्ष वेधून त्यातील निरनिराळ्या विषयांतील प्रपद्धतींची चर्चा करण्याचे योजिले आहे.

पाचव्या व्याख्यानात ' ललितवाङमय-लेखन ' हे वाङमयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र आहे असे गृहित धरून त्याच्या स्वरूपाची चर्चा करण्याचे योजिले आहे. सर्जनशील लेखन अभिकृती व विचारप्रधान लेखनअभिकृती यांतील साम्य बारकाईने पाहणी करून दाखवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण ललित वाङमयाला विद्वत्ताक्षेत्रात समाविष्ट करण्याची कारणे विस्ताराने स्पष्ट करणे आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे ते ' विद्वत्ते 'चे क्षेत्र आहे असे दाखवून दिल्यानंतर त्याच्यासाठी एक प्रशिक्षणाची योजनाही मांडण्याचे योजिले आहे.

सहाव्या व्याख्यानात मराठीतील वाङमयीन विद्वत्तेचा विकास दाखविण्याचे योजिले आहे. व्याख्यानमालेतील निरनिराळ्या परिक्षेत्रांतील वाङमयीन विद्वत्तेची जडणघडण महाराष्ट्रात कशी होत होती, त्यादृष्टीने निरनिराळ्या व्यक्ती, संस्था, यांच्या कार्याचे व विविध अभिक्रमांचे समालोचनात्मक विवेचन करणार आहे. तसेच विद्यापीठीय प्रबंधाच्या वाङमयीन विद्वत्तेतील स्थानाची चर्चा करणार आहे. शेवटी वाङमयीन विद्वत्तेच्या शास्त्रशुद्ध विकसनासाठी काही योजना सुचविण्याचे मनात आहे.

अशा प्रकारे ह्या सहा व्याख्यानांतील विवेचनाची स्थूल रूपरेषा आहे. वाङमयक्षेत्रीय अभ्यासाचे हे विवेचन अनेक दृष्टींनी आज आवश्यक आहे असे वाटते.

## : २ :

मी निवडलेला विषय व त्याचे केलेले शब्दांकन अनेक परींनी अपरिचित व नवीन असल्याने प्रारंभी त्यासंबंधी थोडे विवेचन स्पष्टीकरण अवश्य आहे.

' वाङमयीन विद्वत्ता ' हा शब्दप्रयोग मी ' लिटररी स्कॉलरशिप ' या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून उपयोजिला आहे. ' लिटररी ' आणि 'स्कॉलरशिप ' ह्या दोन शब्दांचे शब्दशः भाषांतर या दृष्टीने हा शब्दप्रयोग बरोबर आहे. परंतु ह्या दोन शब्दांचा संकलित अर्थ मराठी भाषिकांना अपरिचित आहे, हा शब्द-प्रयोग व ही संकल्पना मराठीत मी प्रथमच वापरीत आहे, म्हणून प्रारंभी त्या विषयी थोडी चर्चा करतो.

' स्कॉलरशिप ' म्हणजे विद्वत्ता किंवा व्यासंग. ' लर्निंग ' हा शब्दही याच अर्थाने रूढ आहे, त्याचेही मराठीकरण विद्वत्ता असेच करता येईल. सामान्यतः प्रत्येक क्षेत्रातल्या श्रेष्ठ अभ्यासकाला पूर्वी ' स्कॉलर ' म्हटले जात असे. विज्ञानाच्या उदयानंतर निर्माण झालेल्या आजच्या तज्ज्ञताप्रधान युगात प्रत्येक क्षेत्रातील

अभ्यासक-संशोधकास 'तज्ज्ञ' या अर्थी 'ज्ञ' प्रत्यय लावून शब्द तयार करण्यात येऊ लागले. आज 'सामाजिक शास्त्रे' म्हणून प्रसिद्ध असलेली शास्त्रे पूर्वी 'मानव्यशास्त्रां' (ह्यूमॅनिटीज) मध्ये समाविष्ट होत असत. मानव्य-शास्त्रांतील अभ्यासकांना 'स्कॉलर' म्हटले जाई. पण पुढे पुढे विज्ञानशास्त्रांच्या प्रभावामुळे त्यांचाही तज्ज्ञतादर्शक 'ज्ञ' प्रत्ययाने उल्लेख होऊ लागला, आणि त्या दृष्टीने अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, विधिज्ञ, इ. शब्द आज रूढ झालेले आहेत. याचे कारण विज्ञानाचा व विशेषत: वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करून त्या दिशेने त्या-शास्त्रांची प्रगती करण्याचा पायंडा सर्वत्र पडला आहे. अशा रीतीने सामाजिक शास्त्रे स्वतंत्र झाल्याने व ती विज्ञानाच्या दिशेने पुढे जात असल्याने मानव्यशास्त्रांत (ह्यूमॅनिटीजमध्ये) वाङ्मय हे एकटेच राहिले आहे. वाङ्मयक्षेत्रातील अभ्यासक-संशोधकांना वाङ्मयज्ञ म्हणण्यापेक्षा पूर्वपरंपरेची मान्यता असणारा 'विद्वान' हा शब्दच अधिक समर्पक. पण आज तो विवाद्य होईल. कारण वाङ्मयातील विद्वत्ता अगर तज्ज्ञता एकाच प्रकारची नसते. म्हणूनच तिचे स्वरूप पाहणे अधिक जरूरीचे झाले आहे. दुसरे असे की, विज्ञान शास्त्रे व सामाजिक शास्त्रे ही तुलनात्मकदृष्ट्या अगदी अलीकडची आहेत, त्या दृष्टीने जगाच्या विद्वत्तेची परंपरा ही प्रामुख्याने वाङ्मयक्षेत्रामागेच आहे. साहजिकच ही विद्वत्तेची परंपरा काय आहे व आजच्या विज्ञानविचाराच्या कालात तिचे स्वरूप कसे आहे व ते कसे असावे, तसेच विज्ञानाच्या प्रभावामुळे पुढे आलेल्या वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब किती प्रमाणात करावयास हवा, वाङ्मयीन विद्वत्तेची ध्येये कोणती इ. प्रश्नांचा ऊहापोह करण्याचे या ठिकाणी ठरविले आहे.

इंग्रजी भाषेच्या संपर्काने वाङ्मयक्षेत्रात व समीक्षेत अनेक इंग्रजी संकल्पना आपण घेतल्या आहेत, त्यासाठी नवे नवे शब्दही आपण तयार केले आहेत. परंतु त्यांत 'लिटररी स्कॉलरशिप' ह्या संकल्पनेस वा शब्दप्रयोगास आजच्या समीक्षेत विशेष महत्त्वाची प्रतिष्ठा वा मान्यता अद्याप परिप्राप्त झालेली नाही. याचे कारण ज्या इंग्लंडप्रणीत इंग्रजीकडून आपण आधुनिक समीक्षाक्षेत्रात नवनव्या कल्पना घेतल्या त्या इंग्लंडप्रणीत इंग्रजीत 'लिटररी स्कॉलरशिप' या शब्दप्रयोगास महत्त्वाचे स्थान नाही. त्यांच्या मते 'स्कॉलरशिप' ही स्वतंत्र गोष्ट आहे, तिचा 'लिटररी' या शब्दाच्या साहाय्याने वापर करण्याची काही आवश्यकता नाही. (ही भूमिका तयार होण्यास काही ऐतिहासिक कारणे आहेत, आपण ती पुढे पाहणार आहोत.) आपणही हीच भूमिका अंगिकारली असल्याने आपणांसही तसेच वाटते. परंतु अमेरिकाप्रणीत इंग्रजीत वाङ्मय-समीक्षेत 'लिटररी स्कॉलरशिप' ही संज्ञा बहुलत्वाने व साक्षेपाने वापरली जाते. त्या शब्दप्रयोगामागे तेथे एक प्रकारची व्यापक आशयघनता निर्माण झालेली आहे,

तिच्यासह हा शब्दप्रयोग आपणांस आज अधिक स्वीकारार्ह आहे, तो त्या दृष्टीने रूढ होणे आवश्यक आहे असे मला वाटते व म्हणून मी हा नवीन शब्दप्रयोग, त्यातील नवीन विचार–आशयासह आपणांपुढे मांडीत आहे.

वाङ्मयव्यापाराच्या सर्व क्षेत्रांत मानवी प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे जे उपयोजन किंवा अवलंबन होते, त्याचे सूचन ' वाङ्मयीन विद्वत्ता ' या शब्दप्रयोगाने व्हावे अशी येथे अपेक्षा आहे. वाङ्मयीन विद्वत्ता म्हणजे वाङ्मयक्षेत्रात निरनिराळ्या कारणांनी व उद्दिष्टांनी होणारा प्रज्ञेचा वा प्रतिभेचा व्यापार, असा एक प्रारंभिक अर्थ स्थूल मानाने गृहित धरणे योग्य होईल. विद्वत्ता हा शब्द केवळ पांडित्य या अर्थात न वापरता सर्जनशील वाङ्मयकर्तृत्वाचाही समावेश त्यात गृहित धरलेला आहे.

## : ३ :

एवढे प्रास्ताविक स्पष्टीकरण केल्यानंतर हा विषय मी का निवडला, याची काही कारणे सांगणे आवश्यक वाटते, ती अतिशय महत्त्वाची आहेत. वाङ्मयाशी व विद्वत्तेशी संबद्ध असणाऱ्या अनेक विषयासंबंधीचे हे चिंतन आहे. ते तसे तत्त्वशोधक वा तत्त्वविवेचक आहेच, परंतु त्याला समकालीन परिस्थितीच्या संदर्भात एक विशिष्ट अर्थ आहे तो अधिक लक्षणीय आहे.

सध्या वाङ्मयक्षेत्रात विविध हालचाली व उपक्रम चालू आहेत. भारतातील सर्वच राज्ये व भाषा विकासाच्या उंबरठ्यावर उभ्या आहेत. सर्वच समाज किंवा समाजाचे घटक आपला सर्वांगीण विकास साधण्यासाठी उत्सुक झाले आहेत. विद्यापीठे, साहित्यसंस्था, साहित्य व सांस्कृतिक संघटना आपापल्या परीने कार्यवाही होत आहेत, झाल्या आहेत. एवढेच नव्हे तर कित्येक ज्ञानशाखाही आपले स्वतंत्र अस्तित्व आणि वेगळेपण सिद्ध करण्यासाठी उत्सुक झालेल्या आहेत. सामाजिक शास्त्रांची शाखा अधिक योजनाबद्ध रीतीने कार्यवाही झालेली दिसते. शाळा-कॉलेजांतील शिक्षण व संशोधन कसे असावे ह्या दृष्टीने काही पुस्तके त्यांनी तयार केली आहेत, एकंदर जागरूकतेच्या दृष्टीने हे उपक्रम उल्लेखनीय आहेत. त्यांतून तत्क्षेत्रीय जागृतीची दिशा कळते. तसेच सर्वत्र अनेकविध उपक्रम चालू आहेत. परिषदा, सेमिनार (परिसंवाद), कृतिसत्रे, शिबिरे, व्याख्यानमाला, चर्चा इत्यादींच्या द्वारे सर्वच क्षेत्रांत एकप्रकारचे जागृतीचे वातावरण दिसते, त्याशिवाय अनेक संस्था, संघटना निरनिराळे प्रकल्प हाती घेत आहेत. कुणी शब्दकोशाचा, सांस्कृतिक-कोशाचा, ज्ञानकोशाचा, महाकोशाचा कुणी इतिहासाचा, तर कुणी कशाचा, तसेच विद्यापीठांतील विविध विभागही स्वतःच्या योजना आखीत आहेत.

वाङ्मयक्षेत्रही याला अपवाद नाही. निरनिराळे अभ्यासक आपले प्रबंध तयार करीत आहेत.

हे सारे उपक्रम उपयुक्त आहेत. त्यांची आवश्यकता विवादातीत आहे. तथापि ह्या सर्व वाङ्मयीन उपक्रमांतून जी विद्वत्ता अपेक्षित आहे, तिचे स्वरूप कसे आहे व तिचे वेगळेपण कशात आहे, याची तात्त्विक चर्चा होणे अवश्य वाटते. तिच्या अभावी हे सारे उपक्रम केवळ प्रतिक्रियारूप वाटतात. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत जे चलनवलन सुरू झाले आहे––ज्याचे प्रेरकत्व व दायित्व वास्तविकतेने व प्रामुख्याने शासनाकडे आहे,––त्याचे लोण वाङ्मयाच्या क्षेत्रापर्यंत आलेले आहे, एवढेच या उपक्रमांवरून सिद्ध होते. लोकांनी वा संबंधितांनी जागृत वा कार्यवाही होऊन शासनास तसे करण्यास भाग पाडलेले नाही. म्हणूनच या नव्या परिस्थितीत व वातावरणात वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वरूप कोणते, तिची कार्ये कोणती, तसेच या उपक्रमांशी संबद्ध असे काही तात्त्विक प्रश्न आहेत, समस्या आहेत, त्यांची चर्चा होणे आवश्यक वाटते. तिच्यामुळे या उपक्रमांचे स्वरूप अधिक नीटस व रेखीव होऊन ह्या क्षेत्रात एक प्रकारची सूत्रबद्धता येण्यास मदत होईल, या अपेक्षेने ह्या उपक्रमास मी उद्युक्त झालो आहे.

सर्व क्षेत्रांप्रमाणे विद्येच्या व विद्यापीठाच्या क्षेत्रात नुसते प्रकल्पच वा तत्सम योजना हाती घेतल्या जाव्या असे नाही, तर त्यापेक्षा अधिक मूलभूत व महत्त्वाचे असे काही कार्य व्हावे अशी शासन तसेच विद्यापीठ-अनुदान मंडळ यांची इच्छा दिसते. निरनिराळ्या भाषांसाठी विद्यापीठांतून उच्चतर विद्याकेंद्रे निर्माण व्हावीत, संशोधन-कार्य अधिक जागरूकतेने व सूत्रबद्धरीतीने चालावे अशीही एक योजना विचाराधीन दिसते. त्यादृष्टीने पाहिले तर हा विषय अधिकच महत्त्वाचा ठरतो. या उपक्रमांनी ह्या देशातील वाङ्मयीन विद्वत्तेला एक घाट यावा, तिची प्रतिष्ठा वाढावी हे अपेक्षित आहे.

आताच उल्लेखिलेले जे सर्वंकष जागृतीचे लोण आहे, त्याचा परिणाम निर-निराळ्या विद्याशाखांवर असा होत आहे की, प्रत्येक विद्याशाखा व विद्याशास्त्र आपले स्वतःचे असे परिशासन किंवा ' डिसिप्लीन ' निर्माण करीत आहे. आणि त्या त्या क्षेत्रातील उच्चतर संशोधनपर लिखाणात ही शोधजाणीव किंवा 'डिसिप्लीन-कॉन्शसनेस' असावी अशी रास्त अपेक्षा धरली जाते. भाषेच्या व वाङ्मयाच्या क्षेत्रात तशी उपक्रमशीलता बरीच आहे; पण शोधपद्धतीच्या वा शोधानुशासनाच्या दृष्टीने आवश्यक अशी चर्चा क्वचितच चाललेली दिसते. त्यादृष्टीने सामाजिक शास्त्रे अधिक योजनापूरकतेने या क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. विद्यापीठे पीएच्.डी. सारख्या पदव्या प्रदान करीत आहेत, लहानमोठे लेखक आपले प्रबंध, ग्रंथ प्रकाशित करीत आहेत पण जो शोधशिस्तसाक्षेप हवा तो विरलत्वाने दिसून येत असल्याने ही प्रगती

थोडी वरवरचीच भासते. तेव्हा वाङ्मयक्षेत्रातील विविध परिक्षेत्रे व त्यांतील शोधानुशासनाच्या दृष्टीने येणाऱ्या विविध समस्या यांचा ऊहापोह होणे अगत्याचे वाटते.

शेवटी आणखी एका कारणाचा उल्लेख करावयास हवा. आज विद्येच्या व वाङ्मयाच्या क्षेत्रात नवा वर्ग येऊ घातलेला आहे, त्या अभ्यासकाच्या वर्गापुढे ह्या क्षेत्रातील विद्वत्तेचे चित्र अधिक सुस्पष्टपणे उभे करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. तसेच हे सारे विवेचन मराठीत अद्यापपर्यंत झालेले नाही हे जाणवते.

विद्येच्या व वाङ्मयाच्या क्षेत्रात शिरणाऱ्या नवागत वर्गासाठी वाङ्मयीन विद्वत्तेचा या प्रकारचा ऊहापोह करणे का आवश्यक आहे ह्याची थोडया खोलात जाऊन पाहणी करणे अवश्य आहे. इंग्लंडप्रणीत समीक्षाशास्त्रात 'वाङ्मयीन विद्वत्ता' असा शब्दप्रयोग वापरला जात नाही हे आपण पाहिले. त्याला काही ऐतिहासिक कारणे आहेत, त्यांचे विवेचन ह्या संदर्भात उपयुक्त होईल. इंग्लंड-फ्रान्स आदी युरोपीय देशांतल्या संस्कृतीची व ज्ञानाची जडणघडण आधुनिक कालात ग्रीक व रोमन या संस्कृतींच्या वारशाने झालेली आहे; त्यामुळे आधुनिक भाषा व वाङ्मय यांची उभारणी व अभिवृद्धी होत असता प्राचीन संस्कृतीच्या आदर्शाने इतिहासाच्या ओघात आधुनिक विद्वत्तेची व वाङ्मयाची परंपरा थोडयाफार स्वाभाविकपणेच तेथे निर्माण झाली. सर्जनशील लेखन करणारे लेखक, विचारप्रधान व शास्त्रीय स्वरूपाचे लेखन करणारे लेखक, तसेच प्राचीन व आधुनिक भाषांचे व वाङ्मयाचे अभ्यासक आणि वाङ्मयसमीक्षक यांच्या परंपरा तिकडे आपोआप व थोडयाफार स्वतंत्ररीतीने निर्माण झाल्या व वाढीला लागल्या. नव्या जुन्या विद्यापीठांनी त्यांना हातभार लावला आणि वाङ्मयीन चर्चेला प्राधान्य देणारे क्रिटिसिझम, समीक्षा ऊर्फ टीकाशास्त्र यासारखे एक व्यापक शास्त्र त्यांनी निर्माण केले. त्याची उभारणी व प्रगती इतिहासाच्या क्रमात थोडयाफार स्वाभाविकरीतीने झाल्याने वाङ्मयीन विद्वत्तेची अमेरिकाप्रणीत सर्वंकष संकल्पना इंग्लंडच्या प्रभावाखालील व युरोपातील राष्ट्रांत जोर धरू शकली नाही. तोच वारसा इंग्लंडच्या राजकीय व सांस्कृतिक प्रभावातून आपल्याकडे आल्याने येथेही वाङ्मयीन विद्वत्तेची सर्वंकष संकल्पना रुजली नाही व वाढीस लागली नाही.

इंग्लंडपासून व युरोपपासून फुटून निघालेल्या अमेरिकन राष्ट्राची परिस्थिती भिन्न होती. युरोपमधील निरनिराळ्या देशांतील लोकांनी एकत्र येऊन हे नवे राष्ट्र निर्माण केले. या राष्ट्राची भाषा इंग्रजी झाली आणि युरोपच्या सांस्कृतिक परंपरेचा वारसा अपरोक्षरीतीने ह्या राष्ट्रापर्यंत आला तरीपण प्रत्येक क्षेत्रात नव्या उभारणीचा प्रश्न जेव्हा निर्माण झाला तेव्हा ह्या राष्ट्राला आपल्या परिस्थितीस अनुरूप अशी वेगळी भूमिका घेणे अवश्य झाले.

स्वतंत्र झाल्यानंतरचे पहिले शतक नवनवीन प्रदेश स्वत:च्या अमलाखाली आणणे व नव्या परिस्थितीशी जमवून घेणे यात गेले. त्यानंतर जीवनाला जेव्हा सुस्थिरता व संपन्नता प्राप्त झाली तेव्हा विद्या, कला, वाङमय यांच्या अभिवृद्धीचा प्रश्न निघाला त्यावेळी युरोपीय पद्धतीची विद्यापीठे व अभ्यासक्रम सुरू झालेही. पण काही कालानंतर प्रत्येक क्षेत्रात त्यांची अपूर्णता कालबाह्यता जाणवू लागली, आणि आपली स्वतंत्र मनोवृत्ती, परंपरा आणि परिस्थिती ह्यांना अनुरूप असा विद्वत्तेच्या व वाङमयाच्या क्षेत्रास घाट देणे अवश्य वाटले. या प्रयत्नांतूनच वाङमयीन क्षेत्रासाठी वाङमयीन विद्वत्तेचा मूलग्राही विचार करण्याची गरज तेथे निर्माण झाली. अशी गरज निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण असे की, जो नवागत वर्ग विद्यापीठे, विद्या व वाङमय यांच्या कक्षांत आला तो युरोपच्या पूर्वकालीन परंपरेला पूर्णपणे पारखा झालेला होता. त्यामुळे वाङमयक्षेत्रातील युरोपीय विद्वत्तेच्या परंपरेचा तादृश उपयोग नव्हता. नवागतांसाठी सर्वच क्षेत्रांप्रमाणे वाङमयीन क्षेत्राचीही नव्याने उभारणी करणे आवश्यक झाले. त्यावेळपर्यंत विद्यापीठांतून चालू असलेल्या युरोपीय जर्मन पद्धतींचे पुराणेपण लक्षात आल्याने त्यांचा परित्याग करून व वाङमयीन विद्वत्तेची नवी संकल्पना नवागतांपुढे ठेवून या क्षेत्रास अधिक नीटस व शास्त्रशुद्ध स्वरूप देणे त्यांना अवश्य वाटले.

आपणाकडील विद्येच्या व शिक्षणाच्या क्षेत्रात आज येणारा नवागतवर्ग पुष्कळसा तत्कालीन अमेरिकीय नवागतवर्गाप्रमाणे आहे. इंग्रजी राज्य प्रस्थापित झाल्यानंतर शिक्षणक्षेत्रात जो नवा जमाना सुरू झाला त्यात आधुनिक कालात विद्या, ज्ञान, वाङमय, कला यांचे स्वरूप युरोपच्या (विशेषत: इंग्लंडच्या) धर्तीवर ठरविण्यात आले हे सर्व प्रसिद्ध आहे. हे नवे ज्ञान व नवी संस्कृती आत्मसात करणारा नवा मध्यमवर्ग या देशात निर्माण झाला, त्याने इंग्रजी आदर्शाचा यशस्वी अवलंब केला. पण सामान्यत: असे दिसते की, हा नवा मध्यमवर्ग भारतीय संस्कृतीतील विद्या, कला वाङमय यांना तसा पारखा झालेला नव्हता, म्हणजे पुनरुज्जीवनाच्या कालात युरोपमध्ये प्राचीन ग्रीक रोमन संस्कृतीचा वारसा घेऊन आधुनिक युरोपीय भाषा व वाङमय सिद्ध झाले, तसेच थोडेफार येथे घडले. प्राचीन संस्कृतीच्या वारशापासून फारसे दूर न राहता आधुनिक युरोपीय संस्कृतीची विधायक तत्त्वे आत्मसात करण्याचा प्रयत्न येथे आजपर्यंत झाला व तो बराच यशस्वीही झाला.

परंतु इंग्रजांच्या व इंग्रजी भाषेच्या परकेपणामुळे ज्ञान, विद्या, वाङमय यांच्या प्रसाराचे क्षेत्र मर्यादितच राहिले. स्वातंत्र्याचे पाव शतक उलटेपर्यंत ते तसेच होते. पाव शतकानंतर आज विद्येच्या, ज्ञानाच्या व वाङमयाच्या क्षेत्रात जो नवागत वर्ग शिरत आहे, त्याच्यापर्यंत प्राचीन भारतीय ज्ञानविद्येचा वारसा आलेला नाही. त्याचप्रमाणे प्रवचन, कीर्तन इ. मार्गांनी जे कार्य पूर्वी होत होते तेही थांबले आहे व म्हणूनच

अमेरिकेतील तत्कालीन मध्यमवर्गाप्रमाणे त्याची अवस्था आहे. साहजिकपणे या वर्गासाठी विद्या, ज्ञान, वाङ्मय यांच्या क्षेत्रांची मांडणी नव्याने करणे अवश्य झाले आहे. ज्ञानेश्वर–तुकारामांची स्थूल शिकवण व महाभारत–रामायणातल्या कथा यांपलीकडे त्याच्या वारसात्मक ज्ञानाची व्याप्ती गेली नाही. अशा नवागत वर्गातून येणाऱ्या वाङ्मयाभ्यासकासाठी वाङ्मयक्षेत्राचे पुनरावलोकन करून त्याची पुनर्रचना करणे अवश्य झाले आहे. तसे केले तरच यापुढील काळात वाङ्मयक्षेत्रीय हालचालींत, उपक्रमांत एकप्रकारची सुसूत्रता येईल व नवागतांना वाङ्मयीन विद्वत्तेचे व विद्वत्तेच्या नवध्येयांचे दर्शन घडेल व त्यांच्या प्रज्ञाप्रतिभेला ते आवाहन देत राहील. एवढे विस्ताराने विवेचन करण्याचे कारण असे की, वाङ्मयीन विद्वत्ता असे म्हटल्यानंतर विद्वत्त्व आणि कवित्व यांच्यासारखा हा विषय असावा अशी कल्पना होईल तिचे निराकरण व्हावे. विद्वत्त्व व कवित्व या वा तत्सम विषयांचा थोडा ऊहापोह विवेचनाच्या ओघात पुढे येईल पण तो आनुषंगिक होय. थोडक्यात वाङ्मयविद्येच्या अभ्यासक्षेत्रांचे स्वरूप, त्यांची परंपरा व तत्संबद्ध असणारी निरनिराळी परिक्षेत्रे, त्या परिक्षेत्रांशी संबंधित असणारे तात्त्विक प्रश्न व त्यांच्या स्वतःच्या शोधानुशासनांचा (डिसिप्लीन्स) प्रश्न अशा विविध विषयांचे विवेचन ह्या ठिकाणी अभिप्रेत आहे.

## : ४ :

वाङ्मय आणि त्याचा अभ्यास ह्या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. वाङ्मय-निर्मितीशी विद्वत्तेचा संबंध कोणता आहे हे विवाद्य असले तरी तिचा विद्वत्तेशी अजिबात संबंध नसतो असे म्हणता येणार नाही. वाङ्मयनिर्मितीची कारक शक्ती प्रतिभा आहे, हे सर्वमान्य असले तरी मनाच्या इतर शक्तींप्रमाणे ती एक शक्ती असून तिच्या द्वारे होणारी ' नवनिर्मिती ' ही प्रामुख्याने चिंतन, अवलोकन आणि शब्दांकन यांवर अवलंबून असते. मनुष्याच्या विचारक्रियेशी तिचा जवळचा संबंध आहे. याचा अर्थ, ती विद्वत्तेला दूरची नाही. म्हणजेच वाङ्मयाची निर्मिती, त्याचे आकलन आणि त्याचा अभ्यास यांच्याशी विद्वत्तेचा संबंध जवळचा आहे. विहंगमात्मक दृष्टीने पाहू गेले तर वाङ्मय व विद्वत्ता यांचे संबंध वेगवेगळ्या काळी वेगवेगळ्या प्रकारचे होते असे दिसते. वाङ्मयाची ज्याप्रमाणे इतिहासक्रमाबरोबर उत्क्रांती होत आली, त्याप्रमाणे विद्वत्तेचीही. अभ्यासकाच्या भूमिकेवरून या दोहोंचे परस्परसंबंध पाहणे उद्‌बोधक होईल. मानवी मन व मानवी जीवन ह्यासंबंधीच्या ज्ञानामध्ये जी सतत वाढ होत आलेली आहे; तिच्यामुळे वाङ्मयीन विद्वत्तेचेही स्वरूप बदलत आले आहे.

वाङ्मयाचा अभ्यास आणि वाङ्मयनिर्मिती या दोहोंच्या प्रदीर्घ व अतिप्राचीन परंपरेतून एक स्वयंसिद्ध असा ज्ञानाचा संचय तयार झालेला आहे. माणसाच्या सर्जनशील शक्तीचे शब्दरूप आविष्करण या दृष्टीने ललित वाङ्मयाचा अभ्यास होत असला, तरी ती भूमिका आजची आहे. निर्मितिप्रधान वाङ्मयाची, बुद्धिगम्य होईल अशी चर्चा दीर्घकालापासून होत आलेली आहे. आणि ह्या उलटसुलट व कित्येकदा तलस्पर्शी चर्चेतून वाङ्मयीन विद्वत्ता अस्तित्वात आलेली आहे. वाङ्मयाइतकीच या वाङ्मयीन विद्वत्तेची परंपरा जुनी आहे. किंबहुना आधुनिक युग सुरू होईपर्यंत मनुष्याची सर्वांगीण विद्वत्ता आणि वाङ्मयीन विद्वत्ता ही दोन्ही अविभाज्य मानली जात असत. प्राचीन ग्रीस, रोमन, भारत, चीन इ. देशांतील ज्ञानाच्या परंपरा वाङ्मयीन विद्वत्तेनेच टिकविल्या आहेत. वाङ्मयीन विद्वत्तेच्या ह्या सर्वंकषतेमुळेच देशाच्या शिक्षणात वाङ्मयीन विद्वत्तेच्या संगोपनालाच बरेच महत्त्व दिले जात असे.

परंतु विज्ञानाच्या प्रभावामुळे व त्याच्या तितक्याच सर्वंकष आक्रमणामुळे मनुष्याच्या ज्ञानसाधनेचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. त्यामुळे वाङ्मयीन विद्वत्तेचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक झाले आहे. कोणत्याही देशाच्या ज्ञानपरंपरेत वीरवृत्तीचा आविष्कार करणारी महाकाव्ये, नाटचप्रबंध, तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ इत्यादींना असाधारण महत्त्व आलेले आहे. आजच्या पृथगात्मक दृष्टीला ह्यांच्या स्वरूपरचनेतील वेगळेपणा जाणवत असला तरी पूर्वी तो जाणवत नसे. विज्ञानाचे व औद्योगिक युगाचे आगमन होऊन बराच काल लोटेपर्यंत शिक्षण हे प्रायः वाङ्मयप्रधानच होते. सभ्यतेचे संस्कार झालेली व्यक्ती निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय मानले जात होते, आणि त्यासाठी कालपरवापर्यंत सर्वत्र एकप्रकारच्या वाङ्मयप्रधान अभ्यासक्रमांची योजना केली जात असे. सभ्यतावृत्ती अंगी बाणलेले व्यक्तित्व निर्माण होण्यासाठी ते आवश्यक मानले जात असे. (उलटपक्षी आजचे अभ्यासक्रम हे विषयांचे तज्ज्ञ—एक्स्पर्ट—निर्माण करणारे आहेत.) पूर्वीच्या शिक्षणात बुद्धिप्रधानता (विवेक) व चारित्र्य एकत्रितरीत्या परिणामकारी मानले जात असे. त्याचा उगम ग्रीसमध्ये होता, युरोपातील पुनरुज्जीवनाच्या कालखंडात त्याचे उज्जीवन झाले व नंतरच्या शतकांतून झिरपत ते व्हिक्टोरियन युगापर्यंत आले. 'ए स्कॉलर, ए जंटलमन, ए ख्रिश्चन'[1] असे शिक्षणाचे ध्येय होते व ब्रिटिशांच्या राज्याद्वारे ते आपणाप्रत आले.

अशा रीतीने जगाची ज्ञानपरंपरा ही प्रामुख्याने वाङ्मयीन आहे. निदान ती कालपर्यंत तरी तशी होती, आणि साहजिकपणे आजच्या विज्ञानप्रधान, व ज्ञानक्षेत्रांचे पृथकत्व मानणाऱ्या जगात ती आज कोणत्या स्वरूपात टिकविणे शक्य व आवश्यक आहे, ह्याचा विचार व्हावयास हवा.

: ५ :

विज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे ज्ञानक्षेत्रातील विविध संकल्पना जरी बदलल्या असल्या तरी माणसाच्या आदर्शाविषयीच्या प्रतिमा प्राय: स्थलकालनिरपेक्ष असतात, त्यांत तसा बदल होत नसतो. उदाहरणार्थ, आजच्या आदर्श नागरिकांची प्रतिमा प्राचीन तत्सम प्रतिमेशी जर पडताळून पाहू लागलो तर त्या दोन्ही एकमेकांना पुष्कळशा मिळत्याजुळत्या आहेत असे दिसून येईल. भगवद्गीतेतील स्थितप्रज्ञ, ज्ञानेश्वरीतील ज्ञानी भक्त व रामदासांचा उत्तम पुरुष यांची चित्रे आजच्या आदर्श नागरिकाशी बरीच मिळतीजुळती अशी वाटतील. विद्वान किंवा स्कॉलरबाबत असेच म्हणता येईल. आजचा खरा विद्वान हा प्राचीन कालीन विद्वानासारखाच असणे शक्य आहे. नॉर्मन फॉर्स्टर हे आपल्या 'लिटररी स्कॉलरशिप' या ग्रंथात प्रारंभी लिटररी स्कॉलरची व्याख्या देताना— A man of intellegence, is one who is wellversed in literature[2] — हे लाँजीनसचे वाक्य उद्धृत करतात. पुढे ते म्हणतात— "and who is continually growing in uuderstanding of the intellectual artistic aspects of his subject ".[3] ॲरिस्टॉटल् अशा प्रकारचा स्कॉलर होता. त्याचे व त्याच्यासारख्याचे ग्रंथ मागे पडतील असे ग्रंथ अद्याप निर्माण झालेले नाहीत. They are still the scholar's best text-books.[4] अशा रीतीने विद्वत्तेच्या अंतिम आदर्शाबाबत तसे काही फारसे नवीन म्हणता येण्यासारखे नाही. आजच्या विज्ञानप्रधान वातावरणात वाढलेल्या पिढीने तेथपर्यंत कसे जावयाचे हा खरा प्रश्न आहे.

भारताचा प्राचीन कालखंड हा सर्वत्र दृष्टींनी अभूतपूर्व किंवा अपवादभूत म्हणावा लागेल. कारण या कालात मानवी प्रतिभेला व प्रज्ञेला जे घुमारे फुटले आहेत, तो मानवजातीचा श्रेष्ठतर वारसा होय. रामायण–महाभारतासारखी रचना ही कोण्या कवीने केली असे म्हणण्यापेक्षा, रवींद्रनाथ टागोरांनी म्हटल्याप्रमाणे भूमीतून वृक्ष जसा निर्माण होतो, त्याप्रमाणे या भारतीय संस्कृतीच्या भूमीतून ती रचना 'निर्माण' झालेली आहे. 'येथे काव्य, तत्त्वज्ञान, नीति, चारित्र्य, तत्त्वशोधन, परमार्थ ही सारी एकजीव झालेली आहेत.'[5] असा हा मानवजातीचा अभूतपूर्व ठेवा, वारसा, प्रकृतीने वाङमयीन मानला जातो, म्हणून वाङमयीन विद्वत्तेवरच्या ह्या विवेचनात त्याला महत्त्वाचे स्थान आहे.

रामायण, महाभारत व उपनिषदांचे कर्ते हे ऋषीमुनी ज्ञानी असत. 'कवि' ह्या शब्दाचा अर्थ ज्ञानी असाच आहे. या कालात कवी हा ज्ञाता, द्रष्टा, तत्त्वज्ञ सर्व काही असे. तो समाजाचे नेतृत्व करीत असे. समाजाच्या व व्यक्तीच्या

जीवनासाठी आवश्यक अशा धर्म, सदाचार, कर्तव्य, तत्त्वनिष्ठा इ. सारख्या नीतिगुणांबरोबरच शौर्य, धैर्य तितिक्षा, शहाणपणा, वात्सल्य इ. व्यक्तिगुणांचा विकास होण्याची जबाबदारी त्यांच्यावर असे, त्यामुळे ह्या आरंभीच्या कालात काव्य वा वाङमय आणि विद्वत्ता यांचे अविभाज्यत्व प्रस्थापित झाले होते. वरील गुणांच्या दृष्टीने त्यांचे ग्रंथ आजही अभ्यसनीय ठरले आहेत, याचे कारण वरील गुणांबरोबरच वाङमयगुणांनीही हे ग्रंथ मंडित आहेत, हे होय. केवळ वाङमयगुणांकरताही ते आज आदरिले जातात.

या गुणवत्तेच्या प्रकर्षाला आणखी एक कारण आहे. हे वाङमय आजच्या परिभाषेतील सर्वसामान्यांकरिता लिहिलेलेच नाही. तर ते अत्यंत सुविद्य अशा विशिष्ट वर्गाकरिता, त्यातील व्यक्तींकरता लिहिलेले आहे. कित्येकदा ती व्यक्ती राजा असेल. महाभारत हे पांडवांच्या वंशजांच्या माहितीकरता रचले गेले, रामायणाचे गायन त्याचे पुत्रच करतात, उपनिषदे ही गुरुशिष्य संवादात्मक आहेत. ती सुविद्य व बुद्धिमान शिष्यांकरिता लिहिली आहेत. आपणांप्रमाणेच पाश्चात्य राष्ट्रांचीही परिस्थिती फारशी भिन्न नाही. ग्रीक ग्रंथकारांचे ग्रंथ सुविद्य अशा मोठ्या समुदायाकडून अभ्यासिले जात असले तरी रोमन लेखकांनी आपले ग्रंथ हे अल्पसंख्य सुविद्यांकरिताच लिहिलेले आहेत. या कालात विद्वत्ता व वाङमय यांचे अविभाज्यत्व मान्य केले जात असे. कारण या कालातली प्रतिभापूरित रचना ही विद्वत्तेने तेजाळलेली आहे.

वाङमयीन विद्वत्तेच्या विकसनाच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा कालखंड म्हणजे प्राचीन कालानंतर मध्ययुग संपून आधुनिक युग सुरू होण्याचा 'विद्येच्या पुनरुज्जीवनाचा' होय. 'रेनेसान्स' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चळवळीला तिच्यामधील चिकित्सक वृत्तीच्या आविष्कारामुळे व व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेच्या पुरस्कारामुळे आज 'प्रबोधनाची चळवळ' असे म्हटले जाते. रेनेसान्स म्हणजे मानवजातीचा पुनर्जन्म, या अर्थाने 'प्रबोधन' हे नाव ठीक असले तरी या चळवळीला पूर्वी 'विद्येचे पुनरुज्जीवन' असे म्हटले जात असे. तेच नाव या ठिकाणी आपल्या विषयाच्या संदर्भात अधिक समर्पक होईल. वाङमयीन विद्वत्तेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ह्या कालखंडाचे महत्त्व अनन्य आहे. ॲरिस्टॉटल् आदि श्रेष्ठ ग्रीक ग्रंथकारांचे ग्रंथ अरब लोकांनी केलेल्या त्यांच्या भाषांतरांद्वारे युरोपात अभ्यासिले जात असत. मधल्या काळात निरनिराळ्या ख्रिस्तधर्मीय पंडितांनी ॲरिस्टॉटल्चे तत्त्वज्ञान ख्रिश्चन तत्त्वज्ञानाला मिळतेजुळते करण्याचाही प्रयत्न केला. या उपक्रमास 'स्कॉलॅस्टिसिसम' असे म्हटले जाते. परंतु कॉन्स्टॅन्टिनोपल हे शहर तुर्कांच्या हाती पडल्यानंतर तेथून परागंदा झालेले विद्वान जेव्हा युरोपमधील निरनिराळ्या विद्येच्या माहेरघरी जाऊन स्थायिक झाले, तेव्हा

त्यांनी मुळातले ग्रीक ग्रंथ तेथे लोकांना शिकवावयास सुरवात केली, विद्येची नवी केंद्रे निर्माण केली व अशा रीतीने ग्रीक विद्येचे, वाङमयाचे व तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन सुरू झाले. ग्रीक ग्रंथ, त्यांची भाषांतरे, त्यांच्यांवर भाष्य या सर्व मार्गांनी युरोपात एक चैतन्यमय असे नवे वातावरण निर्माण झाले. इरॅसमस, मूर, कॉलेट इत्यादींनी या कार्यासाठी आपणांस वाहून घेतले व आधुनिक कालातील प्राचीन ग्रंथांच्या संशोधनाचा पाया त्यांनी घातला.

सर्वच दृष्टींनी पाहता 'विद्येच्या पुनरुज्जीवना'च्या चळवळीचे वाङमयीन विद्वत्तेच्या उभारणीत व विकसनात अनन्य महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन ग्रीक, लॅटीन ग्रंथ शोधून काढणे, त्यांच्या संहिता तयार करणे, त्यांची शास्त्रशुद्ध व विश्वसनीय प्रत तयार करणे व छापणे, त्याचप्रमाणे त्यांचे भाषांतर व विवरण करणे, ह्या वाङमयीन विद्वत्तेचा पाया मानणाऱ्या गोष्टी या चळवळीच्या निमित्ताने सर्वसंमत झाल्या. एक प्रकारच्या प्रचारकाच्या उत्साहाने (मिशनरी झील) कार्याला लागलेल्या ह्या विद्वानांनी जुने ग्रंथ व त्यांची हस्तलिखिते मिळवण्याचा एवढा साक्षेपी प्रयत्न केला की, त्यांना 'जुन्या हस्तलिखितांचे पारधी' (हंटर्स ऑफ मॅन्युस्क्रिप्टस्) असे गौरवाने म्हटले जाते. त्यांनी केलेल्या ग्रीक, लॅटिन इ. भाषांतील ग्रंथांच्या भाषांतरांतूनच आधुनिक भाषांचे भाषांतरयुग निर्माण झाले व त्याने आधुनिक भाषा आणि प्राचीन वाङमय व संस्कृती यांची सांधेजोड केली. यांपैकी काही-जण केवळ ग्रीक, लॅटिनमध्ये पारंगत असत, पुढे पुढे या भाषा जसजशा लोक-प्रचारातून बाजूला झाल्या, तसतशा आधुनिक युरोपीय भाषा पुढे सरकू लागल्या. या नव्याने पुढे येऊ लागलेल्या भाषांना त्यांच्या प्रारंभिक अवस्थेत संपन्न करण्याचे कार्य याच चळवळीच्या पुढाऱ्यांनी केले आहे. इरॅसमस, मूर, कॉलेट, पॉलिझिअॅनो, पेट्रार्क यांचीच परंपरा युरोपीय वाङमयीन विद्वत्तेने प्रमाण मानली व पुढे चालू ठेवली.

रॉजर व फ्रॅन्सिस बेकन इ. सारखे नवविचारप्रवर्तक ह्या चळवळीने निर्माण केलेले असले तरी, पुढे झालेल्या, व्हॉल्टेअर, डॉ. जॉनसन, लेसिंग या युरोपीय विद्वानांनी इरॅसमस आदींची परंपरा पुढे चालविली. ह्या परंपरेमुळेच वाङमयीन विद्वत्ता म्हणजे प्रामुख्याने जुनी हस्तलिखिते शोधून काढणे, जुन्या ग्रंथांचे पाठभेद ठरविणे, भाषांतर करणे, लेखकाच्या स्थलकालाचा तर्कशुद्ध व निराग्रही भूमिकेने शोध घेणे, असे समीकरण युरोपीय देशांत दृढमूल झाले, आणि वाङमयीन विद्वत्तेचा हा एकच पैलू त्यांना महत्त्वाचा वाटला. साहित्यसमीक्षेसारखे शास्त्र नव्याने विकसित झाले तरी, ह्या वाङमयीन विद्वत्तेच्या विशिष्ट परंपरेमुळे त्याची व या वाङमयीन विद्वत्तेची सांगड घालावी, समन्वय करावा असे युरोपीय वाङमयकारांना पुष्कळ काळ वाटले नाही. आजच्या वाङमयीन संशोधनाचा पाया या आधुनिक

कालाच्या प्रणेत्यांनी घातला आहे. युरोपीय कल्पनेप्रमाणे 'स्कॉलरशिप' किंवा विद्वत्तेचा वाङ्मयाशी संबंध हा एवढाच आहे. अर्थात तो अतिशय महत्त्वाचा आहे, हे मान्य झालेले आहे.

विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीने माणसांच्या विचारधारणेत फार मोठा फरक घडवून आणला. प्राचीन ग्रीक ग्रंथकारांच्या साहित्याचा अभ्यास ऐहिक व मानवी दृष्टीतून होणे आवश्यक आहे, असा विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या पुरस्कर्त्यांनी आग्रह धरला. प्राचीन कालीन धर्माच्या बंधनांतून मनुष्यजातीला सोडविण्याचा तो एक उपक्रम होता, म्हणून त्यांना मानवतावादी—ह्यूमॅनिस्ट—असे रास्तपणे म्हटले जाते. प्राचीन ग्रीक ग्रंथांतून आलेल्या ज्ञानाला त्यांनी 'ह्यूमॅनिटीज' —मानव्यशास्त्रे—अशी संज्ञा दिली व ती आजही ज्ञानक्षेत्रामध्ये प्रमाण मानली जाते. ही संज्ञा धर्मप्रणवत्तेच्या व विशेषतः तीतील दिव्यत्वाच्या विरुद्ध आहे. त्यापूर्वी शास्त्रे ही धर्मप्रधान शास्त्रे किंवा 'दिव्यताप्रधान' शास्त्रे (डिव्हिनिटीज) म्हणून ओळखली जात. त्यांच्या विरुद्ध ही 'मानवप्रधान शास्त्रे' म्हणून त्यांनी उभी केली आणि आजच्या इहवादी मानवहितप्रधानतेचा पाया घातला.

त्याचबरोबर माणसाची नवी प्रतिमा 'रेनॅसान्स'ने किंवा पुनरुज्जीवनाच्या चळवळीने तयार केली. ही नवी प्रतिमा शिक्षणक्षेत्रासाठी प्रमाण मानली जाऊ लागली व विज्ञानक्षेत्राच्या सर्वांगीण आक्रमणानंतरच ती बदलत जाऊ लागली. अनेक गुणांचा विकास व्यक्तीने करून घ्यावा. म्हणजे विज्ञानप्रधानता, श्रेष्ठ मानवी सद्‌गुण, कलात्मकता या गोष्टी माणसाने आत्मसात करावयास हव्या, अशाप्रकारचे हे ध्येय होते. मनुष्य हेच या विश्वातील अंतिम गणक असेल तर ते मनुष्यत्व परिपूर्ण हवे, म्हणजे निरनिराळ्या शक्तींचा विकास मनुष्याच्या ठिकाणी झाला असला पाहिजे, असा हा आग्रह आहे. मनुष्य एखाद्या क्षेत्रात तज्ज्ञ झाला तरी त्याला परिपूर्णता आणण्यासाठी दुसऱ्या तज्ज्ञाची गरज लागेल. **म्हणजे अपूर्णता राहिलीच**. या ध्येयाप्रमाणे काही मोठी माणसे रेनेसान्सने निर्माण केली. लिओनॉर्डो द व्हिन्सी हा चित्रकार, शिल्पकार, इंजिनिअर व शास्त्रीय शोधक होता; वॉल्टर रॅले हा धाडसी प्रवासी, कवी, इतिहासकार होता; तर थॉमस कॅंपियन हा वैद्य, कवी व गीतकार होता. या सर्व गोष्टींमुळे ह्या कालाला वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रातही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

आपल्याकड या प्रकारचे पुनरुज्जीवन एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकात सुरू झाले. विशेषतः मुद्रणाच्या शोधानंतर वृत्तपत्रे निघाली, आणि निर्णयसागर छापखान्याने जुनी संस्कृत काव्ये, नाटके व इतर ग्रंथ छापून काढले. जुने ग्रंथ संपादन करून छापण्याचे उपक्रम अनेक झाले त्यांत 'काव्येतिहाससंग्रह', 'ज्ञानप्रसारक' इ. नियतकालिकांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. इंग्रजीतल्याप्रमाणे

आपल्या देशात या कालात व विशेषतः मराठीत भाषांतर-युग झाले आहे. त्याचप्रमाणे युरोपने आधुनिक कालात प्रवेश करीत असता आपल्या परंपरेतील ग्रीक, लॅटिन विद्यांचा अभ्यास केला, तसे येथे होण्यासाठी प्राचीन भारतीय भाषा व ग्रंथ यांचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई, कलकत्ता इत्यादि ठिकाणी शाखाही निघाल्या. प्रारंभी प्रारंभी या जागृतीचे नेतृत्व युरोपियन विद्वान व ईस्ट इंडिया कंपनीचे ज्ञानप्रेमी नोकर यांच्याकडे होते. पुढे संस्कृत, अरेबिक इ. प्राचीन भाषा, विरुद्ध आधुनिक युरोपीय विद्या असा वादही निर्माण झाला व गाजला. आणि राममोहन रॉय, लोकहितवादी आदी तत्कालीन सुधारकांनी आधुनिक विद्यांच्या बाजूने मत दिले. मेकॉलेच्या खलित्यानेही महत्त्वाचे काम केले आहे. पुढे इ. स. १८५७ मध्ये मुंबई, मद्रास व कलकत्ता ही विद्यापीठे स्थापन झाली. त्यांतील पदवीचे अभ्यासक्रम तत्कालीन इंग्लंडमधील विद्यापीठांतील अभ्यासक्रमांप्रमाणे भाषाप्रधान व सर्वांगीण विकासप्रधान आखले गेले. (त्यातूनच न्या. मू. रानडे यांच्यासारखे चतुरस्र विद्वान निर्माण झाले.) प्रत्यक्षात या नव्या शिक्षणाचा परिणाम होऊन नवजागृती होण्यासाठी एकोणिसाव्या शतकाचे शेवटचे चतुर्थक उजाडावे लागले. अशारीतीने नवविचारजागृती व वाङ्मयीन विद्वत्ता यांचे संबंध व विकासक्रम जवळजवळ सारखे आहेत. युरोपीय जागृतीक्रमात एकंदर उत्क्रांती होण्यास दोन-तीन शतकांचा अवधी मिळाला. उलट या देशात मात्र तीच क्रिया केवळ ७५।८० वर्षांत आणि थोडचा फार कृत्रिमतेने घडून आलेली आहे, त्यामुळे निरनिराळ्या अवस्थांचे आरेखन तारतम्यानेच करावे लागते.

## : ६ :

विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीनंतर युरोपात विज्ञानाचे युग सुरू झाले. जीवनात क्रांती घडवून आणणारे निरनिराळे शोध लागले होते, त्यांत मुद्रणाचाही शोध येतो. त्या शोधामुळे विद्येचे व वाङमयाचे स्वरूप आमूलाग्र बदलले. बुद्धिवादाच्या विकासामुळे विज्ञानशास्त्रे निर्माण झाली. इतर अनेक छोटचा मोठ्या शोधांनी उद्योगधंद्यांचे युगमान सुरू झाले आणि जीवनाची धारणा आमूलाग्र बदलली. इतके दिवस केवळ स्वतःच्या वापरासाठी तयार करावयाच्या वस्तू यंत्रांच्या सहाय्याने निर्माण करण्यात येऊ लागल्या व त्यांची निर्मिती व्यापारासाठी होऊ लागली. मुद्रणाच्या प्रसाराबरोबर वाचकवर्गाची व्याप्ती वाढली, त्याप्रमाणेच ग्रंथलेखन प्रामुख्याने गद्यात होऊ लागल्याने निरनिराळी सामाजिक व वैज्ञानिक शास्त्रे अस्तित्वात आली. अशारीतीने सामाजिक क्षेत्रे सांस्कृतिक क्षेत्रे व ज्ञानक्षेत्रे यांचा तोंडवळा पूर्ण बदलला. तथापि, शिक्षणाचे स्वरूप मात्र तसेच

राहिले. म्हणजे रेनेसान्सच्या कालात जो आदर्श ठरविला तोच मान्य केला गेला. त्यामुळे विद्वान आणि कवी यांच्यांत जरी प्रकृतिभिन्नतेच्या पोटी आलेला फरक असला तरी त्यांच्यावर एकाच प्रकारचे संस्कार झालेले असल्याने ते एकमेकांना पूरक असत. एकाच शिक्षणक्रमातून बाहेर पडल्याने कवी हे चांगले विद्वान असत. 'Many poets were not only well-educated, but have substantial claims to be thought as scholars.[6]' असे एक मत. याचा परिणाम असा झाला की, विद्वान हे कवीपेक्षा श्रेष्ठ गणले जाऊ लागले. तेही स्वतःच्या मोठेपणाच्या एवढे घमेंडीत राहू लागले की, कवींना मार्गदर्शन करणे, त्यांच्या चुका दाखविणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, असे ते मानू लागले. बेंटले ह्या टीकाकाराने तर मिल्टनच्या 'पॅरॅडाइज लास्ट' ची आवृत्ती छापताना पूर्वीच्या आवृत्तीतील पाठ हे त्या ग्रंथाच्या छापखानेवाल्याने चुकीचे छापले, असे मानून दुरुस्तीसाठी आपले स्वतःचे पाठ सरळ सरळ छापून टाकले! डॉ. जॉनसननेही समकालीन कवींना धारेवर धरले होते हे प्रसिद्ध आहे. कित्येकदा कवीही हे टीकाकाराचे मार्गदर्शन आपणहून प्रमाण मानीत असे दिसते. टॅसो या इटालियन कवीचे उदाहरण मन अस्वस्थ करणारे आहे. त्याने आपण रचलेले एक महाकाव्य समकालीन विद्वानांच्या सल्ल्याप्रमाणे स्वतःच पूर्णपणे बदलले. पण हे असे बदलेले काव्यही विद्वानांना तेवढेच सामान्य वाटले! ब्राऊनिंगच्या 'ग्रॅमॅरियन्स फ्यूनरल' या कवितेवरून विद्वानांच्याविषयी कवीच्या मनात आदरभाव वसत असलेला दिसतो. व्हिक्टोरिया राणीच्या युगापर्यंत हा प्रभाव कमी झाला नव्हता असे दिसते.

तथापि समाजात विज्ञानाचे व उद्योगधंद्यांचे युगमान सुरू झाले होते. लोक-जीवन त्याच्याशी समरस होत होते. विज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत महत्त्वाचे क्रांति-कारक शोध लागल्याने सृष्टीचे स्वरूप बुद्धिगम्य रीतीने उलगडता येणे शक्य आहे, असा एक आशावाद निर्माण झाला आणि विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळापासून चालत आलेल्या वाङ्मय व तत्सम क्षेत्रातील बुद्धिमंतांचा दबदबा त्या प्रमाणात कमी होऊ लागला. ज्ञानाच्या व विद्येच्या क्षेत्रात 'रीसर्च' ऊर्फ संशोधन या गोष्टीस विशेष महत्त्व झाले. शिक्षणाची सर्वसामान्य चौकट कायम राहूनही अनेक विज्ञानशास्त्रांनी व सामाजिकशास्त्रांनी विद्यापीठाच्या म्हणजे विद्येच्या क्षेत्रात स्वतःला मानाचे स्थान प्राप्त करून घेतले त्यामुळे पूर्वीच्या एकसंध अभ्यासक्रमात अनेक शाखा निर्माण झाल्या, उच्च शिक्षितांच्यासुद्धा मनाची सांस्कृतिक घडण पूर्णपणे बदलली. 'Even highly educated circles have no longer the common basis of culture which still existed in the 19th century.[7]' असे सर मॉरिस बॉवरा म्हणतात, ते अर्थपूर्ण आहे. ग्रीक व लॅटिन या भाषांचे महत्त्व विद्यापीठातून केव्हाच कमी झाले होते व सर्वत्र अभ्यासक्रमांची उभारणी तज्ज्ञतेच्या (स्पेशलायझेशन) दिशेने होऊ लागली.

त्यामुळे शिक्षितवर्गाची एकसंधता भंग पावली. या परिस्थितीचा काव्यावर कोणता परिणाम झाला हे स्पष्ट करताना सर मॉरिस बावरा म्हणतात, 'The strength which poetry once drew from a single accepted and famliar tradition has been lost.[8]' आणि वाङमयीन दृष्टीने महत्त्वाचे असे दुसरे व 'स्वच्छंदवादी पुनरुज्जीवन' ऊर्फ रोमॅन्टिक रिव्हायव्हल सुरू झाले.

या दुसऱ्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीचा वाङमयावर व वाङमयीन विद्वत्तेवर अतिशय दूरगामी परिणाम झाला. वाङमयाच्या आणि वाङमयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात एक नवेच युगमान अवतीर्ण झाले. परंपरेच्या जोखडापासून काव्य पूर्णपणे मुक्त होऊ लागले. त्यामुळ कवीला आता परंपरेपेक्षा स्वतःच्या व्यक्तित्वावर अवलंबून राहण्याची आवश्यकता वाटली. परंपरेने आलेली प्रतीके व प्रतिमाने यांचा त्याग करून संपूर्णपणे नवी व स्वतःची अशी प्रतीके व प्रतिमासृष्टी त्यांना निर्माण करावी लागली. वर उल्लेखिलेले टीकाकार म्हणतात, "Poets, who are no longer trained in a knowledge of literary past, may not be unaware of scholarship, but may also regard it with enstranged and even suspicious eyes". [9]

म्हणजेच विद्वत्व आणि कवित्व यात केवळ एक प्रकारची दरी निर्माण झाली, असे नव्हे तर यांचा परस्परांशी काहीएक संबंध नाही, या गोष्टी परस्पर-विरोधी आहेत, असेही कित्येकजण मानू लागले. निबंधमालाकार चिपळूणकरांनी विद्वत्त्व आणि कवित्व हा विषय एका निबंधासाठी घेऊन त्यात कवित्वाची बाजू घेऊन केवळ विद्वान कवीपेक्षा अविद्वान कवीला श्रेष्ठ ठरविले आहे, एवढेच नव्हे तर अविद्वत्व हे कवीच्या श्रेष्ठपणाला पोषक ठरते, असा आपला अभिप्राय दिलेला आहे. हे त्यांचे मत ऐकांतिक असले तरी वाङमयाच्या क्षेत्रात पांडित्याची प्रतिष्ठा कमी झाल्याचे गमक आहे. ही प्रतिष्ठा कमी झाली ती कायमची कमी झाली. याचा एक परिणाम म्हणजे वाङमयाची विविध प्रकारची बुद्धिप्रधान चर्चा करणारे पण पारंपरिक वाङमयीन विद्वत्तेशी संबंध नसणारे असे नवे समीक्षा ऊर्फ टीकाशास्त्र युरोपमध्ये अस्तित्वात आले, वाढीला लागले. व टीकाकार हा नवा वर्ग अस्तित्वात आला.

नव्या स्वच्छंदवादी वृत्तीला जुने संकेत, गृहितकृत्ये सर्वस्वी अमान्य होती. कवीच्या ठिकाणी वेगळ्या व्यक्तित्वाची प्रभावी जाणीव निर्माण झाली व पारंपरिक यमनियमांची पर्वा न करता स्वतःच्या शब्दांत आपले व्यक्तित्व आविष्कृत करणे हा त्याचा जन्मसिद्ध अधिकार मानला गेला. स्वतःला आवश्यक वाटतील

व स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या आविष्कारासाठी पोषक असतील एवढ्याच नियमांचे बंधन प्रमाण मानले जाऊ लागले. आजही ही वृत्ती तेवढीच प्रभावी आहे. आणि या काळापासून काव्यक्षेत्रात विद्वत्तेचा विशेषतः पांडित्याचा जो एक प्रकारचा तिटकारा निर्माण झाला तो आजही कमी झालेला नाही.

या कालखंडातील कवींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काव्यात प्रतिभेचे (क्रिएटिव् इमॅजिनेशन) अनन्यत्व त्यांनी पुरस्कारिले, हे होय. वर्डस्वर्थ, ब्लेक्, कोलरीज्, कीट्स आदी कवींचा या 'इमॅजिनेशन'वर विलक्षण भर आहे. पूर्वकालीन विद्वत्तेच्या कल्पनेपासून काव्यास दूर नेणारे हे लक्षण आहे. वस्तुतः कोलरिज् हा आपल्यापरीने अत्यंत विद्वान होता. कीट्सला विद्वान होणे आवडले असते, पण त्यांचे काव्य विद्वत्तेच्या संकेतांत बसणारे नव्हे. ब्लेकचा आग्रह ह्यापेक्षा विलक्षण आहे. त्याच्या निश्चित आग्रही (अन्–कॉम्प्रमायजिंग) निष्ठेशी त्याची भूमिका साजेशी आहे. निर्मितिशीलतेवर त्याचा विलक्षण विश्वास आहे. त्याचे वेगळेपण त्याच्या पुढील ओळींतून विलक्षण प्रभावीपणाने व्यक्त झाले आहे.

I must Create my System or be enslaved by another man's.
I will not reason, compare, my business is to Create ".[10]

अशा प्रकारच्या असामान्य विश्वासामुळे हे लोक काव्याला नव्या नव्या क्षेत्रांचे दर्शन घडवू शकले व कल्पकतेच्या विश्वात नव्या नव्याच्या शोधार्थ मुक्त संचार करू शकले. केशवसुतांच्या कविप्रतिभाविषयक कवितांचा निर्देश या संदर्भात अर्थपूर्ण ठरेल.

या व्यक्तिकेंद्रित वृत्तीतूनच पुष्कळ पुढे पहिल्या युद्धानंतरच्या कालात 'शुद्ध काव्या' च्या कल्पनेचा उदय झाला. या संप्रदायाची भूमिका अशी आहे, " Poetry, deprived of accidental tappings and reduced to its essence, does not need, and in fact does not have a meaning which appeals to the intelligence, since its appeal is to something else. .. It creates a state which is not understanding but akin to the entraptured awe and wonder."[11] काव्याच्या अर्थाच्या सुगम-दुर्गमतेविषयी मराठीत आज जी चर्चा चालू आहे तीतील कवितेच्या **दुर्बोधतेची** पार्श्वभूमी ही अशी आहे. या प्रवृत्तीचे परिणाम अनेकविध स्वरूपांत दिसून येतात. पहिला परिणाम असा की, व्यक्तिमत्त्वाला साजेशी प्रतीके व प्रतिमा शोधण्याचे पर्यवसान पूर्णपणे खाजगी स्वरूपाची प्रतीके, प्रतिमा वापरण्यात झाले. म्हणजे काव्याचा अर्थ फक्त कवीशी संबंधित असणारालाच कळू शकतो. याचा परिणाम असाही होतो की, कविता, फक्त दुसरे कवी किंवा मित्रपरिवार यांच्याकरता निर्माण होते व सर्वसाधारण वाचक

म्हणजे अपरिहार्य संकट (नेसेसरी ईव्हल) मानण्याकडे प्रवृत्ती होते. अशा प्रकारे या अतिरिक्त व्यक्तिवादाच्या युगात आपण एका टोकाला येऊन पोहोचलो आहोत. या अडचणीतून वाङमयीन विद्वत्ता कसा मार्ग काढू शकेल, हे पाहण्यापूर्वी ह्या कालात वाङमयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात काय परिस्थिती होती हे पाहणे आवश्यक आहे.

स्वच्छंदवादी पुनरुज्जीवनाच्या ह्या कालखंडात काव्य व सर्जनशील वाङमय जसे पारंपरिक विद्वत्तेच्या बंधनापासून मुक्त होत होते, त्यात ज्याप्रमाणे एक प्रकारच्या उन्मुक्ततेची उर्मी प्रत्ययकारी रीतीने आविष्कृत झाल्यासारखी दिसते, त्याप्रमाणे विद्वत्तेच्या व वाङमयीन विद्वत्तेच्या क्षेत्रातही तिचे दर्शन वेगळ्या स्वरूपात घडते. अनिर्बंध स्वातंत्र्यवाद, आग्रही व्यक्तिवाद व उत्तुंग कल्पकता ह्या या चळवळीच्या प्रवृत्तिविशेषांचे दर्शन **विद्वत्तेच्या क्षेत्रातही** घडते. विद्येच्या पुनरुज्जीवनाप्रमाणे हेही पण एक 'पुनरुज्जीवनच' होते. प्राचीन कला, साहित्य, सौंदर्यस्थळे यांच्यांविषयी अत्यादराची भूमिका ह्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांत होती. विज्ञान व उद्योगसंस्कृती यांनी मानवी जीवनाची, मानवी मूल्यांची जी धूळधाण केली होती, तीमुळे नकलीपणा, दिखाऊपणा, यांविषयी एक प्रकारची घृणा मानण्याची प्रवृत्ती तेवढीच प्रबल होती. विद्वत्तेच्या क्षेत्रातही या प्रवृत्तीचे जे दर्शन घडते ते अभिनव असेच आहे. "The distinguishing virtue of the romantic spirit is breadth of sympathy, not strict truth; its favourite method is dreaming or devination, not a discipline"[12] असे या प्रवृत्तीचे वर्णन नॉर्मन फॉर्स्टर यांनी केले आहे. भाषा व साहित्य यांच्या क्षेत्रात ऐतिहासिक दृष्टिकोन, समीक्षाक्षेत्रात निर्णायकतेऐवजी रसोद्ग्राही वृत्तीवर भर, ही काही वैशिष्ट्ये वाङमयीन विद्वत्तेच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीप्रमाणे याही चळवळीला अखिल युरोपीय असे अंग आहे. श्लेषेरद्वय व हर्डर यांनी जर्मनीत ती सुरू केली, तिचे लोण मॅडॅम डी स्टाएल यांनी फ्रान्समध्ये, टेलर, कोलरिज्, कार्लाईल यांनी इंग्लंडात व टिकनर, हेज्, लाँगफेलो व लोवेल यांनी अमेरिकेत नेले.

विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालात प्राचीन ग्रीक व रोमन कला यांना आदर्श मानले जात असे, ते आदर्श **सर्व कालाकरिता** होत असे मानले जाई. स्वच्छंदवादी वृत्तीच्या अनुयायांच्या मते ते आदर्श खरे, पण ते त्यांच्या कालापुरते. अशा प्रकारे स्वच्छंदवादातून हा जो ऐतिहासिक दृष्टिकोण निर्माण झाला तो सर्वस्वी अपूर्व असाच होता. प्राचीन भाषांकडेसुद्धा ह्याच (कालसापेक्ष) दृष्टीने पाहिले जाऊ लागले. त्यामुळे या कालखंडात प्राचीन भाषा आस्थेवाईकपणे अभ्यासिल्या गेल्या, त्यासाठी ऐतिहासिकतेवर भर देणारे भाषाशास्त्र निर्माण झाले. जुने ग्रंथ व ग्रंथकार ह्यांच्याकडे पाहण्याची स्वच्छंदवादी दृष्टीसुद्धा अशी उदार व

सहानुभूतिशील अशी आहे. ग्रिम्मबंधूंनी पूर्वकालीन कथा मोठ्या आस्थेवाईकपणे जमविल्या व संपादन केल्या. प्राचीन ग्रंथ व कलाकृती ह्या दस्तऐवज या दृष्टीने अभ्यासिल्या जाऊ लागल्या. अशा रीतीने वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रातही नवप्रवृत्तीचे दर्शन घडते.--रीत वेगळी एवढेच.

विज्ञानाचे युग एकोणिसाव्या शतकात स्थिर झालेले होते. अनेक शोध लागले होते. नवी नवी शास्त्रे आकारास येत होती. त्या क्षेत्रांतील शोधांचे व पद्धतीचे परिणाम साहित्यावर व साहित्यक्षेत्रीय अभ्यासावर झाल्याविना राहिले नाहीत. जीवशास्त्रातील जैविक विकासाची कल्पना, तसेच डार्विनप्रणीत उत्क्रांतीवाद इ. उपपत्ती वाङ्मयीन विचार, वाङ्मय प्रकार, भाषा इ. सर्वांना लावल्या जाऊ लागल्या. त्या दृष्टीने विवेचनात त्या त्या गोष्टीचा उगम, वाढ, प्रौढत्व प्रगल्भता वृद्धत्व, विनाश इ. अवस्थांचे अवलंबनही होऊ लागले. शास्त्रांच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे नवे सिद्धान्त लावले, त्याप्रमाणे वाङ्मयाच्या क्षेत्रातही लावले जाऊ लागले. तेन् याचा सिद्धान्त ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे. नैसर्गिक विकासाच्या कल्पना आणि वैज्ञानिक पद्धती यांचा सुरेख समन्वय घालण्याचा ह्या सिद्धान्तात प्रयत्न करण्यात आला आहे. अशा रीतीने वाङ्मयीन विद्वत्ता आपल्या परीने विकसित होत होती. रूढ अर्थाने मान्यता पावलेल्या पारंपरिक स्वरूपाच्या वाङ्मयीन विद्वत्तेवर वैज्ञानिक पद्धतीचा अधिक खोल संस्कार होऊन ती अधिकाधिक वस्तुनिष्ठ व साक्षेपी होत होती. व्यक्तिगत आवडीनिवडी, मते यांच्यांकडे साशंकतेने पाहिले जाऊ लागले. हे सारे लोण आपल्या काळापर्यंत आले आहे.

आजकालच्या वाङ्मयीन क्षेत्राकडे पाहिले, तर सर्जनशील लेखन व विद्वत्ताप्रधान लेखन हे एकमेकांपासून फुटून स्वतंत्र रीतीने विकास पावत आहे. आताच पाहिल्याप्रमाणे वाङ्मयीन विद्वत्तेवर वैज्ञानिक पद्धतीची छाया पडली आहे, व्यक्तिनिरपेक्षता, तर्कशुद्धता या गोष्टी प्रमाण मानल्या जात आहेत. वेगळेपणाची जाणीव कित्येकदा अशी पराकोटीला गेलेली दिसते की, काव्य हे ज्याप्रमाणे दुसऱ्या कवीसाठीच निर्माण झालेले कित्येकदा आढळते, त्याप्रमाणे वाङ्मयीन विद्वत्ताप्रचुर लेखन दुसऱ्या विद्वानासाठीच लिहिलेले दिसून येते. हा स्वच्छंदवादाचाच परिणाम होय. तेव्हा साहजिकपणे प्रश्न निर्माण होतो की, सर्जनशील साहित्याला महत्त्व आलेल्या आजच्या कालखंडात वाङ्मयीन विद्वत्तेचे स्थान कोणते ?

आज वाङ्मयाच्या विविध प्रकारांची स्वतंत्र व अनिर्बंध रीतीने वाढ होत आहे आणि वाङ्मयीन विद्वत्तेला वाङ्मयाच्या क्षेत्रात अपूर्व असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. पारंपरिक दृष्टीने कवीच्या काव्याची (लेखकाच्या लेखन–कृतीची) संहिता तयार करण्याचे कार्यही अतिशय महत्त्वाचे झाले आहे. कवींनी वापरलेल्या शब्दांना अपूर्व महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचे केवळ शब्दच नव्हेत तर त्याच्या

हस्तलिखिताच्या समासात लिहिलेल्या टिपणीच नव्हेत, एखादे चिटोरे, रेखाटलेला एखादा कागदाचा तुकडा ते सारे तसेच संग्रहित करून ठेवणे आज महत्त्वाचे झाले, त्यातूनच कवीच्या मनातील विविध खळबळी, विचार, भावना यांचा शोध लावला जातो, व त्याचा काव्यावर, ते समजून घेण्याच्या दृष्टीने अपूर्व परिणाम होतो, उपयोग होतो, असे आज मानले जाते. काव्य वा सर्जनशील लेखन हे दुर्बोध वा अबोध होत असेल, पण त्या अबोधकतेतून वा दुर्बोधतेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न यशस्वी व जिद्दीचा अभ्यासकच करू शकतो, हे वाङ्मयीन विद्वत्तेत पडणारे एक कार्य आहे, व त्याचे महत्त्व आज कमी झालेले नाही, तर उलट वाढलेले आहे.

कित्येकदा कवी हे कालाच्या एवढे पुढे असतात की त्यांच्या काव्याचे आकलन होण्यास काही अवधी जावा लागतो, हे अभ्यासकाने बरोबर ओळखून योग्य वेळ येताच आवश्यक त्या स्पष्टीकरणासह ते प्रसिद्ध करणे योग्य ठरते. हॉपकिन्स या कवीचे काव्य रॉबर्ट ब्रिजेस यांनी जवळ जवळ त्यांच्या मृत्यूनंतर तीस वर्षे दडवून ठेवले व नंतर प्रसिद्ध केले. त्याबद्दल ब्रिजेसवर अनेकांनी टीकाही केली. परंतु अभ्यासाच्या दृष्टीने पाहिले तर ब्रिजेस यांनी केले तेच योग्य ठरते. नवप्रवृत्तींचा अंगिकार करणारी नवी पिढीच त्यांच्या काव्याचे आकलन योग्य रीतीने करू शकेल हे ब्रिजेस यांनी बरोबर ओळखले, असे म्हणावे लागते. हॉपकिन्स यांची प्रसिद्धी व लोकप्रियता त्यांच्या काव्यावर अभ्यासकांनी जे संस्कार केले, त्यांची पत्रे, नोटबुके, वृत्तासंबंधी त्यांची भूमिका विशद करणारे कागदपत्र प्रसिद्ध केले, यांवर अवलंबून आहे. तिचे श्रेय अभ्यासकांना दिले पाहिजे. नोटस् इ. ची जोड नसली तरी केशवसुतांचे काव्य त्यांच्या मृत्यूनंतर बऱ्याच कालाने प्रसिद्ध झाल्याने त्याची लोकप्रियता वाढली.

अभ्यासकाचे काम तसे मध्यस्थाचे आहे. लोकांना जे हवे आहे ते त्यांच्यापुढे सादर करणे हे त्याचे काम आहे. ‘His business is not to create but to understand.’[13] हे करीत असताना संवेदनशीलता व सहानुभूती ह्यांना अपरंपार महत्त्व देणे हे अगत्याचे आहे. अशा रीतीने त्याचे काम जरी दुय्यम स्वरूपाचे असले तरी महत्त्वाचे आहे. सुसंस्कृत समाजात तर हे कार्य अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. अंतिमतः पाहू गेले तर वाङ्मयाचे जे कलात्मक सातत्य (कंटिन्यूइटी) आहे, ते कायम ठेवण्याचे कार्य वाङ्मयक्षेत्रीय अभ्यासकांनीच व विद्वानांनी केलेले आहे. त्यांच्या ह्या अविरत प्रयत्नांमुळेच वाङ्मयीन श्रेष्ठ कलाकृती ह्या विस्मरणात न जाता, उपेक्षेच्या बळी न पडता सतत ताज्या आणि चैतन्यपूर्ण राहातात. ‘The past is alive, but only because the scholars keep it so.[14]’ हे लक्षात ठेवले पाहिजे. एवढेच नव्हे तर हा भूतकाळ केवळ जिवंत ठेवला जातो असे नव्हे

तर तो आपल्या विचार-कल्पना-संकेतांबरोबर सतत वर्धमान अवस्थेत राहतो, आणि त्याचे सर्व श्रेय वाङ्मयीन अभ्यासकांना द्यावयास हवे. साहित्याचा नव्या कालाला अनुरूप असा अर्थ लावण्याचे कार्य समाजात सतत चालू राहावयास हवे व समाजातील वाङ्मयक्षेत्रीय विद्वान जर दक्ष आणि क्रियाशील असतील तरच ते शक्य आहे. निर्मितीप्रधान लेखन करणारा लेखक जेव्हा आपली निर्मिती करतो, तेव्हा ती सर्व कालासाठी व एकदाच तो करतो, पण विद्वानाला मात्र आपल्या कालातील बदलत जाणारे ज्ञानक्षेत्र, विचार करण्याच्या पद्धतीत पडत जाणारा बदल, नवी साधने, शोध, यांच्यांशी सतत संपर्क ठेवणे आवश्यक ठरते. हे त्याचे जे अनन्य महत्त्वाचे कार्य आहे ते त्याचेच आहे. अशा रीतीने आजच्या काळातही वाङ्मयीन विद्वत्तेला किती महत्त्वाचे कार्य करावयाचे आहे हे स्पष्ट होईल.

## : ७ :

वाङ्मयीन विद्वत्तेचा विकासक्रम पाहात असता तिच्या स्वरूपात कसा आमूलाग्र फरक होत गेला आहे हे आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट होईल. प्राचीन कालात धर्म, नीति, तत्त्वज्ञान यांच्याशी ती एकरूप झाली होती, विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालखंडात तिने प्राचीन वाङ्मय व विद्या यांच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण केले, पण एक प्रकारे सांस्कृतिक व शैक्षणिक ध्येयदर्शन घडविले, त्याचप्रमाणे मानवतावादाचा आदर्श पुढे ठेवून नव्या माणसाच्या जडणघडणीस तिने हातभार लावला. स्वच्छंदवादी पुनरुज्जीवनानंतर तिचेही पुनरुज्जीवन होऊन तिने नवे समीक्षाशास्त्र निर्माण केले व आपलेसे मानले. विज्ञानाच्या युगातही वाङ्मयाच्या सर्वांगीण विकासास ती कसा हातभार लावू शकते व समाजाच्या सांस्कृतिक जीवनात तिचे स्थान कसे अनन्य आहे हेही आपण लक्षात घेतले. आता विद्यमान (इतर क्षेत्रांतील) विद्वत्तेशी तिचे संबंध कोणते आहेत आणि इतर क्षेत्रीय अभ्यासपद्धतीशी तिला कितपत जुळवून घ्यावयाचे आहे, तसेच स्वतःची अभ्यास-संशोधन-पद्धती निर्माण करता येईल काय, तिची उद्दिष्टे कोणती, इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह करावयाचा आहे.

इतर सर्व क्षेत्रांप्रमाणे साहित्यक्षेत्रीय अभ्यासपद्धतींवर विज्ञानाचा म्हणजे वैज्ञानिक पद्धतीचा प्रभाव पडलेला आहे व ते सर्वस्वी अटळ आहे. आज प्रत्येक क्षेत्रातल्या अभ्यासकाला 'तज्ज्ञ' म्हटले जाते, ह्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. आजचे युग हे विशिष्टीकरणाचे (स्पेशलायझेशनचे) आहे. आजचा अभ्यासक हा आपल्या मर्यादित क्षेत्रात तज्ज्ञ गणला जातो. हे तज्ज्ञतेचे लोण वाङ्मयक्षेत्रापर्यंत

येऊन पोहोचले आहे. त्यासाठीच येथे त्याची निरनिराळी परिक्षेत्रे विचारात घेतली आहेत. सर्व क्षेत्रांतील ज्ञाने इतक्या झपाट्याने वाढत आहे की, पूर्वीची 'सर्वज्ञ' विद्वानाची कल्पना पूर्णपणे सोडून द्यावी लागली आहे. होत असलेला ज्ञानविकास पाहिला तर हे केवळ अटळ आहे असे दिसेल.

वैज्ञानिक पद्धतीचे स्वरूप प्रत्येक ज्ञानशाखेसाठी वेगळपणाने उत्क्रांत करण्याची प्रत्येक ज्ञानक्षेत्राची धडपड चालू असून त्या प्रत्येक ज्ञानक्षेत्राला आपल्या ज्ञानशाखेच्या स्वरूपवैशिष्ट्याला मिळतेजुळते असे अनुशासन ( डिसिप्लीन ) असावे असे वाटते. त्यामुळेच एका वेळी मानव्यशाखेत समाविष्ट होणारी अर्थ, राज्य, तत्त्वज्ञान, इतिहास आदी सामाजिक शास्त्रे आज स्वतंत्ररीतीने विकास पावत असून त्यांनी विज्ञानशास्त्राच्या पद्धतीशी मिळतीजुळती अशी आपापली अनुशासने निर्माण केली आहेत; आणि एकापरीने तशा स्वतंत्र अनुशासनांच्या निर्मितीचा आदर्श इतर ज्ञानशाखांपुढे ठेविलेला आहे. आजचे सारे ज्ञानक्षेत्र अशा प्रकारच्या विशिष्टताप्रधान ज्ञानशाखांनी व अभ्यासक्रमांनी गजबजलेले आहे. या अतिरिक्त विशिष्टीकरणाचे दोषही दिसून आले असले तरी, ज्ञानाचा प्रसार व विकास एवढ्या जलद रीतीने व गतीने होत आहे की, त्याच्याबरोबर राहणे हे अतिशय कठिण झाले आहे. अशा परिस्थितीत साहित्याचा स्वतःच्या परिशासनाचा विचार करणे अवश्य ठरते. काही काही शास्त्रांवर या शोधपद्धतींचा एवढा प्रभाव पडला आहे की, त्यांच्या अभ्यासक्रमांत किंवा शिकविण्यात त्या क्षेत्रातील महत्त्वाच्या ज्ञानापेक्षा या अनुशासनालाच जास्त महत्त्व देण्यात येते, इतके की, विशिष्ट शोधपद्धतीच्या अवलंबनासाठी घेतली जाणारी उदाहरणे ही फक्त त्या ज्ञानशाखेत अंतर्भूत होणारी अशी असतात; ती तेथे अपरिहार्य असतात असे नव्हे.

इतक्या अतिरेकी वृत्तीने शोधपद्धतीकडे पाहण्याची आवश्यकता नसली तरी त्या पद्धतींची सर्वमान्य अशी जी तत्त्वे किंवा मूल्ये आहेत ती प्रमाण मानली पाहिजेत अशीच आहेत. वाङ्मयाप्रमाणे वाङ्मयीन विद्वत्ता ही वास्तवलक्षी असल्याने तिने विज्ञानशास्त्रांच्या व अलिकडे समाजशास्त्रांच्या पद्धतींचे व ध्येयांचे अवलंबन केले आहे. सत्याबद्दल विशेषतः वस्तुस्थितीनिदर्शक सत्याबद्दल विशेष कटाक्ष बाळगणे, सर्वंकषपणा व बिनचूकपणा आणणे; विवेचनात वस्तुनिष्ठता व अलिप्ततेचा प्रत्यय आणून देणे, क्लिष्ट व कंटाळवाणेपणाचे आक्षेप पत्करूनही तपशील देत राहणे, या साऱ्या गोष्टी वैज्ञानिक पद्धतीच्या प्रभावाच्या द्योतक आहेत.

त्याचप्रमाणे जीवप्रधान वैज्ञानिक शास्त्रांकडून बदलाची, विकासाची व वाढीची कल्पना साहित्याने काही गोष्टींसाठी आत्मसात केली आहे. अशा रीतीने वाङ्मय-क्षेत्राने वैज्ञानिक शोधपद्धतीच्या पायाभूत तत्त्वांचा स्वीकार केला आहे. शास्त्र व ज्ञानक्षेत्र म्हणून वाङ्मयाचे स्वरूप इतर कोणत्याही वैज्ञानिक तसेच सामाजिक-

शास्त्रापेक्षा वेगळे आहे. हे जसे खरे तसे त्याची काही काही परिक्षेत्रे प्रकृतीने ह्या काही शास्त्रांशी मिळतीजुळती असल्याने त्या त्या परिक्षेत्रांच्या शोधपद्धतींवर त्या त्या शास्त्रांचा परिणाम होणे अटळ आहे. तरी पण साहित्याचे स्वतंत्र अनुशासन करता येणे शक्य आहे काय, ह्या प्रश्नाबद्दलच्या मतामतांचा परामर्श घेणे अवश्य आहे.

वैज्ञानिक पद्धतीमागील मूलतत्त्वे वाङ्मयक्षेत्रीय संशोधनाने अंगिकारली आहेत हे आपण आताच पाहिले. वाङ्मयक्षेत्रासाठी वैज्ञानिक पद्धतीचा सही सही अवलंब करणे अशक्य आहे. कारण वाङ्मयातल्या वस्तुस्थितीनिदर्शक गोष्टी ( फॅक्टस् ) विज्ञानशास्त्राप्रमाणे निरपवाद असणे कठिण आहे. त्यांचे महत्त्व मर्यादितच राहाणार. त्याचप्रमाणे उपलब्ध गोष्टींवरून (डाटा) विज्ञानशास्त्रात ज्याप्रमाणे सिद्धान्त किंवा सूत्रे (फॉर्म्युली) तयार केली जातात, तसे वाङ्मयाच्या बाबतीत होणे अशक्यप्राय आहे, त्यातूनही ती काढण्याचा प्रयत्न झाला तर ती अतिशय सामान्य व किरकोळ असतील. तसेच प्रयोगसिद्ध सत्याच्या शोधाला विज्ञानात जो अवसर आहे तसा तो वाङ्मयात अत्यंत कमी आहे. म्हणूनच विषयाचे पृथःकरण करून काही अभ्युपागम (हायपॉथेसिस) मानणे व त्यांची पुन्हा पाहणी करून निष्कर्षवजा सिद्धान्त काढणे, या वैज्ञानिक पद्धतीच्या अवलंबनपैलूस वाङ्मय-शोधक्रियेत काही विशेष अवसर आहे असे मानता येत नाही.

विज्ञानक्षेत्राच्या कक्षेतील जी जैविक शास्त्रे (बायॉलॉजिकल सायन्सेस) आहेत, त्यांच्यांतील शोधनक्रियेत वापरल्या जाणाऱ्या पद्धती काही प्रमाणात उपयुक्त आहेत. विशेषतः सेंद्रिय एकत्वाची कल्पना असणे, त्या सेंद्रिय घटकांचा विकास, विस्तार व बदल यांचा अभ्यास करणे, आणि त्याप्रमाणात काही महत्त्वाचे निष्कर्ष काढणे, ह्या वैशिष्टयांचा अवलंब वाङ्मयीन क्षेत्रात तारतम्याने केलेला असतो, हे मागे आलेलेच आहे. जेथे जेथे ' एकत्व-कल्पना ' गृहित धरता येईल अशा ठिकाणी ह्या पद्धतीचे संस्करण झालेले आहे असे दिसून येईल. वाङ्मयप्रकार, कालखंड, एखादी भाषा, विशिष्ट विचार, व्यक्ती इत्यादींच्या बाबतीत अशी एकत्व-कल्पना गृहित धरता येते. मात्र या संदर्भात एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी ती अशी की, ह्या संकेतांचे अवलंबन करून ते प्रतिभानिर्मित, विचारपूरित सृष्टीला लावावयाचे असल्याने त्या ठिकाणी जीवसृष्टीतील वस्तुनिष्ठता व त्याप्रमाणात आलेली निरपवादता या विशेषांचा प्रत्यय येणे कठिण आहे. म्हणजे याही ठिकाणी केवळ पद्धती-विशेषापेक्षा त्या पद्धतीमागील शोधसूत्र महत्त्वाचे आहे. तेच वाङ्मय क्षेत्राने आपल्यापरीने अंगिकारिले आहे.

अलिकडच्या काळात सामाजिक शास्त्रे स्वतःच्या अशा काही पद्धती सुरू करीत आहेत. वस्तुनिष्ठ भूमिकेवरून माहिती मिळविण्यासाठी या शास्त्रांनी नवीन शोधायुधे (टूल्स ऑफ रिसर्च) निर्माण केली आहेत. उदा. मुलाखत, प्रश्नमालिका इ.

या मार्गांनी माहितीचा संचय करणे, तसेच एखाद्या गोष्टीचा आढावा घेणे इ. या पद्धती साहित्यक्षेत्रात थोड्याफार प्रमाणात उपयोगी पडतील, नाही असे नाही पण तसा त्यांचा तादृश उपयोग नाही. कारण ज्ञानसंचय यादृष्टीने वाङ्मय हे शब्द व ग्रंथ-स्वरूपात प्रत्यक्षतः उपलब्ध असते. त्यामुळे ह्या शोधायुधांचा उपयोग विशिष्ट अनुविषयांच्या (टॉपिक) संदर्भातच होणे शक्य आहे. सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत ह्या मार्गांनी माहिती जमवावी लागते. पण तो प्रश्न तितक्या तीव्र स्वरूपात वाङ्मयापुढे नसतो. डिल्थे याने विज्ञानशास्त्रांच्या व इतिहासासारख्या सामाजिक-शास्त्राच्या अभ्यासपद्धतीत फरक आहे हे दाखवून दिले आहे, विज्ञानशास्त्रांत कार्य-कारण संबंधावर भर दिला जातो, उलटपक्षी इतिहासाभ्यासात घटना, काल इ. चे स्वरूप जाणून घेण्यावर अधिक लक्ष केंद्रित करावे लागते. पुढे विल्हेम विडल-बँड यानेही या दोन शास्त्रांच्या पद्धतींत असाच फरक दाखवून दिला आहे. विज्ञान-शास्त्रे सर्वसामान्य सिद्धान्त प्रस्थापित करतात, तर इतिहासात पुन्हा न घडू शकणाऱ्या घटनेचे वा वस्तुस्थितीचे अंतरंग जाणून घेण्याचा प्रयत्न होत असतो. हेन्री रिकेटने 'सायन्सेस ऑफ नेचर' (भौतिकशास्त्रे) व 'सायन्सेस ऑफ कल्चर' (संस्कृति-प्रधान शास्त्रे) असा फरक केला आहे. बेनेडिट्टो क्रोचे याने आपली इतिहास-पद्धती अशी स्वतंत्रपणे मांडली की, ती भौतिकशास्त्रांपासून पूर्णतया भिन्न होती.

असे असले तरी विज्ञानशास्त्रप्रणीत पद्धतीचे महत्त्व कमी लेखता येत नाही, कारण ही पद्धती म्हणजे आजच्या सर्वच क्षेत्रांतील ज्ञानाचा पाया आहे. त्याचप्रमाणे, विगमन, निगमन, पृथःकरण, संश्लेषण (सिंथेसिस), तुलना इ. गोष्टी सर्वच ज्ञान-क्षेत्रांत विषयाच्या व्यवस्थापनासाठी, चर्चेसाठी महत्त्वाच्या ठरतात. परंतु या पलिकडे जाऊन स्वतंत्र पद्धतीसुद्धा असंभाव्य नाहीत. "Literary scholarship has its own valid methods which are not always those of natural sciences, but are nevertheless intellectual methods"[15] असे रेने वेलेक आपल्या 'थिअरी ऑफ लिटरेचर' या पुस्तकात म्हणतात. त्यांचे म्हणणे असे की, विज्ञानशास्त्रांचा उदय होण्यापूर्वी तत्त्वज्ञान, इतिहास, न्याय, देवशास्त्र (थिऑलॉजी) या शास्त्रांनी आपल्या स्वतःच्या प्रभावी (व्हॅलिड) पद्धती उपयोजून ज्ञानसंपादन केले आहे. आधुनिक विज्ञानशास्त्राच्या पद्धतींनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले असले तरी त्या स्वयंसिद्ध व कायम स्वरूपाच्या आहेत, आणि थोड्याफार फरकाने वा साक्षेपी उपयोजनेने त्यांचे पुनरावलंबन करता येईल. नैसर्गिकशास्त्रे व मानव्यशास्त्रे यांच्या पद्धती व ध्येये यांत फरक आहे हे मान्य करावयास हवे.

नॉर्मन फॉर्स्टर यांनी आपल्या 'लिटररी स्कॉलरशिप' या पुस्तकातील 'द स्टडी ऑफ लेटर्स' या निबंधात असे म्हटले आहे की, मानव्यशास्त्राच्या क्षेत्रातील विद्वानांनी भौतिकशास्त्रांतील संशोधन म्हणजे खरे संशोधन, ही कल्पना खोडून काढ-

ण्यास व मानव्यशास्त्रांतही खरे संशोधन असू शकते हे दाखविण्यास अध्येत्यांनी पुढे आले पाहिजे. विषयाला अनुरूप अशी पद्धती आयोजिली तर कोणत्याही विषयातले शोधकार्य आदरणीय (रिस्पेक्टेबल) होऊ शकते. वाङ्मयक्षेत्राविषयी ते म्हणतात "In literature, a subject lying in the realm of values, the most appropriate means of learned inquiry is critical argument, fortified by æsthetic perspectiveness and historical awareness."[16] ही वस्तुस्थिती मान्य करावयास हवी. शास्त्रीय पद्धतीचे संस्कार महत्त्वाचे आहेत हे खरे, पण वाङ्मयासंबंधीचे विद्यार्थ्यांचे आकर्षण हे शास्त्रीय क्षेत्रातील आकर्षणापेक्षा वेगळे असते. "The literary approach to literature and not scientific, first attracts the young to the study of the subject and the literary approach should normally dominate throughout the period of study"[17] असा आग्रह ते धरतात. सगळ्या अभ्यासकांनी केवळ शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्याचा आग्रह धरणे म्हणजे वाङ्मयाचे वेगळे स्वरूप न ओळखण्यासारखे आहे. तसेच ते "The field of the humanities is humans and field of literature is literary"[18] या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे, असे फॉर्स्टर यांचे म्हणणे आहे. अशा रीतीने तात्त्विक दृष्टीने पाहता वाङ्मयक्षेत्रासाठी स्वतंत्र व विशिष्ट असे शोधानुशासन तयार करण्याची शक्यता अमान्य करता येत नाही हे खरे आहे. साहित्याचे स्वविशिष्टत्त्व आज जवळ जवळ सिद्ध होत आलेले आहे, त्याच्याशी मिळतीजुळती अशीच ही भूमिका आहे.

पण प्रत्यक्षात मात्र असे दिसून येईल की, वाङ्मयक्षेत्रातील शोधानुशासनाचा प्रश्न एक प्रकारच्या समन्वयात्मक भूमिकेवरून सोडावा लागेल, आणि ह्याला वाङ्मयाचे विशिष्ट स्वरूपच जबाबदार आहे. साहित्याची जी परिक्षेत्रे आहेत त्या परिक्षेत्रांच्या स्वरूपाप्रमाणे हे ठरेल. भाषाशास्त्र हे सामाजिक शास्त्रांना प्रकृतीने जवळचे असल्याने त्या शास्त्रांतील शोधपद्धतीच्या कसोटयांवर उतरणारी शोधपद्धती या शास्त्राने आपल्यासाठी तयार केली आहे. एवढेच नव्हे तर वाङ्मयापासून थोडेफार विभक्त होऊन सामाजिक शास्त्रांशी मिळतेजुळते असे त्याचे 'लिंग्विस्टिक्स' ऊर्फ भाषाविज्ञान हे नावही आज रूढ झालेले आहे. असे असले तरी भाषाभ्यासकाची विद्वत्ता ही वाङ्मयक्षेत्रीय आहे हे अमान्य करता येईल असे वाटत नाही. अशा रीतीने वाङ्मयक्षेत्रातील अभ्यासविषयाच्या अनुषंगाने अवलंबिल्या जाणाऱ्या अनुशासनाचे स्वरूप वेगळे राहाणार. प्राचीन ग्रंथ, ग्रंथकार, संप्रदाय, चळवळ इत्यादी विषयांच्या शोधनात इतिहासशास्त्रप्रणीत शोधानुशासनाचा अवलंब करणे योग्य ठरते. प्राचीन वा पूर्वकालीन ग्रंथांच्या संहिता निश्चित करतानाही ह्याच

भूमिकेचा अवलंब करणे योग्य होईल. वाङ्मयविषयक कालखंडाच्या बाबतीतही इतिहासप्रणीत शोधपद्धतीचा अनुकार योग्य ठरेल, तर ग्रंथाच्या वा ग्रंथकाराच्या वाङ्मयगुणाची पाहणी, एखादा वाङ्मयप्रकार, वाङ्मयीन कलाकृती इ.च्या विवेचनाच्या बाबतीत जीवशास्त्रप्रणीत अभ्यासभूमिका प्रमाण मानली तरी चालेल. प्रत्येक विषयाच्या अभ्यासाच्या शोधपद्धती स्वतंत्र रीतीने उत्क्रांत होत आहेत असे दिसते.

शेवटी वाङ्मयीन विचार व तत्त्वशोधन यांचा प्रश्न येतो. ह्याही क्षेत्रासाठी तत्त्वज्ञानपूरित पद्धतीचा अवलंब अर्थातच समर्थनीय ठरेल. याशिवाय निरनिराळ्या प्रकारच्या 'पाहाणी' (सर्व्हे) करताना तत्सम विषयासाठी इतर क्षेत्रांत अवलंबिल्या जाणाऱ्या शोधपद्धतींचा उपयोगही करता येण्यासारखा आहे. समीक्षा हे वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वतंत्र अंग आहे. ह्या परिक्षेत्रातील शोधनाचे स्वरूप संमिश्र आहे, त्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे धोरण अवलंबिले जाणे शक्य आहे. तरी पण असे दिसते की, वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वविशिष्ट असे परिशासन निर्माण होत आहे.

शोध-पद्धतीच्या दृष्टीने वाङ्मयीन विद्वत्तेचे विविधत्व विचारात घेतल्यानंतर निरनिराळी तिची परिक्षेत्रे पाहणे अवश्य आहे. वाङ्मयीन विद्वत्तेला किती प्राचीन परंपरा आहे हे आपण पाहतो तेव्हा अनेक परिक्षेत्रे दृष्टीपुढून सरकून जातात. प्राचीन वाङ्मय मग ते संस्कृतसारख्या विद्वन्मान्य भाषेतले असो, प्राकृतसारख्या लोकाभिमुख भाषेतले असो अगर आधुनिक भाषांसारख्या लोकभाषांतले असो, ते शोधणे, त्यांचे नवार्थदर्शन घडविणे, त्यांच्या विश्वसनीय संहिता उपलब्ध करून देणे हे वाङ्मयीन विद्वत्तेचे पहिले फार मोठे व सर्वमान्य क्षेत्र आहे. वाङ्मयातले खरे संशोधन म्हणज हेच कार्य असा कित्येकांचा समज आहे. हे वाङ्मय कोणत्या दृष्टीने अभ्यासावयाचे याचे सविस्तर विवेचन वाङ्मयेतिहासात करणे इष्ट होईल. ग्रंथसंहिता संपादनाच्या बाबतीत ग्रंथाच्या विषयाला फारसे महत्त्व नाही. वाङ्मयस्वरूपाचे ग्रंथ जेवढे शोधनीय आहेत तेवढेच तत्त्वज्ञान, धर्म, सामाजिक शास्त्रे इ. क्षेत्रांतील ग्रंथही. त्यामुळे रामायण महाभारताच्या शास्त्रशुद्ध अधिकृत संहिता सिद्ध करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे ठरते. पाठसंहिताशास्त्र या क्षेत्राच्या शोधपद्धतीच्या दृष्टीने अपरंपार महत्त्वाचे ठरते.

त्यानंतरचे प्राचीन कालातील वाङ्मयीन विद्वत्तेचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे प्राचीन साहित्यशास्त्र होय, त्यात रस, ध्वनी, अलंकार इ. महत्त्वाचे विषय येतात. त्याशिवाय व्याकरण, व्युत्पत्ती, छंदशास्त्र, नाटचशास्त्र या क्षेत्रांतही प्राचीन कालात झालेली प्रगती अभ्यसनीय आहे. अर्थात प्रत्येक भाषेच्या स्वरूपाप्रमाणे, इतिहासाप्रमाणे ही क्षेत्रे वेगवेगळी होतील. त्यादृष्टीने संस्कृत भाषेतील न्याय, मीमांसा,

वेदान्त इ. 'दर्शने' उल्लेखनीय आहेत. निरनिराळे धर्मपंथ व त्यांचे वाङ्मय असेच धार्मिक व वाङ्मयीन दृष्टीने अभ्यसनीय आहे.

या परिक्षेत्रांच्या स्वतंत्र शोधपद्धती प्राचीनांनी निर्माण केलेल्या आहेत. त्याशिवाय प्रत्येक भाषेतले विविध प्रकारचे गद्य व पद्य ललित व तत्सम क्षेत्रात पडणारे वाङ्मय हे विद्वत्तेचे मोठे परिक्षेत्र होय.

आधुनिक कालात वाङ्मयाचा अभ्यास अगदी वेगळ्या दिशेने व दृष्टीने होत आहे. मुद्रणामुळे व वृत्तपत्रांमुळे अनेक निरनिराळे 'वाङ्मयप्रकार' ऊर्फ 'अभिबंध' निर्माण झाले आहेत. त्या प्रत्येकाने स्वतःचा असा 'इतिहास' निर्माण केला आहे. एवढेच नव्हे तर स्वतःचे तंत्रही जोपासले आहे. ग्रंथ हे प्रत्यक्ष स्वरूपात वाचकांपर्यंत जात आहेत. त्यामुळे त्याचे अर्थदर्शन घडविणाऱ्या त्रयस्थांची गरज निर्माण झाली आहे. तीतून वाङ्मयसमीक्षेचा उदय झाला आहे. त्याशिवाय आधुनिक कालात साहित्यतत्त्वमीमांसा विपुल प्रमाणात झालेली आहे. काही बाबतीत तिने पूर्वकालीन काव्यशास्त्राचा वारसा हक्क मिळविलेला असला तरी तिचे एकंदर विकसन आधुनिक पद्धतींनी व आधुनिक दृष्टीने स्वतंत्र रीतीने झालेले आहे. या सर्व विषयांचा समावेश असणारे वाङ्मयसमीक्षा हे शास्त्र म्हणजे आधुनिक वाङ्मयीन विद्वत्तेचे एक लक्षणीय परिक्षेत्र आहे.

त्याशिवाय भाषा व भाषाभ्यासाची स्वतंत्र ज्ञानशाखा प्राचीन कालापासून विकसित होत आलेली आहे आणि अलिकडील कालात तर त्या शास्त्राचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलेला आहे. आजच्या संमिश्र जीवनात निरनिराळे व्यवसाय, निरनिराळी ज्ञानक्षेत्रे, तसेच समाजव्यवहाराशी संबद्ध असणारी, राज्य, न्याय, शिक्षण इत्यादि क्षेत्रे, तसेच निरनिराळे समाजगट आपापल्या 'भाषा' निर्माण करीत आहेत. या संबद्ध विषयांचा अभ्यास करण्याच्या निरनिराळ्या प्रपद्धतीही उत्क्रांत होत आहेत. हे साधे अध्ययन वाङ्मयीन विद्वत्तेतच समाविष्ट होते.

लोकशाही जीवनपद्धतीत लोकभावना, लोकविचार, लोकजीवन इ. गोष्टी अतिशय महत्त्वाच्या ठरतात. त्यांचे प्रतिबिंब लोकवाङ्मयात विविध प्रकारे अधिक ठसठशितपणे उमटलेले असते. त्यामुळे लोकवाङ्मय हाही एक स्वतंत्र अभ्यासविषय, एक ज्ञानक्षेत्र– अर्थात वाङ्मयीन विद्वत्तेचे एक क्षेत्र–म्हणून उपलब्ध झाले आहे. ग्रिम्म बंधूंनी एकोणीसाव्या शतकात जर्मनीतील लोककथा जमवून ह्या अभिक्रियांचा प्रारंभ सूचित केला आहे. लोकवाङ्मय मौखिक असल्याने त्यांचे आलेखन, मुद्रण, प्रकाशन महत्त्वाचे आहे. त्यानंतर त्याचे वाङ्मय व इतर दृष्टींनी अध्ययन ओघानेच येते. मराठीत डॉ. सरोजिनी बाबर, आदी अभ्यासकांनी या

संदर्भात केलेले कार्य लक्षणीय आहे. त्याशिवाय वाङ्मयीन विद्वत्तेचे महत्त्वाचे परिक्षेत्र म्हणून ललितवाङ्मय हे क्षेत्र अभ्यसनीय आहे.

अशा रीतीने प्राचीन व आधुनिक कालात निरनिराळी परिक्षेत्रे वाङ्मयीन विद्वत्तेशी सर्वमान्यपणे संबद्ध झालेली आहेत. या व्याख्यानमालेत वाङ्मयेतिहास, वाङ्मयसमीक्षा, भाषा व भाषाभ्यास आणि ललितवाङ्मयलेखन ही चार क्षेत्रे त्यांच्यांतील स्वतंत्रतेमुळे विचारात घेतली आहेत. वाङ्मयक्षेत्राचा जसजसा विकास होईल तसतशी आणखीही अनेक क्षेत्रे व विषय या क्षेत्रात महत्त्व पावू शकतील. प्रत्येक ज्ञानक्षेत्रात अशा रीतीने नवे नवे विषय, त्यांची नवनवी अंगोपांगे आणि त्यांच्या नव्या पद्धती उत्क्रांत होत असतात. वाङ्मयेभ्यासाचे क्षेत्रही त्याला अपवाद नाही.

: ८ :

ह्या परिक्षेत्रांत या ठिकाणी एका परिक्षेत्राचा आगळेपणाने समावेश केला आहे. ते क्षेत्र म्हणजे सर्जनशील वाङ्मयाचे लेखन हे होय. सर्जनशील वाङ्मयाच्या गुणदोषांची चर्चा व समीक्षा या परिक्षेत्रात होणे शक्य आहे. पण सर्जनशील लेखन हाही एक ' वाङ्मयीन विद्वत्तेचा ' आविष्कार आहे ही भूमिका नवीन आहे, म्हणून तिचे थोडे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे.

सर्जनशील वाङ्मय हे वास्तविक वाङ्मयक्षेत्राचे आत्मभूत अंग. प्रतिभेच्या पोटी त्याची निर्मिती होते. प्रतिभा ही असाधारण बौद्धिक शक्ती असली तरी, इतर बौद्धिक शक्तींमागे जी तर्कप्रमाणता असते ती प्रतिभेला लागू पडत नाही म्हणून तिच्याभोवती एक प्रकारचे असाधारणतेचे वलय निर्माण झालेले आहे व इतर बुद्धिव्यापारांपासून ती वेगळी काढली जाते. परंतु आजच्या मानसशास्त्राच्या युगात तिचे मर्यादित अलौकिकत्त्व मान्य झाले असले तरी तो एक वेगळ्या प्रकारचा प्रज्ञाव्यापार आहे हे सर्वमान्य झाले आहे. तिची धारणा व तिचे कार्य हे अवलोकन, मनन, चिंतन, संश्लेषण, विश्लेषण याच बाबींवर आधारलेले आहे हेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रतिभेचे आगळेपण मान्य केले तरी तिला वेगळे करण्याचे कारण नाही, म्हणून प्रतिभापूरित पण कल्पनाप्रधान लेखन करणाऱ्या (रूढ अर्थाने ज्याला आपण ' कलावंत ' म्हणतो त्या) व्यक्तींचा समावेश वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात करावयास हरकत नाही. त्यांचा तो एक प्रकारे गौरव होय. नाहीतरी श्रेष्ठ लेखकास विद्यापीठे आपली श्रेष्ठ (डी.लिट्.सारखी) पदवी बहाल करतात. तो त्यांचा गौरव मानला जातो, तसेच संगीतक्षेत्रीय कलावंताना ' पंडित ' म्हटले जाते, तेही गौरवानेच. त्या दृष्टीने ललितलेखन हे वाङ्मयीन विद्वत्तेचे एक परिक्षेत्र मानून त्याचा येथे स्वतंत्र रीतीने परामर्श घेतला पाहिजे.

वाङ्मयीन विद्वत्तेची ही परिक्षेत्रे तशी सर्वमान्य आहेत, पण एकमेकांशी ती इतक्या घनिष्ठपणे संलग्न आहेत की, त्यांचा तसा अलगपणे विचार करता येत नाही. उदाहरणार्थ, वाङ्मयीन समीक्षा, वाङ्मयीन तत्त्वशोधन व वाङ्मयीन इतिहास ह्या स्वतंत्र शाखा असल्या तरी एकमेकांवर त्या किती अवलंबून आहेत, हे स्पष्ट करताना रेने वेलेक् म्हणतात, "They (literary theory, history and criticism) complicate each other so thoroughly as to make inconceivable literary theory without criticism or history, or criticism without theory or history, or history without theory and criticism."[19] वाङ्मयीन विद्वत्तेच्या सर्वच परिक्षेत्रांबाबत असे म्हणता आले तरी प्रत्येक परिक्षेत्राची काही स्वायत्त मूल्ये आहेत तर काही पृथगात्म समस्या आहेत त्या सर्वांचा स्वतंत्र रीतीने विचार होण्याच्या दृष्टीने वर उल्लेखिलेली चार परिक्षेत्रे स्वतंत्रपणे चर्चिली आहेत. त्यांची ही चिकित्सा आज आवश्यक आहे असे वाटते.

ज्ञानक्षेत्रांचे विकसन आज अशा अवस्थेत आहे की, उच्चस्तरीय अध्यापनात विषयांतर्गत ज्ञानापेक्षा त्या विषयाच्या शोधपद्धतींना प्राधान्य देण्याची प्रथा आज रूढ आहे. रेने वेलेक् व ऑस्टिन वॅरेन यांच्या "थिअरी ऑफ लिटरेचर" ह्या गाजलेल्या ग्रंथाचे खरे नाव "थिअरी ऑफ लिटरेचर अँड मेथॉडॉलॉजी ऑफ लिटररी स्टडी" असे आहे, असा प्रस्तावनेत प्रारंभीच त्यांनी उल्लेख केला आहे. डेव्हिड डायचेस यांच्या पुस्तकाचेही तसेच, त्यांच्या "क्रिटिकल अॅप्रोचेस टू लिटरेचर" या प्रसिद्ध पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते आवर्जून (इटॅलिकमध्ये छापून) सांगतात की, "I am concerned with methodology, with the varying ways in which....Literature can be....discussed[20]. यावरून एखाद्या विषयाच्या उच्चतर स्तरावरील अभ्यासात आज ज्ञानापेक्षा प्रपद्धतींना (मेथॉडॉलॉजी) कसे महत्त्व आले आहे हे स्पष्ट होईल. वाङ्मयीन महत्त्वाच्या परिक्षेत्रांची त्या दृष्टीने पाहणी करण्याचा हा उपक्रम आहे.

: ९ :

शेवटी वाङ्मयीन विद्वत्तेच्या ध्येयासंबंधी विवेचन करणे अवश्य आहे. इतर कोणत्याही क्षेत्रातील विद्वत्तेप्रमाणे सत्यशोधन हे वाङ्मयीन विद्वत्तेचे अनन्यसाधारण ध्येय होय. त्याचप्रमाणे वाङ्मय स्वतःच्या ज्या गुणवैशिष्ट्यांमुळे मानवी संस्कृतीत अनन्य स्थान टिकवून आहे त्या गुणविशेषांचे संवर्धन-परिवर्धन करणे हे तिचे अनन्य महत्त्वाचे कार्य आहे. त्याचबरोबर श्रेष्ठ कलाकृती, विचार, कल्पना इ. अखंड परिष्कृत करून त्यांना नवा अर्थ देऊन त्या सदैव समकालीनांना सुगम करणे;

मनुष्याची साहित्यविषयक व सौंदर्यविषयक जाण व रसिकता वाढवून ती अधिक संस्कारी व साक्षेपी करणे; आणि त्या प्रमाणात बौद्धिक व प्रतिभापूरित विश्वाचे उन्नयन करणे, ही कार्येही महत्त्वपूर्ण अशीच आहेत.

नवनव्या अभ्यासकांच्या प्रवृत्तीला साजेशी नवनवी बौद्धिक क्षेत्रे उपलब्ध करून देणे, मानवी संस्कृतीने जतन केलेला व वाढविलेला वाङ्मयीन विद्वत्तेचा वारसा पुढे चालू ठेवणे अगत्याचे आहे. सर्जनशील व असर्जनशील असा भेदभाव करण्याचे कारण नाही. आपण वाङ्मय या मानवजातीच्या श्रेष्ठ ठेव्याशी संबंधित असे सर्व अभ्यासक आहोत ही वृत्ती वाढीला लागली तर विकास अधिक सुकर होईल.

वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात या पुढे सर्जनशील लेखन करणारा लेखक श्रेष्ठ की ह्या लेखनाचे संशोधन करणारा अभ्यासक श्रेष्ठ असा वाद होण्याचे कारण नाही. सर्जनशील लेखन करणाराचे अव्वलपण व मोठेपण विवादातीत आहे. पण अशी तुलना बरोबर नाही कारण ह्या लेखकांचे लेखन अमर करण्याचे, त्यांचे वेगळेपण, मोठेपण पुढल्या पिढ्यांना परिचित करून देण्याचे, त्या लेखनाला नवा अर्थ प्राप्त करून देण्याचे त्याला सदैव समकालीनत्व प्राप्त करून देण्याचे व त्या संपदेला राष्ट्राच्या मूलधनात कायमचे स्थान प्राप्त करून देण्याचे मोलाचे काम वाङ्मयक्षेत्रीय विद्वानांनी केले आहे. त्यांचे अनन्यपण अमान्य करता येत नाही. ते काम त्यांनी केले नसते तर श्रेष्ठ वाङ्मयकृती केव्हाच विस्मृतीच्या गर्तेत गेल्या असत्या. त्या गेल्या नाहीत याचे श्रेय वाङ्मयीन विद्यावंतांना आहे.

इतर क्षेत्रीय विद्वत्तेपासून वाङ्मयीन विद्वत्तेचे वेगळेपणही लक्षात घेणे अवश्य आहे. विद्वत्तेची वा प्रज्ञाव्यापाराची इतर क्षेत्रे म्हणजे विज्ञान व समाजशास्त्रे, शिक्षण इत्यादि आधुनिक क्षेत्रे आणि तत्त्वज्ञान, धर्म, नीती इ. प्राचीन क्षेत्रे होत. तत्त्वज्ञान वगळले तर ही सारी शास्त्रे समस्यामूलक (प्रॉब्लेम ऑरिएंटेड) आहेत. त्यांचा, त्यांतील गृहिततत्त्वांचा कालाबरोबर अधिकाधिक विकास होत आला आहे. ही केवळ ज्ञानप्रधान (कॉग्निटिव्ह) शास्त्रे आहेत. इतिहासक्रमाबरोबर ती विकसित होत आली असल्याने त्यांच्या पूर्वकालीन प्रगतीला केवळ 'ऐतिहासिक' महत्त्व आहे. कारण त्यांच्यांतील नव्या शोधकल्पनांनी जुन्या विचारकल्पना ह्या कालबाह्य ठरविलेल्या असतात.

विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्यांतल्या वर्तमानकेंद्रित्वामुळे त्या दोहोंतील विद्वत्तेचे व शोधभूमिकांचे साधर्म्य लक्षणीय आहे. वाङ्मयाचे स्वरूप याहून अगदी भिन्न आहे. वाङ्मयाच्या बाबतीत पाहिले तर जुने वाङ्मय तसे जुने होत नाही. नवे विचार, कल्पना अगर दृष्टिकोन इ. या जुन्या तत्सम गोष्टी कालबाह्य ठरल्या म्हणून उदयास येतात असे नाही, तर समाजपरिस्थिती व वातावरण यांना अनु-

सरून मनुष्याचा समज, समजुतदारपणा, संवेदनशीलता, ज्ञानग्राहकता इ.त फरक पडतो, त्यांच्या अनुषंगाने जुन्या कलाकृती व वाङमय यांना वेगळाच अर्थ प्राप्त होत असतो. त्या एका दृष्टीने सदैव नव्या होत असतात. जुन्याच्या या नवीनीकरणाच्या प्रक्रियेसाठी समीक्षा हे शास्त्र अस्तित्वात आलेले आहे. ते केवळ बुद्धीवर अधिष्ठित असणारे शास्त्र आहे असे नव्हे, तर त्यात आताच उल्लेखलेल्या इतर अनेक गोष्टींचा–शास्त्रांचा समावेश होतो. जुन्या-नव्याचा सदैव समन्वय घालण्याच्या ह्या वैशिष्टया-मुळे वाङमयीन विद्वत्ता वेगळी झाली आहे. जुन्याचा अभ्यास सोडता येत नाही व नव्यापासून फारकत घेता येत नाही, केवळ बुद्धिप्रधान वा तर्कसिद्ध दृष्टिकोना-पलिकडच्या इतर अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

साहित्याचे क्षेत्र हे मूल्यांचे (व्हॅल्यूचे) क्षेत्र आहे. त्यामुळे ते अनेक इतर संबंधी व्यवसायक्षेत्रांवर आणि ज्ञानक्षेत्रांवर आधारलेले आहे. विशिष्टीकरणाच्या (स्पेशलायझेशन) पद्धतीचा वाङमयक्षेत्रावर परिणाम होत आहे. त्या प्रमाणात ते क्षेत्र इतर सामाजिक विज्ञानशास्त्रांच्या अभ्यासक्रमदृष्टया जवळ जात असले तरी वाङमयीन विद्वत्तेचे वेगळेपण लक्षात घेणे अगर टिकविणे आवश्यक आहे. वाङमयीन अभ्यासाचे वैशिष्टय कशात आहे हे स्पष्ट करताना ग्रॅहॅम हफ् आपल्या 'क्रायसिस इन् लिटररी एज्युकेशन' या लेखात म्हणतात : The characteristic virtues of an education in literature are not a matter of disciplined thinking and handling of information.[21] हे तसे महत्त्वाचे खरे, पण ते अलगपणे साधणार नसून इतर भाषा, इतिहास व कल्पनांचा इतिहास यांच्याशी संपर्क साधूनच साध्य होणार आहे. ते पुढे म्हणतात, "It needs closely integrated with the study of other languages, with history and history of ideas."[22] यावरून वाङमयीन विद्वत्तेच्या वेगळेपणाची व व्याप्तीची कल्पना येईल.

अशा रीतीने वाङमयीन विद्वत्तेच्या विविध वैशिष्टयांचा आज आपण परि-चय करून घेतला. यापुढे तिच्या परिक्षेत्रांचा विचार करणे योग्य होईल.

□ □ □

# व्याख्यान दुसरे

# वाङ्मयेतिहास : स्वरूप, समस्या, पद्धती

: १ :

कालच्या व्याख्यानात पाहिल्याप्रमाणे वाङ्मयाचा इतिहास हे वाङ्मयीन विद्वत्तेचे अत्यंत महत्त्वाचे परिक्षेत्र आहे. कोणत्याही ज्ञानशाखेच्या उच्च अभ्यास-क्रमात त्या शाखेच्या इतिहासाला महत्त्वाचे स्थान असणे स्वाभाविक आहे. कारण इतिहासाच्या अभ्यासानेच त्या क्षेत्राच्या समकालीन परिस्थितीचा व वैशिष्टयांचा उलगडा होत असतो. त्या दृष्टीने इतिहासाला प्राप्त होणारे महत्त्व हे केवळ स्वाभाविक आहे.

इतर ज्ञानक्षेत्रांच्या बाबतीत त्या त्या विषयाचा इतिहास त्या विषयाच्या अभ्यासाचा उपविषय (टॉपिक) होऊ शकतो. म्हणजे त्या क्षेत्राच्या विद्वत्तेत व व्यासंगात त्याला फारसे महत्त्व नसते. याचे कारण वैज्ञानिकशास्त्रे व सामाजिक-शास्त्रे ज्ञानाच्या दृष्टीने प्रश्नशोधक (प्रॉब्लेम ओरिएंटेड) आहेत. म्हणजे त्यांत विविध प्रयोगांनी अगर इतर मार्गांनी प्रश्नांची पूर्वतयारी करावी लागते. त्यानंतर अशाच प्रयत्नांनी साधनसामग्री उपलब्ध करून घ्यावी लागते. त्यामुळे त्या त्या प्रश्नांना अगर साधनसामग्रीला तसे पृथगात्म आणि केवळ तात्कालिक महत्त्व असते व काही कालानंतर जेव्हा तो प्रश्न इतिहासजमा होतो तेव्हा त्या संशोधनाला व ज्ञानाला केवळ इतिहासात नोंद होण्याइतके महत्त्व उरते. समकालीन प्रश्न व समस्या नव्या नव्या निर्माण होतात त्या त्या क्षेत्रातील नव्या संशोधनाला साहित्य पुरवितात.

'इतिहास' हे ज्ञानक्षेत्र ह्या दृष्टीने थोडे वेगळे मानावे लागते. पण या क्षेत्रात इतिहासाकडे एक ज्ञानसंचय म्हणून पाहिले जाते. कारण ह्या ज्ञानक्षेत्राचे

स्वरूप तसेच आहे. तथापि अभ्यास-संशोधनाच्या दृष्टीने सामाजिकशास्त्रांच्या पद्धतींचा अवलंब करून उपलब्ध घटितांना (फॅक्टस्ना) कार्यकारणाच्या कैचीत बसविले जाते. म्हणजे हे क्षेत्र तसे स्वतंत्रपणे इतिहासाचे असले तरी शोधपद्धती सामाजिक क्षेत्रांच्याच असतात.

वाङमयेतिहासाची गोष्ट संपूर्णपणे निराळी आहे. ते एक आताच पाहिल्या-प्रमाणे वाङमयीन विद्वत्तेचे व्यासंगाचे व महत्त्वाचे परिक्षेत्र आहे. इतर क्षेत्रांप्रमाणे कालाबरोबर वाङमय हे इतिहासरूप म्हणजे कालगत होते, हे खरे आहे. पण वाङमयाचे वेगळेपण असे की, कालाच्या ओघाबरोबर इतिहासजमा झालेल्या वाङमयापैकी काही भाग हा सार्वकालिक महत्त्वाचा ठरतो, ता कालपक्व असा कधीच होत नाही. त्यालाच अक्षर वाङमय म्हटले जाते. असे वाङमय जितक्या आस्थेने त्याच्या निर्मितिकालात वाचले जाते तेवढ्याच आपलेपणाने ते नंतरही वाचले जाते. म्हणजे ते सदैव समकालीन महत्त्वाचे राहाते. या वस्तुस्थितीमुळेच काही समीक्षक वाङमयाला ' इतिहास 'च नसतो असे म्हणतात. " We do not need literary history, as its objects are always present, are "eternal" and thus have no proper history at all."[1] असे डब्ल्यू पी. केर हे टीकाकार म्हणतात. अर्थात या वचनात सर्वच वाङमय अध्याहृत धरले आहे. ते एका दृष्टीने लक्षणीय आहे. कारण व्यक्तिगत दृष्टीने ग्रंथाचे मोठेपण कमीजास्त स्वरूपाचे मानले तरी वाङमय म्हणजे सुसंघटित असा एक ज्ञानसंचय (बॉडी ऑफ ऑर्गनाॅइज्ड नॉलेज) आहे, ही वस्तुस्थिती मान्य केली तर विशेष मतभेदाचे कारण नाही. प्रसिद्ध कवी व टीकाकार टी. एस. एलियट यांचे मत असेच आहे. तेही वाङमयाचे भूतकालत्व (पास्टनेस) अमान्य करतात. होमरपासूनचे सारे युरोपीय वाङमय हे सदैव समकालीन आहे, " It has a simultaneous existence and composes a simultaneous order".[2] असे ते म्हणतात. अशा रीतीने ' वाङमयेतिहास ' अशी चीजच त्यांच्या मते अस्तित्वात नाही. ' वाङमयेतिहास हा खरा ' इतिहास 'च नव्हे...हे स्पष्ट करताना रेने वेलेक असे कारण देतात की, " It is the knowledge of the present, the omnipresent and the eternally present"[3]. ते पुढे असे म्हणतात की, राजकीय इतिहास व कलांचा इतिहास यांत हाच फरक आहे, की राजकीय इतिहासातील घटना ह्या ऐतिहासिक व पूर्वी होऊन गेलेल्या अशा असतात, पण कलाकृतीच्या बाबतीत असे दिसते की, त्या पूर्वी वा इतिहास-कालात निर्माण झालेल्या असतात, पण राजकीय वा तत्सम क्षेत्रांतील घटनांप्रमाणे त्यांना कालपक्वता आलेली नसते. त्यांना एकप्रकारचे समकालीनत्व, जिवंतपण वा चैतन्य लाभलेले असते.

वाङमयेतिहासाच्या या अनन्यसाधारण वैशिष्टयामुळे तो केवळ एक सामान्य अभ्यास-उपविषय (टॉपिक) न ठरता त्याला व्यासंगक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे वाङमयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र म्हणून त्याचे विशेषत्त्व सर्वमान्य झाले आहे. वाङमयीन कलाकृतींना त्यांच्या गुणांमुळे अक्षरत्व प्राप्त होत असते, याचा अर्थ इतिहासक्रमात त्यांच्या स्वरूपात काही बदल होत नाही असा नव्हे. कलाकृतींना स्वत:चा असा जो वैशिष्टयपूर्ण रूपबंध (स्ट्रक्चर) लाभलेला असतो तो इतिहासाच्या ओघात न बदलता तसाच अविकृत स्वरूपात राहातो हे खरे आहे, पण त्यांचा हा रूपबंध (स्ट्रक्चर) प्रकृतीने अधिगतिक (डायनॅमिक) असतो, इतिहासाच्या प्रवाहाबरोबर तसा त्यात बदल होत असतो, पालट होत असतो. हे सारे इतिहासाच्या ओघात घडत असते. नवार्थ–बोधन (इंटरप्रिटेशन) संविवरण (क्रिटिसिझम) व अभिग्रहण (ॲप्रिसिएशन) ह्या अविरतपणे चालू राहणाऱ्या अभिक्रियांचा (ॲक्टिव्हिटीज) हा प्रभाव होय. ही प्रक्रिया सांस्कृतिक परंपरेचे उन्मूलन होईपर्यंत तशीच अविरतपणे चालू राहणार आहे. ह्या वस्तुस्थितीमुळेच वाङमयेतिहास हा नुसता इतिहास न राहता तो एक अखंड विकसित व विकासक्षम असा ज्ञानसंचय (बॉडी ऑफ नॉलेज) झालेला आहे. त्याचे स्वत:चे असे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यापैकी काहींचे विवेचन या व्याख्यानात प्रयोजित आहे.

: २ :

वाङमयाचा इतिहास लिहिण्यास एकोणीसाव्या शतकात विशेष महत्त्व प्राप्त झाले. कारण 'ऐतिहासिक' दृष्टी ह्या काळात निर्माण झाली ती पूर्वी नव्हती. त्यामुळे वाङमयेतिहास लेखनाचे प्रारंभीचे प्रयत्न हे एकंदर मानवी व्यापक व राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक इतिहासाला प्राधान्य देऊन झालेले आहेत. विज्ञानशास्त्रांनी व नंतर सामाजिकशास्त्रांनी जे बौद्धिक वातावरण निर्माण केले त्याचा परिणाम वाङमयाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर झाल्याविना राहिला नाही. भौतिक व सामाजिक घटनांप्रमाणे वाङमयीन घटना म्हणजे ग्रंथ, कलाकृती इत्यादींचीही त्यांनी कारणे शोधिली. त्या इतिहासक्रमात कशा निर्माण झाल्या व त्यांचे स्वरूप असेच का, हे दाखवून देण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. त्याप्रमाणे वाङमयीन कलाकृती समाजाच्या कोणत्या अवस्थेत निर्माण होत असतात, ते दाखवून वाङमयीन ललितकृतींना एकंदर सामाजिक सांस्कृतिक कार्यकारण–परंपरेत गोवण्याचा प्रयत्न काही विचारवंतांनी केलेला आहे. त्यायोगे

वाङ्मयीन कलाकृतींच्या अभ्यासाला एक वेगळेच ऐतिहासिक आणि आधिवैद्यिक ( ॲकॅडेमिक ) अधिष्ठान प्राप्त झाले.

या संदर्भात तेनचा प्रसिद्ध सिद्धान्त उल्लेखनीय आहे. या सिद्धान्ताच्या योगाने वाङ्मयीन कृतींच्या निर्मितीसंबंधी एक सूत्रच त्याने निर्माण केले. वंश, सामाजिक परिस्थिती व विशिष्ट कालविचार ( रेस्, मिल्यू, मोमेंट ) यांनी वाङ्मयाचे स्वरूप ठरते वा स्पष्ट होते, असा हा सिद्धान्त आहे. म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या या तीन महत्त्वाच्या अंगांची आपणांस माहिती असेल तर आपण त्या राष्ट्राचे वाङ्मय कसे असेल हे सांगू शकतो किंवा ते तसे का आहे हे जाणून घेऊ शकतो. असा तेनच्या सिद्धान्ताचा आशय आहे. काही मानववंश स्वभावत: पराक्रमी, शूर असतात, तर काही भित्रे व संकोची स्वभावाचे असतात. काहींत लोकोत्तर ध्येयाने भारलेली माणसे निर्माण होतात. ह्या वंशसिद्ध गुणांचा प्रभाव साहित्यावर पडतो असे तेनचे म्हणणे. त्यानंतरचा महत्त्वाचा घटक म्हणजे परिस्थिती हा होय. भौगोलिक परिस्थिती हा मानवी मनावर संस्कार करणारा मोठा घटक आहे. निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळ्या प्रवृत्ती वाढीला लागतात, त्यांचा वाङ्मयावर तेवढाच प्रभाव पडतो. डोंगराळ प्रदेशातील माणसे अधिक कडवी असतात, उलट संपन्न व सपाट प्रदेशातील माणसे सामान्यत: अधिक उदार, व्यवहारी, व्यापारी वृत्तीची असतात. यापेक्षा महत्त्वाचा घटक म्हणजे मोमेंट वा युगप्रभाव हा होय. परिस्थिती जरी तीच असली, तरी काही कालात काही विशिष्ट विचार, ध्येये निर्माण होतात व वाढीला लागतात. त्यांचा प्रभाव वाङ्मयावर पडल्याशिवाय राहात नाही. वाङ्मयाच्या धारणेत युगप्रभावाचा फार मोठा अंश आहे. असा एकंदरीने तेनच्या विचारांचा रोख आहे. त्याने भरपूर विस्ताराने हा विचार मांडला आहे.

निरनिराळ्या राष्ट्रांतील वाङ्मयाचे अवलोकन केले असता त्याच्या विचारात सत्याचा अंश आहे, हे आपणास मान्य करावे लागेल. परंतु प्रश्न असा की वाङ्मय, समाजकारण, तत्त्वज्ञान, कला इत्यादींची निर्मिती कोणत्या वातावरणात व कशा प्रकारची होईल हे सांगता येईल काय, हा आहे. विज्ञानशास्त्रे व सामाजिकशास्त्रे 'शास्त्रे' म्हणून जोमाने वाढीला लागली होती, त्यांत नवे नवे सिद्धान्त प्रस्थापित होत होते, नवी नवी सत्ये हुडकून काढली जात होती व त्या त्या क्षेत्रांना कार्यकारणाच्या साच्यात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न होत होता, त्यात यश येत होते, त्यामुळे सर्वच क्षेत्रे अशा रीतीने कार्यकारणाच्या कैचीत बसवून दाखवता येतील, असा जो एक उत्साह गेल्या शतकात निर्माण झाला होता त्याचे लोण वाङ्मयापर्यन्त तेनच्या सिद्धान्ताच्या स्वरूपात आले होते. तेनने भौतिक शास्त्रांच्या पद्धतींचा अवलंब वाङ्मय, कला यांसाठी केला आहे, असे

जॉन ड्यूरंटने आपल्या तेनच्या फ्रेंच ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराच्या प्रस्तावनेत म्हटले आहे ते ह्या दृष्टीने खरे आहे.

साहित्य ही एक स्वतंत्र अशी एक मानवी अभिक्रिया आहे. तिचे काही स्वतंत्र प्रश्न आहेत, तिच्या विकासक्रमाचे काही स्वतंत्र नियम असणे शक्य आहे, ह्या गोष्टीकडे या कालात पूर्ण दुर्लक्ष झाले होते. वाङमय ही एक प्रज्ञायुक्त अभिकृती ( ॲक्टिव्हिटी ) आहे, असे मत जरी या एकोणीसाव्या शतकात प्रसृत झालेले असले तरी, प्राचीन कालच्या जीवनात व संस्कृतीत जे स्थान धर्मसंस्थेला होते, ते वाङमयाने आपल्या कालात प्राप्त करून घ्यावे असा एक विचारप्रवाह या शतकात अत्यंत प्रभावी होता. कार्लाईल, रस्किन तसेच मॅथ्यू ॲर्नोल्ड इ. विचारवंतांनी हा विचार मांडलेला आहे. राष्ट्राचा इतिहास व त्याचे वाङमय यांचे संबंध अत्यंत घनिष्ट असे असतात, असे कार्लाईलने आग्रहाने प्रतिपादिले आहे. वाङ्मयाचे स्थान तो कमी मानीत नाही, वीरगाथा व पुराणकथा यांचे महत्त्व त्याने तेनच्या अगोदर कितीतरी वर्षे त्याने प्रतिपादिले.

वाङमयेतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर या कालात वाङमयेतिहास हा व्यापक इतिहासाचा एक भाग म्हणून त्याच्याकडे पाहिले जाई, असे दिसते. म्हणजे वाङमयेतर घटना, प्रसंग, विचार, ध्येये इत्यादींना प्राधान्य देऊन वाङमयाने त्यांच्या विश्वसनीय अशा वाहकत्वाचे काम कसे केले हे दाखविणे, हेच वाङमयेतिहासाचे एक प्रमुख प्रयोजन दिसते. स्वच्छंदवादाच्या प्रभावानंतर साहित्यकलांकडे पाहण्याची एक 'ऐतिहासिक' दृष्टि निर्माण झाली होती. तिचे प्रत्यंतर निरनिराळया इतिहासलेखनाच्या प्रयत्नांतून व विचारवंतांच्या प्रयत्नांतून प्रत्ययास येऊ लागले.

## : ३ :

आणखीही काही प्रश्न विचारात घेणे अवश्य आहे. त्यांपैकी अगदी पहिला प्रश्न म्हणजे वाङमयेतिहासाच्या 'स्वरूपा'संबंधीचा होय. आताच पाहिल्याप्रमाणे इतिहासकालीन वाङमयकृती ह्या इतर क्षेत्रीय घटना, प्रसंग, विचाराप्रमाणे केवळ संस्काररूपाने जिवंत न राहता त्या प्रत्यक्ष स्वरूपात सदैव अस्तित्वात असतात. म्हणजे ग्रंथरूपाने त्या मूळ स्वरूपात केव्हाही वाचनीयच असतात असे नव्हे, तर त्या बोधकही असतात. त्यामुळे त्यांच्या रूपबंधादि गुणदोषांची चर्चा सदैव संभवतेच, पण त्याचबरोबर ज्या इतिहासाच्या ओघात त्या निर्माण झालेल्या असतात त्या इतिहासपरिस्थितीचे संस्करण घेऊन त्या आलेल्या असतात, हे

विसरता येत नाही. त्या परिस्थितीशी त्यांचे अतूट नाते निर्माण झालेले असते, तोही एक अभ्यासाचा, विमर्शाचा विषय होऊ शकतो. समकालीन जीवन-परिस्थितीशी वाङ्मयाचे जे नाते असते त्याचे नेमके स्वरूप काय, हा वाङ्मयेतिहासातील एक महत्त्वाचा प्रविषय होय. तेन प्रमाणे काही विचारवंत वाङ्मयेतिहासाचे एकूण व्यापक मानवी इतिहासाशी घनिष्ट नाते जोडतात, त्याच्याशी तो अविभाज्य आहे, असे ते मानतात. वाङ्मयाला जीवनाचे कोणतेच अंग वर्ज्य नसल्याने जीवनाचे सारे विषय व सारी अंगे वाङ्मयाशी संबद्ध आहेत. त्या दृष्टीनेच एडविन ग्रीनलॉ यांनी वाङ्मयीन इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करताना Nothing related to the history of civilization is beyond our province[4] असे म्हटले आहे. त्याचे म्हणणे असे की, सांस्कृतिक इतिहास हा स्वतंत्र विषय विद्यापीठांतून मानला जात नाही, (त्यावेळी जात नसे) आणि राजकीय इतिहासकार जीवनाच्या राजकीय अंगाने एवढे भारावून गेलेले असतात की, जीवनाच्या व्यापक सांस्कृतिक अंगाकडे त्यांचे दुर्लक्षच होते. वाङ्मयाने असा विषयव्यापक, सर्वसमावेशक दृष्टिकोन धारण करून सर्व श्रेय आपणाकडे घेणे चूक नाही, हे त्यांचे म्हणणे चित्य आहे.

बारकाईने पाहिले तर अशी भूमिका धारण केली असता बरीच अतिव्याप्तता येईल व वाङ्मयापेक्षा इतर गोष्टींवर लक्ष केंद्रित होऊन ' वाङ्मयत्वा 'कडे दुर्लक्ष होईल, हा धोका आहे. पण ही अतिव्याप्ती टाकून अलिकडे व्यापक सांस्कृतिक संदर्भास ( कल्चरल कॉन्टेक्स्ट ) अधिक महत्त्व दिले जाते. अर्थात ह्या दृष्टीने पाहाणारास काही अवाङ्मयीन निष्कर्ष काढण्याचा मोह होणे व काही सर्वसामान्य नियम स्वरूपाचे अवलोकन सादर करता येणे शक्य आहे. परंतु डॉ. डायचेस यांनी या बाबतीत असे मत मांडले आहे की, " but if the critic, is careful enough in the application of this method and does not look for oversimplified cause and effect relationship, some illuminating results can be achieved "[5]. वाङ्मयेतिहासाचा विचार करताना ही भूमिका महत्त्वाची आहे.

काही अभ्यासक कित्येकदा वेगळ्या प्रकारची एकांगी भूमिका घेत असतात. वाङ्मय हे भाषारूप असते, ही गोष्ट लक्षात घेऊन आणि जी भाषा व्यवहारात सर्वत्र निरनिराळ्या कार्यासाठी वापरली जाते, तीच वाङ्मयातही वापरली जाते. त्यामुळे वाङ्मयाचा अभ्यास म्हणजे एका परीने भाषेचा अभ्यास होय, अशी ही भूमिका आहे. मर्यादित अर्थानेच तीही खरी आहे. परंतु एफ्. डब्ल्यू. बेट्सन् यांनी या भूमिकेच्या आहारी जाऊन असे विधान केले आहे की, " Literature is unintelligible except in reference to something

outside itself.[6]" कारण वाङ्मय हे पूर्णपणे भाषाक्षेत्रीय विकासावर अवलंबून आहे. अर्थात भाषा व वाङ्मय ही दोन्हीही कालाबरोबर व सामाजिक शक्तींमुळे बदलतात. परंतु वाङ्मय जरी भाषारूप असले तरी केवळ भाषिक दृष्टीनेच त्याची पाहणी करणे योग्य होणार नाही. भाषाशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र आहे. वाङ्मयाचा उपयोग त्या शास्त्रातील अभ्यासासाठी व शोधनासाठी होऊही शकेल आणि वाङ्मयाच्या आकलनास भाषाविज्ञानाची मोठी मदतही होऊ शकेल, एवढेच म्हणता येईल.

सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील अनेक घटनाविचारांचा वाङ्मयावर फारच खोल ठसा उमटलेला असतो. सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात निरनिराळ्या प्रकारांनी व निरनिराळया स्वरूपांत पडलेले असते, त्यामुळे राजकीय सामाजिक विचार चळवळी इत्यादींच्या आधारे साहित्याचा इतिहास लिहिला जातो. ही एक अतिशय लोकप्रिय अशी भूमिका आहे. त्या दृष्टीने वाङ्मयाकडे कसे पाहिले जाते ते जाणून घेणे मौजेचे आहे. इंग्रजी कवितेचे पहिले इतिहासकार थॉमस वॉर्टन इंग्रजी काव्याचे महत्त्व वर्णन करताना म्हणतात : 'It (ancient literature) faithfully records the features of the times and preserves the most picturesque and expressive representations of manners and transmits to the poetry genuine delineation of life.[7]' हेन्री मोर्ले हे वाङ्मयेतिहासकार इंग्रजी वाङ्मयाचे वर्णन The national biography किंवा the story of English mind असे करतात. तर लेस्ली स्टीफन यांच्या मते वाङ्मय म्हणजे 'particular function of the whole social organism a kind of by-product of social change'[8] असे आहे. डब्ल्यू. जे. कोर्टहोप हे इंग्रजी काव्याचे आणखी एक इतिहासकार काव्याचे वेगळेपण स्पष्ट करताना—'precisely where, the political history looks for it namely, in the life of a nation as a whole[9]' असे म्हणतात. कझामियाँ हे फ्रेंच भाषिक इंग्रजी वाङ्मयाचे इतिहासकार इंग्रजी वाङ्मयासंबंधी म्हणतात की, इंग्रजी वाङ्मय म्हणजे "the oscillation of the moral rhythm of the English national soul."[10] हे सारे इतिहासकार इंग्रजी वाङ्मयाच्या मोठेपणाने दिपून जाऊन त्याचा 'इतिहास' शोधण्यासाठी उद्युक्त झालेले आहेत. म्हणजे त्यांना प्रामुख्याने वाङ्मयाचाच इतिहास लिहावयाचा आहे पण त्यांच्या मनावर राष्ट्रीय विचारांचा एवढा प्रभाव पडला आहे की प्रत्यक्ष वाङ्मयाला ते दुय्यम स्थान द्यावयास प्रवृत्त झाले आहेत !

वाङ्मय हे राष्ट्रीय विचार, परंपरा सामाजिक विचार तसेच समाज-जीवनातील महत्त्वाच्या घटना, प्रसंग व चळवळी यांच्यांशी अविभाज्यत्वाने

एकरूप झालेले असते. समाजाच्या वा राष्ट्राच्या अस्मितेचा एक आविष्कार अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहिले जाते, आणि त्या दृष्टीला प्राधान्य देऊन त्याची परंपरा, इतिहास इ. दिल्या जातात. पुष्कळांना त्यात काही चूकही वाटत नाही. परंतु वाङमयीन दृष्टीने व वाङमयीन विद्वत्तेच्या भूमिकेवरून ह्या प्रवृत्तीचे बारकाईने अवलोकन करावयास हवे.

वाङमय हे समाजजीवनाशी व राष्ट्रीय अस्मितेशी सामान्यतः मिळतेजुळते असले तरी ते काही आनुषंगिक महत्त्वाचे वा उपांग (बाय् प्रॉडक्ट) नव्हे. मानवी प्रज्ञेचा व प्रतिभेचा तो एक स्वयंभू आणि स्व-तंत्र असा आविष्कार आहे. विशिष्ट राष्ट्राची किंवा समाजाची संस्कृती प्रायः वाङमयकलांच्या रूपानेच अस्तित्वात असते व चिरंजीव झालेली असते. अशा प्रकारचे वाङमय केवळ आपाततः निर्माण झाले, ते दुय्यम स्वरूपाचे आहे असे मानणे चूक आहे. वाङमयाचे साधन भाषा हे आहे, आणि जीवनातील लहानमोठे प्रसंग, व्यक्ती, भावभावना ... ईर्षा इ. हे त्याचे माध्यम आहे, त्यामुळे ते जीवनाशी अविभाज्यपणे निगडित झालेले वाटते, पण तो एक प्रज्ञेचा व प्रतिभेचा पूर्णपणे स्वतंत्र असा आविष्कार आहे हे लक्षात घेतले तर, केवळ इतर कोणत्या तरी जीवनांगाच्या संदर्भात त्याची मूर्ती शोधण्याचा प्रयत्न करणे हे फारसे इष्ट नाही. कारण त्यामुळे वाङमयाला दुय्यमत्त्व प्राप्त होते. तसेच विशिष्ट गोष्टींच्या पुराव्यांसाठी उपलब्ध असलेला एक 'दस्तऐवज' अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहिले जाते, हे विशिष्ट मर्यादेपर्यंतच ठीक आहे.

: ४ :

वाङमय आणि सांस्कृतिक जीवन यांमधील परस्परावलंबित्व जरी सामान्यतः दाखविता येत असले, तसेच सामाजिक, राजकीय इ. क्षेत्रांतील विचारांचा प्रभाव वाङमयावर जाणवत असला तरी वाङमय हे जीवनाचे सही सही प्रतिबिंब नसते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. उलटपक्षी समाजमनावर वाङमयाचा बराच परिणाम होत असतो. म्हणजेच इतर सामाजिक शक्तींप्रमाणे तीही एक कारक-शक्ती असते. त्या शक्तीचा प्रभाव कित्येकदा जेवढा भडक करून दाखविला जातो तेवढा तो नसतो. तो अतिशय सूक्ष्म असतो. त्यामुळेच वाङमयाचे व समाजाचे संबंध अतिशय गुंतागुंतीचे झाले आहेत. वाङमयाला जीवनाचे प्रतिबिंब म्हणून मानले जाते, ते फारच स्थूल अर्थाने होय.

तसेच वाङमय आणि सामाजिक जीवन यांची वाटचाल एकमेकांच्या अगदी हातात हात घालून चाललेली असते, हे मत तेवढे खरे नाही. वाङमय हे कधी कालाच्या

199271

मागे असते, तर कधी ते पुढे असते. साहित्य हे नेहमी समाजाचा जो बुद्धिमान वर्ग (इंटेलेजन्सिया) असतो त्याच्याकडून निर्माण होत असते. हा वर्ग नेहमी 'वर्गीय' जाणिवांनी भारलेला असतोच असे नाही. तो त्या दृष्टीने 'स्वतंत्र' असतो. त्याचे लक्ष कित्येकदा इतिहासावर खिळलेले असते तर कित्येकदा भविष्यावर. समाजात प्रेमभावनेला एवढे महत्त्व नसता वाङ्मयात मात्र प्रेमविवाह चित्रिलेले असतात ह्याचे कारण हेच आहे. सामाजिक बदलांवर लक्ष ठेवून जेव्हा आपण साहित्यातील प्रवृत्तींचे विवेचन करतो, तेव्हा वाङ्मयाला दुय्यम स्थान देत असतो, त्यायोगे एक प्रकारचा विपर्यास होत असतो.

तथापि वाङ्मयाचा व समकालीन जीवनाचा बिंब-प्रतिबिंबासारखा परस्परावलंबी संबंध नसतोच असे नाही. तसा तो आहे असे सिद्ध करण्यास वाङ्मयेतर क्षेत्रांतील पूरक पुराव्यांचा वापर करावा लागेल. थोडक्यात असे म्हणता येईल की, वाङ्मयेतिहासकाराला वाङ्मयेतर क्षेत्रांतील इतिहासाचा सर्व परिचित आराखडा घेऊन त्यात वाङ्मयीन कलाकृती व वाङ्मयीन प्रवृत्ती सरधोपटपणे बसवून दाखविता येणार नाहीत. अर्थात संपूर्णपणे ते टाळणेही योग्य होणार नाही. तेनच्या विवेचनात आलेली व प्रायः जर्मन वाङ्मयेतिहासकारांनी वापरलेली 'युग-प्रभाव' (टाइम-स्पिरिट) ची कल्पना वाङ्मयाला संपूर्णपणे लावता येत नसली, तरी प्रत्येक युगाची विशिष्ट प्रवृत्ती असते, विशिष्ट मूल्ये असतात, त्याचा प्रभाव वाङ्मयक्षेत्रावर पडत असतोच हे मान्य करावे लागते.

वाङ्मयाचा इतिहास अशा रीतीने सामाजिक, राजकीय, तत्त्वज्ञानात्मक इ. क्षेत्रीय इतिहासापासून स्वतंत्र मानावा लागतो. तथापि एक महत्त्वाचा दस्तऐवज (डॉक्युमेंट) ह्या दृष्टीने सामाजिक, वैचारिक विविध प्रवृत्तींची पाहणी करण्यासाठी वाङ्मयाचा वापर करणे अगदी असंभाव्य वा चुकीचे आहे असे म्हणता येणार नाही. कारण सामाजिक जीवनाची काही अंगे साहित्याविना अन्य कोणत्याच ठिकाणी नमूद झालेली आढळणार नाहीत, आणि अशा प्रकारे एक विश्वसनीय साधन म्हणून साहित्याचा अभ्यास करणे तसे चुकीचे नाही. काहींच्या मते हा विशुद्ध वाङ्मयाभ्यास म्हणता येणार नाही. पण तसे म्हटले तर तो विशुद्ध सामाजिक अभ्यासही म्हणता येणार नाही. कारण बोलून चालून तो काल्पनिक जगाचा अभ्यास होय. त्याचे नाते वाङ्मयाशीच अधिक जवळचे आहे. असा अभ्यास वाङ्मय व सामाजिक शास्त्रे यांच्या सीमारेषेवर पडला तरी त्याचा गाभा वाङ्मय हाच राहणार. त्या दृष्टीने त्याचा समावेश वाङ्मयीन विद्वत्तेतच करावा लागेल, वाङ्मयात जीवनातील इतक्या विविध प्रकारच्या गोष्टींचा उल्लेख येत असतो की, त्या त्या गोष्टींना प्राधान्य देऊन वाङ्मयाची पाहणी करणे विशेष चूक ठरणार नाही. वाङ्मयात आलेला एखादा विषय सामाजिक स्वरूपाचा असला तरी त्याचे समाज-

शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले विवेचन व वाङ्मयाभ्यासकाच्या भूमिकेवरून केलेले विवेचन यांत फरक राहाणारच.

वाङ्मय हे स्वरूपदृष्ट्या सामाजिक शास्त्रांना जितके जवळचे आहे त्यापेक्षा ते कलांना विशेषत: महत्त्वाच्या गणल्या गेलेल्या ललितकलांना अधिक जवळचे आहे, असे आजकाल मानले जाते. त्या दृष्टीने वाङ्मयाचा इतिहास हा कलांचा इतिहास जसा अभ्यासिला जातो तसा अभ्यासावा असे काहींचे म्हणणे पडते. पण वर वर जरी पाहिले तरी कलांच्या इतिहासापेक्षा वाङ्मयेतिहासाचे स्वरूप खूपच भिन्न आहे. चित्रकलेचे उदाहरण घेतले तर असे दिसेल की, रेने वेलेकनी म्हटल्याप्रमाणे चित्रकलेतील श्रेष्ठ कलाकृतींची कालानुक्रमाने मांडणी केली किंवा निरनिराळ्या संप्रदायांप्रमाणे त्या कलाकृतींची आयोजना केली तर चित्रकलेच्या ऐतिहासिक विकासाची पूर्ण कल्पना येऊ शकेल. तशीच योजना करून संगीतकलेतील ऐतिहासिक विकासाची कल्पना येण्यासाठी कालानुक्रमानुसार त्या कलाकृतींची केवळ मांडणी करणे योग्य होईल. कारण ह्या दोन्ही प्रकारच्या कलाकृतींच्या बाबतीत त्यांचे निर्माते असलेल्या कलावंतांचा स्वभाव, चरित्र, व्यक्तिमत्त्व, त्यांचा सामाजिक दर्जा इ. गोष्टींचा विचार ह्या संदर्भात फारसा संभवत नाही.

वाङ्मयकलेचे तसे नाही. भाषा हे माध्यम असल्याने वाङ्मयाच्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण होतात. भाषा ही समाजपरिस्थितीप्रमाणे बदलत जाते. अगदी साध्या विधानापासून तो अत्यंत सुबद्ध व रेखीव अशा वाङ्मयीन कृतीपर्यंत भाषेचा वापर होत असतो. त्यामुळेच वाङ्मयीन कलाकृतींची कलांगे पूर्णपणे वेगळी काढणे कठिण जाते. साहजिकच वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन वाङ्मयकलेची अंगे विलगपणे विचारात घेऊन करणे कठिण आहे. तथापी कित्येकदा तसे करावे लागते. पण त्यावेळी कलाकृतीच्या एकत्वाची जाणीव सतत ठेवावी लागते.

## : ५ :

वाङ्मय ही एक कला आहे, हे एकदा गृहित धरले आणि त्या दृष्टीने वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला, तरी त्यामुळे काही मूलभूत प्रश्न निर्माण होतातच. जेव्हा एखादा इतिहासकार राजकीय, सामाजिक इ. साहित्यबाह्य क्षेत्रातील विचारांना प्राधान्य देऊन साहित्याचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी तो वाङ्मयाचा बोलून चालून एक विश्वसनीय ‘ दस्तऐवज ’ म्हणून वापर करीत असतो. त्यामुळे असा ‘ इतिहास ’ हा केवळ इतिहास असेलही, पण तो वाङ्मयाचा नव्हे. उलटपक्षी जेव्हा एखादा लेखक वाङ्मयीन कलाकृतींना प्राधान्य देऊन वाङ्मयाचा इतिहास

लिहिण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी प्रत्येक महत्त्वाच्या कलाकृतींचे विवरण त्याने इतिहासक्रमाने केलेले असते. असा वाङ्मयीन इतिहास हा 'वाङ्मयीन' असतो पण 'इतिहास' नसतो. एडमंड गॉसने आपल्या वाङ्मयेतिहासात 'आंग्ल साहित्याची आंदोलने' (Movements of English literature) आपण दाखवून देणार आहोत, त्यांतून वाचकांना इंग्रजी साहित्याच्या उत्क्रांतीची जाणीव (Feeling of evolution in English literature) होईल असे म्हटले आहे.

त्याचा असा दावा असला तरी त्याच्या या वाङ्मयेतिहासाचे वर्णन टीकाकारांनी असे केलेले आहे की, प्रत्यक्षात त्याचे हे इतिहासखंड म्हणजे ग्रंथकार व कालानुक्रमाने मांडलेल्या त्यांच्या साहित्यकृती यांवरील विवेचक अभिप्राय आहेत. ("a series of critical remarks on authors and some of their works chronologically arranged")[11] कारण गॉसने प्रारंभी जरी तेनच्या सिद्धान्ताचा आधार घेतला तरी पुढे तो केव्हाच सोडून दिला होता. सेंट्सबरी या दुसऱ्या वाङ्मयेतिहासकाराचा इतिहासही कलाकृतींच्या रसग्रहणांनी भरलेला आहे. ऑलिव्हर एल्टनने आपल्या सहा खंडांच्या 'सर्व्हे ऑफ इंग्लिश लिटरेचर' या वाङ्मयीन इतिहासाबद्दल अशी स्पष्ट कबुली दिली आहे की, हा इतिहास म्हणजे 'really a review, a direct criticism'[11a] होय. हा अभिप्राय अतिशय बोलका आहे. अशा रीतीने वाङ्मयाचा इतिहास एका दृष्टीने लिहिला तर तो 'इतिहास' होतो पण वाङ्मयाचा होत नाही. दुसऱ्या दृष्टीने लिहिला तर तो 'वाङ्मयीन' होतो पण 'इतिहास' होत नाही, असा एक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. वाङ्मयेतिहासलेखनातील हा यक्षप्रश्न होय.

असे असले तरी वाङ्मयाचे इतिहास हे मागे लिहिले गेले आहेत व आजही ते योजनापूर्वक लिहिले जात आहेत. वाङ्मयीन कलाकृतींच्या रसग्रहणात्मक व विवेचक लेखनाचा समावेश समीक्षेत होईल. कारण प्रत्यक्षात 'इतिहास' या नांवाखाली आलेले ते व्यक्तींवर किंवा कृतींवर लिहिलेले समीक्षा-लेखच असतात. मराठी कादंबरीचा ऐतिहासिक विकास-क्रम सांगणारी प्रा. नरहर कुरुंदकरकृत 'धार आणि काठ' व प्रा. ल. ग. जोग यांची 'मराठी कादंबरी' ही पुस्तके ह्या संदर्भात सहज लक्षात घेण्यासारखी आहेत. साहजिक वाङ्मयीन समीक्षा व वाङ्मयीन इतिहास यांच्या सीमारेषा कुठे भिडतात ते पाहणे महत्त्वाचे आहे. वाङ्मयेतिहास हे समीक्षालेखन का इतिहासलेखन हे व्यक्तीच्या प्रकृती-प्रवृत्तीवर अवलंबून आहे. वाङ्मयेतिहासात वाङ्मयीन कलाकृती केव्हा कशा निर्माण झाल्या, कोणी निर्माण केल्या, इ. इतिहासस्वरूपाची माहिती अपेक्षित असते, पण केवळ तेथे थांबून चालत नाही तर त्यांचे कलात्मक मूल्यही विशद करावे लागते. त्याशिवाय वाङ्मयाला सार्वकालीन अंग असते त्याची चर्चा करावी लागते. रेने वेलेक यांनी म्हटल्याप्रमाणे वाङ्मये-

तिहास, वाङ्मयतत्त्वशोधन व वाङ्मयमूल्यमापन या तीनही अभिक्रिया एकमेकांच्या हातांत हात घालून या ठिकाणी वावरत असतात. कोणतीही एक अधिक महत्त्वाची असे मानता येत नाही. अलिकडे कलाकृतीच्या स्वत:च्या आकृतीबंधात्मक विशेषांची छाननी करून, प्रत्येक अंगाची उत्क्रांती कशी होत गेली आहे हे दाखविले जाते. विशेषत: आधुनिक वाङ्मयात प्रसिद्ध असलेल्या निरनिराळ्या ' वाङ्मयीन अभिबंधां'चा (फॉर्मस्) अभ्यास या दृष्टीने करता येतो. वाङ्मयीन अभिबंध हे तसे प्राचीन कालापासून अस्तित्वात असले तरी त्यांच्या स्वरूप वैशिष्ट्यांची जाणीव आज अधिक प्रभावी असते. लेखकाच्या निर्मितिप्रक्रियेवर तिचा परिणाम झालेला असतो.

अशाप्रकारे वाङ्मयीन इतिहासात वाङ्मयीन कलाकृतीच्या रसग्रहणात्मक चर्चेचा पूर्ण त्याग करता येत नाही. वाङ्मयातील तत्त्वशोधन हे वाङ्मयकृतींच्या चिकित्सक अभ्यासाविना पूर्ण होणे अशक्य आहे. निरनिराळी गमके, दंडक अगर मूल्ये ही पोकळीतून निर्माण होत नाहीत, त्याचप्रमाणे काही काही प्रश्न, काही संकेत-मालिका अगर तत्सम संदर्भ आधाराला घेतल्याशिवाय वाङ्मयसमीक्षा वा वाङ्मय-इतिहास शक्य आहे असे वाटत नाही. ज्यावेळी एखाद्या कालखंडाचा किंवा तत्सम घटकाचा वाङ्मयेतिहास आपण अभ्यासतो, त्यावेळी आताच उल्लेखिलेले काहीतरी तत्त्व वा गृहितकृत्य आधारास घेतलेलेच असते. काही टीकाकारांनी वाङ्मयेतिहास हा काही प्रमाणात वाङ्मयसमीक्षेशी मिळताजुळता असला तरी त्याची स्वत:ची अशी काही भूमिका आहे, त्याच्या स्वत:च्या अशा काही पद्धती आहेत, त्यांचा अवलंब वाङ्मयेतिहासात व्हावयास हवा, असे प्रतिपादिले आहे. वाङ्मयेतिहासाची भूमिका वाङ्मयसमीक्षेपासून कशी भिन्न असते हे स्पष्ट करताना. बेटसन म्हणतात की, " Literary history shows A to derive from B, while criticism pronounces A to be better than B."[12] पहिल्या प्रकारात सतत बदलणारी घटिते ( फॅक्टस् ) विचारात घेतली असताता; तर दुसरा प्रकार म्हणजे टीकाकाराच्या मताचा व आग्रहाचा परिपाक होय. पण हा अशा प्रकारचा भेद मान्य करता येईल काय याची शंका आहे.

कोणत्यातरी प्रकारच्या मूल्यनिदानाशिवाय (व्हॅल्यू-जज्मेंट-विना) वाङ्मयेतिहा-साची कल्पनाच करता येत नाही.वाङ्मयेतिहासकार ज्यावेळी विशिष्ट प्रकारचे वाङ्मय वा ग्रंथ किंवा कालखंड आपल्या अभ्यासासाठी निवडतो त्यावेळी तो चांगला टीकाकार असावा लागतो. कारण उपलब्ध साहित्याच्या आधारे त्याला कोणत्यातरी प्रकारच्या मूल्यनिदानाप्रत यावे लागते. मूल्यनिदान म्हणजे तटस्थवृत्तीने केलेले मतप्रदर्शन नव्हे. अभ्यासासाठी त्याच्या पुढे जे ग्रंथ वा तत्सम गोष्टी घटकावयव ( फॅक्टस् ) म्हणून उपलब्ध असतात त्या तशा तटस्थ (न्यूट्रल) स्वरूपाच्या कधीच नसतात. उलटपक्षी

ऐतिहासिक परंपरेची जाणीव नसलेली वाङमयसमीक्षा ही केवळ स्वैरालाप स्वरूपाची असेल. तिच्यातील मूल्यनिदान हे ऐतिहासिक संस्करणाच्या अज्ञानावर आधारलेले असल्याने तीत मूलग्राहीत्व असणार नाही. त्यामुळे अशा समीक्षकाला वाङमयीन कलाकृतीच्या खऱ्या स्वरूपवैशिष्टयांचे आकलनही होणार नाही. एकोणीसाव्या शतकात समीक्षा व इतिहास यांमध्ये निरनिराळ्या कारणांनी जो दुरावा निर्माण झाला होता तो त्या दोघांनाही हानिकारक होता.

वाङमयेतिहासाच्या वेगळ्या गमकांचा व मूल्यांचा पुरस्कार करणारांना समीक्षाक्षेत्रातील मूल्यनिदानाचे महत्त्व अमान्य करता येत नाही. वाङमयेतिहासाचे समीक्षेपासून अलगपण सिद्ध करण्याचा त्यांचा आग्रह चालू असतो. त्यातून वाङमयेतिहासाशी संबद्ध असा एक व वाङमयेतिहास आणि समीक्षेच्या दृष्टीने वेगळाच प्रश्न निर्माण होतो. त्याचे निराकरण करणे अवश्य आहे.

: ६ :

स्वच्छंदवादाच्या चळवळीनंतरच खरा आधुनिक वाङमयेतिहास विचार सुरू होतो. त्याच्यापूर्वी ग्रीक, लॅटीन आदि प्राचीन विद्यांतून जी तत्त्वे प्रतीत होतात ती सार्वकालिक व त्रिकालातीत मानण्याची प्रवृत्ती होती. स्वच्छंदवादाने त्यांचे सार्वभौमपद हिरावून घेतले व प्रत्येक कालखंडाला साजेशी अशी तत्त्वे असतात, असा विचार वाङमयक्षेत्रात मूळ धरू लागला. त्यातून एक इतिहासवाद निर्माण झाला.

आपण पूर्वकालिनांच्या मनात प्रवेश करून त्यांच्या प्रवृत्तींचे आकलन करून घेतले पाहिजे, असे या इतिहासवाद्यांचे म्हणणे असते. त्या कालाला पसंत असणारी प्रमाणे (स्टँडर्डस्) आपण स्वीकारली पाहिजेत व हे करीत असताना आपल्या कालाचे जे संस्कार आहेत त्याचा पूर्णपणे निरोप घेतला पाहिजे. ह्या विचारप्रणालीला 'इतिहासवाद' (हिस्टॉरिसिझम) असे म्हटले जाते. ही विचारधारा एकोणीसाव्या शतकात जर्मनीत पद्धतशीरपणे वाढीला लागली. तेथील काही इतिहासतत्त्व-विवेचकांनी तिच्यावर आक्षेप घेतले, तरी अप्रत्यक्षपणे तिचा इंग्लंड-अमेरिकेत प्रवेश झाला व तेथील अनेक वाङमयीन इतिहासकारांनी ह्या विचारसरणीशी आपले नाते जोडले. हार्डिन क्रेग यांनी "The newest and best phase of recent scholarship is the avoidance of anachronistic thinking.[13]" असा ह्या दृष्टिकोनाचा गौरव केला आहे. इ. इ. स्टॉल यांनी एलिझाबेथकालीन रंगभूमीचे विशेष सांगून तत्कालीन प्रेक्षकांच्या नाटयाविषयीच्या अपेक्षा कोणत्या होत्या, हे विशद केले आहे. ते करीत असता लेखकाच्या

लेखनविषयक उद्दिष्टांचेही विवेचन केले आहे. अशाच प्रकारचा प्रयत्न लिलि कॅम्बेल यांनी आपल्या 'शेक्सपीअर्स ट्रॅजिक हीरोज' या प्रबंधाद्वारे नावीन्यपूर्ण रीतीने केलेला आहे.

शेक्सपीअरकालीन मानसशास्त्रविषयक ज्ञान कशा प्रकारचे होते, मनुष्याच्या भावभावना, मनोविकार इ. बाबत शेक्सपीअरच्या काली कोणत्या समजुती होत्या, माणसाच्या मनाला अस्वस्थता केव्हा प्राप्त होते, मनोविकारांच्या प्रभावामुळे केव्हा वृत्तीत उच्छृंखलता येते, तिचे वेडात रूपांतर केव्हा होते, इ. बाबींबाबत शेक्सपीअर-काली काही संकेतात्मक तत्त्वज्ञान उपलब्ध होते. ते तत्कालीन मानसशास्त्रीय ज्ञानावर आधारलेले होते. त्याचाच अवलंब शेक्सपीअरने आपल्या नाटकांत केलेला आहे. मनोविकारांचा जो सिद्धान्त त्यावेळी रूढ होता त्याला, 'थिअरी ऑफ् ह्यूमर्स' असे म्हटले जात असे. तो सिद्धान्त विचारात घेतला तर शेक्सपीअरची नाटके म्हणजे जवळ जवळ रूपककथा कशा ठरतात हे लिलि कॅम्बेल यांनी विस्ताराने दाखवून दिलेले आहे. आपल्याकडेही अलिकडे जे महाभारतविषयक नवे चिंतन अनेकांनी मांडले आहे, त्याला उत्तर देण्यासाठी विरोधकांनी महाभारतीय कथा-वस्तूची खोलात जाऊन पाहणी करून ती व्यक्तिचित्रे परत त्या पार्श्वभूमीवर चपखल-पणे बसवून दाखविली आहेत. फ्रेडरिक पॉटलने ह्या भूमिकेचे आपल्या 'इडियम ऑफ् पोएट्री' या ग्रंथात वेगळेच अंतर्दर्शन (इंटरप्रिटेशन) घडविले आहे. आपल्या भूमिकेला तो 'टीकात्मक सापेक्षवाद' अशी संज्ञा देतो. धर्मनीतिशास्त्रात ज्याप्रमाणे आपण काही चिरंतन तत्त्वे मानतो तशी समीक्षेसाठीही मानणे आवश्यक आहे, हे प्रतिपादून त्याने ती ह्या भूमिकेत बसविली आहेत. साहजिकच त्याचे विवेचन त्यादृष्टीने मूलग्राही मानावे लागते. ह्या इतिहासनिष्ठ भूमिकेचा अवलंब करताना टीकाकारांना ऐतिहासिक वातावरणात कल्पनेने प्रवेश करावा लागतो. टीकाकाराच्या ठिकाणच्या कल्पनाशक्तीमुळे व सहानुकंपनामुळे (एंपथी) निरनिराळ्या कालांतील प्रवृत्ती, संकेत, आवडीनिवडी, तिरस्कारस्थळे, तसेच देवदेवता, निरनिराळे समाजगट, त्यांचे परस्परसंबंध इ. जाणून घ्यावी लागतात. हे करीत असता आपल्या कालापासून पूर्णपणे फुटून निघून त्या कालाशी संपूर्णपणे समरूप होण्याची क्रिया साध्य केलेली असावी लागते.

तसेच हे सारे इतिहासगत चित्र संपूर्णपणे उभे करीत असताना लेखकाच्या लेखनामागील उद्दिष्टांवर अधिक भर द्यावा लागतो. आपण ती उद्दिष्टे शोधू शकतो. ती ग्रंथकाराने पार पाडलेली आहेत, हे दाखवावे लागते. ते एकदा सिद्ध केले की या प्रकारच्या टीकेचे काम संपले. ग्रंथकाराने आपले समकालीन उद्दिष्ट पार पाडलेले आहे, त्यामुळे त्याच्या लेखनकृतीवर टीका करण्याची शक्यताही नाही व आवश्यकताही नाही, अशा निर्णयाप्रत आपणास यावे लागते. या पद्धतीत

लेखकाने स्वकालीनांकडून मान्यता मिळविण्यात संपादन केलेले यश, हे एवढे एकच गमक प्रमाण मानावे लागते. साहजिकपणेच प्रत्येक कलाकृतीपरत्वे निरनिराळ्या व कित्येकदा परस्परविरुद्ध व परस्परांना छेद देणाऱ्या अनेक समीक्षा-संकल्पना प्रमाण मानाव्या लागतील. त्यामुळे या पद्धतीने लिहिलेला वाङ्मयेतिहास म्हणजे अशा परस्परविरुद्ध व कोणत्याही तत्त्वाप्रत न येणाऱ्या छोट्या तुकडेवजा संकल्पनांचे संकलन बनेल.

लेखकाचे लेखन-निर्मिती मागले उद्दिष्ट प्रमाण मानणे, ही भूमिका चुकीची आहे. आधुनिक समीक्षा तिला हेतुमिथ्यावाद (इंटेन्शनल फॅलसी) अशी संज्ञा देते. "The meaning of work of art is not exhausted by or equivalent to its intention."[14] असे रेने वेलेक म्हणतात, ते महत्त्वाचे आहे. एकदा निर्माण झाल्यानंतर एक मूल्यमालिका म्हणून कलाकृतीचे स्वतंत्र जीवन सुरू होते. त्यामुळे कलाकृतीचा मथितार्थ तिच्या कर्त्याला व त्याच्या समकालीनांना जो तिचा अर्थ अभिप्रेत असतो, त्याच्या परिभाषेत बसत नाही. तिचा खरा अर्थ निरनिराळ्या कालातल्या तिच्या रसिकांनी समजून घेतलेला असतो, त्याच्या संकलनातून निष्पन्न होतो. कलाकृतीचा अर्थ किंवा आशयवत्ता ही थोडीफार इतिहाससिद्ध प्रक्रिया आहे.

या इतिहासनिष्ठ भूमिकेचे पुरस्कर्ते कलाकृतीची ही सारी अर्थसिद्धता गैरलागू आहे व कलाकृतीच्या खऱ्या अर्थासाठी आपण तिच्या मूळाकडेच जावयास पाहिजे असे म्हणतात. त्यांचा हा दावा पूर्णपणे अस्वीकार्य आहे, हे वास्तविक जाहीर करण्याचेही कारण नाही. कारण दूरच्या वा जवळच्या भूतकाली निर्माण झालेल्या कलाकृतींचे मूल्यनिदान करीत असताना आपण विसाव्या शतकात वावरत आहोत, ह्या गोष्टीचा आपणास विसर पडणे केवळ अशक्य आहे. आपली समकालीन भाषा व तिचे संस्कार, तसेच नवनवीन प्रवृत्ती व गेल्या अनेक शतकांचा आपणांवर झालेला निर-निराळा परिणाम, ह्या गोष्टी पूर्णपणे विसरून जाणे हे कसे शक्य आहे ? आपण पूर्वकालीन ग्रंथकारांचे (उदा. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, कालिदास, शेक्सपीअर इत्यादीकांचे) समकालीन होऊच शकत नाही. कल्पनेने पूर्वकाल मनात निर्माण करणे व पूर्वकालीन जीवनविषयक दृष्टिकोनाचा अंगिकार करणे ह्यात खूप आणि मूलभूत फरक आहे. हॅम्लेटचे उदाहरण देऊन रेने वेलेक म्हणतात, If we should really be able to reconstruct the meaning which '*Hamlet*' held for its contemporary audience, we would merely improvish it.[15] नंतरच्या रसिकांच्या पिढ्यांनी 'हॅम्लेट'चा जो नवनवा अर्थ लावला त्याला आपण मुकू व पुढे येणाऱ्या नवार्थदर्शनाच्या विविध प्रयत्नांचीही आपण वासलात लावू. याचा अर्थ टीकाकाराने मन मानेल तसा अर्थ लावणे असा नव्हे. तसेच योग्य व

अयोग्य पाठभेदांतील फरकांची चर्चा करणे अनवश्यक आहे, असे नव्हे. ते चालू राहाणारच आणि प्रत्येक वेळी कोणता पाठ बरोबर आहे ह्याचा निर्णयही शक्य त्या चिकित्सेने करावा लागणार.

खऱ्या अभ्यासकाने कलाकृतीच्या निर्मात्याच्या कालाहून व स्वतः वावरत असलेल्या वर्तमानकालाहूनही भिन्न अशा तिसऱ्या कालावस्थेत शिरून कलाकृतीकडे पाहावयास हवे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या काली रसिकांनी लावलेल्या भिन्न अर्थांचा चित्रपट त्याच्या दृष्टीपुढून जावयास हवा. त्यांतूनच कलाकृतीच्या खऱ्या अर्थाचा सुगावा लागणे शक्य आहे. प्रत्यक्षात मात्र इतिहासाशी समरस होण्याची प्रवृत्ती व स्वतःच्या कालात रमण्याची प्रवृत्ती या दोहोंपैकी एकीची निवड करणे चालू असते. ते अयोग्य आहे. खोटा सापेक्षवाद तसेच त्रिकालातील तत्त्वांचा खोटा आभास, या दोहोंपासून आपण अलिप्त राहावयास हवे. इतिहासाच्या ओघात होत असलेल्या मूल्यमापनातून मूल्ये वाढीला लागतात व ती कलाकृतीचा आशय आपणास समजून देण्यास मदत करतात. ऐतिहासिक सापेक्षवादाला त्रिकालातीत तत्त्व-मीमांसा हे उत्तर नव्हे. तसेच कलेचे सार्वकालित्व व मानवी स्वभावप्रकृतीची दुरितक्रमता ह्यामागे लपणे योग्य नव्हे. रेने वेलेक यांनी, ह्या दोन ऐकांतिक भूमिका टाळून जी तिसरी भूमिका वाङ्मयाभ्यासकाने स्वीकारवयास हवी तिचे नामकरण करताना 'We must rather adopt a view for which the term "*Perspectivism*" seems suitable.'[16] हे विधान करून 'परस्पेक्टिविझम' हा नवा शब्द-पर्याय सुचविला आहे. 'सम्यक्-दृष्टिक्षेपणवाद' असे त्याचे मराठी-करण करता येईल..

कलाकृतीतून कोणती समकालीन मूल्ये प्रतीत होतात हे, तसेच तिच्या निर्मितीनंतरच्या कालातील मूल्यांच्या संदर्भातही त्या कलाकृतीचे परिशीलन केले पाहिजे. कारण कलाकृती ही, 'ऐतिहासिक' असते तशीच 'सार्वकालिक'ही असते. सम्यक्-दृष्टिक्षेपणवादाचे स्पष्टीकरण करताना रेने वेलेक म्हणतात,— "Perspectivism means that we recognize that there is one poetry, one literature, comparable in all ages, developing, changing, full of possibilities."[17] वाङ्मय म्हणजे एकमेकांशी सामान्यधर्माने निगडित नसलेल्या परंतु वैशिष्टचपूर्ण असलेल्या कलाकृतींची मालिका नव्हे. तसेच 'रोमँटिसिझम', 'क्लासिसिझम' यांसारख्या एकमेकांच्या परस्परविरोधी प्रवृत्तींच्या एकाआड एक उठलेल्या लाटा नव्हेत. सार्वकालिकता व सापेक्षता ही दोन्हीही गमके चूक आहेत. त्यांतून मार्ग काढण्यासाठी आताच पाहिल्याप्रमाणे सर्वसमा-वेशक अशी तृतीय कालाची भूमिका आपणास घ्यावी लागते. अशारीतीने वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकाला वाङ्मय-समीक्षकाची भूमिका चांगलीच पार

पाडता आली पाहिजे. या अभ्यासकाच्या विवेचनात नेमकेपणा व साक्षेप यावयाचा असेल तर त्याला वाङ्मयेतिहासाची परंपरा माहीत असणे आवश्यक आहे. कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या तत्त्वाचा वा सूत्राचा अवलंब करून ग्रंथाची निवड केल्याशिवाय वाङ्मयेतिहास लिहिता येणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे तो लिहीत असता, गुणविशेष-दर्शनाचा व मूल्यमापन करण्याचा प्रयत्न टाळणे हे अशक्य आहे. या विवेचनावरुन वाङ्मयेतिहास-लेखनाच्या वेगळेपणाची कल्पना येईल.

वाङ्मयेतिहासलेखनासंबंधीच्या काही भूमिकांचे परीक्षण केल्यानंतर महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वाङ्मयेतिहासाच्या अनुशासनाचा होय. आताच पाहिल्याप्रमाणे इतिहासान्तर्गत घटिते (फॅक्टस्) ते ज्ञान, व ऐतिहासिक दृष्टी यांबरोबर समीक्षाविषयक मूल्ये, प्रमाणे यांचा अवलंब वाङ्मयेतिहासास करावा लागणे केवळ अपरिहार्य आहे. त्यामुळेच अनुशासनाचा (डिसिप्लीन) प्रश्न निर्माण होतो. म्हणजे हे अनुशासन इतिहासानुशासनाशी मिळतेजुळते का समीक्षेशी ? आताच पाहिल्याप्रमाणे या दोहोंचा समन्वय हेच उत्तर संभवते. याचा अर्थ वाङ्मयेतिहासाने आपले स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण अनुशासन निर्माण करावयास हवे, जे प्रत्यक्षात इतिहास, तत्त्वशोधन व मूल्यमापन या अभिक्रियांचा समावेश करणारे असेल, म्हणजे त्यांमधील वैशिष्ट्यांचे त्यात अवलंबन केलेले असे असेलच, पण त्याचबरोबर वाङ्मयाची प्रकृती वेगळी असल्याने त्यांच्यापासून ते त्या प्रमाणात भिन्नही असेल.

या संदर्भात आणखीही काही गोष्टी लक्षात घेणे अवश्य आहे. वाङ्मयेतिहास ही एकाच प्रकारची अभिक्रिया नव्हे तर निरनिराळ्या अभिक्रियांचा तो कलाप आहे. कारण वाङ्मयाच्या इतिहासाच्या अवलोकनासाठी जो घटक आपण विचारात घेऊ त्यावर कोणती प्रपद्धती (मेथॉडॉलॉजी) अवलंबावयाची हे अवलंबून राहील. म्हणजे एखादा कालखंड, एखादा वाङ्मयप्रकार, एखादी व्यक्ती, अगर तत्सम काहीतरी (उदा. स्त्रीजीवन, स्वभावलेखन, जीवनचित्रण) असे जे काही आधारास घेतलेले असेल त्याच्या स्वरूपाप्रमाणे एकंदरीने अवलंबावयाच्या पद्धतीचे स्वरूप वेगळे वेगळे राहाणार आहे. म्हणजे शोधानुशासनाच्या दृष्टीने वाङ्मयेतिहास हे एकावयवी अनुशासन नव्हे, हेच खऱ्या इतिहासापासूनचे त्याचे वेगळेपण. पण ऐतिहासिक दृष्टी हा इतिहासाशी जोडणारा दुवा होय.

## : ७ :

वाङ्मयेतिहासाशी संबद्ध अशा घटकांचा आणि त्या संदर्भात अनुशासनांचा विचार केल्यानंतर 'इतिहासलेखन'. ह्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या काही प्रश्नांचे

विवरण आवश्यक आहे. इतिहास-लेखनात कोणतेतरी सूत्र वा तत्त्व गृहीत धरलेले असते आणि त्याचा 'विकास' दाखविण्याचा प्रयत्न केलेला असतो. समाजजीवन, राजकीय व तत्सम विचार, जीवनपद्धती, एखादी विशिष्ट सामाजिक संस्था (उदा. कुटुंब) किंवा संकल्पना (उदा. व्यक्तिवाद) विवेचनासाठी घेऊन तिचा कालमानानुसार विकास कसा होत गेलेला आहे हे दाखविणे हा इतिहास-अभ्यासाचा एक भाग होऊ शकतो.

वाङ्मयाभ्यासाच्या दृष्टीने ही उपपत्ती वाङ्मयीन इतिहासाला लावण्यात अनेक अडचणी येतात. वाङ्मयाच्या इतिहाचा गाभा म्हणजे इतिहासाच्या क्रमात निर्माण झालेल्या वाङ्मयीन कलाकृती ह्या होत. वाङ्मयीन कलाकृती ही स्वयंपूर्ण असते. ती तिच्या कर्त्याची एक निर्मिती असते. विशिष्ट कालात ती निर्माण झालेली असते एवढेच. एकाच कालातील निरनिराळ्या कलाकृतींना जोडणारा दुवा जसा नसतो, तसा इतिहासाच्या ओघात निर्माण झालेल्या कलाकृतींनाही जोडणारा धागा नसतो. म्हणजे या ठिकाणी इतर संकल्पनांच्या बाबतीत जो 'विकास' दाखविता येतो तो दाखविता येत नाही. त्याचाच अर्थ 'विकास' ही कल्पना वाङ्मयीन कलाकृतीच्या ऐतिहासिक विवेचनाला जशीच्या तशी लावता येत नाही.

दुसरे असे की, इतर क्षेत्रांतील संकल्पना, प्रयोग, उपक्रम यांना काही कारणे किंवा सामाजिक अस्तित्व असते, त्यामुळे त्यांच्यांतील अपुरेपणा व उणीवा काढून टाकण्याचा प्रयत्न होत असतो. एखादा शास्त्रीय सिद्धान्त प्रस्थापित करण्याचे श्रेय त्या शास्त्रातील संशोधकाला जरूर द्यावे परंतु (उदा. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त प्रस्थापित करण्याचे श्रेय न्यूटनला देणे जरूर आहे.) हे शास्त्रीय व तत्सम शोध त्या कालातील विशिष्ट प्रवृत्ती, प्रक्रिया किंवा परिस्थितीचे फलित असते. म्हणजे त्याच्यात व्यक्तिसापेक्षता असली तरी तो शोध किंवा सिद्धान्त हा एक विशिष्ट पद्धतीचा किंवा शोधसूत्राचा तार्किक परिपाक असल्याने, त्या संशोधकाने तो शोध किंवा सिद्धान्त मांडला नसता तर तो शोध किंवा सिद्धान्त मानवजातीपासून अज्ञात राहिला असता असे नव्हे. म्हणजे हे असे की, हे संशोधन थोडे मागेपुढे झाले असते, दुसरा एखादा संशोधक पुढे झाला असता व तो शोध लागलाच असता. त्यामुळेच साहित्यकलेतर शास्त्रांना विकास-कल्पना लावता येते, पण साहित्याचे तसे नाही. विशिष्ट कलाकृती विशिष्ट कालात कलावंताने निर्माण केली नसती तर ती पुढेमागे दुसऱ्या कोणीतरी निर्माण केली असती असे म्हणता येत नाही, इतकी कलाकृती ही व्यक्तिनिष्ठ असते. 'मेघदूत' कालिदासाने लिहिले नसते तर दुसऱ्या कोणी कवीने ते लिहिले असते असे मानता येत नाही. म्हणूनच काही वेळा असे म्हटले जाते की, "There is no history of literature but only of men writing—".[18]

या सर्व विवेचनाचा मथितार्थ असा की, प्रत्येक वाङ्मयीन कलाकृतीला स्वतंत्र व स्वयंपूर्ण अस्तित्व असल्याने एका विकाससूत्रात गोवून त्यांचा इतिहास लिहिणे अशक्य आहे. परंतु हा युक्तिवाद वाटतो तितका बिनजोड नाही. या बाबतीत भाषेचे उदाहरण देता येईल. भाषा ही प्रत्येक माणसाकडून बोलली जाते, एका माणसाच्या बोलण्याचा दुसऱ्याशी भाषेच्या स्वरूपाच्या दृष्टीने काहीही संबंध नसतो. परंतु भाषेचा इतिहास लिहिता येतो. अतिशय व्यक्तिकेंद्री असणारे मानवी मन हेही शास्त्रीय पद्धतीने अभ्यासले जात आहे. तेव्हा व्यक्तीच्या प्रतिभेतून निर्माण झालेले वाङ्मय संकलित व ऐतिहासिकदृष्टचा अभ्यासता येणार नाही, हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. वाङ्मयाचे साधन भाषा हे असून त्याचे माध्यम जीवन हे असल्याने वाङ्मयाला सामाजिक अधिष्ठान आहे. त्यामुळे त्याचा 'इतिहास' पाहणे शक्य आहे. विहंगमदृष्टीने पाहिले तर काही कालखंडांत विशिष्ट प्रकारच्या रचनेला भर आलेला असतो. उलट काही कालखंड हे केवळ भाकड असतात. उत्कृष्ट वाङ्मये निर्माण करणारे कालखंड हे नेहमी राष्ट्रीय दृष्टीने मोठे भरभराटीचे असतातच असे नाही. याचा अर्थ असा की, वाङ्मयाचा इतिहास स्वतंत्रदृष्टीने लिहिता येणे शक्य आहे. कदाचित त्याच्यासाठी योग्य अशा पद्धतींचा उद्‌भव अद्याप झालेला नसेल, कदाचित त्याच्यावर इतर ज्ञानशाखांचा प्रभाव आतापर्यंत अधिक असेल, पण तोपर्यंत वाङ्मयेतिहास लेखनाचे जे विविध उपक्रम झालेले आहेत व ज्या पद्धती अवलंबिल्या गेलेल्या आहेत, त्यांतून त्याचे स्वतःचे असे इतिहास-लेखन-तंत्र निर्माण होणे शक्य आहे.

## : ८ :

वाङ्मयेतिहास हा मानवी इतिहास व राष्ट्रीय इतिहास यांच्या आधाराने व अनुषंगाने लिहिण्याच्या प्रयत्नांची चिकित्सा यापूर्वी केलेली आहे. इतर कलांच्या इतिहासाशी त्याची तुलना करता येईल. वाङ्मयेतिहासात कलावंतांचे चरित्र, विचार, जीवनविषयक भूमिका इत्यादी गोष्टींना जे महत्त्व असते ते इतर कलांच्या बाबतीत नसते, हेही यापूर्वी आपण पाहिले आहे. आता वाङ्मयेतिहासलेखनात लेखकाच्या चरित्र-व्यक्तित्वाचा जो उपयोग केला जातो, त्याच्या योग्यायोग्यतेची वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीने पाहणी करावयाची आहे.

वाङ्मयीन कलाकृतीशी संबद्ध असणारा महत्त्वाचा घटक म्हणून लेखकाच्या चरित्राकडे अभ्यासकांचे लक्ष गेले. स्वच्छंदवादाच्या उद्‌भवानंतर कलाकृती ही कलावंतांच्या व्यक्तित्वाचा आविष्कार ठरली. साहजिकपणेच कलावंताच्या भाव-

भावना, त्याचे चरित्र अशा गोष्टींकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले. वास्तविक चरित्र ही इतिहासाचीच एक शाखा, इतिहासप्रणीत पद्धतीच त्याला उपयुक्त होत. राजकारणी पुरुष, सेनापती, संगीतकार यांच्या चरित्राप्रमाणेच लेखकाचे चरित्र लिहिले जाते. साहित्याच्या आंतरदर्शनासाठी चरित्र अतिशय महत्त्वाचे आहे. त्यात सामाजिक व मानसशास्त्रीय माहितीचे संकलन केले जाते. त्याचप्रमाणे लेखकाचे कुटुंब, वंश, त्याची सामाजिक प्रतिष्ठा इत्यादि व्यक्तिगत माहितीबरोबर त्याच्या मनाची ठेवण, त्याचे अनुभव-विश्व इ. विषयी बरीच सामग्री जमते. तथापि ह्या सर्व माहितीचे महत्त्व थोडयाफार अतिशयोक्तीने मांडले जाते. चरित्रकार कित्येकदा चरित्रासाठी जमविलेल्या माहितीचा विपर्यास करतो. लेखकाच्या अगदी खाजगी जीवनाशी संबद्ध असलेल्या गोष्टी, व्यक्तिगत हेवेदावे, त्याची प्रेम-प्रकरणे इ. बाबींना विशिष्ट वाङमयीन अनुबंध असतोच असे नाही. हे जरी सोडले तरी कलाकृतीचे स्वरूप-वैशिष्टय समजण्यात लेखकाच्या चरित्रविषयक माहितीच्या अभावाने फार मोठा व्यत्यय येतो असे नाही. कित्येक जुन्या ग्रंथ-कारांच्या चरित्राची आपणास फारशी माहिती नसते, त्याचप्रमाणे अनेक समकालीन लेखकांची आपणांस नाममात्रच माहिती असते, पण त्यामुळे या लेखकांच्या कला-कृतींचे आपले आकलन अडून राहिले असते असे नव्हे.

लेखकाचे जीवन व त्याचे साहित्य यांच्यांमधील परस्पर अनुबंध जेव्हा यशस्वीपणाने चरित्र-लेखकाकडून स्पष्ट केला जातो, तेव्हा ते चरित्र यशस्वी ठरते. परंतु हेही व्यक्तिवादी व सौंदर्यवादी लेखकापुरतेच महत्त्वाचे मानावे लागते. कारण इतर अगणित वाङमयकलाकृतींच्या बाबतीत त्यांच्यांतील व्यक्तिगत अंश हा जवळजवळ नगण्य असतो, परंतु त्यांचे सु-रूपमूल्य (एस्थेटिक व्हॅल्यू) मोठे असते. चरित्रपर लेखनात लेखकांचे जीवन व कला यांतील संबंध अतिशय वरवर व थोडयाफार यांत्रिकतेने दाखविला असतो. कलाकृतीतून कधी लेखकाचे स्वप्न साकार झालेले असेल तर कित्येकदा त्याच्या मनोधर्माच्या अगदी विरुद्ध प्रवृत्ती त्यांत चित्रिलेल्या असतील. कधी कधी लेखनातील चित्रण त्याच्या सर्वमान्य प्रकृतीच्या इतके विरुद्ध असते की, त्याच्या व्यक्तित्वाशी त्या चित्रणाचा संबंध केवळ दूरान्वयानेच पोहोचेल. अशारीतीने चरित्र हे विशिष्ट व्यक्तीच्या वाङमयाचा इतिहासाभ्यासकाच्या भूमिकेवरून परामर्श घेणारे महत्त्वाचे साधन खरे, पण त्यातील चरित्रनायक, त्याचे भावविश्व व वाङमय यांतील गुंतागुंतीचे संबंध उलगडून दाखविणे अतिशय अवघड असते.

वाङमयातील उल्लेखांवरून लेखकाच्या प्रकृती-प्रवृत्तीविषयी निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. रेने वेलेक म्हणतात त्याप्रमाणे नाटक–कादंबऱ्यांतील पात्रांच्या संवादांवरून वा विधानांतून लेखकाच्या चरित्राविषयी काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष

काढणे चूक आहे. इतकेच नव्हे तर भावगीतात्मक काव्यात किंवा लघुनिबंधात प्रथम पुरुषवाचक 'मी' या सर्वनामाचा वापर करून जे काही आलेले असते, त्याचा लेखकाच्या व्यक्तिगत अनुभवांशी संबंध दाखविणे चुकीचे आहे. खाजगी जीवन आणि ग्रंथगत लेखन यांतील संबंध हे साध्या कार्यकारण-संबंधाइतके साधे व सोपे नसतात.

लेखक दोन प्रकारचे असतात. काही बहिर्मुख वृत्तीचे तर काही अंतर्मुख वृत्तीचे. अंतर्मुख वृत्तीचे लेखक आत्माविष्कृती व आत्मचित्रण यात रमलेले असतात. परंतु इतिहासाच्या विशाल प्रवाहात आपणांस पहिल्याच वृत्तीचे लेखक ज्ञात आहेत. त्यांच्या लेखनातील व्यक्तित्वांश अल्प आहे, परंतु त्याची कलाकृती म्हणून रूपसुंदरता अतिशय मोलाची आहे.

लेखकाचे जीवन त्याच्या साहित्यात प्रतिबिंबित होते असा जो समज आहे तो चुकीचा आहे. लेखन म्हणजे जीवनाची प्रतिमा नव्हे. चरित्रात्मक दृष्टिकोनाला अधिक महत्त्व दिल्यामुळे कलाकृतीच्या वाङ्मयत्वाकडे दुर्लक्ष होते. व्यक्तिगत आशा-आकांक्षा, भावना जरी कलाकृतींतून व्यक्त होत असल्या तरी लेखनकृती ह्या लेखकाच्या कालाबरोबर चालत आलेल्या वाङमयीन परंपरेशी संबध्द असतात. म्हणजे कलाकृती एक नाटक, कादंबरी, कविता... इ. दृष्टीने निर्माण झालेली असते. ह्या वस्तुस्थितीकडे चरित्रात्मक पद्धतीचा अवलंब करणारांचे सामान्यत: दुर्लक्ष होते.

चरित्राचा वाङमयीन विद्वत्तेशी संबंध दोनतीन प्रकारचा असतो. एक स्वतंत्र वाङमयकृती म्हणून, तसेच वाङमयप्रकार वा वाङमयाभिबंध म्हणून चरित्राचा अभ्यास हा स्वतंत्र विषय आहे. याचे पद्धतीविषयक स्वरूप इतिहासाशी मिळतेजुळते असते. दुसरा प्रकार म्हणजे वर पाहिल्याप्रमाणे लेखकाच्या लेखनकृतींचा व त्याच्या जीवनाचा परस्पर संबंध दाखवून देण्यासाठी चरित्राचा अवलंब करणे. ह्या प्रकाराचे गुणदोष आपण पाहिले. त्यात अनेक अडचणी असल्या तरी वाङमयीन विद्वत्तेचे हे महत्त्वाचे क्षेत्र आहे.

अलिकडच्या कालात वाङमयक्षेत्रात मानसशास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व वाढत आहे. साहित्य हा एक प्रज्ञा-प्रतिभा व्यापार असल्याने त्याचा मनबुद्धीशी जवळचा संबंध आहे. अलिकडील नवनवीन मानसशास्त्रीय शोधांमुळे व संकल्पनांमुळे साहित्याचे स्वरूपही थोडे फार बदलत आहे. साहजिकच लेखक-चरित्राभ्यास मानसशास्त्रीय भूमिकेवरून होऊ लागलेला आहे. म्हणजे विशिष्ट कलाकृतीचा जन्म झाला तेव्हा लेखकाची मनोवृत्ती कोणती होती, हे जाणून घेण्याचा व देण्याचा प्रयत्न अभ्यासक करीत आहेत. परंतु ह्यापेक्षा अधिक वेगळ्या दिशेने वाङमयीन

चरित्रकारांचा प्रयत्न चालू आहे. तो म्हणजे एखाद्या लेखकाची वाङ्मयकलाकृति-निर्मितीची प्रक्रिया शोधून काढणे हा होय. त्या योगे एकंदर कलानिर्मितीविषयी (पोएटिक प्रोसेस) जे औत्सुक्य आहे त्याची परिपूर्ती होईल, अशी एक अपेक्षा आहे. अलिकडे निरनिराळ्या लेखक-कलावंतांकडून आपल्या विशिष्ट कलाकृतीने घाट कसा घेतला हे जाणून घेण्याचा प्रयत्न होत असतो, त्याचे कारण हेच होय. चरित्रवाङ्मयाचा वाङ्मयीन विद्वत्तेशी येणाऱ्या संबंधाचा हा तिसरा प्रकार आहे.

वाङ्मयाशी संबंध असणाऱ्या प्रश्नाविषयीचे हे शोधकार्य तसे महत्त्वाचे आहे. परंतु त्याचा वाङ्मयेतिहासाशी संबंध दूरचा आहे. कारण ह्या सर्व व्यवहारात वाङ्मयाचा वापर 'एक साधन' म्हणून होत असणार. रेने वेलेक् म्हणतात, "when literature is used as evidence or material in the field of psychology, it loses its literary character and is placed on the same level as a psychological questionnairs or experiment."[19] या सर्व विवेचनावरून चरित्रात्मक पद्धतीचे वाङ्मयेतिहासाशी असलेले संबंध किती गुंतागुंतीचे आहेत, हे स्पष्ट होईल.

: ९ :

वाङ्मयेतिहासलेखनात विशिष्ट संदर्भात विकास-कल्पनेचा अवलंब करता येत नाही, हे आपण यापूर्वी पाहिले आहे. तथापि विकासक्रम हा आजच्या वैचारिक जीवनातील महत्त्वाचा अभिक्रम आहे. त्याचा तसा पूर्णतया परित्याग करता येत नाही. वाङ्मयेतिहासाशी संबद्ध असणाऱ्या अशा कित्येक अभिक्रियांना विकास-कल्पना चांगलीच लागू पडते. त्या संदर्भात तिचा अवलंब करणे चूक ठरत नाही. एखाद्या वाङ्मयप्रकाराचा इतिहास, एखाद्या लेखकाच्या समग्र साहित्याचा अभ्यास, अगर एखाद्या विशिष्ट कालखंडाचा अभ्यास, या तीनही ठिकाणी कोणतेतरी गृहितकृत्य आधारास घेऊन त्याची कालमानाबरोबर झालेली उत्क्रांती किंवा विकास-क्रम शोधावा लागतो, ते तसे चुकीचे नसते. मानवी जीवनाचे लक्षण गतिमानता हे आहे. त्यामुळे मनुष्याने निर्माण केलेल्या सर्वच संस्था सदैव बदलत असतात. या बदलांमुळे 'इतिहास' शक्य झालेला आहे. परंतु कित्येकदा बदल हा विशिष्ट दिशेने होत असतो, इतिहासक्रमात कालांतराने दाखविता येणाऱ्या दोन अवस्थां-मधील बदल हा नुसता बदल नसतो, तर दोन अवस्थांपैकी खालच्या अवस्थेतून वरच्या अवस्थेकडे जी वाटचाल होत असते, तिला 'विकास' असे म्हणता येते. ही विकास-कल्पना प्रामुख्याने विज्ञानशास्त्रांकडून (विशेषतः जीवशास्त्रांकडून)

घेतलेली आहे. डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा तो एक परिपाक आहे. प्राणीशास्त्रात दोन प्रकारचा विकास असतो. पहिला म्हणजे अंड्यातील बलकाचे पक्ष्याच्या पिलात विकसन होणे व दुसरा म्हणजे माशाच्या मेंदूपासून माणसाच्या मेंदूपर्यंत उत्क्रांती होत राहणे.

ब्रॅनेटीअर या टीकाकाराने ही प्राणीशास्त्रातील उपपत्ती वा विकास-कल्पना साहित्याला लावून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. वाङमयप्रकारांचे त्याने निसर्गातील निरनिराळ्या प्राणीप्रकारांशी ( स्पेसीस ) साधर्म्य कल्पिले आहे. त्याच्या मते प्रत्येक वाङमयप्रकाराला उत्पत्ती, स्थिती, बाल्य, प्रौढत्व, प्रगल्भत्व, वृद्धत्व व विनाश या अवस्था लागू पडतात. त्याच-प्रकारे काही बाबतींत एका वाङमयप्रकाराचे दुसऱ्या उच्चतर वाङमयप्रकारात रूपांतर होते, असे त्याने वाङमयक्षेत्रातील काही उदाहरणे देऊन दाखवून दिलेले आहे. परंतु वाङमयाच्या बाबतीत ही उत्पत्ती अशीच्या अशी सर्रास लावता येणे अशक्य आहे. या कल्पनेप्रमाणे एखादा वाङमयप्रकार अगर रचनाप्रकार प्रगल्भता पाळून वृद्धत्व पावल्यानंतर त्यात परत रचना होता कामा नये.

परंतु प्रत्यक्षात मात्र हे आढळत नाही. फ्रेंच शोकांतिकांना ब्रॅनेटीअरचा सिद्धान्त कसा लागू पडत नाही हे टीकाकारांनी दाखवून दिले आहे. आपल्याकडील 'अभंग' या वाङमयरचनाप्रकाराचे येथे उदाहरण घेता येईल. वास्तविक हा 'रचनाप्रकार' ज्ञानेश्वरांपासून उदय पावून तुकारामांपर्यंत विकसित पावला. पुढे त्यात फारशी रचना झाली नाही, म्हणजे रचनाप्रकार या दृष्टीने तो 'अस्तंगत' झाला. परंतु अलिकडच्या काळात गडकरी, माधव ज्यूलियन, यांची अपवादभूत रचना सोडली, त्याप्रमाणेच साने गुरुजी, सेनापती बापट, विनोबा इ. ची काही रचना सोडून दिली तरी बहिणाबाई, चौधरींनी तो पुनः उज्जीवित केला. वा. भा. पाठक, ग. ह. पाटील यांनी अभंग रचना केली आहेच. याचा अर्थ उत्पत्ती... स्थिती इ. अवस्थांचे बंधन वाङमयक्षेत्राला काटेकोरपणे लावता येते असे नाही.

त्याचप्रमाणे एका वाङमयप्रकारातून दुसरा वाङमयप्रकार निर्माण होतो हे मानणेही गृहीत धरता येत नाही. ब्रॅनेटीअरचे म्हणणे १७ व्या व १८ व्या शतकांतील फ्रान्समधील ख्रिस्ती धर्मप्रवर्तकांच्या प्रवचनांमधून एकोणीसाव्या शत-कात भावगीतात्मक (अलिकडील संज्ञा गीतकाव्यात्मक) रचना निर्माण झाली. प्रत्यक्षात तसे काही म्हणता येत नाही. आपल्याकडचे उदाहरण द्यावयाचे झाले तर अनिलांच्या मतांचा उल्लेख करावा लागेल. 'भग्नमूर्ति' च्या प्रस्तावनेत ते 'भावगीताचा विकास, विस्तार व प्रस्तार म्हणजे खंडकाव्य होय' असे विधान करतात. याचा अर्थ भावगीताचे स्वरूपांतर (ट्रॅन्सफॉर्मेशन) खंडकाव्यात होते. (प्रत्यक्षात हे मान्य करता येईलच असे नाही. भावगीत व खंडकाव्य हे दोन्ही

स्वतंत्र रचनाप्रकार आहेत.) अशा रीतीने प्राणीशास्त्रातील विकासकल्पना येथे लावता येत नाही म्हणून ती त्या प्रकारात त्याज्य ठरविली पाहिजे. रेने वेलेक म्हणतात त्याप्रमाणे "We must thus reject the biological analogy between the development of literature and the closed evolutionary process from birth to death."[20]

परंतु पूर्वी स्पेंग्लर आणि अलिकडे टॉयन्बी यांनी ही कल्पना उचलून धरून ती इतिहासातील विकसनक्रियेला लावून दाखविली आहे. तिचा विचार करणे अवश्य आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, एखाद्या गोष्टीचा इतिहास (मग तो राष्ट्र असो, एखादा वाङ्मयाभिबंध असो, एखादी सामाजिक अगर तत्सम संकल्पना, उदा. विवाह-संस्था इ. असो) म्हणजे कालाच्या ओघात निर्माण झालेल्या व परस्परांशी संबंध नसलेल्या घटना, फलिते, किंवा तत्सम घटक यांची केवळ जंत्री होय. हिला तसा काहीच अर्थ नसतो म्हणून तिचे वर्णन कित्येकदा 'अर्थशून्य प्रवाही संचय' (मीनिंगलेस फ्लक्स) असे केले जाते. वस्तुत: सर्व मानवी इतिहास, तसेच मानवाच्या विविध उपक्रमांचा इतिहास म्हणजे तसा 'अर्थशून्य संचय'च आहे. पण असे मानले तर मग इतिहासच लिहावयास नको, केवळ घटना, बाबी, फलिते इ. ची यादी दिली की काम भागेल.

परंतु माणसाची कशासाठी तरी धडपड चालू आहे. तीतून विविध घटना, फलिते इ. निर्माण होतात तो एक 'अर्थशून्य संचय' नव्हे हे इतिहासकाराला जाण-वते. म्हणून कोणत्यातरी प्रकाराची सुसूत्रता दाखविण्याचा इतिहासकाराचा प्रयत्न असतो. प्राणीशास्त्रीय विकासवाद या क्षेत्रासाठी जसाच्या तसा मानता येत नाही हे खरे. कारण प्राणीशास्त्रात जन्ममृत्यूसारखी दोन निश्चित टोके दिसतात, विशेषत: शेवटचे टोक (उदा. मृत्यूची घटना, वर उल्लेखिलेला माणसाचा मेंदू)... प्रमाण मानले जाते. मानवी कृतींच्या इतिहासात तसे मानता येत नाही. वाङ्मयाचा व तत्सम क्षेत्राचा इतिहास हा प्रामुख्याने माणसाच्या मूल्यकल्पनेशी संबद्ध असतो. म्हणून विशिष्ट कालखंड, व्यक्तिजीवन वा तत्सम जे काही असेल त्यातील एखादी मूल्यकल्पना किंवा मूल्यमालिका आधारास घेणे अवश्य आहे.

ही मूल्यकल्पना गृहीत धरली की, 'अर्थशून्य संचया'चा व इतिहासप्रवाहांचा अन्वय समजू लागतो व मग साहजिकच विकसनक्रियेचे स्थूल दर्शन घडू लागते. ज्यांचा संचय झालेला असतो त्या घटना किंवा फलिते, ह्या गोष्टी केवळ सुटया न राहता त्या एखाद्या सूत्राने बद्ध आहेत असे दाखविता येते, हे सूत्र पण इतिहासक्रमातून निर्माण झालेले असते. अर्थात येथे एक दुष्ट वर्तुळ तयार झालेले आहे हे मान्य

करावयास हवे. म्हणजे असे की इतिहासाचा क्रम हा कोणत्यातरी मूल्य मालिकेने परिबंधित झालेला असतो, पण ती मूल्यमालिका इतिहासाच्या ओघातच निर्माण झालेली असते. ( Historical process has to be judged by values, while the scale of values is itself derived from history असे बेलेक म्हणतात. )[21] परंतु त्याला इलाज नाही. कारण ही कल्पना त्याज्य ठरविली तर इतिहास लिहिणे अशक्य होईल व वाङमयाच्या बाबतीत तर वाङमयेतर कल्पना, संकेत विचारात घ्यावे लागतील. वाङमयाच्या व्यक्तिविशिष्टतेला तसे करणे अपकारक ठरेल.

अशाप्रकारची विकसनकल्पना इतिहास व वाङमय यासारख्या क्षेत्रांना लागू करताना आणखी एक काळजी घ्यावी लागते. इतिहासातल्या घटना वा घटिते, तसेच साहित्यविकसनाचे घटकावयव मानता येतील ते ग्रंथ वा कलाकृती यांना स्वतःचे व्यक्तित्व असते. त्या व्यक्तित्वाची बूज राखूनच त्यांना विकासक्रमात बसवावे लागते. नाही तर विकासकल्पना मानली की या घटकावयवांना तो विकास साधणाऱ्या मधल्या दुव्याचे अर्थहीन स्थान प्राप्त होण्याचा धोका असतो. विकासकल्पना ही महत्त्वाची खरी, परंतु साहित्यकलांना ती परिष्कृत करून घ्यावयास हवी.

अशा रीतीने परिष्कृत करून घेतलेली विकासकल्पना हाती घेतल्यानंतर तिच्या अवलंबनासाठी विस्तृत क्षेत्र उपलब्ध होते. उदाहरणार्थ, एकाच लेखकाच्या निरनिराळ्या ग्रंथांना वा कलाकृतींना ती लावता येते व त्यामुळे त्यात एक प्रकारची सुसंगत सुसूत्रता व अर्थपूर्णता प्राप्त होते. त्याचप्रमाणे जनमानसात महत्त्वाचे स्थान पटकाविलेल्या एखाद्या परिकथेचे वा तत्सम कृतीचे चित्रण निरनिराळ्या कलाकारांनी कसे केले आहे हे पण ऐतिहासिक दृष्टीने पाहता येते. रामायण, महाभारतातील कथांनी व व्यक्तींनी भारतीय मनावर संस्कार केलेले आहेतच, पण त्याच्या भावविश्वात विशिष्ट स्थान पटकाविले आहे. साहजिकच अशा विविध रचनांचा विकासदृष्टीने परामर्श घेता येतो.

ह्यापेक्षा या कल्पनेच्या अवलंबनाचे अतिशय मोठे क्षेत्र म्हणजे निरनिराळे वाङमयप्रकार होत. वाङमयप्रकारांना म्हणजे अभिबंधांना 'वाङमयप्रकार' म्हणून लेखकाच्या लेखनसंभारात किती महत्त्व आहे हा प्रश्न विवाद्य असला तरी निरनिराळे वाङमयाभिबंध सुस्थिर झालेले आहेत आणि त्या दृष्टीने वाङमयप्रकारांचा विकसनक्रम शोधण्याचा प्रयत्न करणे हा वाङमयेतिहासाचा एक भाग होय. ते वाङमयाभिबंध अस्तित्वात कसे आले, वाङमयाच्या एकंदर अभिवृद्धीशी त्यांचे अस्तित्व कसे निगडित आहे, इ. बाबी विचारणीय ठरतात. आणखी काही निर-

निराळे उपक्रम या दिशेने झालेले आहेत. एखाद्या क्षेत्रात एखादा मोठा ग्रंथकार निर्माण झाल्यानंतर, त्या ग्रंथकाराचे तत्क्षेत्रीय कर्तृत्व ही शेवटची परिणती मानून ती विकासक्रमाने कशी सिद्ध होत गेली, त्याच्या पूर्वीच्या कालखंडातील अनेकांनी कसा हातभार लावला, हेही विकासक्रम दाखविण्याच्या भूमिकेवरून मांडता येते. वाङमयेतिहासात आज मोठ्या लेखकांपेक्षा छोटया व लहानलहान लेखकांच्या लेखनकृतींकडे अधिक लक्ष देण्याची प्रवृत्ती दिसून येते तीही समजून घेण्यासारखी आहे.

एखाद्या वाङमयप्रकाराच्या सर्व अंगांचा विकास दाखविण्याइतकेच त्या वाङमयप्रकाराच्या आकृतीबंधाशी संबद्ध असणाऱ्या अनेक घटकावयवांची उत्क्रांती कशी होत गेली हे पाहणे, हाही वाङमयेतिसाच्या अभ्यासाचाच भाग आहे. नाटकातील संवाद, भाषा अगर स्वभावलेखन, काव्यातील प्रतिमा, छंदशास्त्रीय प्रयोग कादंबरीतील वातावरण, प्रेमकल्पना इ. ही निरनिराळी उदाहरणे होत. या दिशेने मराठीत लहानमोठे उपक्रम झालेलेही आहेत, पण ते नुसते समालोचन स्वरूपाचे वा दिग्दर्शन स्वरूपाचे न होता त्यात त्या क्षेत्राच्या अनुषंगाने निर्माण झालेली परिशासनाची जाण अधिक सखोल असण्याची आवश्यकता आहे.

## : १० :

वाङमयेतिहासाशी संबद्ध असणारा शेवटचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कालखंडाचा होय. ग्रंथकार, वाङमयाभिबंध त्याचप्रमाणे कालखंड हा अभ्यासाचा एक घटकावयव (युनिट) होय. साहजिकपणे कालखंड कोणत्या तत्त्वावर पाडावे हा एक तांत्रिक व तात्त्विक स्वरूपाचा प्रश्न निर्माण होतो. वाङमयावर व जीवनाच्या सर्वच अंगांवर राज्यसंस्थेचा प्रभाव सर्वत्र असल्याने सामान्यत: राजकीय घटना, राज्यकर्ते (राजे) लक्षात घेऊन वाङयेतिहास लिहिलेले आहेत. एलिझाबेथ, व्हिक्टोरिया या इंग्लंडच्या राण्यांच्या नावांवर वाङमयीन कालखंड मानले गेलेले आहेत. इंग्लंडच्या बाबतीत तर हे राजकीय कालखंडच सामान्यत: सर्वमान्य झालेले आहेत. अर्थात सर्वच राजांच्या नावाचे वाङमयीन कालखंड पाडले जाणे अशक्य आहे. तरी वाङमयांचे इतिहास पाहता लेखकांच्या मनावर राजकीय क्षेत्रातील विचारकल्पनांचे संस्करण बरेच दृढ आहे असे दिसते. वाङमयीन दृष्टीने हे कालखंड केवळ अस्थानी आहेत. पण या बाबतीत काही संकेत निर्माण झालेले आहेत, ते लक्षात घेणे जरूर आहे. विशेषत: एलिझाबेथ व व्हिक्टोरिया या राण्यांच्या नांवाने ज्ञात असणारे कालखंड हे केवळ राजकीय अर्थाने वापरले जात

नाहीत. तर त्यांच्या कारकीर्दी विशिष्ट प्रवृत्तीच्या वाचक म्हणून मानल्या जातात, आणि वाङमयक्षेत्रात, विचार–तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात, जोपर्यंत त्या प्रवृत्ती दिसून येतात, तोपर्यंत त्यांची व्याप्ती मानली जाते. त्या राण्यांच्या मृत्यूनंतरही तो कालखंड अस्तित्वात आहे असे मानले जाते. (We use the term ' Elezabethan ' to include writers before the closing of theatres [ 1642 ] almost forty years after the death of the queen. The terms originally of political origin, have thus assumed a definite meaning in intellectual and even in literary history[22] इति रेने वेलेक.)

मूलतः वाङमयेतर क्षेत्रातील महत्त्वाचे शब्दप्रयोग–नामसंज्ञा–वाङमयावरील त्यांच्या संस्करणामुळे वाङमयातही विशिष्ट कालखंडाचे व प्रवृत्तीचे द्योतक म्हणून मान्यता पावलेले आहेत. ' रेफर्मेशन ' हा धर्मसुधारणावाचक शब्द धार्मिक क्षेत्रातून आला आहे. ' ह्यूमॅनिझम ' ही विद्वत्तेच्या इतिहासाशी संबद्ध असलेली संज्ञा आहे. ' रिनेसॅन्स ' हा कलेच्या इतिहासातून आलेला आहे. त्याचप्रमाणे ' अठरावे शतक ' हा अंकप्रधान शब्द विशिष्ट वाङमयीन, बौद्धिक प्रवृत्तीचा द्योतक बनला आहे, तर रोमँटिसिझम, प्री-रोमँटिसिझम, क्लासिसीझम्, रिॲलिझम् ह्या संज्ञा प्रायः वाङमयीन आहेत. या शब्दसंहतींना वाङमयेतिहासात विशिष्ट अर्थ व आशय प्राप्त झाला आहे. त्यातही विशेष हे की, हे शब्द या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे बनले आहेत. निरनिराळ्या भाषिकांनी त्यांचे स्वभाषीय पर्याय रूढ केले आहेत.

वाङमयाचे कालखंड मानण्यात अधिक वस्तुनिष्ठता आणण्यासाठी कित्येकजण केवळ शतकांचे वा दशकांचे अंक प्रमाण मानताना दिसतात. वास्तविक इतिहास हा तसा सलग असल्याने त्याचे कालखंड पाडता येत नाहीत, म्हणून रूढ असलेली कालमापन (कॅलेंडर) पद्धती आधारास घेऊन केवळ सोयीसाठी दशक-शतकांचे विभाग पाडणे वरवर सोयीचे दिसते. तथापि मागे कालखंडाच्या कालविशिष्टतेचा विचार आपण केला आहे तो पाहता, दशक-शतकांचे विभाग मुळीच अन्वर्थक वाटत नाहीत. अर्थात वाङमयाचा जेव्हा समग्र इतिहास लिहावयाचा असतो, तेव्हा कित्येकदा कालाच्या दूरत्वाने कालप्रवृत्ती अगर वैशिष्टये सर्वज्ञात नसतात, अशा वेळी शतकांचे खंड सोयीचे होतील.

या कालविभागणीबाबत व तत्संबद्ध काही संज्ञांबद्दल असे म्हणता येईल की, प्रत्येक देश अगर राष्ट्र आपापल्या परंपरेप्रमाणे, इतिहासाप्रमाणे वेगळी कालगमके मानू शकेल. आधुनिक, प्राचीन आणि मध्ययुगीन ह्या कालवाचक संज्ञा सर्वरूढ आहेत. ' मध्ययुगीन ' वा ' आधुनिक ' ह्या संज्ञा केवळ कालवाचक नसून त्या ' प्रवृत्तिवाचक ' आहेत. त्यामुळे या संज्ञांचे आपल्याकडील अवलंबन

थोडे वैशिष्ट्यपूर्ण आहे. युरोपीय व व्यापक जागतिक दृष्टीने इतिहासातला 'आधुनिक' कालखंड हा सामान्यत: पंधराव्या शतकाच्या मध्यापासून सुरू होतो. परंतु हा कालखंड ज्या आधुनिक प्रवृत्तींचा द्योतक आहे, त्या प्रवृत्ती आपणांकडे दृग्गोचर होऊ लागल्यापासून आपण हा कालखंड मानतो. म्हणजे मराठी वाङमयाच्या बाबतीत तरी इंग्रजी राजवटीबरोबर 'आधुनिक' कालखंड सुरू होतो असे मानले जाते व त्यापूर्वीचा कालखंड हा 'प्राचीन' मानला जातो. वास्तविक संतवाङमय ज्या कालात निर्माण झाले तो 'प्राचीन' न मानता 'मध्ययुगीन' मानावयास हवा. तसेच पेशव्यांचे राज्य ही वास्तविक 'आधुनिक' गोष्ट पण तीतील प्रवृत्तिविशेषांमुळे ती 'मध्ययुगीन' मानली जाते. पण एवढ्या काटेकोरपणे शब्दांचे उपयोजन अद्याप व्हावयाचे आहे. वाङमयेतिहास जेव्हा अधिकाधिक चिकित्सकतेने लिहिला जाऊ लागेल तेव्हा या बाबतीतले हे रूढ संकेत सोडून अधिक शास्त्रशुद्ध असे नवे कालवाचक संकेत घ्यावे लागतील.

वाङमयक्षेत्रीय स्ववैशिष्ट्याची जाणीव कालखंड–आयोजनेत आणखी एका स्वरूपात दिसून येते. इंग्लंडमध्ये मान्यवर लेखकांच्या नांवाने 'युग' (एज) मानण्याचा एक उपक्रम झाला. शेक्स्पीअर–चॉसरपासून तो टेनिसनपर्यंत अशी 'युगे' मानून इतिहास लिहिण्याचे उपक्रम झालेले आहेत. वाङमयक्षेत्र ज्यांनी घडविलें त्यांना त्यांचे श्रेय देण्याच्या दृष्टीने हे ठीक आहे. पण ह्यात तशी अर्थवाहकता नसते. एकाच युगात इतर अनेक ग्रंथकार तेवढेच महत्त्वाचे असतात त्यामुळे एकाचे नाव युगाला दिले की इतरांवर तसा अन्यायच होतो. वाङमयप्रकाराप्रमाणे 'युगे' मानण्याची कल्पनाही फारशी स्वीकार्य वाटत नाही. कारण 'युग' कल्पना व्यापक आहे. वाङमयप्रकार भिन्न असले तरी 'युगकल्पना' एकच असते. त्याशिवाय त्या क्षेत्रात इतरांनी लावलेला हातभार कमी महत्त्वाचा नसतो. वाङमयप्रकाराच्या स्वतंत्र इतिहासात, अशी 'युगे' हवी असतील तर मानावी पण व्यापक दृष्टीने लिहिलेल्या, कालखंडाला मध्यवर्ती मानून लिहिलेल्या वाङमयेतिहासात त्याला स्थान नाही.

अलिकडे मोठ्या लेखकांइतकेच किरकोळ म्हणून दुर्लक्षित झालेले लेखकही महत्त्वाचे मानले जाण्याची प्रवृत्ती असल्याने ग्रंथकारांची नावे युगाला देण्याची पद्धत मागे पडली आहे. पांगारकरांनी आपल्या मराठी वाङमयाच्या इतिहासातील खंडांना लेखकांची नावे दिली आहेत. ते एका दृष्टीने योग्य असले तरी रामदास-तुकाराम ह्या समकालीनांना त्यांनी वेगळ्या 'कालां'त बसविले आहे. म्हणूनच प्राचीन वाङमयाच्या बाबतीत शतकांचे विभाजन थोड्याफार तारतम्याने वापरावे लागेल. आधुनिक मराठीच्या वाङमयेतिहासाबाबतही लेखकांची युगे मानणे फारसे सयुक्तिक होईल असे वाटत नाही. वाङमयेतिहासाचे कालखंड हे

राजकीय–सामाजिक इतिहासातून घेतलेले नसावेत, कारण तसे करण्यात वाङ्मय-क्षेत्र हे केवळ इतर क्षेत्रांचे प्रतिबिंबरूप अंग आहे असे मानले जाण्याची शक्यता आहे. म्हणून वाङ्मयीन इतिहासाचा कालखंड हा विशुद्ध वाङ्मयीन निकषांनी मानलेला असावा, असा जो आग्रह रेने वेलेक धरतात तो बरोबर आहे.

परंतु कालखंडाची नावे व आखणी प्रत्येक भाषेच्या प्रकृति-प्रवृत्तीपरत्वे भिन्न असणार. इंग्रजी भाषेसारख्या सर्व प्रगल्भ भाषेच्या वाङ्मयाच्या इतिहासाला जरी केवळ वाङ्मयीन निकषांवर निश्चित केलेले कालखंड मानणे शक्य असले तरी इतर प्रत्येक भाषेच्या वाङ्मयेतिहासलेखकाला तेच धोरण अवलंबिता येईल असे नव्हे. म्हणून कालखंडांची आखणी करताना विशिष्ट प्रवृत्ती विचारात घेणे अवश्य आहे. वाङ्मय हे कालाबरोबर संस्कृतिरूप होत असल्याने एकंदर सांस्कृतिक अनुबंध वाङ्मयेतिहासकारांनी मानण्यात काहीही चूक नाही. लेखक वाङ्मयनिर्मिती करण्यासाठी म्हणून लिहीत असला तरी ती एकंदर सांस्कृतिक जीवनाची ठेवण व जडणघडण लक्षात घेतली तरच त्याच्या लेखनात मौलिकता येईल. वाङ्मय वाङ्मय करीत बसण्याने वाङ्मयात एक प्रकारचा भाकडपणा येण्याची शक्यता असते. अतिरिक्त वाङ्मयीनतेविरुद्ध टी. एस्. इलियट यांनी जो इशारा दिलेला आहे तो उद्धृत करणे योग्य होईल. ते म्हणतात, "A critic who was interested in 'nothing but literature' would have very little to say to us, for his 'literature' would be pure abstraction. Poets have other interests besides poetry; otherwise their poetry would be very empty.."[23] वाङ्मयेतिहासाचे कालखंड अशारीतीने वैचारिक व वाङ्मयीन प्रवृत्तीवर आधारलेले असावे, असे म्हणणे योग्य होईल. वाङ्मयाचे व जीवनाचे संबंध इतके गुंतागुंतीचे होत आहेत की, वाङ्मयाच्या भाष्यकाराने संस्कृतीच्या भाष्यकाराचेही कार्य करावयास हवे. ते करीत असताना वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासकाची भूमिका सोडण्याचे कारण नाही. ह्या प्रकारच्या अभ्यासकांची परंपरा मॅथ्यू ॲर्नोल्ड इतकी जुनी आहे. अशाप्रकारच्या अभ्यासकांचा प्रयत्न वेगळा असतो. मूल्यनिदान करताना त्याच्या अवलोकनाची कक्षा साहित्य व सांस्कृतिक जीवन या दोहोंचा समावेश करण्याइतकी व्यापक असते. अशा प्रकारच्या अभ्यासकांच्या भूमिकेचे समर्थन करताना डे. डायचेस म्हणतात. "It is possible and profitable for a historically minded critic to look at literature in cultural context without any normative intention, but simply in order to add to understanding."[24]

वाङ्मयेतिहास ह्या ज्ञानशाखेला तसे म्हटले तर व्यापक इतिहास आहे. उलटपक्षी तिचा विकास अद्याप एवढा व्हावयाचा आहे की, त्या दृष्टीने ती बाल्यावस्थेतच आहे. जुन्या पद्धतींबरोबर नवे नवे प्रयोग व्हावयास हवेत. "We must seek to elaborate new ideas of literary history and new methods which would make its realization possible," [25] हे रेने वेलेक यांचे उद्गार लक्षात घेण्यासारखे आहेत. आपल्या आखलेल्या योजना व अवलंबावयाच्या पद्धती यांची परिपूर्ण कल्पना अभ्यासकास असावयास हवी. आतापर्यंत या दिशेने झालेले प्रयत्न हे महत्त्वाचे असले तरी प्रारंभिक स्वरूपाचे आहेत. लेखन भरपूर झालेले आहे. पण झालेले बरेच लेखन हे महाविद्यालयीन विद्यार्थी–अभ्यासकांना पुढे धरून झालेले आहे. त्यात शोध–जाणिवेचा जेवढा प्रत्यय यावयास हवा तेवढा येत नाही, असे म्हटल्यास फारसे चूक होणार नाही. वाङ्मयेतिहास हे शोधक्षेत्रीय परिशासन आहे. त्याच्यास्वतःच्या पद्धती आहेत, परिक्षेत्रे आहेत, पथ्ये आहेत, हे साक्षेपाने लक्षात घेऊन प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## : ११ :

वाङ्मयेतिहासात पूर्वकालीन ग्रंथांचे महत्त्व अनन्य आहे. मागील व्याख्यानात पूर्वकालीन ग्रंथांच्या मुद्रणशुद्ध व विश्वसनीय प्रती तयार करण्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. हे सगळे काम वाङ्मयेतिहासाशी संबंधित असे आहे. ते विद्वत्तेचे एक स्वतंत्र क्षेत्र मानले जाते. कित्येकांच्या मते खरे संशोधन ते हेच. कारण जुनी हस्तलिखिते तपासून काढणे, त्यांच्या पाठभेदांची चर्चा करणे इ. तांत्रिक महत्त्वाची किचकट स्वरूपाची कामे होणे आवश्यक असते. अलिकडे पाठचिकित्साशास्त्रच निर्माण झालेले आहे व कित्येक ठिकाणी महान ग्रंथांच्या विश्वसनीय प्रती तयार करण्याचे काम चालू आहे. अशा प्रकारचे बरेचसे प्राथमिक कार्य झाल्यानंतर पुढे इतर प्रकारच्या चर्चेची शक्यता निर्माण होते. (पण व्यापक सांस्कृतिक, सामाजिकदृष्टीने वाङ्मय चर्चा, वाङ्मयचिकित्सा वा वाङ्मयेतिहास यांवाचून अडून राहात नाही.) ग्रंथांच्या अधिकृत प्रती जसजशा निर्माण होतील, तसतसा त्यांवरील चिकित्सेत अधिक नेमकेपणा काटेकोरपणा यावयास लागेल. ग्रंथकाल, ग्रंथकारकाल, इ. संबंधीचे निरनिराळे वाद हे ह्याच क्षेत्रातील विद्वत्तेशी संबद्ध आहेत. अशारीतीने वाङ्मयेतिहासाशी संबंधित असणारे पायाभूत असे हे ज्ञानक्षेत्र होय. त्यामुळेच ह्यालाच 'रिसर्च पार एक्सेलन्स' असे म्हटले जात असे. हे क्षेत्र प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या पाठावृत्ती तयार करण्यापुरतेच मर्यादित आहे. रामायण

महाभारताच्या अधिकृत संहिता तयार करण्याच्या प्रयत्नांचा इतिहास ह्या संदर्भात निर्देशनीय आहे.

प्राचीन ग्रंथाप्रमाणे प्राचीन शिलालेख, कोरीव लेख, ताम्रपट, एखादे दानपत्र, करारनामा इ. चा अभ्यासही वाङ्मयेतिहासातच मोडतो. "एखाद्या भाषेच्या अगदी प्राथमिक अवस्थेत प्राचीनकाली जो लेख शिलांवर कोरलेला असेल, अथवा ताम्रपटांवर अथवा तत्सदृश वस्तूंवर कोरलेले असेल, त्याचाही अभ्यास वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने आवश्यक असतो,"[26] असे डॉ. रा. शं. वाळिंबे म्हणतात ते अर्थपूर्ण आहे. वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासाची ही महत्त्वाची अभिक्रिया आहे. वाङ्मयेतिहासकार्याशी संबद्ध असणारा आणखी एक उपक्रम म्हणजे सूचिग्रंथांचा होय. प्रत्येक क्षेत्रात शास्त्रशुद्ध रीतीने उच्चस्तरावर अभ्यास जेव्हा व्हावयास लागतो त्या वेळी विविध प्रकारचे सूचिग्रंथ सिद्ध होणे जरूर असते. वारंवार प्रसिद्ध होणारे व पूर्वी प्रसिद्ध झालेले वाङ्मय अशा सूचिग्रंथांच्या रूपाने अभ्यासकांच्या कक्षेत आणून सोडले जाते. त्या दृष्टीने निरनिराळ्या प्रकारच्या अगणित सूची आवश्यक असतात. मराठीत सूचिग्रंथरूप साहित्य फार अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. वाङ्मयाभ्यासाचे क्षेत्र अद्यापपर्यंत तरी शाळा-कॉलेजांपुरते मर्यादित आहे. त्यामुळे शास्त्रीय दृष्टीने योजनापूर्वक सूचिग्रंथलेखन फारसे झालेले नाही, होत नाही. दाते यांची ग्रंथसूची प्रयत्न लक्षणीय आहे. पुणे विद्यापीठाने म. सा. पत्रिकेतील लेखांची सूची तयार केली आहे, अशाच प्रकारचे सामुदायिक व योजनाबद्ध उपक्रम अधिकाधिक व्हावयास हवेत.

जेव्हा असे सामुदायिक उपक्रम शक्यतेत उतरावयाचे असतात, त्या वेळी त्या कार्यात एकसूत्रीपणा असण्यासाठी एक प्रकारच्या योजकतेची आवश्यकता भासते. अशा योजकतेचा जो जो प्रसार होईल तो तो त्या ज्ञानक्षेत्रात अधिकाधिक सुव्यवस्था येऊ लागेल.

अशा रीतीने या व्याख्यानात आपण वाङ्मयेतिहासाचे स्वरूप, त्याच्याशी संबद्ध असणाऱ्या विविध समस्या, वाङ्मयेतिहासात समाविष्ट होणाऱ्या विविध अभिक्रिया विचारात घेतल्या व अनुशासनाच्या दृष्टीने वाङ्मयेतिहास ह्या वाङ्मयीन विद्वत्तेच्या परिक्षेत्राची पाहणी केली आहे. वाङ्मयातील व्यक्ती व प्रवृत्ती इ. यांना केवळ ऐतिहासिक वा आधिवैद्यिक महत्त्व नसते तर जनमानसावर त्यांचा प्रभाव असतो, त्यातून त्यांची एक प्रतिमा साकार झालेली असते. ते सर्व अंग समजून घेण्यासाठी आपणास वाङ्मयसमीक्षेकडे वळावे लागते. पाश्चात्य टीकाशास्त्राच्या संकेताप्रमाणे वाङ्मयेतिहास हा एक समीक्षेचा विभाग आहे

असे मानले जाते. प्रत्यक्षात समीक्षेपेक्षा ते वेगळे ज्ञानक्षेत्र आहे, ह्याची कल्पना या विवेचनावरून येईल. 'वाङ्मयसमीक्षा' हे वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वतंत्र परिक्षेत्र आहेच. ते अनन्य महत्त्वाचे आहे. त्याचे वाङ्मयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र या दृष्टीने उद्या व्याख्यानात विवेचन करण्यात येईल.

□ □ □

## व्याख्यान चौथे

# भाषा आणि भाषाभ्यास

: १ :

वाङमयेतिहास व वाङमय-समीक्षा या वाङमयीन विद्वत्तेच्या परिक्षेत्रांचे अवलोकन गेल्या दोन व्याख्यानांत केले. आज "भाषा" या परिक्षेत्राचे विवेचन करावयाचे आहे.

भाषा हा मनुष्याचा अत्यंत महत्त्वाचा शोध आहे. ती अतिशय गुंतागुंतीची मानवी संस्था आहे. ती एकस्वरूपी नाही, तर अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेली आहे. बोलली जाणे हे तिचे प्रमुख लक्षण खरे, 'भष्' या धातूतून ते सुचविले जाते, पण ती लिहिलीही जाते. या दोनही स्वरूपांत ती अभ्यसनीय आहे. सामान्यतः मनातला आशय व्यक्त करण्याकरता तिचा वापर होत असला तरी, माणसाच्या मनाशी त्याचा संबंध असल्याने तिचे स्वरूप अतिशय संमिश्र झालेले आहे. जे व्यक्त करावयाचे ते वाचेच्या द्वारा व्यक्त करावयाचे असल्याने भाषेला लक्षणीय असे ध्वन्यंग प्राप्त झाले आहे. ती भाषेची अनन्य व्यवस्था आहे. त्याशिवाय ध्वनींच्या द्वारा जो आशय व्यक्त करावयाचा असतो तो मनोगम्य असतो, पण ध्वनि-चिन्हांद्वारा तो बोधक होतो. ध्वन्यंग व प्रत्यक्ष अर्थ यांना जोडणारी 'संकेत' ही मनोगम्य संस्था निर्माण करून ऑगडेन व रिचर्डस् यांनी भाषेच्या अर्थविज्ञानात वेगळीच क्रांती केली आहे. त्या संदर्भात भारतीय भाषावेत्त्यांनी 'स्फोट' हा शब्द वापरला आहे. अर्थात ध्वन्यंग व प्रत्यक्ष वस्तू यांना जोडणाऱ्या दुव्यासारखे काही-तरी माणसाच्या मनात आहे, ही जाणीव पतंजलीइतकी जुनी आहे. भाषा ही संपर्कसाधनाचे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे तिच्या अर्थवत्तेतील सर्वगम्यतेचे व सामाजिकतेचे महत्त्वही तेवढेच आगळे आहे. भाषेचा व्याव-

हारिक गरजांशी जेवढा संबंध आहे, तेवढाच व्यक्ती व समाजाच्या भावभावना, विचार, कल्पनाशक्ती अनुभव या मानवी मनाच्या विविध अभिक्रियांशी आहे. त्याशिवाय आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टच म्हणजे माणसाने भाषेचा वापर एका महत्त्वाच्या कलेच्या निर्मितीसाठी साधन म्हणून केलेला आहे. वाङ्मय हीच ती कला होय, ती जशी उच्चाराधिष्ठित आहे तशी ती लेखनाधिष्ठित आहे. ही दोन्ही भाषेचीच अंगे होत.

जगात अनेक भाषा प्रचलित आहेत, त्या सगळ्या बोलल्या जातात, कारण बोलली जाण्याशिवाय भाषेला अस्तित्वच नाही. त्यांपैकी काही लिहिल्या जातात. त्याबावतीतले प्रत्येकीचे धोरण स्वतंत्र असे आहे. त्याशिवाय प्रत्येक भाषेत अनेक प्रकारची विविधता असते. कधी ती प्रादेशिकतेमुळे निर्माण होत असेल, कधी व्यवसायातून तिची निर्मिती झालेली असेल, तर ज्ञानक्षेत्रीय प्रगतीमुळेही ती निर्माण होत असेल, किंवा विशिष्ट सामाजिक गरजेपोटी ती होत असेल.

अशी माणसाच्या जीवनातील विविध अभिक्रियांशी आणि स्वभावधर्मांशी अतिशय घनिष्टपणे संबंधित असलेली भाषा तिच्या अभ्यासासाठी वेगळी काढावी लागते. पण ती तेवढ्यापुरतीच. कारण बुद्धीच्या पकडीत आल्यासारखी वाटली तरी तिचे एखादेच अंग येते. तरीपण भाषेला तिच्या विविध संबद्धते (ॲसोसिएशन)-पासून वेगळे करून तिचे 'शास्त्र' करून तिचे संचलन व अभिवर्धन करणे हा उद्योग माणसाच्या संस्कृतीइतकाच प्राचीन आहे. माणसाच्या संस्कृतिवर्धनात भाषेइतके अनन्य महत्त्वाचे दुसरे काहीही नाही. म्हणून मानवी विद्वत्तेचे प्रारंभस्थान भाषा हेच आहे. स्वनिर्मित शब्दाच्या ध्वन्यंगाच्या अपूर्वतेने भारल्या गेलेल्या भारतीयांनी 'शब्दब्रह्म' व 'नादब्रह्म' ह्या संकल्पना शोधल्या व सामर्थ्याने भारलेले 'मंत्र' त्यांनी निर्माण केले. तीच प्रतिक्रिया पाश्चात्त्यांची आहे. शब्द हाच जगाचा प्रारंभ व शब्द हा परमेश्वर असे ते मानतात. In the beginning there was Word and Word was God असे बायबलमधले वचन हेच दर्शविते. भाषेचे हे गुंतागुंतीचे स्वरूप लक्षात घेऊनच 'ब्रिटानिका परस्पेक्टिव्ह' या कोशवजा ग्रंथात भाषा विषयावरील विभागाला 'भाषेचा गुंतवळा (लॅबेरिंथ ऑफ लँग्वेज)' असे नाव दिलेले आहे, ते अन्वर्थक वाटते. भाषेचे आणखी एक लक्षण असे की, ती ज्या मानवी गटांतून बोलली जाते त्या गटांच्या व एकंदर मानवी संस्कृतीबरोबर ती बदलत बदलत वा विकसित होत आलेली आहे.

अशा या बहुस्वरूपी भाषेच्या विविध स्वरूपांचा, तिच्या अभ्यासाच्या क्षेत्रांचा व तिच्या स्वरूपाभ्यासाचा म्हणजे शास्त्राचा विचार, आपणांस ह्या व्याख्यानात करावयाचा आहे.

: २ :

आताच पाहिल्याप्रमाणे भाषा ही तशी प्राचीन असली तरी 'शास्त्र' या दृष्टीने तिचा अभ्यास तुलनेने अलीकडे होऊ लागला, आधुनिक जगाची विद्वत्-परंपरा पाश्चात्य राष्ट्रांत प्राचीन ग्रीक व प्राचीन लॅटिन ग्रंथ ह्यांच्या अभ्यासाने सुरू झाली आहे, हे पहिल्या व्याख्यानात आपण पाहिले आहे. आपल्याकडेही तसेच झाले. म्हणजे या देशांच्या प्राचीन भाषांचा (संस्कृत, अरेबिक इ.) अभ्यास करण्यासाठी पाठशाळा व मदरसे ई. इं. कंपनीने आपल्या मुलखातील मोठ्या व प्रमुख शहरांतून सुरू केले. पुढे १८५७ त तीन विद्यापीठे स्थापन झाल्यानंतर त्यांना 'विद्यापीठीय' प्रतिष्ठा प्राप्त झाली, पण तो सारा अभ्यास इंग्रजी भाषेद्वारे सुरू झाला. त्यामुळे 'भाषाशास्त्र' हा मराठी शब्द ज्या इंग्रजी शब्दाचा प्रतिशब्द आहे त्या फिलॉलॉजी या शब्दाच्या अर्थातील बदल लक्षांत घेणे गमतीचे आहे. ह्या शब्दाचा अर्थ आजच्या शब्दकोशात, भाषाविषयक सर्व संबंधी विषयांचा अभ्यास असा दिला असला तरी त्यात "love of learning and literature and study of literature and relevent disciplines"[1] असाही अर्थ एका शब्दकोशात शेवटी दिला आहे, त्यावरून त्या शब्दामागे व्यापक संकल्पना कशा रूढ होत्या हे स्पष्ट होईल. म्हणजे फिलॉलॉजी हा शब्द पूर्वी व्यापक अर्थाने ज्ञानवाचक, विद्यावाचक असा होता. "Historically, it (word philology) has been used to include not only all literary and linguistic studies but of all products of human mind."[2] हे रेने वेलेक यांचे विधान या संदर्भात लक्षणीय आहे. बीख (Boeckh) याने आपल्या विश्वकोशात 'फिलॉलॉजी' ह्या शब्दाचा अर्थ विश्वातील उपलब्ध ज्ञान (knowledge of the known) असा दिलेला आहे. म्हणजेच भाषा, तसेच वाङ्मय, राज्यशास्त्र, धर्म, सामाजिक चालीरीती, कला यांच्या अभ्यासाचा समावेश त्या शब्दात आहे. ह्या शब्दामागे असा व्यापक अर्थ येण्याचे कारण प्राचीन भाषा व साहित्य यांचा अभ्यासच बीखला अभिप्रेत होता. त्यासाठीच प्राचीन उत्खननशास्त्र व इतिहास यांच्या ज्ञानाची आवश्यकता त्याला वाटली. त्याच्या मते वाङ्मयाचा अभ्यास हा फिलॉलॉजीचा केवळ एक भाग होय.

आज मात्र त्याच्या ( या शब्दाच्या ) व्युत्पत्तिसिद्ध अर्थाकडे व इतरांनी केलेल्या ह्या क्षेत्रातील कार्याकडे लक्ष देऊन या शब्दाचा अर्थ 'भाषाशास्त्र म्हणजे भाषा, व्युत्पत्ती, व्याकरण इ. चा ऐतिहासिक दृष्टीतून केलेला अभ्यास, तसेच पूर्वकालीन भाषेच्या स्वरूपाचा अभ्यास', असा घेतला जातो. अलीकडच्या काळात भाषेच्या अभ्यासाला एक प्रकारची स्वायत्तता प्राप्त झालेली आहे. भाषेच्या अभ्यासाकडे पाहण्याची दृष्टी पूर्णतया बदलली आहे. अगदी पूर्वकाली भाषा हे

ज्ञानाचे साधन मानले जात असे, नंतरच्या कालात ते प्राय: प्राचीन श्रेष्ठ वाङ्मयाचे वाहन म्हणून अभ्यासले जाई. कारण विद्यमान भाषांची मूळ पीठिका तेथपर्यंत जाऊन पोहोचते. विद्यमान भाषांच्या अभ्यासास भाषाशास्त्र हे केवळ पूरक नव्हे, तर आवश्यकही आहे, असे मानले जाऊ लागले. साहजिकपणे भाषाशास्त्राचा अभ्यास त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे त्या कालात एक आदर्शवादी व आज्ञापक शास्त्र म्हणून केला जाई. सांस्कृतिक प्रगतीच्या त्या अवस्थेत विचारांच्या नियमनाशी (लॉ ऑफ थॉट) भाषेचा संबंध आहे, असे मानले जात असे व तर्कशास्त्र हे त्याचे आयुध मानले जाई. आपले मनोगत परिणामकारकरीतीने व्यक्त करण्यासाठी भाषेचा वापर कसा करावा, हे शिकविण्यासाठी ऱ्हेटोरिक ऊर्फ भाषासौष्ठवशास्त्र अस्तित्वात आले होते.

विद्यांच्या पुनरुज्जीवनाच्या नंतरच्या कालात सामाजिक व वैज्ञानिक शास्त्रे पुढे आली, त्यांना मिळतेजुळते असे हे 'शास्त्र' तयार करण्याचा प्रयत्न झाला. मानवी संपर्काचे साधन या दृष्टीने भाषा या 'शास्त्रा'चा अभ्यास होऊ लागला. आज मात्र भाषा माणसाच्या मनोवृत्तीची घनिष्टपणे संबंध असणारी अशी, माणसाने निर्माण केलेली सामाजिक संस्था असून तिचे त्या दृष्टीने महत्त्व अनन्य आहे, असे मानले जाते. माणसाच्या अनेक गरजांपैकी त्याची भाषाविषयक गरज ही प्रमुख आहे. भाषेचा उगम त्या गरजेतून झाला आहे, त्यामुळे तिचा अभ्यासही त्या दृष्टीने होणे अवश्य आहे, असे आज मानले जाते. अशा प्रकारची एक स्वायत्त ज्ञानशाखा म्हणून भाषाशास्त्राच्या अभ्यासाच्या पद्धती तयार होत आहेत. त्यामुळे भाषाशास्त्राच्या क्षेत्रात अनेक नवे विचार, कल्पना रूढ होऊन अलीकडे एकंदर भाषाशास्त्राच्या अभ्यासाची बैठकच बदलली आहे. त्यामुळे भाषाशास्त्रवाचक 'लिंग्विस्टिक्स' हा शब्द आज रूढ झाला आहे, त्याचे मराठीकरण 'भाषाविज्ञान' असे करणे योग्य होईल. भाषिक व्यवहाराचे वस्तुनिष्ठ दृष्टीने शास्त्रप्रणीत पद्धतींनी वर्णन करणे हे ह्या शास्त्राचे कार्य होय. इतर शास्त्रांप्रमाणे या शास्त्रातील निष्कर्षही निगमनात्मक पद्धतीवर आधारलेले व तर्कसिद्ध असावेत असे आज मानले जाते. साहजिकच भाषेच्या अभ्यासाच्या पद्धती, साधने हीही बदलली आहेत.

: ३ :

भाषाभ्यासास ग्रीक व रोमन संस्कृतींत महत्त्व प्राप्त झाले होते. ही भाषाभ्यासाची पहिली अवस्था होय. ग्रीकांनी व्याकरणावर अधिक भर दिला. व्याकरणाचा अभ्यास त्यांनी तर्कशास्त्राच्या अनुषंगाने केला. ध्वनिशाखेत त्यांनी फारसे लक्ष घातले नाही. त्यांची भाषाशास्त्रीय नियमांविषयी एक स्वतंत्र अशी भूमिका होती. स्वत:च्या व्याकरणातील विविध प्रवर्गांचा (कॅटॅगरीज) अभ्यास

१११२७।

करून सर्व भाषांना लागू पडेल, असे व्याकरण तयार करता येईल असे त्यांना वाटे. त्याप्रमाणे त्यांनी ते तयार केले होते. जगातील ' सुसंस्कृत ' भाषांना ते लागू पडावे, अशी त्यांची कल्पना होती.

ग्रीक भाषेच्या व्याकरणाच्या धर्तीवर लॅटिन भाषेची व्याकरणे लिहिली गेली.* ह्या दोन भाषांचे स्वरूप थोडेफार सारखे असल्याने लॅटिन भाषेला ही व्याकरणपद्धती बरीच तंतोतंतपणे लागूही पडली. त्यामुळे सर्वच भाषांना ही व्याकरणपद्धती लागू पडेल असे युरोपातील विद्वानांना दीर्घकाल वाटत असे. त्याप्रमाणे अरबांशी संबंध आल्यानंतर अरेबिक भाषांचा व त्यांचा परिचय झाल्यानंतर आपल्याकडील भाषांचा अभ्यास त्याच पद्धतीने त्यांनी सुरू केला होता. अशा रीतीने व्यापार, राज्यविस्तार इत्यादी कारणांनी निरनिराळ्या लोकांशी संबंध आल्याने त्यांनी (युरोपियनांनी) इतर भाषांचा अभ्यास जरी सुरू केला, तरी त्यांची भूमिका तशी ' शास्त्रीय ' नव्हती.

वास्तविक ग्रीक व लॅटिन ह्या भाषा प्रकृतीने भिन्न आहेत, हे लक्षात न घेता ग्रीकांनी मानलेले भाषिक प्रवर्ग चिकित्सकता न दाखविता लॅटिनला लावले गेले. ग्रीक व नंतर लॅटिन ह्या सर्वश्रेष्ठ भाषा होत, अशी प्राचीनांची खात्री होती. ती विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालखंडात प्राचीन भाषांच्या अभ्यासाला मिळालेल्या चालनेमुळे अधिकच दृढ झाली. या कालात ग्रीक-लॅटिन भाषांतील ग्रंथांच्या आवृत्त्या संपादन करण्याचे महत्त्वाचे भाषाक्षेत्रीय कार्य जोराने सुरू झाले. भाषेच्या अभ्यासात व्याकरण व शब्दार्थ यांनाच प्राधान्य असे. त्या दृष्टीने निर-निराळ्या भाषांचा अभ्यास होऊ लागला. त्यासाठी व्याकरणग्रंथ लिहिले जाऊ लागले व व्युत्पत्तिशास्त्राचा पण जन्म झाला. पण ' भाषाशास्त्र ' अद्याप अस्तित्वात आले नव्हते. याचे कारण या कालात प्राचीन कालाप्रमाणे भाषेचा अभ्यास हा प्रामुख्याने शिक्षणाचा एक प्रमुख विषय म्हणूनच होत होता. त्यामुळे त्यात व्याकरणसंबद्ध विषयांना अधिक प्राधान्य मिळावे, हे स्वाभाविक होते. नव्या लोकभाषांचा उदय झाला होता तरी विद्वानांच्या मनावर ग्रीक-लॅटिन या भाषांच्या थोरवीचे संस्कार दृढ झालेले असल्याने आधुनिक भाषांच्या अभिवर्धनास ह्या प्राचीन अभिजात भाषांचा अभ्यास आवश्यक आहे अशी भूमिका सर्वसाधारण भाषिक वा वाङमयक्षेत्रीय अभ्यासकाची होती.

प्राचीन भाषांचा आदर्श असल्याने भाषेच्या अभ्यासाचे उद्दिष्ट ती भाषा शुद्ध व बिनचूक बोलण्यास शिकणे हे मानले जाई. साहजिकपणे वापरावयाचे

---

* डायोनिसिअस थ्रॅक्स व अॅपोलोनियस-डायस्कोलस् या ग्रीक ग्रंथकारांची व्याकरणे रोमन ग्रंथकार आदर्श मानीत.

शब्द हे सुयोग्य किंवा बरोबर कसे हे चर्चा करून ठरविले जाई. हे व्याकरण, शब्दकोश यांच्या साहाय्याने होत असे. डॉ. जॉन्सन याने आपली इंग्रजी डिक्शनरी याच उद्दिष्टांनी तयार केली होती. भाषाभ्यासकाला व भाषाशास्त्रज्ञाला लोकांच्या भाषावापरातील बरोबर-चूक सांगण्याचा अधिकार नाही. त्याच्याशी तसेच भाषावापरातील तर्कशुद्धता अगर तर्कदृष्टता यांच्यांशी त्याचा काही संबंध नाही. तर त्याचे काम म्हणजे बिनचूक नोंद घेणे, समजून घेणे, पृथःकरण करणे व शोध घेणे हे आहे, त्याच्या दृष्टीने लिखित वा वाङ्मयीन भाषाविष्कार जितका महत्त्वाचा तेवढयाच बोलीभाषाही महत्त्वाच्या आहेत, हे विचार अद्याप उदित व्हावयाचे होते. त्यामुळे या कालातील भाषाशास्त्र प्रायः केवळ व्याकरणनिष्ठ व शब्दनिष्ठ म्हणजे आदर्शवादीच राहिले.

आपल्याकडेही भाषाभ्यासाची परंपरा बरीच जुनी आहे. वाक् ही भाषेची वैदिक देवता आहे. पूर्वी वाणीचा सर्व दृष्टींनी अभ्यास होत होता. हे ' परा पश्यन्ति वैखरी ' या सूत्रावरून स्पष्ट होते. प्रतिशास्त्रे व शिक्षाग्रंथ या ग्रंथांतून प्राचीन आर्यांचे भाषाविचार आले आहेत. प्रत्येक वेदसंहितेचे एक स्वतंत्र प्रतिशाख्य होते. शिक्षा ग्रंथ मात्र व्यापक होते, त्यांत स्वर व्यंजने यांच्या उच्चारांचा आधुनिकतेला साजेशा पद्धतीने विचार केलेला आहे. वेदांतील शब्दाचा निघंटू हा कोश तयार केला गेला होता. यास्काचार्यांनी नंतर आपले निरुक्त तयार केले. त्यात वैदिक शब्दांचे अर्थ दिले आहेत. पाणिनीने संस्कृत व्याकरण सिद्ध केले. हा अष्टाध्यायी नावाचा ग्रंथ आजच्या भाषापंडितांनाही मान्य झालेला आहे. असा ग्रंथ होणे नाही, अशी कबुली आजचे विख्यात भाषाचार्य ब्लूमफील्ड यांनी दिली आहे. त्यानंतर पतंजली, वररुची, हेमचंद्र आदींनी ही व्याकरणाची परंपरा पुढे चालविली. अर्थात् भाषाभ्यासाची भूमिकाही प्रामुख्याने शिक्षकाची म्हणजे आज्ञापकाची राहिली.

प्राचीन ग्रीक व प्राचीन भारतीय ब्राह्मण हे असाधारण विद्वान होते, पण इतरांच्या भाषांत त्यांना रस नव्हता. त्यांच्या दृष्टीने इतर लोक कनिष्ठ प्रकारचे आहेत. तशाच त्यांच्या भाषा होत, असे त्यांना वाटत असे. ब्राह्मणांनी संस्कृतची कास धरली, तिला 'देवांची भाषा' बनविले व तंत्र आणि तत्त्वमीमांसा या दोन्ही दृष्टींनी तिला एक प्रकारचे 'पूर्णत्व' आणले. ग्रीक लोक असेच एकभाषी होते, त्यांनीही आपल्या भाषेचा एवढा सखोल अभ्यास केला की, युरोपातील अनेक भाषांनी ग्रीकांच्या भाषाशास्त्रीय सिद्धान्तांचा अवलंब केला आहे. युरोपात नंतर झालेल्या ख्रिश्चन धर्मीय भाषाशास्त्रज्ञांनी मात्र जगातील इतर भाषांपर्यंत आपली दृष्टी पोहोचविली. प्रो. फर्थ ह्या दोन प्राचीन जमातींच्या कार्याला उद्देशून म्हणतात : The Brahmins and Greek ( *Elite* ) were satisfied

with the excellence of their own tongues. Christian Scholars have tried to campass the tongues of the world.[3]

मध्ययुगांमध्ये व नंतरही जवळ जवळ फ्रेंच राज्यक्रांतीच्या कालापर्यंत आधुनिक भाषा व त्यांच्या व्याकरणाचा अभ्यास विशेष महत्त्वाचा मानला जात नव्हता. प्राचीन धर्मग्रंथ व वाङ्मयीन ग्रंथ ज्यांत आहेत त्या ग्रीक-लॅटिन याच खऱ्या अभ्यसनीय भाषा गणल्या जात होत्या. मूळ बायबल हिब्रू भाषेत आहे म्हणून कित्येकांनी त्या भाषेचाही अभ्यास केला. अशा रीतीने प्राचीन भाषांचा अभ्यास आस्थेने होत असला तरी त्यात 'शास्त्रीयता' नव्हती. शाळा-कॉलेजांतून लॅटिन भाषेलाच महत्त्वाचे स्थान होते व साध्या विद्यालयांना ग्रॅमर स्कूलच म्हटले जात होते. त्यांतून लॅटिन भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास होई. शिकविणारे लॅटिन वाङ्मय व व्याकरण यांचा अभ्यास केलेले असत, तो अभ्यासही प्रामुख्याने ते विषय शिकविण्याचे दृष्टीने केला जात असे. या शाळांत ग्रॅमर (व्याकरण), ऱ्हेटोरिक (भाषासौष्ठवशास्त्र) व लॉजिक (तर्कशास्त्र) हे विषय शिकविले जात. त्यांसाठी अर्थातच प्राचीन ग्रंथांचा वापर होत असे. आपल्याकडे सार्वजनिक शाळा नव्हत्या, पण कोठे कोठे असलेल्या गुरुकुलांतून वा विद्येसाठी प्रसिद्ध असणाऱ्या शहरांतून (क्षेत्रांतून) न्याय, मीमांसा, व्याकरण, काव्य इ. विषयांचा अभ्यास होई. त्याचे उद्दिष्ट प्रामुख्याने विद्यार्थ्यांना संथा देणे, शिकविणे व जुने ज्ञान जतन करणे हेच होते.

प्राचीन हिंदू व्याकरणकार व नंतरचे अरब ग्रंथकार ह्यांना त्यांच्या काली प्रचलित असलेल्या लोकभाषांत रस नव्हता. त्यांचे उद्दिष्ट त्या 'दिव्य' भाषांचे 'पावित्र्य' टिकविणे हे होते. त्यासाठी इतरांकडून त्यांचे स्वरूप शबलित होऊ नये, याची दक्षता त्यांना घ्यावयाची होती. त्याचप्रमाणे पवित्र संस्कृत भाषेच्या अगर पवित्र कुराणाच्या मंत्रवजा शब्दांच्या उच्चारण्याने लोकांना अद्वितीय आनंद व्हावा अशीही त्यांची इच्छा होती. साहजिकच त्यांचा दृष्टिकोण स्थितिशील, उपदेशप्रधान व आदर्शवादी असाच होता. प्राचीन भाषाभ्यासाची भूमिका सर्वत्र प्रायः अशीच होती. तत्कालीन परिस्थिती पाहता असे होणे अपरिहार्य होते.

प्राचीन वाङ्मयाच्या संशोधनाने भाषिक अभ्यासाची दुसरी अवस्था सुरू होते. विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालात ग्रीक वाङ्मयाच्या महत्तेची जाणीव झाल्यानंतर अभिजात विद्वत्तेचा म्हणजेच 'क्लॅसिकल स्कॉलरशिप' चा उदय झाला. संस्कृत भाषेची पश्चिमेला ओळख झाली व तीतून आधुनिक भाषाशास्त्राचा (मॉडर्न फिलॉलॉजी) उदय झाला. "Language was studied for the first time for its own sake by a new method elective, comparative, historical"[4] असे जे. आर्. फर्थ यांचे मत आहे.

: ४ :

इ. स. १७८६ मध्ये सर विल्यम ज्योन्स यांनी कलकत्ता येथे रॉयल एशियाटिक सोसायटीच्या सदस्यांपुढे भाषण करताना संस्कृत, ग्रीक, लॅटिन, जर्मॅनिक भाषांमध्ये आढळणारे विलक्षण साम्य भाषापंडितांच्या दृष्टोत्पत्तीस आणले, आणि हे साम्य केवळ योगायोगामुळे आलेले नाही, तर त्यामागे विशिष्ट ऐतिहासिक सत्य असून ह्या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून निर्माण झाल्या असाव्या. ग्रीक, लॅटिन भाषा या भाषांपेक्षा संस्कृत ही अधिक प्रगल्भ भाषा असून तिच्या अभ्यासाने या भाषा ज्या मूळभाषेपासून निघाल्या तिचा शोध लागेल, असा आपला सिद्धान्त त्यांनी मांडला, आणि त्यायोगे भाषाशास्त्रीय अभ्यासाचे एक नवे युगमान सुरू झाले. ह्या सिद्धान्तामुळे भाषाशास्त्राच्या क्षेत्रातील अभ्यासकांना एक नवी दिशा उपलब्ध झाली, एक नवे शास्त्र नव्या स्वरूपात पुढे आले. समकालीन इतर शास्त्रांच्या साहाय्याने व अनुकरणाने ह्या नवशोधित भाषाशास्त्राची वाटचाल सुरू झाली.

आपणांस विशेष अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट म्हणजे संस्कृत भाषा हे या अभ्यासाचे केंद्र होते. राजकीयदृष्टचा अवमानित झालेल्या भारताच्या परंपरेचे वाहन असणाऱ्या संस्कृत भाषेला तत्कालीन जगातील आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जी प्रतिष्ठा लाभली, मान्यता मिळाली, तीमुळे भारतीयांना अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. अशा रीतीने सर विल्यम ज्योन्स यांच्या घोषणेने फ्रेंच राज्यक्रांतीच्या आसपास सुरू झालेले भाषाभ्यास-क्षेत्रातील हे युगमान पहिल्या जागतिक महायुद्धाचा शेवट होईपर्यंत टिकले. भाषाशास्त्राच्या अभ्यासाचा हा दुसरा कालखंड होय. या कालात शास्त्र ह्या दृष्टीने भाषाभ्यासाने कोणती प्रगती केली व भाषाभ्यासाची ह्या कालात कोणती अंगे उत्क्रांत झाली अगर विकसित झाली हे पाहणे अवश्य आहे.

एकोणीसाव्या शतकात अनेक आधुनिक ज्ञानशाखा उदयास आल्या व शास्त्ररूप पावल्या—वैज्ञानिक व सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या—एकमेकांच्या अभ्यासपद्धतींचा परिणाम एकमेकांवर होत होता. वाङ्मयेतिहासाच्या व समीक्षेच्या प्रकरणात जीवनशास्त्रातील 'सेंद्रिय एकात्मतेच्या' कल्पनेचा प्रभाव विशिष्ट कालखंड व कलाकृती यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर कसा पडला, ते यापूर्वी आपण पाहिले आहे. त्या प्रभावापासून भाषा ही संस्थाही सुटली नाही. किंबहुना भाषेलाच ती प्रथम लावली गेली, हा डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा भाषाभ्यासावरील परिणाम होय.

१९ व्या शतकाने ध्वनींचे नियम केले व भाषा ही उत्क्रांत होत असलेली एक सजीव संस्था आहे असे मानले. प्रत्येक भाषा ही सेंद्रिय एकात्म वस्तूप्रमाणे उत्पत्ती, स्थिती, प्रगल्भत्व, प्रौढत्व, वार्धक्य, विनाश ह्या अवस्थांनी युक्त ठरली.

त्यामुळे एका भाषेतून दुसरी भाषा निर्माण कशी होते हे उत्क्रांतितत्त्वाच्या उदाहरणाने स्पष्ट करता आले, त्यातून भाषावंशाची कल्पना वाढीला लागली व जवळ जवळ दृढमूल झाली आहे. या प्रयत्नांच्या अनुषंगाने निरनिराळ्या भाषांचा ऐतिहासिक दृष्टीने व तुलनात्मक दृष्टीने अभ्यास सुरू झाला. सर विल्यम ज्योन्स यांचा सिद्धान्त अधिक सप्रमाण रीतीने सिद्ध करण्याच्या दृष्टीने श्लेगेल, ग्रिम्म, बॉप्प, रास्क आदींनी मोलाची कामगिरी केली आहे. ग्रिम्मने आपला प्रसिद्ध ध्वनिसिद्धान्त मांडला. व्हिटने यांनी भाषाविषयक अभ्यासाला एक शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली. शब्दशास्त्र म्हणजे भाषाशास्त्र नव्हे. भाषाशास्त्र हे फार वेगळे शास्त्र असून ते अधिक मूलभूत व सर्वांगीण स्वरूपाचे आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. ऐतिहासिक व तुलनात्मक पद्धतींचा प्रभाव असलेल्या या कालखंडांत अशा रीतीने थोडा मूलभूत विचार उदयास येत होता.

प्रा. व्हिटने यांनी भाषेचे स्वरूप समजावून घेणे हे भाषाशास्त्राचे मुख्य कार्य आहे, असे म्हटले. तसेच बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषांमध्ये सर्वकाळ सर्व प्रकारचा बदल होत असतो, त्या बदलाचा अभ्यास करणे हे ह्या शास्त्राचे प्रमुख कार्य आहे. तसेच हे बदल ठराविक नियमांनुसार होत असतात. ते नियम शोधून काढले तर भाषा-भाषांमधील परस्परसंबंध व नाती स्पष्ट होतील. भाषा व बोली एकच आहेत हे आधुनिक भाषाशास्त्राचे गृहिततत्त्व अशा रीतीने ह्या कालात प्रथमच मांडले गेले.

सर विल्यम ज्योन्स यांच्या घोषणेने अनेक विद्वानांना प्रेरणा मिळाली व सुचेल त्या दिशेने ते कार्यवाही झाले. चार्लस विल्किन्स यांनी 'गीता', 'शाकुंतल', 'हितोपदेश' इ. संस्कृत ग्रंथांची भाषांतरे केली. कोलब्रुक यांनी प्रथमच संस्कृतचे युरोपीय भाषेत विश्वसनीय असे व्याकरण प्रसिद्ध केले. हॉटन याने संस्कृत-बंगाली-इंग्लिश शब्दकोश तयार केला, आणि तो भारतीय प्रादेशिक भाषा युरोपमध्ये शिकविणारा पहिला प्रोफेसर झाला. युरोपीय विद्वानांना ग्रीक व लॅटिन या भाषांशी तुलना करण्यासाठी संस्कृतचा अभ्यास करावयाचा होता. कारण त्यांना सर्व भाषांच्या मातृस्थानी असलेली भाषा शोधून काढावयाची होती, तसेच युरोपीय प्रचलित भाषांचा भाषिक विकासक्रम व त्यांची पुढली संभाव्य अवस्था त्यांना जाणून घ्यावयाची होती. त्यांचे मते संस्कृत ही स्वयंविकासी (ऑर्‌गॅनिक) भाषा होय. म्हणून तिचे त्यांनी कुल मानले. जर्मन विद्वानांनी ह्या भाषाकुलाला 'इंडो-जर्‌मॅनिक' ठरविले, तर फ्रेंच व इंग्लिश विद्वान त्याला इंडो-युरोपीयन भाषा गट म्हणतात. आपण भारतीय केवळ आर्य-भाषा-गट म्हणतो. ते काही असले तरी ऐतिहासिक दृष्टीचा अवलंब करून भाषावंशाची कल्पना शास्त्रीय पुराव्यांनी सिद्ध करण्यात तत्कालीन भाषाकोविदांनी बरेच यश मिळविले.

ऐतिहासिक दृष्टीबरोबरीने तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करून भाषांचा अभ्यास करावयाचा प्रघातहि या कालखंडात रूढ झाला. त्यामुळें भाषांचे वर्गीकरण करण्याचे निरनिराळे उपक्रम झाले. भाषावंश-शास्त्रीय वर्गीकरणाचा उपक्रम ज्याप्रमाणे झाला, त्याप्रमाणे भाषांच्या प्रचलित स्वरूपाची छाननी करून त्या दृष्टीने प्रत्ययी, अप्रत्ययी, चिकटघा, एकाकी असे भाषांचे वर्गीकरण करण्याचेही उपक्रम झाले. शास्त्रीयदृष्टीने तुलनात्मक अभ्यासाचा उपक्रम ठीक असला तरी त्यातील दोष आज स्पष्ट दिसतात. श्री. य. रा. दाते यांनी या विषयाचा समारोप करताना म्हटले आहे की, "ग्रिम्मपासून पॉट, श्लेषेर व त्यांचे अनुयायी यांनी ध्वनिमूलक किंवा उच्चारमूलक सादृश्यावरून निरनिराळ्या भाषांची तुलना केली व निरनिराळे ध्वनिशास्त्रीय नियम बनविले व ते लावून व्युत्पत्तिशास्त्रीय संशोधनास अधिक निश्चित स्वरूप दिले. परंतु ह्या ध्वनिशास्त्रीय अभ्यासास प्रत्यक्ष उच्चाराचे पाठबळ नसल्याने हे व्युत्पत्तिशास्त्रीय संशोधन केवळ यांत्रिक व निर्जीव स्वरूपाचे झाले. ह्याला आत्मिक पाठबळ नव्हते".[5] या तुलनात्मक पद्धतीची आधुनिक भाषावैज्ञानिक फलश्रुती कोणती हे स्पष्ट करताना प्रा. जे. आर. फर्थ आपल्या 'टंग्ज ऑफ मेन' या पुस्तकात असा इशारा देतात की, शब्दातील वरवरले साम्य लक्षात घेऊन व्युत्पत्ति शोधणे हे चूक आहे. हा धडा आधुनिकांनी घेतला पाहिजे[6].

अशा विशिष्ट प्रकारच्या विचारांनी भारलेल्या ह्या काळातही भाषाशास्त्राच्या मूलतत्त्वांच्या पद्धतींचा विचारही काहींनी केलेला आहे. प्रा. व्हिटने यांच्या विचारांचा उल्लेख वर आलेलाच आहे. मॅक्सम्यूलर यांनी भाषाशास्त्रावर व्याख्याने दिली. त्यात भाषाशास्त्र हे भौतिकशास्त्र असून ऐतिहासिक पद्धतीवर रचलेल्या व्युत्पत्तिशास्त्राशी याचा काही संबंध नाही, असे प्रतिपादिले आहे. परंतु त्यांनी जे प्रत्यक्ष विवेचन केले त्यावरून हे अनुमान काढता येईना, हे त्यांच्याही लक्षात आले. त्यांनी काहीतरी कारण सांगून वेळ भागविली. साहजिकच ह्या काळात ह्या विचाराला अनुयायी लाभले नाहीत. तरी विकासाची दिशा सुचविली जात होती हे स्पष्ट होते. मॅक्सम्यूलर व व्हिटने यांनी तीन (प्रगत, मध्यम सुधारलेल्या व मागासलेल्या अशा) अवस्थांतील भाषांचे नाते तीन समाजावस्थांशी जोडले. एकाकी व स्थानप्रधान भाषा कुटुंबसंस्थेस स्थिरता आल्याचे द्योतक होत. तर चिकटघा भाषा ह्या समाज भटक्या अवस्थेत असल्याचे लक्षण होय. प्रत्ययी भाषा प्रगत राजकीय अवस्थेच्या द्योतक होत. असा त्यांनी समाज व भाषा यांच्या प्रगतीचा परस्पर अनुबंध दाखवून दिला.

अशा रीतीने या काळात भाषाशास्त्राचा अभ्यास सुरू झालेला असला तरी त्याचे केंद्र भाषा हे नसून संस्कृती, समाजज्ञान असे अन्य काहीतरी होते. त्यांच्या मते भाषा हे या गोष्टींचे केवळ एक साधन होय.

: ५ :

पहिल्या महायुद्धानंतरच्या कालात अमेरिकेत व विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या आणि त्यानंतरच्या कालात सर्व जगात भाषाशास्त्राच्या अभ्यासाला एक वेगळेच महत्त्व व स्थान प्राप्त झाले आहे. भाषाविज्ञान असे ज्याचे मराठीकरण करता येईल असा 'लिंग्विस्टिक्स' हा शास्त्रवाचक नवा शब्द रूढ झालेला आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात व एकंदर जागतिक सामाजिक क्षेत्रात जे नवे विचार पुढे आले व नव्या परिस्थितीत जे नवे प्रश्न निर्माण झाले, त्यांच्यामधून हे नव्या चेहऱ्यामोहऱ्याचे भाषाविज्ञान अवतीर्ण झालेले आहे. त्याच्याशी तुलना करता पारंपरिक दृष्टीने केलेला भाषेचा अभ्यास हा आधुनिक भाषाविज्ञानात बसू शकत नाही असा काहींचा दावा आहे. 'Certainly in its traditional form the historical study of languages can hardly be considered as a branch of linguistics in the contemporary mode.'[7] असे डब्ल्यू. सिडने अॅलन म्हणतात. रूढ पद्धतीच्या अभ्यासात निरनिराळ्या घटकांचा अलगत्वाने विचार करून कार्यकारणावर अधिक भर दिलेला असतो. या पद्धतीला भाषाविज्ञानाच्या पुरस्कर्त्यांनी 'उलटा इतिहास' (हिस्टरी इन् रिव्हर्स) अशी संज्ञा दिली आहे. कारण तीत भाषिक रचनेच्या पृथःकरणावर भर दिलेला नसतो. अवलोकनासाठी वा अभ्यासासाठी जी साधनसामग्री उपलब्ध झालेली असते, तिच्या अव्वलपणावर जुन्या दृष्टीने अभ्यास करणारांचा विश्वास असतो, उलट आधुनिकांची भूमिका ही प्रामुख्याने एक प्रकारच्या साशंकतेची (अॅन्टि पॉझिटिव्हिस्ट) असते.

एकोणीसाव्या शतकात भाषेचा ऐतिहासिक व वंशानुगामी पद्धतीचा अवलंब करून अभ्यास करण्याचा जो प्रघात पडला, त्याचे कारण त्यांच्यावर डार्विनच्या सिद्धान्ताचा मोठा परिणाम झाला होता. भाषा आणि वनस्पती वा प्राणिसृष्टीतील विशिष्ट श्रेणी यांत जे रूपकात्मक साधर्म्य गृहित धरले जात होते, ते आज शंकास्पद मानले जाते. उलट ज्या जीवशास्त्रात डार्विनच्या शोधामुळे क्रांती झाली त्या डार्विनच्या शोधाबद्दल आजचे जीवशास्त्रज्ञ असे म्हणतात की, डार्विनच्या शोधामुळे शास्त्र या दृष्टीने जीवशास्त्र बिनचूक असे राहिले नाही. It is still somewhat inexact science[7a] असे एक मत. आधुनिकांच्या मते डार्विनने पुष्कळसे कष्ट घेतले होते, हे खरे, तरीपण त्याला तत्त्वज्ञानाची माहिती अल्प होती व पर्वाही नव्हती. Darwin was the simple naturalists dissecting patiently amassing facts over the years, knowing and caring little of philosophy[8] असे डार्विनचा चरित्रकार यंग याचे मत आहे. डार्विनच्या शोधाच्या परिणामाची त्याच्या क्षेत्रातली ही प्रतिक्रिया लक्षात घेतली तर भाषाविज्ञानावर त्याचा परिणाम

कोणता झाला, याविषयी कसे प्रतिकूल मत असेल याची कल्पना करता येते. डार्विनच्या गुणांचे अवमूलन न करता असे म्हणता येईल की, समकालीन भाषाविज्ञान हे डार्विनप्रणित विज्ञानाच्या प्राथमिक अवस्थे (नॅचरल हिस्टरी स्टेज) पलीकडे झेप घेत आहे हे मान्य करावयास हवे.

भाषाभ्यासाच्या विकासासाठी ऐतिहासिक पद्धतीची आवश्यकता आहे काय, हा प्रश्न आज विवाद्य ठरला आहे. एकोणीसाव्या शतकापासून या क्षेत्रात आपण काही चुकीची गृहीतके (ऑब्सेशन्स) स्वीकारली आहेत. त्यामुळे आधुनिकत्वाच्या प्रकाशात भूतकालाचा अभ्यास करण्यापेक्षा भूतकाळाच्या प्रकाशात वर्तमानाचा अभ्यास करण्याचा तो प्रयत्न झाला. The explanation of the nearer by the farther has sometimes dominated our studies to the point of hypnosis [9] असे मार्क ब्लॉक् म्हणतात ते लक्षणीय आहे.

अशा रीतीने आधुनिकाच्या दृष्टीतून ह्या दुसऱ्या अवस्थेतील भाषाशास्त्राभ्यास-पद्धतीवर अनेक आक्षेप घेतले जात असले व तीतील उणीवा दाखविल्या जात असल्या तरी त्या अवस्थेचे वा त्या अवस्थेतील भाषाभ्यासाचे महत्त्व कोणीच अमान्य करीत नाही. भाषाभ्यासाच्या विकासाच्या या अवस्थेत निरनिराळ्या अभ्यासकांनी भाषाभ्यासविषयक जो उत्साह निर्माण केला व जे वातावरण निर्माण केले त्यातूनच आजचे भाषाविज्ञान उत्क्रांत झालेले आहे. त्या दृष्टीने आजचा भाषाभ्यास या अभ्यासकांचा ऋणी जरूर आहे. त्याला खरे शास्त्र (सायन्स) कोणते व शास्त्राचा आभास करणारा अभ्यास (कोनॅसान्स) कोणता हे चांगले कळते. आणि त्याला अर्थातच पहिले महत्त्वाचे वाटते.

अशा रीतीने भाषाभ्यासाच्या या दुसऱ्या व अत्यंत महत्त्वाच्या अवस्थेतील भाषाभ्यासाच्या विविध उपक्रमांचे पद्धतीचे व त्यांनी त्या अभ्यासास लाविलेल्या दिशेचे विवेचन केल्यानंतर आपणांस भाषाभ्यासाची तिसरी व आजची अवस्था कशी निर्माण झाली, ती कोणाच्या प्रयत्नांतून साकार झाली आणि आजच्या भाषाभ्यासाची प्रमुख तत्त्वे, गृहीतके कोणती, तसेच कोणत्या पद्धती ते प्रमाण मानते याचे विवेचन करणे अवश्य आहे.

## : ६ :

विसाव्या शतकातील भाषावैज्ञानिकांची पूर्वकालातील भाषाशास्त्रीय अभ्यास-पद्धतीविषयीची दृष्टी कशी चिकित्साप्रधान आहे, हे पाहिले. पूर्वकालीनांची भाषा-विषयक जाणीव कशी होती याचे वर्णन–येमस्लेव (Hjelmslev) या डॅनिश भाषा-

कोविदाच्या शब्दांत सांगायचे तर ती पूर्वकालीन भाषाशास्त्राला भाषेच्या भाषिकतेपेक्षा भाषेचे पदार्थवैज्ञानिक व शारीरशास्त्रीय, मानसशास्त्रीय व तर्कशास्त्रीय, समाजशास्त्रीय व इतिहासशास्त्रीय महत्त्व अधिक वाटे. (Linguistics of the past concerned itself with the physical and physiological, psychologial and logical, sociological and historical precipitations of languages not language itself.)[10] भाषेसंबंधीच्या त्यांच्या काही व्याख्या लक्षात घेतल्या तरी हे स्पष्ट होईल. एकाच्या (स्वीट) मते भाषा म्हणजे विचारांचे भाषणीय उच्चारांच्या साधनाने केलेले आविष्करण (the expression of thought by means of speech sounds) होय, तर दुसरा (टेलर) म्हणतो की भाषा म्हणजे मानवी मनाच्या अंतरंगातील हालचालींचे बाह्यांतरी स्पष्ट होणारे विशदीकरण (outword manifestation of inward working of mind) होय. तर तिसरे कोणी (व्हिटने व हर्मन पॉल) असे म्हणतात की, इतरांशी संपर्क साधण्यासाठी केलेले आविष्करण, किंवा विचार सुगम होण्यासाठी केलेले आविष्करण (expression for the sake of communication, thought made apprehensible[11]) होय.

ह्या अवतरणांवरून पूर्वकालीनांची वृत्ती भाषा हे कशाचे तरी साधन, माध्यम आहे असे गृहित धरून त्या दृष्टीने तिचा अभ्यास करण्याची कशी होती, हे स्पष्ट होते. अलीकडच्या कालातील नव्याने अवतीर्ण झालेल्या भाषाविज्ञानाची भूमिका त्यापेक्षा अगदी भिन्न व सर्वस्वी शास्त्रीय अशी आहे. भाषा हे संपर्क साधण्याचे, मनोविष्काराचे--इ. साधन असेलही. परंतु ते प्रामुख्याने ध्वनिप्रधान आहे, इकडे अलीकडच्या भाषाशास्त्रज्ञांचे लक्ष आहे, हे येमस्लेव्हच्या वरील उद्‌गारांतून व्यक्त होते. भाषेच्या ध्वन्यत्मक वैशिष्टयाने हे अलीकडील भाषाकोविद एवढे प्रभावित झालेले आहेत की वॅटसनसारखा वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ विचारक्षमता ही मनाची शक्तीच मानीत नाही. तर तो विचारांना अंतरंगातले भाषण (इनर स्पीच) असे मानतो. बर्ट्रँड रसेलशी झालेल्या त्याच्या वादावरून भाषा ह्या क्रियेविषयी आपण किती अज्ञानात आहोत हे स्पष्ट झाले आहे. रसेलने भाषेचे हे अनन्यत्व मान्य केले आहे. तो म्हणतो— I think myself, that ‘meaning’ can only be understood if we treat language as a bodily habit.[12]

भाषाभ्यासाच्या दुसऱ्या टप्याला सर विल्यम ज्योन्स यांचा मागे उल्लेखिलेला विचार जसा कारणीभूत झाला त्याप्रमाणे भाषाभ्यासाची ही नवी भूमिका फर्डिनंड डी सस्सूर यांच्या शिकवणुकीतून साकार झालेली आहे. त्यांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अभ्यास-टिप्पणी प्रकाशित केल्या. त्यातून ही नवी दृष्टी उदित झाली. त्यांतील शेवटचे विधान ह्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ते असे :

Linguistics has but one proper subject,—the language system viewed in its own light and for its own sake ".[13] परंतु हा विचार म्हणजे केवळ विचार नसून सर विल्यम ज्योन्स यांच्या विधानाप्रमाणेच दीर्घ-कालावधीनंतर अमलात यावयाची अशी योजना होय. भाषाविज्ञानाला परंपरेने निगडीत झालेल्या सह-शास्त्रांपासून मुक्त करण्याच्या प्रक्रियेचा तो एक प्रारंभ होता. एकोणीसाव्या शतकात रूढ असलेला भाषाशास्त्रवाचक 'फिलॉलॉजी' हा शब्द अद्याप इंग्लंडमध्ये काही ठिकाणी वापरला जातो. पूर्वकालीन अवस्थेचा तो द्योतक आहे. पण त्यातून आजचे भाषाविज्ञान (लिंग्विस्टिक्स) विकसित वा उत्क्रांत होत आले आहे. या दोन अवस्था जरी भाषा या एकाच संस्थेच्या असल्या तरी त्यांची स्वरूपे एवढी भिन्न आहेत की डब्ल्यू. सिडने अॅलन यांनी, ह्यांना डॉ. जेकिल व मि. हाईड यांची उपमा दिली आहे. पहिला जेकिल असेल तर दुसरा हाईड, वा या उलट. यावरून या दोन अवस्थांतील फरक किती मूलभूत स्वरूपाचा आहे हे स्पष्ट होईल. त्यांचे वाक्य असे : The linguistic ( or philological ) Jekyll is not therefore to be confused with the philological ( or linguistic ) Hyde.[14]

आधुनिक भाषाविज्ञान हे आधुनिक विज्ञानाच्या पद्धतींचा अवलंब करून पुढे जात आहे. त्या दिशेने वाटचाल करून आधुनिक भाषाविज्ञानाने विज्ञानाच्या स्वरूपाशी मिळतेजुळते असे स्वतःचे स्वायत्त अनुशासन निर्माण केले आहे. भाषा-विज्ञानाच्या व्याप्तीविषयी तसे बंधन नाही. भाषेच्या सर्व अवस्थांतील अभ्यासाशी भाषाविज्ञानाचा संबंध आहे. Linguistics is concerned with language in *all its aspects,* language in operation, language in drift, language in nasscant-state, and languages in dissolution.[15] असे एक आधुनिक मत म्हणून डब्ल्यू. सिडने अॅलन उद्धृत करतात. परंतु प्रत्यक्षात भाषाविज्ञान यांपैकी पहिल्यावरच अधिक भर देत आहे. कारण इतर गोष्टी या भाषाशास्त्राच्या कक्षेत पडत नसून समाजशास्त्र-मानसशास्त्राच्या कक्षेत पडतात, असे आधुनिक भाषावैज्ञानिकांचे मत आहे. साहजिकपणेच आधुनिक भाषाविज्ञान हे आधुनिक विज्ञानपद्धतींचा अवलंब करून पुढे जात आहे. त्यामुळे आधुनिक भाषाविज्ञानकोविदाच्या ठिकाणी पूर्वकालीन भाषाशास्त्रज्ञाचा उत्साह असणे शक्य नाही. त्याचे लक्ष मुख्यत्वे पृथःकरण–पद्धतीवर केंद्रित झालेले असते. पूर्वीच्या भाषाशास्त्रज्ञांचा ऐतिहासिक स्पष्टीकरणावर व त्यातून नवा अर्थ काढण्यावर अधिक भर असे. उलट विद्यमान कालाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे अमाप भाषारूप साधनसाहित्य आजच्या भाषाक्षेत्रीय अध्येत्यापुढे (स्कॉलरपुढे) उपलब्ध आहे, ते एवढे विविध व परिपूर्ण आहे की, त्यातच त्याच्या ठिकाणच्या पृथःकरण-शक्तीला व चिकित्सक पाहणीला उदंड अवसर निर्माण झाला आहे.

ज्ञानशाखा या दृष्टीने भाषाविज्ञानाला विद्यमान भाषांत अधिक रस आहे. त्या अभ्यासाला एककालिक ( सिंक्रॉनिक ) अभ्यास असे म्हणतात. कारण त्यांच्या निरनिराळ्या अंगोपांगांचे सखोल अवलोकनपूर्वक पृथःकरण प्रत्यक्ष रीतीने करता येते. भूतकालसुद्धा आपण वर्तमानाच्याच प्रकाशात पाहू शकतो. ज्याप्रमाणे हिमनद्या व भूपृष्ठांवरील उंचवटे, घळी इ. निरनिराळ्या भूविशेषांवरून अभ्यासक पृथ्वीच्या इतिहासपूर्वकालीन अवस्थांविषयी काही निष्कर्ष काढतो त्याप्रमाणेच आपल्या रोजच्या व्यवहारातील भाषांच्या बोलण्या-ऐकण्यावरूनच प्राक्ऐतिहासिक भाषेसंबंधी अंदाज करणे अभ्यासकाला शक्य आहे. एखाद्या आधुनिक व परिपूर्ण पुतळ्यापेक्षा भंग पावलेल्या अॅपोलोच्या मूर्तीत प्राक्ऐतिहासिक वस्तूंचा अभ्यास करणाऱ्याला रस असतो तसाच काहींना जुन्या भाषांचा नाद असतो.

यावरून आधुनिक अभ्यासकाला प्राचीन भाषांत रस नाही असे नव्हे. पण त्याची भूमिका प्रामुख्याने तटस्थ वृत्तीच्या शास्त्राभ्यासकाची आहे. आजच्या भाषाविज्ञानाला भाषेच्या बोलण्यातील रूपात अधिक रहस्य. भाषा म्हणजे भाषण ऊर्फ बोलले जाणारे शब्द होय, हे तत्त्व आजच्या भाषाविज्ञानाने अगदी पक्के मानले आहे. तोच त्याच्या अभ्यासाचा पाया आहे.

भाषा ही माणसाची अशी वर्तणूक आहे की, तिच्यासंबंधी अनेक प्रकारची विधाने एक प्रकारच्या पद्धतशीरपणाने करता येतात. वर उल्लेखिलेल्या काही व्याख्यांवरून हे स्पष्ट होईल. इतर सामाजिक शास्त्रांशी तुलना करता भाषाव्यवहारात ज्या मानवी वर्तणुकीचे दर्शन घडते, त्याचे पद्धतशीर व्यवस्थापन अधिक यशस्वीपणाने करण्यात आले आहे. साहजिकपणे भाषेच्या ज्या अंगांच्या बाबतीत हे व्यवस्थापन अधिक शास्त्रशुद्ध व पद्धतशीरपणे शक्य होते त्याच अंगांवर आधुनिक भाषाविज्ञानाने अधिक भर दिला आहे. ते स्वाभाविक आहे. ही अंगे म्हणजे ध्वनिउच्चारणशास्त्र (फोनॉलॉजी) व व्याकरण (ग्रॅमर) ही होत. व्युत्पत्ती अगर अर्थविज्ञान या भाषेशी संबद्ध असणाऱ्या विषयांच्या बाबतीत शास्त्रशुद्ध व्यवस्थापन व पद्धती-अवलंबनास तेवढा अवसर नाही. त्यांचे मते ह्या भाषाविज्ञानांतर्गत असलेल्या उप-ज्ञानशाखा तशा अद्याप प्रायोगिक अवस्थेतच आहेत. जेथे अधिक शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ अवलोकन करून सर्वगामी निष्कर्ष काढता येतात, त्या ज्ञानशाखांबद्दल आधुनिक भाषाविज्ञानाला अधिक आस्था आहे. आणि व्युत्पत्तिशोधनाचे कार्य त्यांच्या दृष्टीने जुन्या वस्तूच्या संग्रहा–(ओल्ड क्युरिऑसिटी शॉप) सारखे वाटावे, असे त्यांचे आजपर्यंतचे कार्य आहे. नवीनांचे ह्या उप-ज्ञानशाखाविषयीचे हे मत चिंतनीय आहे.

अर्थात या ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की, भाषाविज्ञानाला भाषेचा कोणताही प्रवर्ग (कॅटॅगरी) हा असंशोध्य आहे असे नाही. भाषाविज्ञान ही एक

सर्जनशील अनुवृत्ती आहे. केवळ अवलोकननिष्ठ नव्हे. सतत होत असलेल्या भाषणातून भाषाशास्त्रज्ञ आपणास हवे असलेले अंश बरोबर निवडतो. त्याची साधनसामग्री ही त्यानेच निवडलेली असते. ती त्याला कोणीही दिलेली नसते. There are no facts in linguistics until the linguist has made them, they are ultimately like all scientific facts, the products of imagination and invention.[16] असे वुडजर याचे मत डब्ल्यू. सिडने अॅलन उद्धृत करतात. लिंग्विस्टिक्स आणि फिलॉलॉजी यांतील फरक स्पष्ट करताना डॉ. प्र. न. जोशी म्हणतात की, " फिलॉलॉजीमध्ये प्राचीन भाषा व लेखनपद्धती यांचा अभ्यास प्रामुख्याने अभिप्रेत आहे, तर लिंग्विस्टिक्समध्ये वर्तमान भाषा अथवा बोली यांचा अभ्यास अपेक्षित आहे. मुखावाटे उच्चारली जाणारी तत्कालीन भाषा हा लिंग्विस्टिक्सचा विषय आहे....भाषेच्या आदर्श स्वरूपाबद्दल चर्चा न करता लिंग्विस्टिक्स भाषेच्या यथातथ्य स्वरूपाबद्दल चर्चा करीत असते."[17] भाषेच्या ऐतिहासिक दृष्टीतून केल्या जाणाऱ्या अभ्यासाविरुद्ध 'लिंग्विस्टिक्स' ही एक प्रतिक्रिया आहे. " Linguistics is in fact primarily concerned with the non–historical ( synchronic ) study of language. "[18] हे मत लक्षांत ठेवणे अवश्य आहे.

: ७ :

आधुनिक भाषा-विज्ञानाची उभारणी सस्सूरच्या (ह्या विशेषनामाचा उच्चार कित्येक जण सस्सूरे असाही करतात) विचारातून झाली हे यापूर्वी पाहिले आहे. त्याने भाषाशास्त्राला तीन गोष्टी प्रदान केल्या. (१) भाषण व भाषा यामध्ये फरक करणे आवश्यक आहे, ह्या विचारास मान्यता मिळविणे. (२) समकालीन भाषा या पूर्वकालीन भाषांपेक्षा अधिक महत्त्वाच्या आहेत, हे त्याचे मत आजच्या भाषाविज्ञानाने जवळ जवळ मान्य केलेले आहे. (३) भाषिक चिन्हांची आवश्यकता त्याने प्रतिपादिली.

पूर्वकालीन (कालक्रमिक) भाषांपेक्षा समकालीन (एककालिक) भाषा महत्त्वाच्या मानल्या गेल्या तरी सर्वांचाच त्याला पाठिंबा आहे असे नाही. सस्सूरचे हे मत म्हणजे पूर्वकालीन भाषांच्या ग्रांथिक स्वरूपातील अभ्यासास जे अतिरिक्त महत्त्व दिले जात होते, त्याविरुद्ध सस्सूरची झालेली ही प्रतिक्रिया आहे, हे लक्षात ठेवणे अवश्य आहे.

स्वकालीन वा प्रचलित बोली स्वरूपातील भाषेला आजच्या भाषाविज्ञानात अधिक महत्त्व प्राप्त झाल्यामुळे ते वर्णनात्मक झाले आहे. त्यासाठी त्याने निर-

निराळी उपकरणे, आयुधे शोधून काढली आहेत. उच्चार केले जातात कसे व ऐकले जातात कसे, हे शारीरविज्ञानशास्त्राचे साहाय्य घेऊन निरनिराळ्या उपकरणांच्या साहाय्याने अवलोकनपूर्वक अभ्यासिले जाते. त्याप्रमाणे भाषा ही ध्वनिरूप असल्याने पदार्थविज्ञानातील ध्वनीच्या नियमनाचाही आधार त्याने घेतला आहे. त्यामुळेच आधुनिक भाषाविज्ञानाला स्वनिम (फोनीम) सारखा क्रांतिकारक शोध लावता आला.

सस्सूरने निर्माण केलेली ही भाषाशास्त्रीय अभ्यासाची पद्धती सपीर व ब्लूमफील्ड या दोन विख्यात भाषाकोविदांनी वाढीला लावली. शब्दस्वरूप, शब्दक्रम, ध्वनिआदेश प्रत्ययीकरण इ. आधुनिक संकल्पना मांडून काही नियम भाषाविज्ञानशास्त्रज्ञांनी तयार केले आहेत. ब्लूमफील्ड यांच्या प्रयत्नांनी भाषाभ्यासाला विज्ञानशास्त्राची प्रतिष्ठा प्राप्त झाली. भाषेची संरचनात्मक ( स्ट्रक्चरल् ) धारणा अभ्यासात महत्त्वाची आहे, हा विचार आजच्या भाषाविज्ञानाला सर्वमान्य झालेला आहे. त्यामुळे भाषेतील ध्वनींचा अभ्यास एक्स रे, स्पेक्टोग्राफ, पिच मीटर, स्पीच स्ट्रेचर इ. आधुनिक विज्ञानप्रणीत आयुधांच्या आधाराने केला जातो.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व त्यानंतर जगातील अनेकभाषी लोक एकत्र आले. त्यांना एकमेकांच्या भाषा शिकण्याची गरज निर्माण झाली व त्याप्रमाणे आधुनिक वैज्ञानिक आयुधांचा उपयोग करून अगदी नवी भाषा अल्प काळात शिकविण्याच्याही पद्धती अमेरिकन भाषाशास्त्रज्ञांनी शोधिल्या आहेत. अशा रीतीने आजचे भाषाशास्त्र निरनिराळ्या दिशांनी विकास पावत आहे. प्रयोगशीलता व वर्णनप्रधानता याबाबतीत अमेरिकेने बरीच प्रगती केली आहे. उलट ऐतिहासिक पद्धतीचा युरोपमधील भाषाशास्त्रावर खोल परिणाम झाला आहे. त्याचे एक प्रत्यंतर म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या कालात ब्रिटिश भाषावेत्त्यांनी इंग्रजीचे सर्वगम्य व मूलभूत महत्त्वाचे असे 'बेसिक इंग्रजी' हे भाषिक स्वरूप तयार केले हे होय.

भाषाविज्ञान हे पूर्वीच्या भाषाशास्त्रापेक्षा वेगळ्या पायावर आधारलेले आहे. पूर्वीचे भाषाशास्त्र हे 'शब्द' या घटकावर आधारलेले होते. हा भाषेचा अंतिम लघुघटक मानला जात असे. आजचे भाषाविज्ञान हे ध्वनिप्रधान आहे हे आपण पाहिले. पूर्वीच्या भाषाशास्त्रातील प्रमुख भाषणावयाचा अभ्यास नव्या दृष्टीने कसा केला जातो, हे पाहाणे अवश्य आहे. त्यादृष्टीने स्वनिम (फोनीम) पदिम (मॉर्फिम) वाक्यविचार व शब्दविकार (सिंटॅक्स) ह्या अंगांचा थोडा विचार करणे अवश्य आहे. आज भाषाविज्ञानाचे हे प्रमुख घटक मानले जातात. भाषाविज्ञानाची वाढ दोन दिशांनी होत आहे. भाषा ही सामान्यतः शब्दांची बनलेली

असते. सामान्यतः म्हणण्याचे कारण प्रत्येक भाषेत जे ध्वनिगट उच्चारांत असतात त्यांना शब्द ही संज्ञा लागू पडेलच असे नाही. उच्चार सामान्यतः स्वर, व्यंजने, ध्वनिविभाग (सिलॅबल्स) असे विभाजता येतात. परंतु सर्व भाषांना हे विभाजन लागू पडत नाही. कॉकेशस विभागातील भाषांचा अभ्यास केला असता असे आढळून आले आहे की, त्यांतील उच्चारांना हे विभाजन लागू पडत नाही.

भाषेच्या उच्चार-प्रक्रियेचे अधिकाधिक शास्त्रशुद्ध रीतीने अध्ययन व्हावे इकडे भाषाविज्ञानाचा रोख आहे. त्या दिशेने काही फार महत्त्वाचे शोध भाषाशास्त्रज्ञांनी अलिकडे लाविले आहेत, त्यांतला सर्वांत महत्त्वाचा विचार म्हणजे 'स्वनिम (फोनीम)' होय. याच्या आधारावर संरचनात्मक भाषाविज्ञान आधारलेले आहे. पदार्थविज्ञानशास्त्रात मोलिक्यूल किंवा अॅटम यांना जेवढे महत्त्व आहे, तेवढे महत्त्व आधुनिक भाषाशास्त्रात स्वनिम विचारास आहे. डार्विनच्या उत्क्रांतिवादामुळे ज्याप्रमाणे वनस्पती व प्राणिशास्त्रात क्रांती घडून आली त्याचप्रमाणे स्वनिम विचारानंतर भाषाविज्ञानाचे स्वरूप पूर्णतया बदलले आहे.

तसे म्हटले तर स्वनिम विचार पूर्णतया नवा नाही. प्राचीन भारतीयांच्या भाषाविचारात त्याला आधार आहे. परंतु त्याला शास्त्रीय महत्त्व अलिकडेच आलेले आहे. संस्कृत व्याकरणकार व आधुनिक भाषाशास्त्रज्ञ स्वनिम हा संबोध निरवयव मानतात. (स्वनिमामुळे दोन शब्द निरनिराळे राखले जातात.) त्यामुळे आधुनिक भाषावैज्ञानिक-पद्धतीचे स्वरूप थोडेफार सांप्रदायिक व्याकरणासारखे दिसते म्हणून डब्ल्यू. एस्. अॅलन यांनी ह्या पद्धतीचे वर्णन करताना असे उद्‌गार काढले आहेत की, "That we have come by devious and rather tedius ways to something looks like old grammar." [19] अर्थात हे ध्वनिशास्त्राला लागू पडत नाही. स्वनिमांचे आपल्याकडील अनेक व्यंजनांशी साम्य दिसेल पण स्वनिम हा एक संबोध आहे. तो तात्त्विक व पृथःकरणात्मक आहे. स्वनिमांचे मूल्य ते कोणत्या भाषेतील आहेत यावर अवलंबून राहणार. प्रत्येक भाषेत स्वनिम मोजकेच असतात. इंग्रजीत ४६, मराठीत ४५, फ्रेंच–जर्मनमध्ये ३६, सरासरीने ते ४५-५० च्या सुमारास असतात. अमेरिकन इंग्रजीत स्वनिमांची संख्या वेगळी आहे. संख्येने थोडे असले तरी ते निरनिराळ्या प्रकारे एकत्र येऊन हजारो पदिम तयार होतात. पदिमांमुळे शब्द व शब्दातर्फे अर्थ-निष्पत्ती होऊन भाषेतर्फे आपण आपले व्यवहार करू शकतो. अशा रीतीने स्वनिम विचाराच्या अभ्यासास भाषाविज्ञानात अधिक महत्त्व देणे अवश्य झाले आहे.

स्वनिमांप्रमाणे पदिम (मॉर्फीम) हा भाषाशास्त्राच्या अभ्यासात दुसरा महत्त्वाचा घटक होय. भाषेच्या उच्चार-प्रक्रियेत स्वनिमांचे जे स्थान आहे, ते तिच्या अर्थ-

प्रक्रियेत पदिमांचे आहे. पदिमांचा अभ्यास हा स्वतंत्र भाग आहे. स्वनिमांचे जसे स्वतंत्र असे फोनॉलॉजी हे शास्त्र निर्माण झाले तसे मॉर्फालॉजी हेही अभ्यासांग भाषाभ्यासात महत्त्वाचे आहे. पदिमांच्या आधारानेच भाषेचा रूपविचार विकसित झाला आहे. त्याशिवाय व्याकरण हा भाषाभ्यासाचा एक महत्त्वाचा विभाग आहे. पूर्वीपासून तसा व्याकरणाचा अभ्यास होत आला आहे. शब्दांच्या जाती त्यांचे वाक्यात स्थान, वाक्यविचार, शब्दघटना इ. विषय व्याकरणात येतात.

पूर्वीच्या व्याकरणात व आधुनिक व्याकरणात महत्त्वाचा फरक आहे. पूर्वीचे व्याकरण हे प्रामुख्याने ग्रांथिक भाषेवर आधारलेले असे. त्यामुळे त्यात शुद्धाशुद्धतेला महत्त्वाचे स्थान असे. ते केवळ शैक्षणिक (अॅकॅडेमिक) दृष्टीने शिकविले वा अभ्यासिले जाई. उदा० कित्येक वाक्यप्रकार, हे केवळ व्याकरणातच असत. प्रत्यक्ष भाषेच्या वापरात त्यांना स्थान नसे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे व्याकरण लिहिले व शिकवले जात असल्याने त्यात बिनचूक कसे लिहावे-बोलावे याचीच चर्चा असे. त्या दृष्टीने या व्याकरणास आज्ञापक (प्रिस्क्रिप्टिव्ह) व्याकरण असे म्हटले जाते. अलिकडच्या भाषाविज्ञानाचे अधिष्ठान मुळी बोली स्वरूपातील भाषेची रूपे पाहणे हे आहे. बोलीतील शब्दरूपे प्रमाण मानली जातात. बोली स्वरूपातील भाषा खूप विविधतेने भरलेली असते. म्हणजे बोली अनेक असतात व समाजातल्या निरनिराळ्या गटांत त्या वापरल्या जातात. अमुक एका बोलीतील अमुक वाक्प्रयोग वा शब्दांचा वापर बरोबर व दुसऱ्या एका बोलीतील चुकीचा, असे मानता येत नाही. त्यामुळे बोलीभाषेत सर्वच शब्दप्रयोग, वाक्प्रचार इ. बरोबरच असतात. त्याला चूक ठरविता येत नाही. म्हणून अलिकडे व्याकरणात व सर्वच भाषाभ्यासात वर्णनप्रधानतेला अधिक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे आजचे व्याकरण हे वर्णनप्रधान (डिस्क्रिप्टिव) आहे. नुसते व्याकरणच नव्हे तर आजचे सर्व भाषाविज्ञानच वर्णनप्रधान झाले आहे.

:८:

आधुनिक भाषाविज्ञानाचे हे स्वरूप पाहिल्यानंतर मूलभूत महत्त्वाचा असा एक प्रश्न निर्माण होतो की, वाङ्मयीन विद्वत्तेत या भाषाविज्ञानाचे स्थान कोणते? कारण भाषाविज्ञान ऊर्फ लिंग्विस्टिक्स हे एक स्वायत्त व स्वतंत्र शास्त्र अशा रीतीने निर्माण झाले आहे व अभिवर्धित होत आहे की, त्याचा वाङ्मयक्षेत्राशी संबंध जवळ जवळ तुटला आहे. विद्यापीठांनी त्या विषयाचे स्वतंत्र अभ्यासक्रम निर्माण

केलेले आहेत व काही विद्यापीठांनी तर त्याचा समावेश मानव्यशास्त्रांत (म्हणजे भाषाभ्यासशास्त्रांत) न करता सामाजिक शास्त्रांच्या कक्षेत केला आहे. त्याच्या अभ्यासाचा पसारा एवढा वाढत आहे की, ध्वनिउच्चारणशास्त्र (फोनेटिक्स), भाषावर्गीकरणशास्त्र (लिंग्विस्टिक टायपॉलॉजी), ध्वन्यत्मक चिन्हशास्त्र (ग्रॅसिमेटि्क्स), भू-भाषाशास्त्र (जिऑलिंग्विस्टिक्स), कार्योपयोगी भाषाशास्त्र- (अॅप्लाइड लिंग्विस्टिक्स) इत्यादी ज्ञानशाखा स्वतंत्र रीतीने उत्क्रांत झालेल्या असून त्यांचे मार्गक्रमण स्वतंत्रपणे सुरू झालेले आहे, त्यासाठी त्यांनी स्वतःची अनुशासने व परिभाषाही निर्माण केल्या आहेत. साहजिकच भाषाविज्ञानाचे वाङ्मयीन विद्वत्तेतील स्थान व स्वरूप कोणते याचे विवेचन करणे अवश्य झाले आहे.

अशा रीतीने भाषाविज्ञानाच्या अनेक शाखा स्वायत्त होऊन मार्गस्थ झालेल्या असल्या, आणि त्यांचा विकास यापुढे स्वतंत्र सामाजिक शास्त्रांच्या दिशेने आणि वैज्ञानिक शोधपद्धतीचा अवलंब करून होणार असला तरी, त्यामुळे भाषाविज्ञानाचा वाङ्मयीन विद्वत्तेशी असलेला संबंध दुरावला असे म्हणता येणार नाही. याची काही कारणे आहेत. एक असे की, वर उल्लेखिलेली विविध शास्त्रे पाहिली तर त्यांची वाटचाल शास्त्रांच्या पद्धतीने म्हणजे मनुष्यजीवननिरपेक्ष रीतीने होणार आहे हे खरे आहे. याचे कारण ती ती अंगे भाषेपासून थोडी वेगळी काढून (आयसोलेट करून) त्यांच्या विकासाचा परिशोध चालू करता येतो. वैज्ञानिक दृष्टीचा व पद्धतीचा जो सर्वत्र अवलंब चालू आहे, ते आजच्या ज्ञानयुगाचे वैशिष्टच आहे. प्रत्येक ज्ञानशाखेचे ते अंतिम उद्दिष्ट मानले जाते, त्यादृष्टीने ही वाटचाल होत आहे. ती प्रतिबंधित करण्याचे अगर थांबवण्याचे कारण नाही.

प्रश्न एवढाच आहे की, भाषेच्या किंवा मानवी बोलण्याच्या (ह्यूमन स्पीच) काही अंगांचाच अशा पद्धतीने अभ्यास करणे शक्य होणार आहे. उलटपक्षी भाषेची इतर अंगे अशी आहेत की, त्यांचा मनुष्याशी किंवा मानवी जीविताशी असलेला संबंध तोडताच येणार नाही. भाषेची आजची व्याख्या ध्वन्यत्मक चिन्हांची एक व्यवस्था अशी करता आली तरी, भाषेकडे पाहण्याच्या भाषा-वैज्ञानिक दृष्टीचे ते प्रतीक म्हणता येईल. पूर्वकालीन भाषेच्या व्याख्या ह्या आजच्या दृष्टीने अस्वीकार्य ठरविता आल्या, तरी त्यांतून व्यक्त होत असलेल्या दृष्टिकोणातून भाषेचा अभ्यास करणे चूक आहे असे नव्हे. उदाहरणार्थ ब्लूमफील्ड- यांच्या बरोबरीने भाषाविज्ञानातील नवपरिवर्तनाचा प्रणेता सपीर याची भाषेबाबतची व्याख्या अशी आहे—" Language is a purely human and non-instinctive method, of communicating *ideas*, *emotions* and *desires* by means of a system of voluntarily produced symbols."[20] ही व्याख्या सर्वसामान्य अभ्यासकाला मान्य होण्यासारखी आहे. परंतु ब्लूमफील्डसारख्यांना

त्या व्याख्येतील ideas, emotions, desires आणि कदाचित voluntarily हे शब्द आवडणार नाहीत. त्यांचे काय म्हणणे असेल हे स्पष्ट करताना जॉन सी. गायलार्ड म्हणतात की, " To them linguistics in an exact science, or should be; since the activities of mind are inaccessible to objective observations, they prefer to exclude it from statements." [21]

स्वत: ब्लूमफील्ड भाषेची जीववास्तव-वैज्ञानिक (बायोफिजिकल) आणि जीव-सामाजिक (बायोसोशल) अशी दोन अंगे मानतात. पहिल्यात घशातील ध्वनि-यंत्रणेच्या द्वारे काढल्या जाणाऱ्या उच्चारांचा (ध्वनिविशेषांचा) समावेश होतो. तर दुसऱ्यात ज्या समाजगटात व्यक्ती वाढली असेल, त्या समाजगटाने दिलेल्या सामाजिक संकेतांचा, आशयाचा, विचारांचा इ. समावेश होतो. पहिल्या अंगाला यंत्रवादी भाषावैज्ञानिक संप्रदाय (मेकॅनिस्ट स्कूल ऑफ लिंग्विस्टिक्स) असे म्हटले जाते. ह्या अंगाचा विकास होऊनच वर उल्लेखिलेल्या निरनिराळ्या ज्ञानशाखा स्वतंत्ररीत्या अस्तित्वात येऊन विकसित झाल्या आहेत.

परंतु भाषेचे वर उल्लेखिलेले जे सामाजिक, सांस्कृतिक अंग आहे, त्याचा अभ्यास वाङ्मयाभ्यासाच्या संगतीनेच होणे अपरिहार्य आहे. या दृष्टीने त्याचा वाङ्मयीन विद्वत्तेशी संबंध आहे. भाषेच्या ह्या अंगाशी संबद्ध असणाऱ्या अनेक ज्ञानशाखा आहेत. त्यांचा अभ्यास वा विकास वाङ्मयाभ्यासाच्या धर्तीवर आणि आधाराने होत आलेला आहे व पुढे होत राहणे केवळ अपरिहार्य आहे. कारण भाषा ही सांस्कृतिक ज्ञानविषयक, जीवनांगांचे नुसते माध्यम नाही, तर मानदंड आहे. तत्त्वज्ञान आणि समीक्षा यासारख्या तर्कप्रधान व काही अंशी सृजनप्रधान ज्ञानक्षेत्रांतही भाषाविज्ञानाचे महत्त्व मान्य झाले असून त्या प्रकारचे संप्रदाय त्या त्या ज्ञानशाखांत निर्माण झालेले आहेत. त्याचप्रमाणे आत्मा-विष्काराचे व जीवनानुभवांच्या आदानप्रदानाचे ते महत्त्वाचे साधनच आहे, असे नव्हे तर त्याच्याशी ते अविभाज्यपणे एकरूप झालेले आहे.

आजचे भाषाविज्ञानशास्त्रज्ञ भाषेची ही अंगे दुय्यम महत्त्वाची मानीत असतात. त्यांच्या दृष्टीने भाषा ही नुसती भाषाच आहे, म्हणजे कशाचे ते वाहन नाही; तर मनुष्याच्या केवळ भाषिक गरजेतून ती निर्माण झाली आहे. अशी भूमिका घेतल्याने त्यांना भाषा तिच्या इतर मनोभावनात्मक, सामाजिक, सांस्कृतिक अंगोपांगांपासून अलग करता आली व तिचे स्वत:चे असे विज्ञान सिद्ध करता आले. त्याला विरोध असण्याचे काहीच कारण नाही. परंतु वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने महत्त्वाची अशी भाषेची जी अंगे आहेत ती तेवढीच विचारार्ह आहेत, त्यांचा अभ्यास आताच पाहिल्याप्रमाणे वाङ्मयाच्या व रोजच्या व्यवहारातील भाषेच्या आधारानेच केला जाणार आहे व होणार आहे. तो

इतर कोणत्याच ज्ञानक्षेत्राशी संबद्ध करून करता येणार नाही, आणि वाङ्मयीन अभ्यासाशी त्याचे इतके जवळचे नाते आहे की, कित्येक ठिकाणी त्याचा तो गाभाही बनलेला आहे. अशा समाज, संस्कृतीशी संबद्ध व महत्त्वाच्या भाषांगांचा या संबंधात विचार करणे अवश्य आहे.

: ९ :

भाषाक्षेत्राचे वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने विवेचन करण्यासाठी काही विशिष्ट अभ्यासक्षेत्रांचा विचार करणे अवश्य आहे. त्या दृष्टीने भाषाभ्यासाशी संबंध असणारी महत्त्वाची ज्ञानशाखा म्हणजे शब्दार्थविज्ञान (सिमँटिक्स) होय. ऑगडेन व रिचर्डस् यांच्या ' मीनिंग ऑफ मीनिंग ' या पुस्तकाने ह्या विषयाचे नवेच दालन खुले झाले. भाषेचा पृथःकरणपूर्वक अभ्यास करून शब्दार्थाकडे कसे पाहावयास हवे, याचा एक नवा प्रत्यय या प्रख्यात पुस्तकाने आणून दिला. प्रत्येक भाषेत शब्दांचे अर्थ बदलत आलेले आहेत. ब्राएल या भाषाशास्त्रज्ञाचे मते शब्दार्थात जो बदल होतो त्याचे मूळ माणसाच्या मनात व वृत्तीत आहे. भाषा हा मानवी वर्तणुकीचाच एक आविष्कार असल्याने, तिच्यातील अर्थविषयक बदल हे माणसाच्या विशिष्ट वृत्तीतून निर्माण होतात, त्यांना स्थिरत्व लाभते व त्यांच्यात बदल होतो. जाणीवपूर्वक इच्छाशक्तीमुळे त्याची वर्तणूक डोळसपणे, विशिष्ट सामाजिक उद्दिष्ट पार पाडण्याच्या दिशेने कार्यवाही झालेली असते. शब्द हा एखाद्या वारांगनेप्रमाणे नैतिकदृष्टचा अधःपतित होत नाही. त्याच्या अर्थातील बदल हा नम्रता, सभ्यता या गुणांचे अवलंबन करावे, ह्या मानवी हेतूने निर्माण झालेला असतो. गुस्टाफ स्टर्न यांनी आपल्या ' मीनिंग अँड चेंज ऑफ मीनिंग ' या पुस्तकाच्या द्वारे शब्दार्थ विज्ञानशास्त्राला भाषेच्या सर्वसाधारण तत्त्वमीमांसेत स्थान प्राप्त करून दिले आहे. अर्थविषयक बदल हा निरनिराळ्या आठ प्रकारच्या भाषिक व अंतर्गत कारणांनी होतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

अशा रीतीने वाङ्मयीन उद्दिष्टांनी प्रेरित झालेल्या भाषाभ्यासकास या क्षेत्रात संशोधनास भरपूर अवसर आहे. व्युत्पत्तिशास्त्रज्ञांनी प्रत्येक शब्दाचा इतिहास स्वतंत्र रीतीने व इतर शब्दांच्या संदर्भाने अभ्यासणे व शोधणे आवश्यक आहे, हे पूर्वीच दाखवून दिले आहे. हे जितके शब्दाच्या रूपाविषयी व उच्चारां-विषयी शक्य आहे तसे अर्थाविषयीही. साहजिकपणे भाषाविज्ञानाची ही शाखा वाङ्मयीन विद्वत्तेच्या आधारेच अभिवृद्ध होत राहाणार. परंतु आजच्या वर्णनप्रधान भाषाविज्ञानाच्या युगात शब्दार्थाकडे इतक्या अधिक्षेपाने पाहिले जाते की, एका अभ्यासकाने शब्दार्थ (मीनिंग) हा एक 'अप्रशस्त शब्द ' (डर्टी वर्ड) आहे, असे

उद्गार काढलेले आहेत. शब्दार्थाविषयीची ही तिरस्काराची भूमिका ब्रिटिश भाषाकोविदांना मान्य नाही. डब्ल्यू. सिडने अॅलन हे आपली नापसंती व्यक्त करताना म्हणतात : " And surely without meaning linguistics cannot exist."[22]

ऐकांतिक दृष्टीने भाषाभ्यास करणाऱ्याला जरी ही ज्ञानशाखा अडचणीची वाटली तरी, वाङमयाभ्यासकाला तसे वाटण्याचे कारण नाही. या ज्ञानशाखेचा अभ्यास भौतिक शास्त्रांच्या दिशेने करता येत नाही, ही भाषाविज्ञान-शास्त्रज्ञांची खरी अडचण आहे. पण वाङमयीन दृष्टीने व विद्वत्तेचे परिक्षेत्र या दृष्टीने भाषेकडे पाहणाऱ्याला तसे वाटण्याचे कारण नाही. भाषाभ्यासाचा 'अर्थविज्ञान' हा एक लक्षणीय पैलू आहे. आणि इतर संबंधी शास्त्रांच्या अनुशासनांचा (डिसिप्लीन्स) अवलंब करून व भाषेला मध्यवर्ती कल्पून ह्या शास्त्राचा अभ्यास होणे शक्य आहे. ते क्षेत्र अद्याप मोकळे आहे. शब्द हे प्रतीकात्मक आविष्कारण आहे. आणि त्यादृष्टीने समाजाच्या सांस्कृतिक जीवनातील विविध प्रतीकांच्या आधाराने भाषेच्या या अंगाचा अभ्यास होण्यास उदंड अवसर आहे. ऑगडेन व रिचर्डस् यांच्या मागे उल्लेखिलेल्या 'मीनिंग ऑफ मीनिंग' या प्रसिद्ध क्रांतिकारक ग्रंथाने ह्या दिशेने प्रयत्न होणे कसे आवश्यक आहे हे दाखवून दिले आहे. भाषाभ्यासक शब्दार्थविज्ञान भाषेच्या अभ्यासाशी गैरलागू आहेत असे मानीत नाहीत. ह्या विज्ञानशाखेतील निष्कर्ष वैज्ञानिक शास्त्रातील निष्कर्षासारखे निरपवाद न मानता मानव्यशास्त्रातील निष्कर्षासारखे विशिष्ट मर्यादेत प्रमाणभूत मानावयास हरकत नाही, एवढेच त्यांचे म्हणणे आहे.

मार्क ब्लॉक हे भाषाशास्त्रज्ञ मानवी शरीराच्या ज्याप्रमाणे अभिसरण, पचन, मज्जातंतू इ. संस्था आहेत, त्याप्रमाणे भाषेच्याही चार पाच संस्था मानतात. फोनेटिक सिस्टीम ऊर्फ उच्चार-संस्था, मॉर्फिक सिस्टीम उर्फ रूपसंस्था, ग्रॅमॅटिक सिस्टीम ऊर्फ व्याकरणसंस्था आणि सिमॅंटिकल सिस्टीम ऊर्फ शब्दार्थ-संस्था ह्या प्रमुख होत. ह्या एकमेकांत गुंतल्या गेलेल्या संस्थांत एकप्रकारचे उच्च व्यवस्थापन, परस्पर-संबद्धता आणि आकृतिवैशिष्टच दिसते. त्या सर्वांत सावकाश असा बदल होत असतो व तो इतरांपासून निरपेक्ष असतो. त्या सर्वांची धारणा निरनिराळ्या मूलद्रव्यांची झाली आहे, आणि त्या दृष्टीने त्यांची तुलना पदार्थविज्ञानातील अणुसंघटनेशी करता येईल. या विवेचनावरून शब्दार्थविज्ञानासारखी ज्ञानशाखा वाङमयीन व भाषाभ्यासकाला कशी मुक्त आहे हे स्पष्ट होईल.

शब्दार्थ-विज्ञानासारखी दुसरी शाखा म्हणजे व्युत्पत्तिशास्त्राची होय. नवे भाषाकोविद या शाखेकडे ओल्ड क्यूरिऑसिटी शॉप वा 'जुन्यापुराण्या वस्तूंचा संग्रह' या दृष्टीने कसे उपहासात्मक रीतीने पाहतात याचा उल्लेख यापूर्वी आलेला आहे वास्तविक शब्दव्युत्पत्तीकडे एवढ्या उपेक्षेने पाहणे बरोबर नाही. पूर्वकालीनांनी या शास्त्रात केलेली प्रगती कित्येक ठिकाणी बरवरची असेल, पण

एकोणीसाव्या शतकात तुलनात्मक भाषाशास्त्र व व्युत्पत्तिशास्त्र यांची प्रगल्भ अनुशासने निर्माण झाल्यामुळेच आजचे परिपूर्ण शब्दकोश सिद्ध झालेले आहेत, हे लक्षात घेणे जरूर आहे. या क्षेत्रात वस्तुनिष्ठता, तर्कशुद्धता, सूक्ष्म व तेवढेच व्यापक अवलोकन, कमालीची साशंकता, पूर्वग्रहरहितता इ. शास्त्रीय पद्धतीशी संबद्ध असणाऱ्या गुणांचा आग्रह आपण धरू शकतो. म्हणजे या ज्ञानशाखेत वा या क्षेत्रात या गुणांना वावच नाही, असे म्हणणे बरोबर नाही. वर एके ठिकाणी डब्ल्यू. सिडने ॲलन या भाषाकोविदाचे 'भाषाविज्ञान हे एक सर्जनशील शास्त्र आहे' असे मत उद्धृत केले आहे. या सर्जनशीलतेला या क्षेत्रात अवसर आहे, असे म्हणणे चूक होणार नाही.

शास्त्रशुद्ध व्युत्पत्ती हे अतिशय कार्यक्षम असे उपकरण असून ते शब्दाविषयीच्या इतर सर्व प्रकारच्या अभ्यासाला एक प्रकारची विश्वसनीयता आणते. भाषावैज्ञानिकक्षेत्रातील भरीव कामगिरीचे प्रत्ययकारी दिग्दर्शन व्युत्पत्तिशास्त्र-क्षेत्राइतके दुसऱ्या कोणत्याच भाषाभ्यासांगातून होत नाही. एकोणीसाव्या शतकापूर्वी या ज्ञानशाखेची जाणीव नव्हती. काहीजण एखादी ओबडधोबड तत्त्वपरंपरा मानून अनमानाने व्युत्पत्ती सांगत. परंतु भाषाविज्ञानाची पद्धतशीर पायाभरणी झाल्यानंतर या प्रकारांना आळा बसला. ध्वनिस्वरूपातील साधनसामग्री ही एक अत्यावश्यक बाब मानली गेली. तिने याबाबतचे मार्गदर्शन करण्याचे व स्वैर कल्पनाविलासाला प्रतिबंध घालण्याचे दुहेरी काम केले. शब्दांचे जे निरनिराळे मूलस्रोत असतात त्यांचे मोठ्या बारकाईने अवलोकन केले जाते. एखादा रसायनतज्ज्ञ (केमिस्ट) जसे त्याच्यापुढील द्रावणांचे परीक्षण करतो, तशी त्यांची छाननी केली जाते. साक्षेपी चिकित्सकवृत्तीच्या व व्यापक आणि विविध विषयांत रस घेणाऱ्या भाषाभ्यासकाला हे फार चांगले क्षेत्र उपलब्ध आहे. शब्दसंपत्तीचा इतिहास म्हणजे संस्कृतीचा इतिहास होय. संस्कृतिशोधाची इतर सारी साधने कालाबरोबर कमीअधिक प्रमाणात शबलित होतात, पण प्रत्यक्ष रीतीने नमूद झालेले शब्द हे विश्वसनीय मानावे लागतात. त्यांच्या पायावर आपण ठाम उभे राहू शकतो.

कोणत्याही भाषेतील शब्दसृष्टीत जे बदल झालेले दिसतात, त्यांचे त्या भाषिकांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील स्थित्यंतरांशी जवळचे नाते असते. त्यायोगेच समाजातील निरनिराळे थर निरनिराळ्या व्यवसायांतील वा निरनिराळ्या प्रकारचे शब्द कसे आणतात ते स्पष्ट होते. शब्दांच्या देवघेवीचा अभ्यास हा भाषाभ्यासाचा फार मोठा विभाग आहे.

भाषाभ्यासाच्या आणखी एका क्षेत्राकडे लक्ष वेधणे अवश्य आहे. ते क्षेत्र म्हणजे व्याकरणाचे होय. व्याकरणाच्या क्षेत्रास वास्तविक प्रदीर्घ परंपरा आहे. व आपल्याकडे तसेच पाश्चात्त्य राष्ट्रांत भाषाभ्यासास सुरवात व्याकरणाने झालेली

आहे. व्याकरण हे पूर्वी आज्ञाकारक (प्रिस्क्रिप्टिव्ह) शास्त्र होते. शुद्ध कसे बोलावे व लिहावे हे व्याकरण शिकविण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. ग्रीक विचारवंत तर व्याकरण हे तर्कशास्त्राचे एक साधन मानीत (किंवा तर्कशास्त्र हे व्याकरणाचे अंग मानीत).* व्याकरणाचा अशा रीतीने विचारक्रियेशी संबंध जोडल्यामुळे त्यातील बिनचूकपणास व बरोबरपणास एक प्रकारचे वैचारिक महत्त्व प्राप्त झाले. व्याकरणाकडे पाहण्याची दृष्टी अलिकडे बदललेली आहे. ते पूर्वीप्रमाणे आज्ञा-प्रधान न राहता आजच्या भाषाविज्ञानाच्या प्रवृत्तीशी मिळतेजुळते असे म्हणजे वर्णनप्रधान झालेले आहे. त्या दृष्टीने त्याचा अभ्यास होत आहे.

कित्येकजण मानतात तशी व्याकरणाची अनावश्यकता आहे असे नव्हे. कारण शेवटी भाषेला जी कालाची बंधने तोडता येतात ती व्याकरणामुळे होय. एका पिढीची भाषा दुसऱ्या पिढीला तेवढ्याच बिनचूकपणे समजते हे सर्व व्याकरणानेच शक्य झाले आहे. पाणिनीने संस्कृत भाषा व्याकरणबद्ध केल्यामुळेच तिची अर्थवाहकता आजपर्यंत टिकली आहे. अर्थात् आज भाषाशास्त्राच्या क्षेत्रात एवढे नवे नवे विचार, संकल्पना येत आहेत की, व्याकरणविषयक कल्पना बदलली आहे. वाक्याचे निरनिराळे घटक, शब्दांच्या जाती इ. ना आज तेवढे महत्त्व दिले जात नाही. भाषाशास्त्रांतर्गत ध्वनिशास्त्राचा (फोनेटिक्स) विकास एवढा झाला आहे की, इंग्रजी भाषेत ध्वन्याधिष्ठित व्याकरण (फोनेटिक ग्रॅमर) निर्माण झालेले आहे व प्रत्येक भाषेत तसे निर्माण होणे शक्य आहे. त्या दृष्टीने निर-निराळ्या भाषांची व्याकरणे नव्या दिशेने लिहिण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या व्याकरणकाराला भाषाशास्त्राच्या आधुनिक स्वरूपाचा चांगलाच अभ्यास करावा लागेल. ह्या दृष्टीने वाङ्मयीन विद्वत्तेची ती एक महत्त्वाची ज्ञानशाखा विकसित करावी लागेल. मराठीमध्ये तर साध्या प्रमाणभूत व्याकरणाचीही नितांत जरूरी आहे.

इतर क्षेत्रीय भाषेप्रमाणे वाङ्मयीन क्षेत्रात व विशेषत: ललितवाङ्मयाच्या क्षेत्रात भाषेला विशेष महत्त्व आहे. भाषा हे ललितवाङ्मयाचे मूलद्रव्य आहे. त्यात योजिलेली शब्दरचना अर्थपूर्ण (सिग्निफिकंट) असते. ललितवाङ्मयाची भाषा ही व्यवहारातील भाषा असल्याने व तिचे संकेत नियम ती पाळीत असल्याने तिचे वेगळेपण चटकन लक्षात येत नाही. पण ह्या ठिकाणी तिला वेगळाच आकार आलेला असतो. शब्दांना या ठिकाणी स्वतंत्र असे महत्त्व प्राप्त झालेले असते. येथे शब्द हे व्यवहारातील भाषेप्रमाणे अर्थ व्यक्त करतातच, पण ते अर्थ

* आधुनिक मानसशास्त्राच्या उदयानंतर तर्कशास्त्र हे मानसशास्त्रात समाविष्ट झाले. तत्पूर्वी त्याचा संबंध भाषाभ्यासाशी जोडला जात असे.

एका दृष्टीने अनुषंगाने आलेले असतात. कारण केवळ ज्ञानात्मक (कॉग्निटिव) माहिती देणे हे या ठिकाणी महत्त्वाचे नसते. ज्ञानात्मक माहिती असली, तरी ती कित्येकदा प्रतीकात्मक असते. शब्दांचा वापर हाही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण व असाच प्रतीकात्मक असतो. त्या प्रतीकात्मकतेमुळे ही भाषा केवळ ज्ञानदान वा भावनाभिव्यक्तीपाशी न थांबता त्यांच्या पलीकडे असणाऱ्या मूल्यांच्या जगापर्यंत माणसाचा संबंध पोहोचविते, व विशिष्ट निर्देशातील व्यक्ति-सापेक्ष भाग घालविते आणि एकप्रकारे सर्वांना आकलन होईल, आस्वाद्य होईल, असे स्वरूप शब्दांना प्राप्त करून देते. लेखक ह्या ठिकाणी शब्दाचा वापर करताना त्याच्या ठिकाणी सर्जनशीलतेला प्रमाण मानीत असतो आणि तिच्या दृष्टीने शब्दांच्या विविध अंगोपांगांची पारख करून ते त्याच्याकडून वापरले जात असतात.

या वस्तुस्थितीला आज सर्वमान्यता प्राप्त झाल्यानेच समीक्षेच्या क्षेत्रात शब्दार्थज्ञान-प्रधान-समीक्षा (सीमँटिक क्रिटिसिझम) अस्तित्वात आली आहे. या समीक्षाशाखेचा पाया भाषाविज्ञान हा आहे. भाषेचे वाङ्मयीन विद्वत्तेला जवळचे असणारे हे परिक्षेत्र आहे. अर्थात् हा ' भाषाभ्यास ' समीक्षेच्या क्षेत्रात समाविष्ट करावयाचा की भाषाभ्यासाच्या, हा प्रश्न येथे निर्माण होणे शक्य आहे. काटेकोरपणे म्हणायचे तर ह्या दोन विद्याशाखांच्या सीमारेषेवर ही ज्ञानशाखा पडेल, कारण ह्या ज्ञानशाखेत भाषाविज्ञान व समीक्षा या दोन्ही क्षेत्रांना मान्य असणाऱ्या अनुशासनाचा वापर करावा लागेल. वाङ्मयीन विद्वत्तेच्या कोणत्या परिक्षेत्रात ह्या भूमिकेवरून केलेला भाषाभ्यास घालावयाचा याबाबत जरी मतभेद होण्यासारखे असले, तरी वाङ्मयीन विद्वत्तेचे हे एक अंग आहे ही गोष्ट अविवाद्य आहे.

## : १० :

भाषाभ्यासाला अलिकडे आणखी एक वेगळेच परिमाण लाभलेले आहे. भाषाशास्त्राचा जो स्वतंत्र रीतीने विकास होत आहे, तो प्रायः सामाजिकशास्त्र म्हणून. पण त्याही पलिकडे जाऊन भौतिकशास्त्रांच्या साहाय्याने व दिशेने भाषाभ्यासाच्या काही ज्ञानशाखा विकसित होत आहेत हे आपण पाहिले. त्यात पदार्थविज्ञान व गणित या शास्त्रांच्या पद्धती भाषाविज्ञानाने स्वीकारावयास हव्यात, असा काहींचा आग्रह आहे. भाषाशास्त्र हा गणिताचाच एक विभाग म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न चालू आहे. या विषयावर आपले विचार मांडताना डब्ल्यू. एस्. ॲलन म्हणतात, " I should not wish to trace the idea of linguistics as a branch of mathematics – although its effective operation certainly

demands the use of quasi-algebriac modes of expression and it is likely that some future developments will require an understanding of statistical technique."[23] ज्यांचे मन गणितशास्त्रात रमते त्यांना भाषाविज्ञान जवळचे वाटेल. कारण तत्त्वज्ञानाचा व गणिताचा संबंध अत्यंत जवळचा आहे हे सर्वश्रुत आहे. काही भाषाशास्त्रज्ञही त्याच मताचे आहेत. जोसेफ राईट यांचे मत असे आहे की, Everybody who would be a philologist must have done mathematics or be capable of mathematics.[24] प्रसिद्ध संस्कृत व्याकरणकार पाणिनी याने भाषाशास्त्रीय चर्चेत शून्य ह्या संकल्पनेचा वापर केलेला आहे. त्याच्यानंतर कितीतरी दिवसांनी ती कल्पना गणितशास्त्राने मान्य केलेली आहे, ह्या वस्तुस्थितीकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

वर उल्लेखिलेली ग्लॉसिमिटिक्स ही ज्ञानशाखा भाषेचा ह्या दृष्टीने विचार करते. भाषा ही ध्वनिरूप आहे, हे लक्षात घेऊन अर्थाचा विचार न करता भाषेचा अभ्यास करता आला पाहिजे, भाषिक वर्णन म्हणजे भाषेतील विविध घटकांचे एकमेकांशी असलेले संबंध व्यक्त करणे हे होय. एवढ्यापुरताच भाषेचा अभ्यास मर्यादित हवा. विशिष्ट ध्वनी आणि भाषेचे उद्दिष्ट अर्थ यांचा समावेश या अभ्यासात करण्याचे कारण नाही. अशी या विचारसरणीची भूमिका आहे. भाषेचा अशा प्रकारचा रूपनिष्ठ दृष्टिकोन अनेक तत्त्वज्ञांनी स्वीकारलेला आहे. यावरून भाषाविज्ञानाचा अभ्यास आज किती विविध दिशांनी होत आहे हे स्पष्ट होईल.

भाषेकडे पाहण्याचे इतके विविध दृष्टिकोन स्वीकारले जातात, अभ्यासाच्या एवढ्या विविध पद्धतींचा स्वीकार केलेला असतो की, कित्येकदा दोन पद्धतींत जमीन-अस्मानाचा फरक असतो. आज भाषेच्या धारणेसंबंधी सर्वांत महत्त्वाची कल्पना म्हणजे भाषा ही संरचना आहे, ही होय. या दृष्टिकोनाप्रमाणे भाषेत शब्द माळेच्या मण्याप्रमाणे येत नसतात, तर ती एक जटिल व संरचनाबद्ध पद्धती (स्ट्रक्चर) आहे. शब्दांचे विश्लेषण करता येते, ते करताना अर्थाचा अवलंब करावा लागत नाही. भाषेचे विश्लेषण केवळ भाषिक कसोट्यांनी व्हावयास हवे, भाषाबाह्य कसोट्या स्वीकारणे योग्य नव्हे, असा आग्रह धरला जातो. मागे आलेल्या स्वनिम या विचारावर ह्या संरचनात्मक भाषाशास्त्राची उभारणी झालेली आहे. भाषिक कसोट्या बाळगून जे विश्लेषण केले जाते, त्याने उपलब्ध झालेल्या घटकांना स्वतःचा काही अर्थ नसतो किंवा मूल्य नसते, पण भाषारचनेच्या अनुषंगाने त्याचा भाषेत उपयोग होऊ लागला म्हणजे त्यांना आपोआप अर्थ प्राप्त होतो, मूल्य प्राप्त होते, असा हा दृष्टिकोण आहे.

भाषेच्या संकेतीकरणाने स्वनिमांना अर्थ प्राप्त होतो. भाषा ही दळणवळणाचे साधन आहे. तीतील व्यवहार संकेतांमुळे सिद्धीस जातात. कोणते संकेत व

किती मानावयाचे यावर बंधन नाही. अशा तऱ्हेची भाषेची चिकित्सा आपणास भाषेच्या प्रकृतीची नीट कल्पना देते. आजचे भाषाशास्त्र भाषेची ही संरचनात्मक धारणा प्रमाण मानते. या संरचनात्मक भाषाशास्त्रासच कित्येकजण वर्णनात्मक भाषाशास्त्र अशी संज्ञा देतात. अर्थात् आग्रही लोक आहेत ते भाषाशास्त्राच्या अभ्यासाची एवढीच शाखा प्रमाण मानतात. भाषेचे इतर दृष्टीने केलेले अभ्यास हे केवळ गैरलागू आहेत असे ह्या आग्रही लोकांचे मत आहे. या आग्रही वृत्ती-विरुद्ध प्रा. गजेंद्रगडकर यांनी आपल्या पुस्तकात असा स्पष्ट इशारा दिला आहे की, "ही उच्चभ्रू प्रवृत्ती, हा अहंगंड नुसता अशास्त्रीय नाही तर खात्रीने हानिकारक आहे. संरचनात्मक भाषाशास्त्राचा विकास होण्याच्या फार आधीपासून ऐतिहासिक दृष्टीने भाषेचा अभ्यास चालू होता, त्याचा भाषेच्या अभ्यासास खास फार फायदा झालेला आहे. या पूर्वसूरींचे आपण खात्रीने ऋणी आहोत."[25] भाषाशास्त्राच्या त्या प्रगतीमुळेच विसाव्या शतकात संरचनात्मक भाषाशास्त्रास चालना मिळाली आहे. भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोण काटेकोरपणे नियमबद्ध झाला आहे, हे मान्य करूनही ऐतिहासिक पद्धतीच्या भाषाभ्यासाचे महत्त्व मान्य करावे लागते.

अशा रीतीने भाषेचा अभ्यास तिचे स्वतंत्र व स्वायत्त शास्त्र कल्पून होत आहे व त्यात उदंड प्रगतीही झालेली आहे. भाषेतील शब्द, शब्दसंदर्भ, वाक्यरचना, व्याकरण या सर्वच अंगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पार बदलला आहे व त्यांच्या अभ्यासाच्या पृथःकरणाच्या नव्या नव्या व निरनिराळ्या पद्धती साकार होत आहेत. काहींच्या बाबतींत तर विज्ञानाने सिद्ध केलेली अत्याधुनिक आयुधे वापरली जात आहेत. उदाहरणार्थ, विशिष्ट भाषेतील विशिष्ट उच्चार करताना मुखाच्या अंत-रंगातील विविध घटकावयवांत कोणती हालचाल होते व ध्वनिनिर्मितीचे काम कसे चालते, हे एक्स-रेसारख्या व मागे उल्लेखिलेल्या इतर साधनांचा वापर करून अभ्यासिले वा परीक्षिले जाते व त्यामुळे उच्चार तंतोतंत रीतीने व सुलभ रीतीने शिकता येतात, असे आढळून आलेले आहे. गणित व संख्याशास्त्रीय पद्धतींचा अवलंब वर्ज्य मानला जात नाही, हा उल्लेख वर आलेलाच आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालात अमेरिकेचा जगातील अनेक भाषिकांशी संबंध आला. त्यांच्या भाषा शिकण्याची व आत्मसात करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी भाषाविज्ञानाचे साहाय्य घेण्यात आले व त्यातून सुलभ रीतीने व सत्वर भाषा शिकण्याची नवी नवी तंत्रे अमेरिकन भाषाशास्त्रज्ञांनी शोधून काढली. काही थोड्या आठवड्यांतच परकी भाषा शिकता येतात असे आढळून आले आहे. युरोप-खंडामध्ये तेच चालू आहे. पण दोघांच्या पद्धतीत, दृष्टिकोनात फरक आहे. तेथे भाषाशास्त्राच्या मूलभूत सिद्धान्ताची तात्त्विक चिकित्सा केली जाते. ऐतिहासिक व तुलनात्मकतेकडे युरोपीयांचा अधिक कल आहे, तर वर्णनात्मक भाषाशास्त्राकडे

अमेरिकेतील शास्त्रज्ञांचा ओढा आहे. अर्थात् त्यांची पद्धती तेवढीच महत्त्वाची व शास्त्रशुद्ध आहे. म्हणजे त्यांनी घातलेली भर तेवढीच मोलाची आहे.

भाषाविज्ञान अशा रीतीने स्वतंत्र रीतीने विकसित होत आहे. तर दुसऱ्या दृष्टीने प्रत्येक ज्ञानशाखेची व शास्त्राची भाषा अधिकाधिक तर्कशुद्ध व शास्त्रपुनीत होत आहे. कित्येकांचा असा समज आहे की तर्कशास्त्राचा मानसिक वा बौद्धिक कार्यपद्धतीशी (ऑपरेशन) घनिष्ठ संबंध आहे. पण आजकाल हे मानले जात नाही. " Every specialist science has developed its own way of correct 'thinking', this it has done by systimatically adopting language or inventing 'ad hoc' languages, to do its own special work, with careful control as the work developed." [26] असे एक प्रभावी आधुनिक मत आहे, त्यामुळे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही एक स्वतंत्र असा भाषिक विचारांना प्राधान्य देणारा संप्रदाय वाढत आहे. कार्नॅप हा भौतिकीप्रधान भाषाशास्त्राचा पुरस्कर्ता म्हणतो की " The philosophy of a science is the systematic analysis of the language of that science."[27] त्याच्या मते पदार्थविज्ञान हे महत्त्वाचे शास्त्र व त्याची भाषा ही सर्व शास्त्रांना प्रमाण मानावी लागेल, तसेच निरनिराळ्या शास्त्रांतील वापरल्या जाणाऱ्या भाषांतून एक जगाची भाषा निर्माण होईल.

अशा रीतीने भाषाविज्ञान हे आज अनेक दिशांनी विकसित होत आहे. भाषेचा संबंध सर्व ज्ञानशाखांशी येत असल्याने प्रत्येक ज्ञानशाखा आपली स्वतःची भाषा निर्माण करीत आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तर या शास्त्राने क्रांतीच घडवून आणली आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील 'लॉजिकल पॉझिटिव्हिझम' या संप्रदायाने भाषेविषयी विशिष्ट भूमिका घेतली आहे. त्यांचा सामान्य माणसाच्या वापरातील रोजच्या भाषेवर विशेष रोष आहे. कारण ती अतिशय संदिग्ध (व्हेग) असंबद्ध (इन्कन्सिस्टंट) व गोलमाल (इम्प्रिसाइज) असते. शास्त्रांची जी वाढ होत आहे तिच्यासाठी या दोषांपासून मुक्त असणारी एक उपभाषा निर्माण करावी (नाहीपेक्षा प्रत्येक शास्त्राने आपणांस सुयोग्य अशी तंत्रभाषा निर्माण केलेल्या आहेत की.) तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही पूर्वकालीन महान् तत्त्वशोधकांच्या (मेटॅफिजिशिअन्स) विचारांचे समालोचनात्मक वा सर्वंकष विवरण करण्यापेक्षा तत्त्वज्ञानक्षेत्रातील विविध संबोधांची पृथःकरणपूर्वक चिकित्सक पाहणी करणे हे सर्वांत महत्त्वाचे मानले जाते. The most important talks of contemporary philosophy are to analyse concepts, rather than to hold special synthesis of the great metaphysicians of the past age.[28] असे 'ब्रिटानिका परस्पेक्टिव'-मधील भाषा विषयावरील लेखात म्हटले आहे. उलटपक्षी सर्वसामान्य भाषातत्त्वज्ञ

रोजच्या भाषेकडे एवढ्या तुच्छतेने पाहू शकत नाही. कारण याच रोज वापरल्या जाणाऱ्या भाषेने आपणांस स्वातंत्र्य, तर्कशुद्धता (रीजन), उद्दिष्ट (मोटिव), कारण (कॉज) असे तत्त्वक्षेत्राच्या दृष्टीने अतीव महत्त्वाचे शब्द दिलेले आहेत. पूर्वसूरींनी ते आपल्या जन्माचे कष्ट देऊन संपन्न केलेले आहेत, आणि ते कालाच्या कसोटीस उतरलेले आहेत.

त्यामुळे खरा मार्ग म्हणजे आपल्या मूलभूत संबोधांविषयी आपण आपली भूमिका स्वच्छ ठेवणे व त्या शब्दांचा, संबोधांचा वापर करण्यासाठी जेवढे बिनचूक करता येतील तेवढे बिनचूक नियम तयार करणे हाच होय. त्यासाठी प्रो. ऑस्टिन यांनी सोपा सिद्धान्त सांगितला आहे. तो म्हणजे What we should say when, and so why and what should mean.[29] अर्थात या उपक्रमां-विषयी इतरांचे आक्षेप आहेतच. त्यांचे म्हणणे ही चळवळ म्हणजे एक प्रकारचा बौद्धिक सनातनीपणा होय. या आक्षेपांना उत्तर देता येईल. पण मुख्य प्रश्न असा आहे की, भाषाशास्त्रीय पद्धतीचा अवलंब अशा रीतीने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात केल्यानंतर जे काही हाती लागेल ते त्याच्यावर घेतल्या जाणाऱ्या अमाप कष्टांची भरपाई करणारे असेल काय ?

## : ११ :

भाषेच्या अभ्यासाच्या कक्षा निरनिराळ्या दिशांनी निरनिराळ्या मार्गांनी रुंदावत आहेत याची कल्पना ह्या विवेचनामुळे येऊ शकेल. वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासासाठी भाषाशास्त्राचा अवलंब कसा पद्धतशीरपणे करता येईल, यासाठी काही योजना सुचवितो.

अलिकडच्या काळात ज्ञानाच्या व व्यवसायाच्या प्रत्येक क्षेत्रांत विशिष्ट शब्द व शब्दसंपत्ती यांची विलक्षण गरज लागते. ती भागविण्यासाठी आणि या त्या क्षेत्रातील शब्द व शब्दसंहतीचे एकत्रीकरण करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर निरनिराळ्या प्रकारच्या लहानमोठ्या शब्दकोशांची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने कोशकार्य हे एक महत्त्वाचे बौद्धिक व प्रामुख्याने भाषेशी संबद्ध असणारे एक क्षेत्रच निर्माण झालेले आहे. हे भाषाभ्यासाशी संबद्ध असे क्षेत्र आहे. हे एक शास्त्र आहे. यातील माहितीचे संकलन विशिष्ट उद्दिष्टांनी केले जाते. निरनिराळ्या संदर्भात, वाक्यांत ज्या प्रकारे शब्दांचा उपयोग केला जातो ते लक्षात घेतले जाते. कोशरचना एककालिक व कालक्रमिक अशा दोन्ही रीतींनी केली जाते. शब्दांचे अर्थपरिवर्तन ध्वनिपरिवर्तन यांची कल्पना कोशांतर्गत माहितीवरून आली पाहिजे.

निरनिराळ्या विषयांशी संबद्ध असणाऱ्या शब्दांचे कोश रचताना त्या विषयांतील सखोल ज्ञानाबरोबरच भाषाविषयक विशेषतः शब्दधारणाविषयक ज्ञान अतिशय महत्त्वाचे आहे. त्याशिवाय त्या कोशाला परिपूर्णता व बिनचूकपणा येणार नाही. अलिकडच्या ज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन शब्दकोश तयार करण्याचे एक शास्त्र ऊर्फ अनुशासन निर्माण झालेले आहे. आणि त्याचा समावेश अर्थातच भाषाभ्यासात होईल. हे भाषाभ्यासाचे अंग समाज संस्कृती इ.शी निगडीत असणाऱ्या मानव्यशास्त्राशी संबंधित असणार आणि त्यादृष्टीने त्याचा समावेश वाङमयीन विद्वत्तेत करावा लागेल.

आज प्रत्येक प्रादेशिक भाषांत जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत, विज्ञान व ज्ञानक्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचे व शब्दसंहतीचे (टर्म्स) कोश तयार होणे हे आवश्यक आहे. ज्ञानाची प्रत्येक क्षेत्राची आज एवढ्या झपाट्याने वाढ होत आहे की, कोणीही त्या क्षेत्रातील सर्व ज्ञान मिळविलेले आहे असे म्हणू शकत नाही. साहजिकपणे अभ्यासकाला प्रत्येक क्षेत्राशी संपर्क साधण्याचे साधन उपलब्ध होणे आवश्यक आहे व ते प्रत्येक ज्ञानक्षेत्रीय वा व्यवसायक्षेत्रीय शब्दकोशांच्या द्वारे पार पाडणे शक्य होईल. प्रत्येक शास्त्र एवढे झपाट्याने वाढत आहे की, त्याच्या अनेक ज्ञानशाखा स्वायत्त होत आहेत व त्यांचा विकास वेगवेगळ्या दिशांनी स्वतंत्र रीतीने होत आहे. ज्ञानाचे विशिष्टीकरण (स्पेशलायझेशन) झपाट्याने होऊ लागले असले तरी, सगळी ज्ञाने शेवटी परस्परसंबद्ध आहेत, आणि प्रत्येक क्षेत्रातील अभ्यासकाला इतर वा संबद्ध ज्ञानक्षेत्रातील घडामोडी, उपक्रम, शब्दसंहती, संकेत, विचार इत्यादींची आवश्यकता भासतेच. ही गरज अशा शब्दकोशाच्या द्वारे पुरी करणे शक्य आहे. विद्यापीठातील आणि ज्ञानक्षेत्रीय नवागत व अनुभवी ह्या सर्वांना हा प्रकल्प पुष्कळ दिवस पुरेल. हे कोश दोन प्रकारचे असावे, एक छोटा म्हणजे चालचलावू पण पुरेशी व विश्वसनीय माहिती देणारा व दुसरा अधिक विस्तृत व सखोल विवरण करणारा असा. महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळातर्फे होऊ घातलेल्या विश्वकोशाच्या उपयुक्ततेबद्दल वाद नाही. पण त्याइतकीच या विभागीय कोशांची आवश्यकता आहे आणि विविध विद्यापीठांच्या कक्षेत हे काम पडण्यासारखे आहे.

त्याशिवाय आणखी एका कारणासाठी अशा शब्दकोशांची गरज आहे. प्रत्येक ज्ञानक्षेत्रात विशिष्ट शब्द, शब्दसंहती, संकल्पना इ.चा उपयोग व वापर होत असतो. परंतु ते शब्दप्रयोग त्याच्यामागील अर्थ व आशय व न कळता तसेच वापरले जातात. शब्दकोशांच्या उपलब्धतेमुळे ही अडचण दूर होईल. पारिभाषिक व विशिष्ट क्षेत्रीय शब्दप्रयोग अधिक साक्षेपाने व काटेकोरपणे वापरले जातील. ज्ञानाच्या विकसनासाठी हे सारे अवश्य आहे.

प्रत्येक क्षेत्रासाठी असा कोश करणे हे त्या त्या क्षेत्राचे त्या त्या क्षेत्रीय विद्वानांचे जरी काम असले तरी त्यासाठी भाषाविज्ञानक्षेत्रास बरेच महत्त्वाचे व प्रारंभिक कार्य करावे लागेल. किंबहुना प्रत्येक ज्ञानक्षेत्रातील काही व्यक्तींना शब्दकोश-निर्मितीच्या संदर्भात भाषाभ्यास करावा लागेल, म्हणजे सर्वांच्या सहकार्याने आजच्या कोशकार्याचे अनुशासन अधिक पद्धतीशीरपणे साकार होईल. हे सारे वाङ्मयीन विद्वत्तेच्या कक्षेत पडणारे काम आहे. वाङ्मयक्षेत्रीय शब्दसंहती संज्ञा इ.च्या कोशाची नितांत आवश्यकता आहे हे सांगण्याची जरुरी नाही. त्या दिशेने काही उपक्रम सुरू झालेलेही दिसतात.

शेवटी भाषाभ्यासाच्या क्षेत्रातील संबद्ध अनुशासने व प्रपद्धती यांचा विचार करणे अवश्य आहे. भाषाशास्त्रीय अभ्यासविषयांतील विविधतेप्रमाणे अपेक्षित विद्वत्तेचे स्वरूपही बदलते. कारण त्यांची शोधक्षेत्रे स्वरूपतः बरीच वेगळी वेगळी आहेत. काही क्षेत्रे पूर्वी पाहिल्याप्रमाणे विज्ञानाच्या जवळ जवळ जात आहेत. कारण त्यात शोधसाहित्य (डाटा) निरनिराळ्या मार्गांनी उपलब्ध करून घ्यावे लागते. ते उपलब्ध झाल्यानंतर त्याचे सूक्ष्मदृष्टीने पृथःकरण करावे लागते. निरनिराळ्या भागांचे परस्पर संबंध शोधणे व विशिष्ट अभ्युपागम मानून निष्कर्ष काढणे हे सारे वैज्ञानिक शोधपद्धतीशी मिळतेजुळते आहे. अशा रीतीने ह्या शोधक्षेत्रासाठी लागणारी विद्वत्ता विज्ञानक्षेत्रीय विद्वत्तेशी बरीच मिळतीजुळती असणे स्वाभाविक आहे. भाषाविज्ञाना (लिंग्विस्टिक्स) मध्ये जे विषय समाविष्ट होतात त्यांच्यांमधील शोधोपक्रमाचे स्वरूप असे आहे. त्या कारणानेच ते शोधक्षेत्र वाङ्मयीन विद्वत्तेपासून पूर्णपणे विलग झाले आहे. ध्वनिशास्त्र (फोनेटिक्स) व शब्दरूपशास्त्र (मॉर्फालॉजी) ही दोन क्षेत्रे अशा रीतीने स्वतंत्र होऊन त्यांची स्वतंत्र अनुशासनेही निर्माण झालेली आहेत. त्यांतील शोधकार्यासाठी निरनिराळी विज्ञान व तंत्रसिद्ध अशी उपकरणे, यंत्रे वापरावी लागतात. उदा. एक्स-रे, स्पेक्टोग्राफ, ऑसिलोग्राफ, काइमोग्राफ, पिचमीटर, स्पीच स्ट्रेचर, ब्रीदिंग प्लास्क, ऑटोफोनोस्कोप इ. इ. हे नवे तंत्रविज्ञानच उत्क्रांत होत आहे. यात गणितशास्त्राच्या व तत्सम पद्धतींचा वापर अपेक्षित आहे. वैज्ञानिक पद्धती अवलंबिल्या जाण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ह्या क्षेत्रातील अधिसंचित (डाटा) हे पूर्णपणे मनुष्यनिरपेक्ष व समाजनिरपेक्ष करता येते. त्यामुळे ही शोधक्षेत्रे विज्ञानाच्या जवळ जवळ गेली आहेत. अध्येत्याच्या ठायी तीव्र पृथःकरणशक्ती असणे अवश्य असते.

पण ह्या ज्ञानक्षेत्रातील शब्दार्थशास्त्र (सिमँटिक्स) आणि व्युत्पत्तिशास्त्र ही अशी शोधक्षेत्रे आहेत की, त्यांचे शोधन अतिशय वेगळ्या पद्धतीने करावे लागते. येथे पृथःकरणशीलता ही आत्यंतिक महत्त्वाची नाही (तसे शोधन म्हटले की पृथः-करण आलेच). अध्येत्याला समाज व संस्कृतीचे गाढ ज्ञान असणे अवश्य असते. निदान

त्याच्या बुद्धीला विविध सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक अंश व अंगोपांगे आणि अभिक्रिया यांची मर्मग्राही जाण हवी. व्युत्पत्तिशास्त्रात तर यांच्या जोडीला ध्वनिशास्त्र व शब्दरूपशास्त्र यांतील मूलभूत ज्ञानाची बैठक हवी. एखाद्या कल्पनेच्या आहारी न जाण्याइतकी अलिप्तता, तेवढीच, भेदक चिकित्सकताही अपार महत्त्वाची. अशा रीतीने हे शोधक्षेत्र शोधाभिक्रियेच्या दृष्टीने सामाजिकशास्त्रांशी मिळतेजुळते असले तरी ते मूलतः वाङमयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र आहे व ते तसेच राहणार आहे. म्हणजे याठिकाणी सामाजिकशास्त्रांचे अनुशासन व इतिहासशास्त्र-प्रणीत अनुशासन यांचा समन्वय झालेला आहे, हे अध्येत्याने लक्षात ठेवणे अवश्य आहे.

याशिवाय व्याकरण, वाक्यरचनाशास्त्र (सिंटॅक्स) ही भाषाशास्त्रांतर्गत शोधक्षेत्रे वेगळ्याच प्रकारची आहेत. याठिकाणी वरील इतर उपक्षेत्रांतील मूलभूत माहितीच्या जोडीला भाषेचा इतिहास, पूर्वकालीन व्याकरण, शब्दघटना, इ. विषयीचे ज्ञान अवश्य असते. या परिक्षेत्रातील शोधविषय विज्ञानातील शोधविषय जसे शोधावे लागतात तसे शोधणे अवश्य असते पण प्रत्यक्ष प्रपद्धती (मेथॉडॉलॉजी) मात्र वाङमयसमीक्षा व इतिहास यांच्यांशी मिळतीजुळती असावी लागेल. या शोधक्षेत्रात तीव्र पृथःकरणशीलतेला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा तीव्र संश्लेषणशीलता अधिक महत्त्वाची आहे. अशा प्रकारचे भाषाभ्यासाच्या क्षेत्रातील भिन्न भिन्न शोधविषय, त्यांच्या मागील मनोवृत्ती व प्रपद्धतीचे स्वरूप आहे. पहिल्या क्षेत्राचा थोडा अपवाद सोडता ह्या साऱ्या अभिक्रिया ह्या वाङमयक्षेत्राशीच घनिष्टपणे संबद्ध राहणार आहेत. कोशसिद्धी (शब्दकोश व तत्सम कोश) सारखा उपक्रम या सर्व पद्धतींच्या समन्वयावर आधारलेला सामुदायिक स्वरूपाचा अभिक्रम होय.

## : १२ :

वाङमयीन विद्वत्तेच्या परिक्षेत्रात भाषाभ्यास हे क्षेत्र असे आहे की त्यात व्यक्तिगत अभिक्रमशीलतेला जेवढे महत्त्व आहे. तेवढेच सामाजिक अभिक्रम-शीलतेला आहे. म्हणजे सामूहिक दृष्टीने पुढाकार घेऊन पार पाडण्यासारखे अनेक प्रकल्प भाषाशास्त्राच्या विभागात आयोजिता येतील. त्यासाठी विधायक कल्पना-शक्ती वापरून व्यापक योजना आखावयास हव्यात. उदा. महाराष्ट्रातील जिल्ह्या-जिल्ह्यात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषांचे आधुनिक भाषावैज्ञानिक दृष्टीने वर्णन वा व्याकरण तयार करता येईल. त्याचप्रमाणे निरनिराळे व्यवसाय

आपली वेगळी परिभाषा वा बोलभाषा–रूढ करतात अशा व्यावसायिक बोली-भाषांचा अभ्यास हे मोठे क्षेत्र आहे. निरनिराळ्या विषयांच्या कोशांचा उल्लेख मागे आलेला आहे. कोशसिद्धी ही एक 'तंत्रविद्याच' झाली आहे आणि ती भाषा-शास्त्रांतर्गत आहे. विशेष म्हणजे ती वाङमयीन विद्वत्तेच्या कक्षेत पूर्णतया पडणारी विद्या आहे. तिचाही प्रसार योजनाबद्ध रीतीने करता येईल.

पीएच्.डी. च्या प्रबंधाचे विषय पाहिले तर असे दिसते की, अत्यल्प विद्यार्थी भाषाशास्त्रीय विषय अभ्यासासाठी घेतात. त्यांपैकी बहुसंख्यजण केवळ वाङमयातील भाषेच्या भाषाशास्त्रीय अभ्यासावर भर देतात. याचे कारण या ज्ञानशाखेचे विद्याक्षेत्रात जेवढ्या आकर्षक रीतीने आयोजन व्हावयास पाहिजे तेवढे झालेले नाही हे होय.

अशा रीतीने आज आपण भाषा व भाषाभ्यासासंबंधी निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचे, अवश्य उपक्रमांचे व अनुशासनांचे स्वरूप वाङमयीन विद्वत्तेच्या भूमिकेवरून पाहिले. भाषाविज्ञान हे आज स्वतंत्र रीतीने विकसित होत असल्याने वाङमयीन विद्वत्तेशी त्याचे संबंध कसे दुरावल्यासारखे झाले आहेत, तसेच भाषा-भ्यासाची काही अंगे अशा प्रकारे स्वतंत्ररीत्या विकासक्षम आहेत आणि इतर काही अंगे वाङमयक्षेत्राशी संबद्ध कशी आहेत, हे आपण पाहिले. लिंग्विस्टिक्स—भाषाविज्ञान—हे स्वतंत्र शास्त्र वा ज्ञानशाखा विकसित होत आहे. भाषाभ्यासाच्या विकासाच्या दृष्टीने ते योग्यच आहे. ही ज्ञानशाखा प्रारंभी सामाजिक शास्त्रांच्या व आता विज्ञानशाखांच्या दिशेने प्रगती करीत आहे. असे असले तरी भाषा-विज्ञानाच्या प्रारंभिक व मूलभूत तत्त्वांचा अभ्यास हा वाङमयाभ्यासाशी संबद्ध करणे योग्य होईल. म्हणजे तो अभ्यास स्वतंत्र रीतीने विकसित होऊ पाहणारे भाषाविज्ञान आणि वाङमयीन विद्वत्तेची इतर परिक्षेत्रे यांना जोडणारा दुवा असेल. कारण नवे भाषाविज्ञान, शब्दार्थविज्ञानशास्त्राला आपणात समाविष्ट करून घेण्यास तयार नाही. अर्थात त्यासाठी कदाचित पुढेमागे झपाट्याने पुढे येत असणारे मानस-शास्त्र पुढे येईल. तसे झाले तरीसुद्धा ही व इतर अनेक भाषाभ्यासाची अंगे वाङमयीन विद्वत्तेतच समाविष्ट होणारी अशी राहणार आहेत.

ज्ञानाच्या वाढीबरोबर अनेक ज्ञानशाखा मूळ ज्ञानक्षेत्रापासून फुटून स्वायत्त होण्याची क्रिया सर्वच ज्ञानक्षेत्रांत सुरू झालेली आहे. तसे झाले तरी त्यात अयोग्य असे काहीच नाही. वाङमयीन विद्वत्तेपासून अशी काही ज्ञानांगे स्वायत्त झाली तरी ते वाङमयीन अभ्यासाचे विकसनच आहे. अभ्यासकाला आपण कोणत्या ज्ञान-शाखेचा व्यासंग करावयाचा, हे पुढे स्पष्ट होते. तोपर्यंत आपण प्रविष्ट केलेल्या ज्ञानक्षेत्रांची अंगे उपांगे व परिशाखा कोणत्या, ह्यांची सुस्पष्ट कल्पना असणे अवश्य आहे. त्यायोगे आपल्या स्वतःच्या, बौद्धिकशक्ती, आवडनिवड, प्रवृत्ती, यांना

मिळतीजुळती ज्ञानशाखा अभ्यासक स्वीकारील. त्यासाठी विविध अभ्यास-पद्धतींचा अभ्यास त्याला करावा लागेल. हे सारे विवेचन त्यादृष्टीने उपयुक्त वाटेल. वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास अधिक शास्त्रशुद्ध होण्यास याची मदत होईल अशी अपेक्षा आहे.

आतापर्यंत आपण वाङ्मयेतिहास, समीक्षा व भाषाशास्त्र या वाङ्मयीन विद्वत्तेच्या परिक्षेत्रांची पाहणी केली आहे. चवथे विचारात घेतलेले परिक्षेत्र 'ललितवाङ्मय-लेखन' हे आहे. ते थोडे वेगळ्या प्रकारचे परिक्षेत्र आहे. त्याचे विवेचन मी उद्याच्या व्याख्यानात करणार आहे.

□ □ □

व्या ख्या न पा च वे

# ललितवाङ्मयलेखन : प्रक्रिया व अनुशासन

: १ :

वाङ्मयीन विद्वत्तेची परिक्षेत्रे या दृष्टीने आतापर्यंत वाङ्मयेतिहास, वाङ्मयसमीक्षा व भाषा आणि भाषाभ्यास, ह्या तीन परिक्षेत्रांचा विचार आपण केलेला आहे, वाङ्मयीन विविध बौद्धिक अभिक्रियांशी ही परिक्षेत्रे एवढी घनिष्ट-पणे संबद्ध आहेत की, त्यांच्या महत्त्वाविषयी कोणताही मूलभूत महत्त्वाचा वाद होण्याचे कारण नव्हते. त्यामुळे ते विवेचन त्यातील काही मते सोडली, तरी एकंदर भूमिका ही सर्वसम्मत व्हावी असेच आहे. त्या त्या क्षेत्रांतील विविध अभिक्रिया व त्यांच्यांशी संबंधित अनुशासने यांचे महत्त्व तसे सर्वमान्य व्हावयास काहीच हरकत नाही. अगदी पहिल्या व्याख्यानात वाङ्मयीन विद्वत्तेचे विवेचन करताना वाङ्मयाशी संबद्ध असा प्रज्ञा व प्रतिभाव्यापार या दोनही गोष्टी वाङ्मयीन विद्वत्तेतच समाविष्ट होतात, असे म्हटले आहे. आणि त्यादृष्टीने ललित वाङ्मय-लेखनाचा समावेशही वाङ्मयीन विद्वत्तेत केला आहे. ललित वाङ्मय हे वाङ्मयाचा अविभाज्य घटक आहे, हे सर्वमान्य आहे. त्याचे समीक्षण, परीक्षण सर्वप्रकारचे बौद्धिक, आस्वादक वा तर्कप्रधान विवेचन हे वाङ्मयीन विद्वत्तेचा अपरिहार्य असा भाग आहे, ह्याबद्दलही वाद होण्याचे कारण नाही. पण या ठिकाणी ललित वाङ्मयनिर्मिती हे वाङ्मयीन 'विद्वत्तेचे' परिक्षेत्र मानले आहे आणि त्यादृष्टीने त्याचे विवेचन प्रस्तुत व्याख्यानात करावयाचे आहे.

रूढ संकेत व समजुती ह्यांना हे धक्का देणारे आहे, या समजुती खोलवर गेलेल्या आहेत. विद्वत्व आणि कवित्व ऊर्फ सर्जनशील लेखन यांत विरोध आहे, ही समजूत फार जुनी आहे. पण हा 'वाद' विद्वत्तेच्या इतिहासात तसा नवा आहे. म्हणजे तो वाङ्मयक्षेत्रात स्वच्छंदवादाचा उगम झाल्यानंतर निर्माण झाला आहे, हे आपण मागे पाहिले आहे. सर्जनशील लेखन आणि विचारप्रधान लेखन ह्या

दोन भिन्न प्रवृत्तींच्या अभिक्रिया (ॲक्टिव्हिटीज्) आहेत. त्या काही ठिकाणी परस्परांना पूरक असल्या, तरी प्रकृतितया त्या केवळ परस्परविरोधी आहेत, असे बहुसंख्यांचे ठाम मत आहे. प्रस्तुत व्याख्यानमालेत ललितवाङ्मयलेखन हे वाङ्मयीन विद्वत्तेचे परिक्षेत्र मानले आहे. हे मत तात्त्विक भूमिकेवर आधारलेले आहे. म्हणून या व्याख्यानात प्रारंभी ती भूमिका थोड्याफार विस्ताराने मांडणे अवश्य वाटते. ते केल्यानंतर ललित वाङ्मयाचे त्यादृष्टीने अनुशासन, प्रशिक्षण आणि या अभिक्रियांचा वाङ्मयीन विद्वत्तेच्या इतर परिक्षेत्रांवर होणारा परिणाम या विषयांची चर्चा करता येईल. काही पाश्चात्य राष्ट्रांत सर्जनशील विचारप्रक्रिया हा एक शिक्षणाचा–प्रशिक्षणाचा भाग मानलेला आहे. त्यांच्या मानसशास्त्रीय संशोधनाचे ते फलित आहे. त्यांच्यांकडील हे नवे नवे प्रयोग आपणांकडेही येत आहेत. मधून मधून कोठे कोठे ललितवाङ्मय (म्हणजे कथा, नाट्य, काव्य इ.) लेखनाची विविध सत्रे किंवा शिबिरे घेतली जात आहेत. त्यांना चक्क ' वर्कशॉप ' अशी औद्योगिक संस्कृतीशी मिळतीजुळती संज्ञा दिलेली असते. त्यावरून निर्मितिशील वाङ्मय हे प्रयोगाच्या प्रशिक्षणाच्या अवस्थेप्रत आले आहे, याची तशी जाण आपणांप्रत आली आहे. या व्याख्यानात तशा प्रकारच्या उपक्रमां-मागील तात्त्विक भूमिका आपणास पाहावयाची आहे. या ठिकाणी जो 'अनुशासना' चा विचार मांडावयाचा आहे, तो लेखननिर्मिति–क्रियेच्या अनुशासनाचा होय. कारण ते लेखन अभ्यासावयाच्या व अभिग्रहणाच्या क्रियेशी संबद्ध अशा अनु-शासनांची चर्चा वाङ्मयसमीक्षा या व्याख्यानात आलेली आहे.

: २ :

ललितवाङ्मय हे विद्वत्तेशी संबद्ध नाही, यादृष्टीने पुढे करण्यात येणारा पहिला युक्तिवाद असा की, ललितलेखन हा निर्मितिशील किंवा सर्जनशील लेखनाचा उपक्रम असतो. त्याचा अभ्यास जरी आतापर्यंत निरनिराळ्या संदर्भात या व्याख्या-नांतून पाहिल्याप्रमाणे तार्किक वा बुद्धिप्रधान भूमिकेचा अवलंब करून करता आला, तरी ज्या दृष्टीने भाषाभ्यास, वाङ्मयसमीक्षा वा वाङ्मयेतिहास, हे अभ्यास वा व्यासंगाचे विषय बनतील, स्वतंत्र व थोड्याफार प्रमाणात स्वायत्त अनुशासने म्हणून त्यांना महत्त्व जसे प्राप्त होईल, तसे ललितवाङ्मयास प्राप्त होणार नाही. कारण व्यासंगाने वा तत्सम प्रयत्नांनी निर्मितिशील लेखन जमेलच असे नाही. किंबहुना ललित लेखनाचे ' कारण ' कोणते, प्रतिभा की व्युत्पत्ती ? या सनातन प्रश्नाचे उत्तर प्रामुख्याने प्रतिभेच्या बाजूने दिले जाते. प्रतिभेचे कार्य हे तर्काधिष्ठित कार्यकारणाच्या पलीकडचे आहे, असे गृहीत धरून अनुशासनाच्या

साच्यात ललितलेखनाला बसविणे योग्य होणार नाही. वादाकरिता त्याचे अनुशासन मानले तरी त्याचे महत्त्व मर्यादित राहणार. इतर अनुशासनांचे संस्करण करून त्यादृष्टीने प्रशिक्षित असे निरनिराळ्या व्यासंग-क्षेत्रातले अध्येते (स्कॉलर) निर्माण करता येतील. त्यांच्या ज्ञानाविषयी वा बौद्धिक तयारीसंबंधी निश्चितपणे काही सांगता येईल. पण ललितवाङ्मयाच्या बाबतीत तसे सांगता येणे अशक्य आहे. तसे म्हणावयाचे झाले तर वैद्यक, कायदा, एखादी विज्ञानशाखा यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतलेल्या अभ्यासाविषयी, त्यांच्या व्यावसायिक ज्ञानाविषयी जसे निश्चितपणे सांगता येईल, तसे निश्चितपणे मानव्य–विद्यांच्या बाबतीत सांगता येणे कठिण आहे. आणि वाङ्मय-कलांच्या बाबतीत तर ते जवळ जवळ अशक्य आहे. कारण या ज्ञानशाखांचे अधिष्ठान त्यांतील व्यावसायिक ज्ञान हे नसून त्या ज्ञानामागील मूल्ये हे आहे. त्यामुळे ललितवाङ्मय-लेखन हा अभ्यास वा व्यासंगविषय होऊ शकला, तरी ललितवाङ्मयलेखनाचे स्वतंत्र अनुशासन मानणे कठिण आहे. निर्मितिशील कृतींना बौद्धिक साच्यातून बसवणे मूलत:च चूक आहे.

दुसरा युक्तिवाद असा की, इतर विषयांच्या बाबतीत पृथ:करण, अवलोकन इ. क्रियांचा अवलंब करून निष्कर्षवजा काही लिहिता येते. विद्येच्या या शाखा प्राय: विगमन, निगमन, पृथक्करण इत्यादींवर आधारलेल्या आहेत. पृथक्करण–पद्धतीने तार्किक विवेचन करता येते. त्याचप्रमाणे केलेले पृथक्करण बरोबर आहे किंवा नाही, तसेच मानलेले विभाग, त्यांचे परस्पर संबंध हे इतर बुद्धिगम्य निकषांनी-पडताळून पाहता येतात, आणि एकंदर निकषांची त्यादृष्टीने तपासणी करता येते. ललितवाङ्मयाचे तसे नाही. त्याची निर्मिती ही मनुष्याच्या पृथक्करण-शक्तीतून होत नसते. तर ती एक प्रकारच्या संश्लेषणात्मक शक्तीने होत असते, आणि प्रत्यक्षात ती कृती सृजनशील असते. हे कार्य तार्किकतेच्या पलीकडे आहे, असे मानले जाते. त्यामुळे त्याच्या परीक्षणासाठी निर्भेळ बौद्धिक व तार्किक निकष मानता येत नाहीत, व ते निर्माण झाले आहे तसे मान्य करावे लागते. साहजिकपणे स्वतंत्र 'अनुशासन' तयार होण्यात या अडचणी येतात. ललितवाङ्मय हा एक संश्लेषणात्मक व सर्जनात्मक अभिबंध आहे. पृथ:करणात्मक पद्धतींचा अवलंब करून त्याची पाहणी करता आली, तरी त्या पाहणीची प्रत वेगळी असेल. तार्किक सर्वमान्य निकष वापरता येत नसल्याने अनुशासनाच्या साच्यात ललितलेखन बसविता येणे अशक्य आहे.

तिसरा युक्तिवाद असा की, आजपर्यंतच्या वाङ्मयनिर्मितीवरून जरी ललितवाङ्मयाचे अनुशासन निर्माण करण्याचा प्रयत्न केला व त्याप्रमाणे प्रयत्नपूर्वक ललितवाङ्मयाची निर्मिती करून घेतली तरी, त्या निर्मितीचे

अंतिम मूल्य काय राहील, हे कोणासही सांगता येणार नाही. अनुशासनाच्या अवलंबनाने तयार करून घेतलेले वाङ्मय चांगले निघेलच असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. जगातील निरनिराळ्या भाषांतून जे श्रेष्ठ वाङ्मय निर्माण झालेले आहे, ते लेखकाच्या आंतर–संवेदनेतून (इंटयूइशनने) निर्माण झालेले आहे. बुद्धिप्रधान निकषांनी त्याची चिकित्सा करता आली तरी ते क्षेत्र ज्ञानप्रधान व तर्कसिद्ध उपक्रमाचे नव्हे. त्यामुळे त्यात एकप्रकारची अगम्यता, गूढता असणे संभवनीय आहे. 'अनुशासना'ला ते विरोधी आहे. अशा प्रकारचे युक्तिवाद आणखीही करता येतील व सर्वसाधारण ललितवाङ्मयविषयक रूढ असलेल्या समजुतींना ते पटतीलही. पण या सर्व युक्तिवादांचे निराकरण करून ललित-वाङ्मयाचे त्याच्या स्वरूपाला साजेसे स्वतंत्र अनुशासन मानणे शक्यच नव्हे, तर आवश्यक आहे. ज्ञानविषयक ज्या नव्या कल्पना रूढ होत आहेत, त्यांच्या प्रकाशात मनुष्याच्या सर्जनशील शक्तीकडे पाहण्याची एक नवी दृष्टी तयार झाली आहे, हे लक्षात घेणे अवश्य आहे.

ललितवाङ्मय व ललितकला माणसाच्या सर्जनशील शक्तीमुळे निर्माण झालेल्या आहेत व ही शक्ती—जिला साहित्यक्षेत्रात प्रतिभा असे म्हटले जाते—एक गूढ व अनाकलनीय शक्ती आहे, असे मानले जात असे. तद्वतच ती बुद्धिसाध्य ज्ञानाच्या मागे असणाऱ्या पृथक्करणशक्तीच्या पूर्णपणे विरुद्ध धर्माची आहे. या आताच पाहिलेल्या समजुतींवर हे निरनिराळे युक्तिवाद आधारलेले आहेत. स्वच्छंदवादाच्या चळवळीत कल्पनाशक्ती ऊर्फ 'इमॅजिने-शन'ला महत्त्व प्राप्त झाले, त्याचा हा परिपाक होय. प्रतिभा वा सृजन-शक्ती हिचे कार्य अगदी वेगळ्या दिशेने चालू असते. पण नवीन मानसशास्त्रीय अवलोकनाने तिच्यातील बरीचशी 'गूढ'ता काढून घेतलेली आहे. मनुष्याच्या इतर शक्तींप्रमाणे तिचेही कार्य विशिष्ट नियमांप्रमाणे चालते. एवढेच नव्हे तर तिच्या विरुद्ध प्रकृतीच्या म्हणून मानल्या गेलेल्या पृथक्करणात्मक शक्तीचे कार्य जसे चालते तसेच तिचेही चालते. माणसाच्या बुद्धिप्रधान, ज्ञानप्रधान उपक्रमांत, अभिक्रियांतही पृथक्करणात्मकता वा विश्लेषणशीलता, आणि संकलनात्मता वा संश्लेषणशीलता यांचे संमिश्रण झालेले असते. विज्ञानशास्त्रज्ञ हा आपल्या अवलोकनशक्तीचा वापर करून संपादिलेल्या माहिती–संचयाचे (डाटा) वा तत्सम सामग्रीचे जरी पृथक्करण करीत असला, तरी विशिष्ट अवस्थेत शोधक्रिया पुढे चालू राहण्यासाठी त्याला एखादे अभ्युपगम (हायपॉथेसिस) मानावे लागते. हे त्याच्या ठायीच्या संश्लेषणात्मक शक्तीचे अपत्य होय. आणि शेवटी जेव्हा निष्कर्ष काढावे लागतात, तेव्हाही परत सर्जनशीलतेचा अवलंब करून निरनिराळे अवयव पुनः एका सूत्रात गोवावे लागतात. याचा अर्थ मनुष्याच्या ह्या दोन शक्ती

परस्परविरोधी व परस्परांपासून पूर्णतया भिन्न आहेत, अशी जी समजूत आहे, ती वस्तुस्थितीस धरून नाही. आधुनिक मानसशास्त्रीय ज्ञानाने ती समजूत चुकीची ठरविली आहे.

: ३ :

ललितलेखनाविषयीच्या या सर्वसामान्य माणसाच्या समजुतीशी मिळती-जुळती भूमिका अध्येत्याचीही (स्कॉलर) असते. ललितवाङमयाला इंग्रजीत 'इमॅजिनेटिव्ह रायटिंग' म्हणजे कल्पनाधिष्ठित लेखन म्हटले जाते. अशा प्रकारचे कल्पनाधिष्ठित लिखाण करणाऱ्या लेखकाबद्दल अध्येत्याच्या मनात एक प्रकारची अढी असते, पूर्वग्रह असतो. त्यामुळे ललितलेखनाला 'अनुशासकीय' म्हणून स्वतंत्र दर्जा देण्याची त्याचीही तयारी नसते. कारण हे लिखाण कल्पनाधारे व स्फूर्तीच्या क्षणी लिहिलेले असते, त्याच्यामागे गूढतेचे वलय असते. ते अतिश्रेष्ठ (सुपरनॅचरल) तरी असते, किंवा अतिकनिष्ठ (सब्नॅचरल) तरी असते, असे समजले जाते. ते लिखाण म्हणजे केवळ शब्दक्रीडा (प्ले), उलट अभ्यासपूर्ण लेखन हे खरे अव्वलदर्जाचे. ललितलेखनाला स्वप्नमयतेची डूब असते, तर अभ्यासपूर्ण लिखाण वास्तवतेच्या व तर्कशास्त्राच्या पायावर घट्टपणे उभे असते. अध्यायीच्या या मतात थोडाफार खरेपणाही असेल, पण प्रथितयश कवी अगर लेखक या मतातील दुसरा भाग कधीही मान्य करणार नाहीत. कारण त्याच्याशी त्यांचे व्यक्तिमत्त्व निगडित झालेले असते. तसेच वाङमयीन कलाकृती कसा आकार घेतात हे त्याला माहित असते. आयझॅक वाल्टन या प्रसिद्ध लेखकाच्या शब्दांत सांगायचे तर As no man is born an angler, so no man is born an artist,[1] याचाच अर्थ असा की, ललितलेखनाची कला संपादावी लागते. लेखकाने आपली तंत्रवजा कारागिरी (क्रॅफ्ट) प्रयत्नपूर्वक शिकावयास हवी. त्यासाठी कलेची काही मूलभूत आत्मसमर्थक तत्त्वे (सेल्फ-एव्हिडंट प्रॉपॉझिशन्स) लक्षात ठेविली पाहिजेत.

सर्जनक्रियेत कठोरतेने विचार करणे, आणि रहस्यभेदक कल्पनीय दृष्टी असणे, ह्या दोहोंचा समावेश होतो. चार्लस मॉर्गन हे आपल्या 'क्रिएटिव्ह इमॅजिनेशन' ह्या लेखात म्हणतात : The creative imagination is a mutual process. It is the product of two interlocking forces; force of giving and force of receiving ".[2]

प्रतिभा झाली तरी तिला काही आगापिछा असतोच. माणसामाणसात काही मूलभूत निसर्गदत्त फरक असतात, हे मान्य करूनही कल्पनांचे स्फुरण कसे होते, याची काही उपपत्ती देता येते. एखाद्या विषयाचा ज्याने खूप अभ्यास केला, चिंतन केले, त्या क्षेत्रातील विविध अंगोपांगांशी, समस्यांशी ज्याचा परिचय आहे, त्यालाच नव्या नव्या कल्पना–तार्किक भाषेत त्याला 'अभ्युपगम' म्हणतात, ते – सुचू लागतात. साम्यानुमान (ॲनॅलॉजी) विगमन (इंडक्शन), परिवर्तन (कन्व्हर्जन) इ. अभिक्रिया त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. याचा अर्थ निर्मितिक्रिया बरीच तर्कगम्य बनू शकते.

म्हणजेच ललितलेखनाची प्रक्रिया ही जेवढी गूढ वाटत असे तेवढी ती आज राहिलेली नाही. सर्जनशील लेखन करणाऱ्या लेखकालाही चिंतन करावे लागते, अगदी कठोर चिंतन करावे लागते. तोही जीवनातील काही ध्येये, विचारप्रणाली इ. प्रमाण मानीत असतो. जीवनाविषयी त्याचे काही तरी मत असते, विशिष्ट भूमिका असते. वाङमयाभ्यासाच्या वेळी ती प्रयत्नपूर्वक शोधून काढावी लागते. त्याचे चिंतनही तर्कपद्धतीने चालते. त्यालाही आपल्या कलाकृतीची उभारणी करीत असताना घटना-प्रसंग, व्यक्ती, यांची काही निवड करावी लागते, ती निवड अनेकदा बुद्धिगम्य असते. कित्येकदा बुद्धिगम्य नसली तरी मनोगम्य असते. सर्जनशीलता व पृथक्करणशीलता या मन:शक्तीचे कार्य किती गुंतागुंतीचे आहे, याचा उल्लेख वर आलेलाच आहे. जे सर्जनशील लेखन असते ते निर्माण होत असता पृथक्करणशीलता बऱ्याच प्रमाणात कार्यवाही झालेली असते. जमा झालेल्या अवलोकनीय साधनसामग्रीतून वा अनुभवांतून काही निवड करावयाची म्हणजे पृथक्करणशीलता आलीच. लेखक जे जग, व्यक्ती, घटना, प्रसंग इ. 'कल्पनेने' निर्माण करतो ते सारे बाह्य व अनुभवगम्य जगाशी मिळतेजुळते असेच असते. म्हणजे अवलोकनातूनच त्याने ते निवडलेले असते. विचारप्रधान लेखन करणारा लेखकही हेच करीत असतो. त्याचेही अवलोकनकार्य सतत चालू असते व त्यातून काहीतरी तो निवडीत असतो.

मानसशास्त्रीय दृष्टीने प्रतिभावंताच्या वा कलावंताच्या (सर्जनक्रियेला कारणीभूत असणाऱ्या) मनोव्यापारांचे स्वरूप विचारप्रधान लेखन करणाऱ्या लेखकाच्या त्याचे लेखनकार्य चालू असतानाच्या मनोव्यापाराशी अत्यंत मिळते-जुळते असते. दोनही क्रिया समान असतात. दोघांचेही लेखनकालीन मनोव्यापार हे कशाच्या तरी 'नियंत्रणा'खाली चालू असतात. त्या दोनही क्रिया 'कंट्रोल्ड थिंकिंग' होत. म्हणजे दोघेही कोणती तरी नियंत्रणे (कंट्रोल्स) प्रमाण मानीत असतात. फरक एवढाच की, विचारप्रधान लेखक जेव्हा लेखन करीत असतो त्यावेळी त्या लेखनासाठी जी नियंत्रणे तो प्रमाण मानीत असतो (त्या

नियंत्रणांअभावी चिंतनशील लेखन अशक्य आहे) ती नियंत्रणे त्याच्या प्रकट (कॉन्शस) मनाने तयार केलेली असतात. ती अवलोकननिष्ठ असतात, व आपल्या-परीने पण निश्चितपणे तार्किकतेच्या निकषांवर ती तो पारखून घेत असतो. म्हणजे लेखन चालू असता जे चिंतन चालू असते त्यात अवलोकननिष्ठ अशा अनेक संबंधित गोष्टींची मालिका त्याच्या मनात सुरू होते, त्यांपैकी काहींची निवड तो तर्कबुद्धीचा वापर करून करीत असतो. आणि तसा उल्लेखही कित्येकदा त्या लेखनात येत असतो. त्याचे लेखन साहजिकपणे जाणीवयुक्त (प्रकट) मनातील कार्यकारणभावावर आधारलेले असते.

गंमत अशी की, निर्मितिप्रधान लेखन असेच नियंत्रणपूर्वक चिंतनाचे अपत्य होय. लेखनकाली त्याच्याही मनात अवलोकनाधिष्ठित, अनुभवाधिष्ठित संबंधी गोष्टींची मालिका सुरू होते, व स्वनिर्मित अशा योग्य नियंत्रणांचा वापर करून त्यांपैकी काहींचा उपयोग तो करून घेत असतो. त्याचीही निवड तशी एक प्रकारच्या कार्यकारणभावावर आधारलेली असते. येथे एक फरक असतो व ते म्हणजे चिंतनशील लेखकांच्या बाबतीत तो प्रमाण मानीत असलेली नियंत्रणे ही त्यांच्या जाणीवयुक्त (प्रकट) मनात असतात. व ती तर्काधिष्ठित असतात. ललितलेखन करणाऱ्या लेखकाच्या बाबतीत ह्या नियंत्रणांचे अस्तित्व त्याच्या जाणीवयुक्त मनात नसून ते त्याच्या नेणीवयुक्त (सबकॉन्शस) किंवा अप्रकट (अन्‌कॉन्शस) मनात असते. त्यामुळे ललितलेखनातील कार्यकारणभाव हा तत्त्वचिंतनप्रधान लेखनातील कार्यकारणभावाप्रमाणे स्पष्टपणे तर्कगम्य नसून मनोगम्य असतो. या मनोगम्यतेमुळे त्याला सृजनशीलत्व लाभलेले असते. त्या लेखकाला आपल्या मनातील नियंत्रणांची जाणीव नसते असे नव्हे. पण ती अंतर्मनात असल्याने तिचे कार्य त्याच्या दृष्टीने अभावतः होते. कारण अवलोकन, चिंतन इ. साऱ्या अभिक्रिया प्रकट मनानेच केलेल्या असतात, व पुढच्या संस्कारणकरणासाठी त्या सुप्त मनाकडे सोपविलेल्या असतात. 'लिटररी स्कॉलरशिप' या ग्रंथातील 'इमॅजिनेटिव्ह राइटिंग' या लेखात डब्ल्यू. एल्. श्‌रॅम हे साम्य दाखविताना म्हणतात की, " The process of creating art is essentially the same as the process of creating of new formula a new philosophic synthesis, or any other new birth in the world of ideas. "[3]

ह्या दोन्ही क्रियांत एखादे प्रश्नबीज मनात निर्माण झाले की त्याचे स्वरूप जाणून घेण्यासाठी अतिशय कठोर चिंतन करावे लागते. त्यानंतर दुसरी अवस्था निर्माण होते. ती अशी की, आपले प्रकट (बाह्य) मन त्याविषयी तर्कसिद्ध विचार करण्याचे सोडून देते, त्याला एकप्रकारे विश्रांती (रिलॅक्सेशन) मिळते,

म्हणून या अवस्थेला विश्रांतिकाल (पीरियड ऑफ रिलॅक्सेशन) असे म्हटले जाते. त्या विश्रांतिकालात सुप्त मनाचे कार्य चालू असते. एका अवस्थेत अंतरंगात काहीतरी चमकून जाते की, प्रश्नाच्या सोडवणुकीचा मार्ग अंधुकपणे दिसावयास लागतो. त्यातूनच अभ्युपगम, सूत्रे, सिद्धान्त, प्रतीके, प्रतिमा इ. सुचतात, विचारांना सुव्यवस्थापन प्राप्त होते. नंतर पुन: घोर चिंतनाची अवस्था निर्माण होते, त्यावेळी सुचलेले सूत्र, प्रतीक इ. परीक्षिले जाते आणि लेखन वा कलाकृती ही आकार व अवयवयुक्त होऊन पूर्णावस्थेकडे झेप घेते. या प्रक्रियेचे विवरण करताना ग्रॅहॅम वालास यांनी चार अवस्था मानलेल्या आहेत, त्या म्हणजे : पूर्वतयारी (प्रिपेरेशन), सुप्त अवस्थेतील वाढ (इन्क्यूबेशन), नवमार्गसूचन (इल्युमिनेशन) आणि पुन: परीक्षण (व्हेरिफिकेशन) या होत. कलाकृतीच्या निर्मितिक्रियेत काही भाग हा जाणता येतो (कॅलक्युलेबल असतो), तर काही भाग हा त्याच्या पलीकडचा (इनकॅलक्युलेबल) असा आहे.

कलावंत व कवी इ. सृजनशील लेखकांचे लिखाण स्फूर्तीच्या क्षणी (मोमेंट ऑफ् इन्स्पिरेशन) लिहिलेले असते, अशी समजून रूढ होती, (व काहीजण मानी-तही असतील) त्यामुळेच सर्जनशील लेखनक्रियेभोवती एक प्रकारचे दिव्यत्वाचे वलय दीर्घकाल होते. त्याची प्रतिक्रिया म्हणून कित्येकांनी प्रतिभावंताना अक्षरश: (उ. लोंब्रोसो) वेडयात काढले. आज तसे कोणी मानीत नाही. कलावंताच्या मनावरील नियंत्रणे ही त्याच्या अंतर्मनात (अबोधपूर्ण मनात) असतात, त्यामुळे या क्रियेत एकप्रकारची अतर्कशीलता (इनप्रेडिक्टॉबिलिटी) आलेली असेल, तेवढीच व ती सदैव राहणार. कारण कलावंत प्रतीकाच्या भाषेत विचार करतो. पण यापेक्षा त्या क्रियेत गूढ असे फारसे नाही. बरे, स्फूर्ती किंवा नवमार्गसूचन हे कलावंतापुरते असते, असे म्हणता येत नाही. मोठमोठे विज्ञानशास्त्रीय शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांना अशाच क्षणी ते शोध लागलेले असतात. त्याचे 'गूढ' कोणी मानीत नाही, उलट त्यांची चिकाटी, प्रयत्नपुरस्सरता, बुद्धिमत्ता इ. गुणांची सर्वत्र तरफदारी केली जाते. ललितलेखकाच्या बाबतीतही तशी भूमिका धारण करावयास काय हरकत आहे ? ललितवाङमयलेखनप्रक्रियेचे तर्कसिद्ध लेखन-प्रक्रियेशी असलेले हे घनिष्ट साधर्म्य लक्षात घेतले पाहिजे. तसे घेतले तर पहिल्याप्रमाणे दुसऱ्याचेही अनुशासन मानावयास काही हरकत नाही. कारण ललित-लेखन म्हणजे त्या लेखकाने विशिष्ट संदर्भात स्वत:च्या मनाला लाविलेल्या विशिष्ट शिस्तीची फलश्रुती आहे. ती शिस्तशीलता शोधणे व अभ्यासाचा विषय करणे यात काही चूक आहे, असे वाटत नाही. तत्त्वशोधनाच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे प्राचीन भारतीयांनी अध्यात्मविद्या शोधून काढून तिला बुद्धिगम्य ज्ञानाच्या पलीकडे अतींद्रिय ज्ञानाच्या क्षेत्रात नेऊन बसविले, तसेच काहीसे प्रतिभेबद्दलचे

झाले आहे. ती दिव्य शक्ती ठरली आणि तर्कगम्य ज्ञानापलीकडे तिला ठेवण्यात आले. पण आजच्या मनोविज्ञानाने तिचे गूढत्व कमी करण्याचा प्रयत्न चालविला आहे.

कलानिर्मितीच्या आणखी काही वैशिष्टयांकडे लक्ष वेधणे अवश्य आहे. विचारप्रधान लेखनाचे उद्दिष्ट वास्तवदर्शन हे असते. कलेचा पण वास्तवदर्शनाशी निकटचा संबंध असतो. अतिपूर्वकालापासून शास्त्र आणि तत्त्वज्ञान यांच्याप्रमाणेच कलेचा विषय सत्य व वास्तव हाच आहे. वरवर पाहणारासुद्धा कलेचा वास्तवज्ञानाशी संबंध असतो, असे आढळून येईल. अगदी पहिली गोष्ट म्हणजे (वाङ्मयीन) कलाकाराला शब्दांचे अर्थ व त्यांचा वापर याचे चांगलेच ज्ञान असावे लागते. लेखकांना शब्दप्रभू वा शब्दसृष्टीचे ईश्वर वा 'मेन ऑफ लेटर्स' म्हटले जाते, ते याच अर्थाने. त्याशिवाय लेखकाला सूक्ष्म अवलोकन करता आले पाहिजे, एवढेच नव्हे तर जे अवलोकिले असेल ते विश्वसनीयरीतीने निवेदिता आले पाहिजे. "Facts and reporting have been popularly accepted in the twentieth century as the artists' window on reality."[4] असे डब्ल्यू. एल्. श्रॅम म्हणतात ते अर्थपूर्ण आहे. कला म्हणजे अर्धसत्य ही समजूत अतिशय हानिकारक आहे. पूर्वीच्या लोकांनी स्फूर्तीविषयी ज्याप्रमाणे चुकीची समजूत करून घेतली होती, तसे नवीनांचे वास्तवदर्शनाविषयी झाले आहे. पूर्वीचे अभ्यासक स्फूर्तीचे प्रस्थ माजवून, अभ्यासाचा अधिक्षेप करीत तर अलीकडच्यांकडून वास्तवदर्शनावर अतिरिक्त भर देऊन कल्पनाप्राधान्याला कमी लेखण्यात येते.

एखादे चित्रकाराने काढलेले चित्र निसर्गाची सही सही प्रतिकृती नसते. म्हणजे कॅमेऱ्याने फोटो काढावा असे ते नसते. कलाकृती निर्माण करण्याच्या वेळी मनाचे खरे कार्य म्हणजे, कलावस्तूला प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा अधिक 'वास्तव' असा आकृतिबंध प्राप्त करून देणे हे होय. यादृष्टीने पाहू गेले, तर कला ही अवलोक्य जगापेक्षा कलावंताच्या मनाशी अधिक संबद्ध आहे. कलेचा आणि वास्तवाचा प्रत्यक्ष असा कोणताच संबंध नसतो. जो काही असतो तो केवळ मनाच्या द्वारा आलेला असतो. कलात्मकता साकार होण्यापूर्वी मनात तिची प्रतिमा तयार व्हावी लागते. ती प्रतिमा निरनिराळ्या संवेदन-सूचनांच्या द्वारे व्यक्त होत असते, आणि ते होत असताना कलावंताच्या (एकत्रित) संकलित संस्कारांनी, प्रवृत्तींनी ती अधिक रेखीव व संपन्न होत असते. या प्रक्रियेला टी. एस्. इलियट 'कॉन्सेंट्रेशन' असे म्हणतात. त्यामुळेच कलेतील वास्तव आपणास अधिक प्रत्ययकारी वाटते. 'कॉन्सेंट्रेशन' या शब्दात कोणत्याही कलेचे एकशब्दी वर्णन येते. कलावंत हा आपले पूर्वानुभव व जगाविषयीचा दृष्टिकोण उपयोगात आणून कलाबीजाला अधिक संपन्न करतो,

त्या क्रियेत अंत:प्रेरणेच्या योगाने त्याच्या विचाराचे सोने होते, साध्या कोळशाचा हिरा होतो. आणि शेवटच्या अवस्थेत त्यावर पुन: पैलू पाडले जातात, म्हणजे पुन: परिष्करण होते, व कलाकृतीची दिव्यता प्राप्त होते.

ही प्रक्रिया होत असताना मूळचे जे कारणात्मक कलाबीज आहे, ते अतिशय मागे राहाते, जो प्रत्यक्षातला बीजरूप अनुभव आहे, तो मागे राहतो. कारण ते केवळ निमित्त असते. तेथून दीर्घ अशा सर्जनात्मक क्रियेची सुरुवात असते व लेखकाचे मन संबंधी कलात्मकतेस अनुरूप असा मालमसाला धुंडाळण्यात व त्याला योग्य अशा प्रकारचा आकृतिबंध शोधण्यात गुंग झालेले असते. निरनिराळ्या लेखक-कलावंताचे याबाबतचे अनुभव पाहिले, तरी ह्या वस्तुस्थितीचा प्रत्यय येईल. त्या आकृतिबंधाला प्लेटो 'फॉर्म' म्हणतो, क्लाइव बेल 'सिग्निफिकंट फॉर्म' म्हणतो, इलियट एकचित्तत्वा (कॉन्सेंट्रेशन) मुळे निर्माण झालेली नवी वस्तू म्हणतो, पॉल एन्जल त्याला 'इंटेन्सिव्ह विजडम्' म्हणतो तर सी. ई. एम्. ज्योड 'जिच्यातून वास्तवाकडे आपण पाहू शकतो अशी खिडकी', 'a window through which we stare upon reality'[5] असे तिचे वर्णन करतो. यावरून चिंतनपर लेखकाच्या व कलावंताच्या लेखनप्रक्रियेतील साम्य स्पष्ट होईल. एका वास्तवाकडे वा सत्यदर्शनाकडे जाण्याचे हे दोन मार्ग आहेत. त्यांच्यांत भिन्नता असली तरी मुख्य टप्पे सारखेच आहेत.

: ४ :

कलाकृती निर्माण करणाऱ्याला निर्माता व वाङ्मयीन कलाकृती निर्माण करणाऱ्याला 'निवेदक' असे म्हणता येईल. कलावंताचे प्रमुख कार्य म्हणजे कलाकृती तयार करणे, हे होय. कवीचे कार्य म्हणजे एखादी चांगली कविता तयार करणे. वाचकाला कवीच्या अनुभवांशी समरस व्हावयाचे असेल तर ती कविता समंजसपणे व सहानुभूतिपूर्वक वाचणे, हे त्याचे कर्तव्य ठरते. याचा अर्थ कवीचे कर्तव्य सर्जन हे आहे, तर रसिकाचे कर्तव्य म्हणजे कवीने जे सर्जन केले असेल त्याच्यावर ते समजून घेण्याच्या दृष्टीने चिंतन करणे हे होय. या ठिकाणी त्याला 'अभिग्रहण' हा शब्द सुचविला आहे. कलाकृतीचा निर्माता आणि तिच्या स्वरूप-चिंतनात रस घेणारा तिचा आस्वादक या दोघांच्या मनोवृत्तीशी एकरूप न होणारी परंतु या दोघांच्या मनाचा संपर्क सांधणारी मध्यस्थ स्वरूपाची एखादी प्रसंस्था (ऑरगॅनिझम) अस्तित्वात असली पाहिजे. अशी संस्था म्हणजे 'प्रतीक' होय. मग ते एक असेल किंवा अनेक प्रतीकांचा तो गट असेल, ते प्रतीक/ती प्रतीके कलावंताला भासमान झालेले वास्तव अनुकृत करीत असते/असतात.

कलाकृती या प्रतीकांच्या द्वारेच कार्य करतात. संगीत कलेत अगदी प्राथमिक पातळीवरले प्रतीक म्हणजे ध्वनी, चित्रकलेत रंग, संगीतात वरच्या अवस्थेत सुरास ताल, आवाजाचा लहानमोठेपणा, सुरेलपणा, चित्रात रंगांच्या विविध छटा इ. नी अधिक विविधता आणली जाते, तसेच वरच्या अवस्थेत चित्रकार आपल्या प्रतीकांचा वापर अधिक नाजूकपणे करीत असतो. संगीतकार निरनिराळे भाव सुरांच्या द्वारे साकार करतो. हे जरी खरे असले तरी प्रत्यक्ष चित्र म्हणजे निरनिराळे रंगरेषा व संगीत म्हणजे सुरावट होय. वास्तव हे प्रतीकात्मरीतीने आविष्कृत झालेले असते व ते त्याला साजेशा पद्धतीने रसिकांकडून आकलित व्हावे लागते.

साहित्याच्या बाबतीत आणखी अडचणी उद्भवतात. इतर कला त्यांच्या माध्यमाद्वारे विशिष्ट वास्तव तात्काळ समूर्त करतात. कारण त्या ऐंद्रिय पातळीवर अस्वाद्य होतात. साहित्याचे तसे नाही. त्याचे माध्यम शब्द हे आहे. हा लहानातला लहान घटक व मोठा घटक म्हणजे प्रत्यक्ष वाङमयीन कलाकृती. या दोन घटकांना जोडण्याचे कार्य उपमारूपकादी अलंकार, चित्रस्वरूप वर्णन व इतर तत्सम क्लृप्त्या करीत असतात. यांच्या द्वारे एखाद्या लघुलिपीप्रमाणे अतिशय गंभीर व सूक्ष्म असा आशय प्रतीकात्मकतेने व कित्येकदा प्रतिमारूपाने साकार होत असतो.

एखादे लहान मूल नवे नवे अनुभव किंवा दृश्ये त्याच्या पद्धतीने व्यक्त करीत असते. गारा पडलेल्या पाहून त्यांना ते 'पावसाच्या बिया' म्हणेल, तर कटिंग-सलूनमधला अनुभव सांगताना 'तेथे फडक्याने बांधून ठेवतात व वरून पाऊस पाडतात' असे वर्णन करील. डॉक्टर थर्मामीटर झटकतात हे पाहून, रोग्याचा ताप 'डॉक्टर त्या थर्मामीटरद्वारे शिपडून टाकतात' असे ते सांगेल. अशा रीतीने आपापले अनुभव आपापल्यापरीने सांगण्याचे कसब लहानपणी असते. त्यावेळी आपले मन 'उघडे' असते, ताजे असते, म्हणून परिणामकारक रीतीने व्यक्त होते. पण पुढे पुढे व्यवहारातल्या भाषेचे स्वरूप-संकेत अंगवळणी पडतात, व आपले अनुभव अभिनव रीतीने व्यक्त करण्याची आपली ही कुशलता लोप पावते. कविलोक मात्र ती काही प्रमाणात कायम ठेवतात. त्यांना ती तशी ठेवावी लागते. त्यासाठी त्यांना नवे-जुने शब्द, शब्दसंहती ह्यांचा कौशल्यपूर्ण वापर करून त्यात नवा आशय आणण्याचे प्रयत्न करावे लागतात. भाषेवर चांगलेच प्रभुत्व संपादन करावे लागते, पण ते भाषाशास्त्रज्ञाच्या पद्धतीचे नव्हे. योग्य ठिकाणी त्याच्या दृष्टीने योग्य शब्द योजण्याचे कौशल्य. एखादा इतिहाससंशोधक आपल्यापुढे उपलब्ध असणाऱ्या घटितांचे उपयोजन ज्या कौशल्याने व नेमकेपणाने करतो, त्या प्रकारे संपादन करावे लागते. त्यासाठी लेखकाला आजपर्यंत जे श्रेष्ठ कवी, लेखक होऊन गेले आहेत, त्यांच्याशी जवळ जवळ एखाद्या स्पर्धेत उतरावे लागते. त्यातूनच नवी नवी रूपके, प्रतीके निर्माण होतात.

काही कालखंडांत त्यांना एवढे अतिरिक्त महत्त्व प्राप्त होते की, त्याविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून एखादा कवी काव्याला त्यांची काही आवश्यकता नाही, असेही प्रतिपादितो. परंतु मोठ्या लेखकांची साक्ष पाहिली, तर ते आपल्याला दिसलेल्या वास्तवाच्या प्रकटीकरणासाठी नव्या शब्दसंहतीच्या शब्दांच्या शोधात असतात, असे आढळून येईल. जेव्हा एखादा लेखक आपल्याला भासमान वास्तवाला शब्दांकित करतो त्यावेळी जी प्रतीके तो वापरतो ती, त्याचे अवलोकन व चिंतन समूर्त करण्याच्या दृष्टीने अधिकाधिक संपन्न असावीत अशी दक्षता तो घेत असतो. एका परीने त्याच्या ज्ञानधारणशक्तींना व कल्पनाशक्तींना मिळालेले आव्हानच तो स्वीकारीत असतो.

या विवेचनावरून कलेचे जे प्रतीकात्मक स्वरूप असते ते लेखकाच्या चिंतनातून कसे साकार होते व ती चिंतनक्रिया एखाद्या विचारप्रधान लेखन करणाऱ्या लेखकासारखीच कशी असते ते स्पष्ट होईल.

: ५ :

आतापर्यंतच्या विवेचनावरून लेखनामागील कल्पना व प्रत्यक्ष लेखन कोणत्या मूलाधारांवर आधारलेले असते, व त्यांचे कार्य कसे चालते, आणि लेखकाच्या ठायीच्या चाणाक्षपणामुळे छोट्या छोट्या अंगोपांगांचे वाङ्मयीन कलाकृतीत कसे अवतरण होते, हे स्पष्ट झाले असेल. हे सारे सत्याधिष्ठित आहे. चांगल्या कलेचे रहस्य एकरूपता (फ्यूजन), एकचित्तता (कॉन्सेंट्रेशन) व उत्कटता (इंटेन्सिटी) ह्या गुणांत सामावलेले आहे. ही उत्कटता कलांगांना आकृतिबंधात बसविणे, आणि वास्तवाचे प्रतीकात्म रूपांतर करणे ह्या क्रियांशी तद्रूप झालेली असते. जर एखादे अंग कलाकृतीच्या आकृतिबंधाशी तद्रूप झाले नसेल, आणि त्याचे विवेचन तांत्रिक स्वरूपात व स्वतंत्ररीतीने करावे लागले, तर ते कलाकृतीच्या अयशस्वितेचे द्योतक मानावे लागेल. पंडिती काव्यातील अतिरिक्त आलंकारिकतेचे उदाहरण ह्या संदर्भात लक्षणीय ठरेल. निरनिराळी अंगोपांगे एकमेकांत विलीन होऊन गेली पाहिजेत, लोखंड व कोळसा यांचे पोलादात रूपांतर होते तसे. त्याचप्रमाणे एखाद्या भागाचा आशय त्यातील गद्य-आशयांशी एकरूप होण्यासारखा असेल, तर तेही कलाकृतीच्या अपयशाचेच अंग मानावे लागेल.

अशा रीतीने लहान लहान प्रतीकांचा वापर करून, त्यांतून मोठे प्रतीक म्हणजे प्रत्यक्ष वाङ्मयीन कलाकृती निर्माण करणे, हे कलानिर्मिती-क्रियेचे मुख्य अंग होय. वर उल्लेखिल्याप्रमाणे एखाद्या लहान मुलाच्या बोलण्यात स्वारस्ययुक्त

असे उल्लेख वा वाक्ये येत असली, किंवा एखादी व्यक्ती एखाद्या घटनाप्रसंगाचे वर्णन आपापल्यापरीने एखाद्या कादंबरीत शोभावे, अशा आकर्षकरीतीने करीत असली, तरी तो लहान बालक अगर ती व्यक्ती काही वाङ्मयीन कलाकृती निर्माण करीत नाही. वाङ्मयीन कलाकृतीच्या निर्मितीत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे संरचनेचा (स्ट्रक्चर) होय. पूर्वतयारीच्या अवस्थेपासून लेखकाच्या मनात हा प्रश्न निर्माण झालेला असतो. प्राथमिक स्वरूपाची तयारी पूर्ण झाल्या-नंतर लेखकाच्या मनात योग्य अशी संरचना कशी करावी ह्याविषयी चिंतन सुरू होते. आपापल्यापरीने प्रत्येक कलाकृतीची संरचना स्वतंत्र असते, व तिचे संरचनात्मक प्रश्न तसे वेगळे असतात. आपल्या हाती असलेल्या साधनसामग्रीला साजेसा असा संरचनाबंध कसा शोधावयाचा हा मुख्य प्रश्न कलाकारापुढे असतो. हा शोध म्हणजे एखाद्या नोकराचा शोध नसून एखाद्या सहकाऱ्याचा शोध होय. कारण खऱ्या सहकाऱ्याप्रमाणे खरी संरचना ही देवघेव करीत असते. म्हणजे काही गोष्टी ती आपणांस देते व आपल्याजवळील काहींचा ती स्वीकार करीत असते. तिच्या सक्रिय सहकार्यामुळे सामग्री व तिची पद्धती यांच्यांत एकप्रकारचे अविभा-ज्यत्व निर्माण होऊन त्या दोन्हीपेक्षा वेगळा व अधिक स्वतंत्र असा एक घाट, आकृतिबंध तयार होतो. त्याला खराखुरा घाट किंवा 'एसेन्शियल फॉर्म' असे म्हटले जाते. संस्मरणीय अशा साधनसामग्रीचे कित्येक हजार शब्दांच्या विस्तारात विशिष्ट पद्धतीशी एकरूपत्व होऊन जेव्हा एखादी यशस्वी लघुकथा निर्माण होते तेव्हा त्याला 'छोटेसे आश्चर्य' (लिटल मिरॅकल) अशी संज्ञा देणे योग्य होईला असे एडवर्ड जे. ओब्रायनने म्हटले आहे, ते लक्षणीय आहे. लेखकाने जे मिळविलेले असते त्याला 'आश्चर्यकारक' म्हणण्यापेक्षा 'कष्टपूरित' म्हणता येईल. एकंदर परिणाम हा कितीही पूर्वयोजितासारखा असो, वरवर सारे कसे सीधे सरळ आणि सोपे वाटत असले तरी, जे साधलेले असते ते कठोर निवड, साक्षेप व संघटकता यांनी ते मिळविलेले असते.

ज्या विशिष्ट परिस्थितीत व तऱ्हेने कलावस्तू ही कलाकृतीपण धारण करते आणि लेखक-निरपेक्ष जीवन जगण्याचा प्रयत्न करते, ती सर्व क्रिया म्हणजे लेखकाला मिळालेले एक आव्हानच असते. अखंड सावधतेने आपल्या सामग्रीतून योग्य साधनांची निवड करणे, ती निवड करीत असता, जे काही समर्पक वाटत नसेल ते कठोरपणे टाकून देऊन त्याच्या जागी त्यापेक्षा सरस असे काही निवडणे, ही प्रक्रिया कलावस्तूला योग्य असा आकार मिळेपर्यंत पुनः पुनः परिष्करण करीत राहून सतत चालू ठेवणे, व कलाकृतीला मनाजोगता घाट आल्यानंतर तेथेच थांबणे, ह्या सर्व गोष्टी एखाद्या सेनापतीने एखाद्या मोठ्या हल्ल्याची तयारी

करावी, इतक्या बारकाईने डोळ्यांत तेल घालून चाललेल्या असतात. साहजिकच या सर्व प्रक्रियेत प्रयत्नांनी व बुद्धिपुरस्सर मिळविण्याचा भाग बराच असतो, हे सारे लेखकाच्या जागृत मनाला करावे लागते. जागृत मनाला यापेक्षा किती तरी विविध प्रकारचे कार्य करावे लागते. त्याचे वर्णन गंगाधर गाडगीळ यांनी 'ललितलेखक आणि तंत्र' या आपल्या लेखात चांगल्या रीतीने स्पष्ट केले आहे.

ललितलेखनाची जी प्रक्रिया आपण आतापर्यंत विस्ताराने पाहिली तर ती एक 'शिस्त' आहे हे आपणास पटेल. आणि त्या शिस्तीकडे लक्ष दिले तर कोणत्याही उच्च अभ्यास-विषयाप्रमाणे ललितलेखनाचे अनुशासन मानणे अग्राह्य मानण्याचे कारण नाही. उच्चस्तरावरून अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला एखादा प्रबंध किंवा तत्सम लेखन तयार करण्यापेक्षा एखादे नाटक, एखादी कादंबरी अगर काही कविता करणे निश्चितपणे अधिक सोपे वाटणार नाही. असे कल्पनाधिष्ठित लिखाण बिनचूक अवलोकन आणि माहिती यांच्यांवर आधारलेले असणार, त्याच्या निर्मितीसाठी ज्या शब्दांचा वापर करावयाचा, त्या शब्दांचे ज्ञान एखाद्या कसलेल्या भाषाविज्ञानशास्त्रज्ञाला शोभेल असे असेल. त्याच्या रचनेसाठी एखाद्या नाणावलेल्या टीकाकाराप्रमाणे निर्णायक शक्तीचा वापर त्याला करावा लागला असेल, आणि त्याच्या उभारणीसाठी जी निवड व संरचना करावी लागली असेल त्यासाठी एखाद्या वाङ्मय-इतिहासकाराइतके अध्ययन व चिंतन त्याला करावे लागले असेल. अशा वाङ्मयीन कलाकृतीला जर 'खोली' किंवा व्यापकता आणावयाची असेल, तर त्यासाठी तात्कालिक व सार्वकालिक यांच्यांमधील नेमका फरक त्याला जाणता आला पाहिजे, तसेच सामाजिक तत्त्वज्ञानात्मक अगर सौष्ठवशास्त्रीय प्रश्नांचे मूलग्राही आकलन लेखकाला झाले असले पाहिजे.

यासाठी खरे सांगावयाचे तर ललितलेखनाचे स्वतंत्र असे प्रशिक्षणयोग्य अनुशासन अस्तित्वात आणावयास हवे. या अनुशासनाच्या योगाने अशा प्रकारचे विशेषीकरण (स्पेशलायझेशन) होईल की, त्यायोगे अभ्यासकाचे मन असे व्यापक होईल की बाह्य व आंतरिक अशा दोन्ही क्षेत्रांत त्याला गती येईल. त्याप्रमाणे जीवनातील महत्त्वाच्या समस्यांची त्याला जाण येईल. कोणत्याही गंभीर स्वरूपाचे कल्पनाधिष्ठित लेखन तीन निकषांवर उतरले पाहिजे. ते तीन निकष म्हणजे, त्यात जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते काय ? ते लेखन जीवनावर काही प्रकाश पाडते काय ? व त्यातून वास्तवदर्शन घडते काय ? हे होत.

या सर्व विवेचनावरून काही पूर्वग्रह सोडून दिले तर ललितवाङ्मयलेखन हे वाङ्मयीन विद्वत्तेच्या इतर परिक्षेत्रांप्रमाणे एक परिक्षेत्र म्हणून मानण्यास प्रत्यवाय नसावा. भाषाशास्त्र, वाङ्मयेतिहास व वाङ्मय-समीक्षा ही वाङ्मयीन

विद्वत्तेची ज्ञानक्षेत्रे एकमेकांपासून जेवढी भिन्न आहेत त्यापेक्षा त्यापासून ललित-वाङ्मयलेखन हे विशेष भिन्न आहे असे नाही, असे पटेल. ललितलेखन-प्रक्रियेतील थोडासा भाग तर्कगम्यतेच्या क्षेत्रात तंतोतंतपणे पडत नाही, एवढेच. आधुनिक मानसशास्त्रीय ज्ञानामुळे ललितवाङ्मयाचे लेखन हे कोणत्याही इतर लेखना-प्रमाणेच होते, हे आपण पाहिले आहे. ललितवाङ्मयाशी संबद्ध असणारे प्रतीक, आकृतिबंध, संरचना, सत्यदर्शन हे विषय तसे तर्कबुद्धीच्या कक्षेपलीकडे कसे पडत नाही, हेही आपण पाहिले आहे.

ललितवाङ्मय ही संकल्पना तशी आधुनिक आहे. ललितवाङ्मयास योग्य प्रतिशब्द इंग्रजीत तसा नाही. काव्य हा शब्द प्राचीन काळी व्यापक अर्थाने वापरला जात असे, पण मुद्रणाच्या शोधानंतर गद्याचे स्वरूप व्यापक झाले, निरनिराळे गद्यप्रधान वाङ्मयाभिबंध निर्माण झाले व त्यांतून व्यापक अशी ललित-वाङ्मयाची प्रतिमा साकार होऊ लागली. इंग्रजीत काही काल 'बेल्स लेट्र्स' ही शब्दसंहती वापरली जात असे. अलीकडे ह्या अर्थाने सर्रास 'इमॅजिनेटिव् राइटिंग' हा शब्दप्रयोग वापरला जातो. त्याचे शब्दशः भाषांतर वेगळे होत असले, तरी त्याचा आशय ललितवाङ्मय ह्या शब्दाने व्यक्त होतो, असे म्हणता येईल. कल्पनाधिष्ठितता व नवनिर्माणक्षमता हे त्याचे विशेष होय. परंतु ह्या कल्पनाधिष्ठित व निर्मितिगुणप्रधान वाङ्मयाला स्वतंत्र संरचनात्मक अधिष्ठान आहे, त्यादृष्टीने त्याचा अभ्यास व्हावयास हवा हा आग्रहही तुलनेने अलीकडचाच आहे. या ठिकाणी आपण वाङ्मयाशी संबद्ध असणारी विविध ज्ञानक्षेत्रे विचारात घेतली आहेत, त्यांत ललितवाङ्मयलेखनाचा समावेश करावयास हरकत नाही हे मत प्रतिपादिले आहे. पण अनेकांच्या ललित-वाङ्मयासंबंधीच्या कल्पना भिन्न असल्याने त्याचा समावेश एक स्वतंत्र अनुशासन म्हणून वाङ्मयीन विद्वत्तेत करणे, त्यांना विवाद्य वाटेल त्यासाठी एवढे विवेचन केले.

## : ६ :

ऐतिहासिक दृष्टीने पाहू गेले तर काव्याची परंपरा ही प्रामुख्याने विद्वत्ते-चीच परंपरा आहे, असे दिसून येईल, काव्य हे प्रामुख्याने शिक्षणाचा विषय असल्याने त्याचे अध्यापन विद्वानांकडून होई, आणि काव्यलेखन करणारे कवी हे चांगले विद्वान असत. विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या कालात तर कवी म्हणजे शिक्षक असे मानले जाई. मुद्रणोत्तर कालात स्वच्छंदवादाचा उदय होईपर्यन्त ही परंपरा

तशी अविच्छिन्नपणे चाल होती, औद्योगिक क्रांतीनंतर जो व्यक्तिवाद निर्माण झाला, त्याचे वाङ्मयक्षेत्रीय आविष्करण वा अवतरण म्हणजे स्वच्छंदवाद होय. व्यक्तिवादाच्या पोटी ज्याप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्याचा उदय झाला, नवजागृत व्यक्तीला ज्याप्रमाणे आपणांवरील विविध बंधनांची जाणीव होऊन त्या बंधनां-विरुद्ध त्याची तीव्र प्रतिक्रिया झाली, त्याप्रमाणेच वाङ्मयक्षेत्रीय व्यक्तिवादी कवीला आपणांवरील वाङ्मयसंकेतात्मक बंधने झुगारून द्यावी असे वाटू लागले, त्यातूनच स्वच्छंदवादाचा उगम झाला. ह्या वाङ्मयक्षेत्रीय विविध बंधनांत विद्वत्तेचे बंधन त्याला तोडून टाकावेसे वाटले. त्यासाठी कवीचे कलावंताचे क्षेत्र, कार्य इ. सारी अपूर्व आहेत, काव्ये ही स्फूर्तीच्या क्षणी निर्माण होतात, काव्य हे बुद्धिप्रधानतेच्या विरोधी आहे, इ. विचारांचा पुरस्कार व प्रभाव वाढू लागला. व्यक्तिवादाचा जसजसा प्रसार व प्रभाव वाढत गेला तसतशी ही काव्याच्या, कलेच्या दिव्यते-विषयीची कल्पनाही अधिक दृढमूल झाली आणि ते लोण आपणांपर्यंत आलेले आहे. वस्तुतः हा 'बंडाचा झेंडा' उभारणारे सारे कवी हे कमालीचे व्युत्पन्न वा विद्वान होते. कारण त्यांच्या मनबुद्धीचे भरणपोषण पूर्वकालीन विद्वत्ताप्रधान परंपरेनेच झाले होते. सर मॉरिस बावरा हे आपल्या 'पोएटस् अ‍ॅण्ड स्कॉलर्स' या निबंधांत रोमँटिक संप्रदायी कवींच्या विद्वत्तेविषयी म्हणतात ते लक्षणीय आहे. ते म्हणतात, 'Coleridge was indeed in his extraordinary way a scholar, Keats would have liked to be one.[6]" हे सारे कवी कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या अतिरिक्ततेच्या आहारी गेले होते. परंतु त्यांची ध्येये उदात्त होती, व तत्त्वज्ञानाच्या अध्ययनाने ती पूरित झाली होती. पण नंतरच्या कालात शिक्षणाचा जो प्रसार वाढला त्यात पूर्वीचा वाङ्मयप्रधान अभ्यासक्रम संपुष्टात आला, त्यामुळे नंतरच्या कालातील कवींचा विद्वत्तेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला आहे, तेच लोण आपणापर्यंत आलेले आहे.

तेनचा मागे वाङ्मयेतिहासाच्या व्याख्यानात उल्लेखिलेला सिद्धान्त संपूर्णतया खरा नसला तरी त्यात सत्यांश आहे हे नाकारून चालत नाही. परिस्थितीचा परिपाक म्हणून लेखक, वा कोणताही मोठा मनुष्य होत नसतो हे खरे आहे, पण त्याचा अर्थ मोठ्या लेखकाची मनोधारणा संपूर्णतया स्वतंत्र असते असे नव्हे. तो ज्या कालात जगत असतो त्या कालातील विचार वा ध्येयविश्वापासूनच तो प्रेरणा घेत असतो. या प्रेरणा युगविचारांशी संपूर्णतया मिळत्याजुळत्या असतात असे नव्हे. त्यांत व्यक्तिगत अंश बराच असतो. त्यामुळे एकाच कालखंडात एकाच युगविचाराचा प्रभाव असताना भिन्न भिन्न प्रवृत्तीचे लेखक निर्माण होतात.

वाङ्मयीन ललितकृतीचे अनन्यत्व मान्य केले आणि तीतील लेखकाच्या निर्मितिशीलतेचे महत्त्व मान्य केले, तरी समकालीन विचार-ध्येयांचे महत्त्व

अमान्य करता येत नाही. विचार व तत्त्वज्ञान क्षेत्रात ज्या प्रणाली रूढ असतात त्यांपासून खरा श्रेष्ठ लेखक अलिप्त राहू शकत नाही. उलट आपापल्यापरीने तो त्यांच्यांशी समरस होण्याचा, सहभागी होण्याचा प्रयत्न करीत असतो. पूर्वकालीन मराठी वाङमयाचा अभ्यास करताना तत्कालीन विविध धार्मिक संप्रदाय यांचा विचार साहजिकच करावा लागतो. आधुनिक आणि अलीकडल्या मराठी वाङमयाचे अध्ययन करताना निरनिराळे सामाजिक, राजकीय विचारप्रवाह, अभिजातवाद, वास्तववाद यांसारखे वाङमयीन संप्रदाय व स्वच्छंदवाद, अस्तित्ववाद इ. सारखे तत्त्वज्ञान व वाङमय यांच्या सीमारेषांवर पडणारे संप्रदाय यांचा अभ्यास हा अटळ ठरतो. कारण निर्मितिप्रक्रियेच्या अनन्यत्वावर खऱ्या लेखकाला विसंबून राहता येत नाही. Poets have other interests beside poetry, otherwise their poetry would be empty, they are poets because their dominant interest have been in their experience and thinking turning into poetry. "[7] हे टी. एस्. इलियटचे मागे एका व्याख्यानात उल्लेखिलेले विधान याही संदर्भात लक्षणीय आहे.

हे सारे लक्षात घेतले तर ललितवाङमयाचे परिशासनाच्या दृष्टीने विचार करणे कसे योग्य आहे हे स्पष्ट होईल. चित्रकला, शिल्पकला अभियोजनकला (डिझाईन) या अशाच निर्मितिप्रधान कला आहेत. चित्रपटासारख्या कलेचे प्रशिक्षणही साक्षेपाने करण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे होत आहेत, हे ह्या संदर्भात लक्षणीय आहे. त्यांचे प्रशिक्षण निरनिराळ्या त्यांच्या अभिवृद्धीला वाहिलेल्या संस्थांतून चालू आहे. त्यासाठी त्याचे परिशासन करण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे चालू आहेत. या प्रत्यक्ष-प्रत्ययी कला आहेत, त्यांचे अधिष्ठान प्रामुख्याने अध्यालोचन (परसेप्शन) हे आहे. त्यामुळे त्यांच्यांत कलावंताच्या–अभ्यासक कलावंताच्या–अभिव्यक्तीला अमर्याद विविधता संभवते. असे असताही त्यांचे पद्धतशीर अनुशासन उत्क्रांत करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यादृष्टीने ललितवाङमयलेखनाचे स्वरूप अनुशासनास कितीतरी अनुकूल आहे. कारण ललितवाङमयाचा अंतिम घटक जो शब्द आहे तो उच्चारक्षम वा लेखनक्षम असला तरी मूलतः तो ज्ञानमय (कॉग्निटिव्ह) आहे. त्यामुळे त्याला व वाङमयाला मनुष्याच्या अनुभवविश्वात व ज्ञानविश्वात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आताच पाहिल्याप्रमाणे त्याचा इतर ज्ञानक्षेत्रांशी घनिष्ट संबंधही आहे. साहजिकपणे त्याचे स्वतंत्र परिशासन वा अनुशासन ही त्याच्या विकासाच्या दृष्टीने एक केवळ अपरिहार्य अशी पायरी आहे.

ललितवाङमयाचे स्वतंत्र अनुशासन केले, तर ते त्याचा गंभीरपणे व विश्वसनीयतेने अभ्यास करणाऱ्या त्याच्या अध्यायींना फायद्याचे होईल. म्हणजे

त्यांच्या जाणिवेची कक्षा रुंदावेल आणि मनाला एकप्रकारचा तल्लखपणा येईल, असे मान्य केले, तरी पुढला महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की, या नव्या ज्ञानशाखेच्या उच्चस्तरावरून अभ्यासल्या जाणाऱ्या इतर अनुशासनांवर त्यांचा कोणता परिणाम होईल? विद्यापीठ म्हणजे एकमेकांशी संबद्ध व एकमेकांवर अवलंबून राहणाऱ्या ज्ञानशाखांचा समूह होय. त्यामुळे ह्या प्रश्नाला थोडे प्रत्यक्ष महत्त्व आहे. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे की, ललितलेखन हे विद्वत्क्षेत्रीय अनुशासन वा प्रशिक्षण-क्षेत्र म्हणून मानले गेले तर त्याचा परिणाम सर्व प्रकारच्या लेखनावर अनुकूल प्रकारचा झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे त्या लेखनाची एकंदर प्रत सुधारेल.

आज जे विचारप्रधान व विद्वत्तागुणपूर्ण लेखन नवीन अध्यायींकडून होत आहे ते अतिशय क्लिष्ट व कंटाळवाणे असते अशी त्याच्याविषयी अनेकजण तक्रार करतात. त्याबरोबरच त्याचे समर्थनही अशा रीतीने केले जाते की, विद्वत्ताप्रधान लेखनाची शैली म्हणजे लोकप्रिय लेखनाची शैली नव्हे. अशी जी गंभीर विषयांना वाहिलेली कालिके असतात त्यांतील लेखन स्पष्ट, निसंदिग्ध असते, ते करताना त्या त्या क्षेत्राची परिभाषा व भाषेची निवडही त्या क्षेत्राच्या प्रकृतीला साजेशी केलेली असते. कारण ते लेखन प्रामुख्याने 'तज्ज्ञां'साठी वा त्या क्षेत्राच्या अभ्यासकांसाठी असते, सर्वसामान्य अभ्यासकांसाठी असतेच असे नाही. असा युक्तिवाद करता आला, तरी आपल्या विचारप्रधान लेखनात भाषेच्या दृष्टीने खूपच सुधारणा होण्यास अवसर आहे, हे मान्य करावे लागते. आणि त्याबाबत ललितलेखक बरेच मार्गदर्शन करू शकेल, असे म्हणणे चूक होणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की, ललितलेखनात अवलंबिल्या जाणाऱ्या अनेक क्लृप्त्या-कल्पनांचा अवलंब करून विद्वत्प्रधान (स्कॉलरली) लेखन अतिशय रंजक करता येईल. त्याची काहीतरी मर्यादा ही मानलीच पाहिजे.

एक संभाव्य व चांगला बदल असा होईल की, हे विद्वत्प्रधान लेखन जे एकसारखे लांबत वा वाढत जाते, त्याची लांबी व विस्तार कमी होईल. कारण विद्वत्प्रधान लेखनात शब्दाकडे अतिशय थंडपणे पाहिले जाते, शब्दाला आपल्या बौद्धिक व इतर विश्वात महत्त्वाचे स्थान आहे, हे विसरले जाते व अतिशय संवेदनाशून्य वृत्तीने त्याचा वापर केला जातो. आपले म्हणणे कमी न करता व त्यात उणीवा न राहू देता ते अधिक रेखीवपणे मांडण्याचा अध्यायींकडून प्रयत्न होईल, हे अजमावता येते. ललितलेखकाला शब्द कसा वाटतो हे प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या शब्दांत सांगायचे तर ते असे सांगता येईल. ते म्हणतात : 'ललितलेखन करताना प्रत्येक शब्द जिवंत आहे, चैतन्याने नुसता थुरथुरत आहे अशी जाणीव लेखकाला असते, आणि आपणांस हवा तो शब्द सापडणे म्हणजेच निर्मिती, अशी त्याची भावना असते.[8]' ललितलेखनाचे स्वतंत्र अनुशासन

सुरू झाल्यानंतर एक परिणाम म्हणून सर्वच अध्यायींचा शब्दाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलेल व एकंदर विद्वत्प्रधान लेखनाचा दर्जा उंचावेल.

त्याशिवाय अशा प्रकारची एक विद्याशाखा अस्तित्वात आलेली आहे, आणि काही जण तिच्यात पारंगतत्व मिळवीत आहेत, ही केवळ जाणीव एकंदर विद्वत्प्रधान लेखनाचा कस सुधारण्यास कारणीभूत होईल. एखाद्या विद्यापीठात एखाद्या नव्या विद्याशाखेचा अभ्यास होत आहे व त्या विषयाचे काही प्राध्यापक तेथे आहेत, ह्या केवळ घटनेने विद्यापीठाची प्रतिष्ठा उंचावते, प्रतही चांगली होते. तसे काही घडणे शक्य आहे. आपले विद्वत्प्रधान लेखन (स्कॉलरली राईटिंग) असे का होते याचे कारण शोधून काढणे, तसे फारसे अवघड नाही. ज्या कालिकांतून ते प्रकाशित होत असते, त्यांचा खप त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांपुरताच असतो. आणि त्या विद्वत्प्रधान लेखनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या नियतकालिकांत लिहिणाऱ्यांना तंत्रज्ञ म्हटले जाते. वाङमयाच्या क्षेत्रामधील लेखकांपुढे ही तंत्रज्ञाचा वा शास्त्रज्ञाचा आदर्श असतो, कलाकाराचा नसतो. कारण तो त्या सर्व परिसरात कोठेच नसतो. या वस्तुस्थितीचा परिणाम कोणता होतो हे स्पष्ट करताना डब्ल्यू. एल्. श्रॅम म्हणतात, 'If literary scholars write like scientists....may it not mean that they also think like scientists ?' [९] बहुसंख्य अध्यायी हे वाङमयाभ्यासाकडे प्रयोगशाळेत शास्त्राकडे पाहावे, तसे पाहणारे असतात, असे वाटते. ह्याचा परिणाम म्हणजे प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची 'शास्त्रपुनीत' दृष्टी त्यांच्या ठिकाणी अभिवर्धित झालेली असते. साहजिकच वाङमयकलेकडेही ते 'शास्त्र' म्हणून पाहू लागतात असे झाले की, त्यातून कला ही नेमकी वगळली जाते.

वाङमयाचा कला म्हणून अभ्यास करणाऱ्या अध्यायीने वाङमयेतिहासकाराच्या दृष्टीतून कलेकडे न पाहता कलाकाराच्या दृष्टीतून पाहावयास शिकले पाहिजे, आणि हे ललितवाङमयाचे परिशासन निर्माण झाले तर ते शक्य होईल असे वाटते. त्याचप्रमाणे कवितेसारख्या एखाद्या कलाकृतीकडे एक ऐतिहासिक दस्तऐवज अशा दृष्टीने न पाहता, अगर एखाद्या तत्त्वाचे वा अनुभवाचे ते शब्दरूप आविष्करण आहे असे न मानता, ती व वाङमय ही एक कलाकृती आहे, व त्यादृष्टीने तिचा अभ्यास करावयास हवा, ही दृष्टी वाढीला लागेल. आजची समीक्षा हे तत्त्वतः मान्य करीत असली तरी समीक्षकाची भूमिका लेखकापेक्षा वेगळीच असणार.

लेखक आणि टीकाकार यांचे वाङमयीन क्षेत्रातील स्थान एवढे परस्परावलंबी आहे की, लेखकाला चांगला लेखक होण्यापूर्वी चांगला टीकाकार होणे अवश्य असते. याचा अर्थ लेखकाने समीक्षकाचे (टीकाकाराचे) कसब अगदी पद्धतशीरपणे अंगी बाणवून घ्यावयास हवे असा नाही; त्यासाठी त्याने टीकाकारासाठीचा एखादा

अभ्यासक्रम पूर्ण करावयास हवा असे नाही. त्याचप्रमाणे आपली साहित्यविषयक मते लेखरूपाने समाजापुढे मांडावयासच हवी असे नाही. इतर यशस्वी लेखकांनी लेखनविषयक समस्यांना कसे तोंड दिले, हे जाणून घेण्याच्या दृष्टीने लेखकाने त्यांच्या कलाकृतींचा अभ्यास, मार्मिकतेने करावयास हवा. लेखकाचा मार्ग हा ' एकट्याने शोधावयाचा ' असतो, त्यासाठी त्याला कठोर आत्मपरीक्षण करावयास शिकणे अवश्य असते, त्याचा जर मूळ कल चिंतनशीलतेकडे असेल तर तो आपोआपच कलात्मक श्रेष्ठकनिष्ठतेचे नाते विचार वा नीतिमूल्यांशी जोडील. त्यायोगेच त्याच्या लेखनात कलात्मकता व चिंतनशीलता यांचा समन्वय घातला जाईल. अशा प्रकारे टीकाकाराच्या संगतीने काही प्रवास केल्यानंतर वाङ्मयेतिहास व संशोधनापेक्षा परत त्याचे लक्ष साहित्य व त्याची कलात्मकता तिचे तत्त्वज्ञान यांवर केंद्रित होईल. थोडक्यात डब्ल्यू. बी. यीट्स् म्हणतात त्याप्रमाणे वाङ्मय हाच त्याच्या चिंतनाचा खरा विषय होईल.

वाङ्मयाची—वाङ्मयाचे अध्ययन लेखक म्हणून करण्याची—आवड निर्माण झाल्यानंतर शिक्षणाचे स्वरूपही बदलेल. कारण त्यामुळे वाङ्मयाकडे केवळ ऐतिहासिक दृष्टीने अगर टीकात्मक दृष्टीने न पाहता ते एक कलाविष्काराचे क्षेत्र म्हणून पाहिले जाण्याची शक्यता आहे. प्रारंभीच्या अवस्थेत जेव्हा विद्यार्थी वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वळतो त्यावेळी त्याला वाङ्मयाविषयी एक जिवंत वा चैतन्यपूर्ण अंग म्हणून आकर्षण असते, परंतु जसजसे प्रौढपण येते तसतशी ती ओढ ओसरते, व शेवटी केव्हातरी एकदा वाङ्मयाची आवड होती, एवढेच संस्करण शिल्लक उरते. परंतु लेखक म्हणून वा अनुशासनक्षेत्र म्हणून वाङ्मयाचा अध्यायी झाल्यानंतर एक असा फरक पडण्याची शक्यता आहे की, त्याचे वाङ्मयासंबंधीचे आकर्षण सदैव ताजे राहील. लेखनाची आवड कायम राहील. आणि त्याचा परिणाम वाङ्मयासंबंधीचे एकंदर अध्ययन अध्यापन सुधारण्यात होईल. अशा रीतीने ललितलेखनाचा अभ्यास सुरू झाला तर एक मोठा फायदा असा होईल की, लेखकाला ललित लेखन-प्रक्रियेची ' अंतर्गत बाजू ' माहित झाल्यामुळे लेखनाविषयी वा वाङ्मयाविषयी तो अधिक आत्मविश्वासपूर्वक व जाणीवपूर्वक बोलू शकेल.

नाहीतरी आदर्श अध्यापकाच्या ठिकाणी आपण अध्यायी (स्कॉलर)-टीकाकार, व लेखक यांचे गुण एकवटलेले असावेत असे आपण अपेक्षित नाही काय? अध्यायी हा साधनसामुग्रीचे व्यवस्थापन करून घटितांचे स्वरूप स्पष्ट करतो, टीकाकार हा मूल्यनिदान करतो, तर लेखक कलेचे नव्या तऱ्हेने अंतरंग-दर्शन घडवितो. ही अंगे ज्याच्या ठिकाणी एकवटलेली असतात तो श्रेष्ठ शिक्षक, प्राध्यापक, लेखक होतो. वांङ्मयाची प्रतिष्ठा अशांनीच वाढविली आहे. ललितवाङ्मयाचे अध्ययन अशा रीतीने एक स्वतंत्र अनुशासन म्हणून सुरू झाल्यानंतर परिस्थिती कशी

मूलभूत रीतीने बदलेल त्या विषयाचा समारोप करताना डब्ल्यू. एल्. श्रॅम आपल्या "इमॅजिनेटिव्ह राइटिंग" या लेखात म्हणतात ते लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणतात, "If the study of imaginative writing will make for better teaching, it will make for better scholars. Teachers who are themselves trained in the discipline of writing and reading as artists, may reasonably be expected to train scholars who will be better equipped to understand, explain and judge an art."[10]

: ७ :

या संबंधात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लेखकांचा होय. लेखनकलेचे अंग ज्यांना आहे त्यांनी ह्या अभ्यासक्रमाचा स्वीकार करून ग्रंथालये व परिसंवादांत आपणास गुंतवून घ्यावे काय? त्यामुळे त्यांचे लेखनांग खुरटून जाण्याचा धोका त्यांनी पत्करावा काय ?

प्रथम हे स्पष्ट केले पाहिजे की जो खरा जन्मसिद्ध लेखक आहे, त्याला अशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची आवश्यकता नाही. प्राचीन (पूर्वकाली) श्रेष्ठ मराठी कवी अगर लेखक कोणत्याही विद्यापीठात गेलेले नव्हते. शेक्स्पीयर कॉलेजात अगर विद्यापीठात कधीच गेला नव्हता. त्याला शिकविण्यासारखे विद्यापीठाजवळ काहीच नव्हते. उलटपक्षी असेही काही लेखक दाखविता येतील की, त्यांना विद्यापीठीय शिक्षणाचा फायदा मिळाला तरी लेखक म्हणून ते विशेष उपयुक्त ठरले नाही. उलटपक्षी एखाद्याची लेखक म्हणून पात्रता अगदी बेताची असेल, असा लेखक या प्रकारच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमामुळे लेखक म्हणून न बनता उत्तम प्रकारचा वाङ्मयाभिज्ञ बनेल. असे असले तरी योग्य प्रकारचा विद्यापीठीय अभ्यासक्रम लेखकाला फायद्याचा होऊ शकेल. स्पष्ट म्हणायचे तर विद्वानाला विद्यापीठीय शिक्षणाचा विद्वान होण्यासाठी जेवढा फायदा होतो, त्यापेक्षा लेखकाला असल्या अभ्यासक्रमापासून अधिक होईल.

त्याचबरोबर हेही खरे आहे की, विद्यापीठे ज्याप्रमाणे शिक्षक, वकील, डॉक्टर इंजिनिअर, व्यापारी....तयार करतात त्याप्रमाणे लेखक तयार करण्याचा उपक्रम कोणत्याही विद्यापीठाने केलेला नाही. अलीकडे पाश्चात्य देशात काही ठिकाणी तशी सुरुवात झाली असेल. लेखनकला कोणासही शिकविणे शक्य नाही. ते देणे मूळातच असावे लागते. त्याशिवाय असा अभ्यासक्रम तयार केला तरी लेखकाचे लेखनकौशल्य मोजणे व त्याची (इतर व्यावसायिक प्राविण्याप्रमाणे) ग्वाही देणे

अशक्य आहे. एखाद्या डॉक्टर अगर अर्थशास्त्रज्ञ...अगर शिक्षक यांच्या बाबतीत त्याने ह्या विषयाचा अभ्यास केला आहे, असे स्पष्ट शिफारसपत्र देता येईल. पण लेखनाच्या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अध्यायीच्या बाबतीत, 'याला उत्कृष्ट नाटके लिहिता येतील, तो चांगली कादंबरी लिहू शकेल किंवा तुम्ही सांगाल त्याप्रमाणे लघुकथा, काव्य लिहू शकेल', असे सांगता येणे अशक्य आहे, हे आपण सर्वजण जाणतो. इतर विषयांच्या अध्यायींसाठी विद्यापीठ कार्यक्रम आखून देऊ शकेल पण तसे येथे काही करता येणार नाही. त्याचप्रमाणे इतर विषयांत ज्याप्रमाणे प्रावीण्यदर्शक पहिला दुसरा इ. वर्ग देण्याची पद्धती आहे, तिचाही अवलंब या बाबतीत कितपत करता येईल, ते सांगता येत नाही.

तसेच हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ज्याप्रमाणे स्वतंत्रपणाने लेखनास वाहून घेण्याचे काहीजण ठरवितील, त्याप्रमाणे काहीजण विद्यापीठातील अधिक उच्चतर पदवी संपादन करतील वा शिक्षकाचा व्यवसाय स्वीकारतील. अशी एखादी पदवी संपादन केली तर त्यांच्या ठिकाणची लेखनाची आवड कोमेजून जाईल, असे अनेकांना वाटेल. पण आजच्या अनेक लेखकांनी पदवी संपादन केलेली आहे. मोठमोठ्या पाश्चात्य लेखकांनी आवड म्हणून विद्यापीठीय अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. टी. एस्. इलियट यांनी मेटॅफिजिक्स व संबद्ध विषयांचा हॉवर्ड विद्यापीठात अनेक वर्षे राहून अभ्यास केला. त्यायोगे त्यांच्या कवित्वशक्तीला बाधा आली असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे कॉलेजात अध्यापन करण्याने लेखन-कुशलता कमी होते, असे कोणीच म्हणू शकणार नाही. कितीतरी नामवंत मराठी लेखक–कवी कॉलेजात प्राध्यापक आहेत. कित्येकदा तर साहित्यक्षेत्र त्यांनीच व्यापून टाकल्याची तक्रार पण ऐकू येते. अर्थात सर्वच लेखकांनी विद्यापीठ पदवी संपादन करून पावन होण्याची आवश्यकता नाही. अशा रीतीने विद्यापीठीय अभ्यासक्रम वा त्याच्याशी संबद्ध असणारे अनुशासन यांच्या मर्यादा मान्य केल्या पाहिजेत, पण हे करून सुद्धा विद्यापीठातील लेखनाचे अभ्यासक्रम लेखकासाठी काय करू शकेल हेही लक्षात घेणे अवश्य आहे.

ललितवाङ्मयाचा अनुशासनबद्ध अभ्यास होण्याच्या आवश्यकतेचे आणखी एक कारण म्हणजे ललितवाङ्मयाची ललितकलांशी निर्माण झालेली जवळीक ही होय. ललितवाङ्मय हे पूर्वी शिक्षणाशी अविभाज्यपणे गुंफले गेले होते, हे मागे अनेकवार आपण पाहिले आहे. नंतरच्या कालात त्याची सांगड तत्त्वज्ञानात्मक, नैतिक, वैचारिक क्षेत्रांशी, सामाजिक क्षेत्रांतील जाणीवविषयक चढउतारांशी घातली गेली. हे चालू असता वाङ्मय आपले स्वतःचे वेगळे व्यक्तित्व सिद्ध करीत होते, त्यादृष्टीने त्याचे स्वतःचे असे शास्त्र वाङ्मय-समीक्षा रूपाने निर्माण झालेले आहे. त्याचा परामर्श एका व्याख्यानात आपण स्वतंत्र

रीतीने घेतलेला आहे. त्या क्षेत्रात वाङ्मयीन मूल्ये वा निकष यांनाच प्राधान्य असावे असा विचार चांगलाच बद्धमूल झालेला आहे, हेही आपण विचारात घेतले आहे. अलीकडे वाङ्मयाची ज्ञान, नीति, तत्त्वज्ञान, समाजविचार इ. क्षेत्रांशी फारकत झालेली आहे. ह्यासबंधीचे सर्व उल्लेख हे वाङ्मयबाह्य ठरविले जातात, आणि त्या दृष्टीने वाङ्मयातील कलात्मकतेला सौष्ठववत्तेला प्राधान्य देऊन ते त्याचे मध्यवर्ती केंद्र ठरवून त्याचा अभ्यास व्हावा, अशा प्रवृत्तीने चांगलाच जोर धरलेला आहे.

ह्या दृष्टिकोनातून पाहिले तर वाङ्मयाचे इतर संबंधी सामाजिक शास्त्रांशी साधर्म्य न विचारता घेता त्याचे ललितकलांशी साधर्म्य कल्पून अभ्यास व्हावा असा विचार वाढत आहे. या विचारात तथ्य असले तरी वाङ्मयाचा समावेश कधीकाळी ललितकलांत संपूर्णपणे होईल असे वाटत नाही. आविष्करण-पद्धती, माध्यम, कलाकृतीची एकंदर आशयघनता आणि कलाकाराच्या जीवनाशी व व्यक्तिमत्त्वाशी असलेले अविभाज्यत्व, इ. बाबतीत वाङ्मयाची भूमिका एवढी स्वतंत्र व स्वयंनिष्ठ आहे की, ललितकलांशी त्याचे संपूर्ण अविभाज्यत्व मानणे अयोग्य आहे.

शिवाय ललितकला त्यांच्या माध्यमाच्या दृष्टीने इतक्या भिन्न भिन्न पातळ्यांवर आहेत की, कलात्मतेची सुबुद्धता व सूक्ष्मता काही ललितकलांनाच साधते. वाङ्मयाखेरीज इतरांचे आकलन केवळ ऐंद्रिय पातळीवर असते. त्यादृष्टीने ललितकलांची दृश्य व श्राव्य अशी विभागणीही करता येते. पण वाङ्मय हे आपल्या स्वरूपवैशिष्ट्याने ह्या दोन्ही प्रकारच्या कलांत बसते व बसत नाहीही. साहजिकपणे त्याची प्रत वेगळी मानावी लागते. वाङ्मयाचे माध्यम 'शब्द' हे आहे, ते ध्वन्यत्मक स्वरूपात श्राव्य आहे व लिखित रूपात दृश्य आहे. कोणत्याही स्वरूपात ते वर्ण्य वा आविष्करण विषयाशी वा आशयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसते. वाङ्मयसंस्काराची सारी क्रिया ही कमालीची गुंतागुंतीची आहे, म्हणजे शब्द ज्या स्वरूपात रसिकापर्यंत येईल त्या स्वरूपात ज्ञानधारणा शक्तीशी तो एकरूप होतो. त्यामुळे त्याच्या मनात ऐंद्रिय वा तत्सम संवेदना प्रतिमा रूपाने जागृत होतात, एवढे झाल्यानंतर त्या आस्वाद्य बनतात, व नंतर पुढची आस्वादक्रिया सुरू होते. अनेक प्रकारच्या प्रतिमा मनोविश्वात निर्माण होतात. त्याचे चांगले वाईट वा सामान्यपण आपण आपल्या अनुभव-अभिरुचीप्रमाणे ठरवीत असतो. हे सर्व चालू असता आस्वादन, आकलन, चिंतन चालू राहते, त्यातून वाङ्मयाचा शेवटी जो मनावर संस्कार होतो तो एवढा संमिश्र असतो की इतर कोणत्याही कलेच्या संस्कारांशी त्याचे साधर्म्य संभवत नाही. तुलनेसाठी चित्र, शिल्प, नाट्य, संगीत ह्या कलांच्या संस्कारांचा वापर करता येईल, पण तो फक्त तुलनेसाठीच. उदाहरणाने सिद्ध करावयाचे तर या कलांतील काही 'संप्रदायांनी' म्हणजे

प्रवृत्तींनी वाङ्मयात प्रवेश मिळविलेला आहे. पण त्या प्रवृत्तींचे त्या कलांतील आविष्करण व वाङ्मयातील आविष्करण यात काहीच साम्य नाही. साम्य असेल तर ते नावाचे. रेने वेलेक यांनी हा मुद्दा चांगला स्पष्ट केला आहे.[11]

: ८ :

ललितवाङ्मयाच्या स्वतंत्र अनुशासनाची आवश्यकता आणखीही एक महत्त्वाच्या कारणासाठी आहे. ते कारण म्हणजे लेखकाचे जीवनातील असणारे स्थान हे होय. इतर कलाक्षेत्रांतील कलावंतांशी तुलना करता वाङ्मयक्षेत्रीय कलाकारांचे स्थान संस्कृतिविकासाबरोबर उत्क्रांत होत आलेले आहे.

अगदी प्राथमिक समाजावस्थेत समाजाची सामूहिक भावना प्रभावी असते. अर्थात अशा अवस्थेत समाज जवळजवळ एकावयवी असतो. त्यामुळे त्याला लागणारे निरनिराळे कसबी व कलावंत त्याच्यातून आपोआप निर्माण होतात. सामूहिक जीवनाशी व्यक्तिजीवन एवढे मिळून गेलेले असते की, जो कलाविष्कार असतो तो व्यक्तीचा न राहता त्या समूहाचा होतो. अगदी प्रारंभीच्या अवस्थेत मनुष्य गुहांत राहात असताना त्याने काढलेली चित्रे आजही पाहावयास मिळतात, त्यांचा कर्ता हा अज्ञात असतो. कारण ती कला ही समाजाची कला असते. ती खरी लोककला असते व्यक्तीची नसते. नृत्य, नाट्य, संगीत इ. कलांनाही हेच लागू पडते.

परंतु जसजसा समाज उत्क्रांत वा प्रगत होऊ लागतो, तसतसा तो अवयवबद्ध होत जातो. निरनिराळे व्यवसायी, वेगळे जीवन जगावयास सुरुवात करतात. समाजात निरनिराळे थर निर्माण होतात, श्रेष्ठ-कनिष्ठ श्रेणी निर्माण होते. गटागटांत, थराथरांत सहकार्य–संघर्ष–क्रिया सुरू होतात. समाज गतिशीलतेच्या दिशेने वाटचाल करीत असतो व शेवटी एक गट हा प्रमुख बनतो, तो सधन बनतो, अधिकारी सत्ताधीश बनतो, वाङ्मयाशिवाय इतर कला त्याच्या कक्षेत येतात — परंतु वाङ्मयकला तशी त्याच्या हातांत आल्यासारखी वाटते, पण तशी ती थोडी स्वतंत्र असते, प्रत्यक्षपणे नव्हे पण अप्रत्यक्षतेने सत्ताधारी वर्गावर तिचे वर्चस्व, प्रभुत्व सुरू होते. एक प्रकारची यशापयशाने भरलेली ओढाताण सुरू होते.

रामायण-महाभारतासारखी काव्ये ज्यांनी लिहिली ते ऋषी, मुनी, तपस्वी, द्रष्टे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या काव्यांच्या द्वारा त्यांनी समकालीन राज्यकर्त्यांच्यापुढे उच्च आदर्श ठेविले आहेत. स्वतः कवी राजाश्रयाची फारशी परवा करताना

दिसत नाही. राज्ययंत्रणेला नैतिक अधिष्ठान असावे, असा त्यांचा प्रयत्न दिसतो. अशा रीतीने हे आद्य लेखक, कवी, द्रष्टे, ज्ञाते असे आहेत. समाजाला शिकवावे ही त्यांची जिद्द आहे. ते खरोखरच द्रष्टे मानवी आदर्शाचे चिंतन केलेले महान तपस्वी असल्याने, त्यांचे आदर्श पुढे येणाऱ्या समाजाला दीर्घकाल मानवले. ह्या पहिल्या अवस्थेतील कवी हे सर्वज्ञ असे आहेत. ते कलावंत असले तरी त्यांच्यांत कवी, तत्त्वज्ञ व समाजोद्धारक ह्या तीन भूमिकांची एवढी सरमिसळ झाली आहे की, त्यांचे काव्य हे केवळ काव्य न राहता त्यापेक्षा काहीतरी बरेच अधिक आहे. त्यामुळे त्यांचे हे लेखन उत्तरकालीनांच्या नवार्थशोधनाला नेहमी अवसर देत आले आहे.

त्यानंतर राजा ही संस्था सुस्थिर झाली. तिने सत्ता, वैभव, प्रभुत्व संपादन केले, त्याच गोष्टींचे गुणगान व्हावेसे तिला वाटू लागले. कलावंताच्या गुणांना त्यासाठी उत्तेजन द्यावे असे वाटू लागले. समाज बराच अवयवबद्ध झाला. त्याच्यात व्यवसायीपणाही दृढमूल झाला, त्यातूनच कवी, नाटककार उदयास आले. हे सारे व्युत्पन्न, पंडित खरे पण पूर्वकालीन कवींप्रमाणे द्रष्टे ज्ञानी इ. नव्हते. ते राजाश्रयी असत. त्यामुळे त्यांचा वाचकवर्ग अथवा आश्रयदाता रसिकवर्ग ठरलेला होता. तो सुसंस्कृत, बह्वंशी व्युत्पन्न, वा विद्येचे संस्कार झालेला असे, त्यामुळे कवित्व व पांडित्य यांची परंपरा कशी कायम राखली गेली हे आपण मागे पाहिले.

महाराष्ट्रात मध्ययुगीन कालात जे संत कवी निर्माण झाले; त्यांचे साधर्म्य पूर्वीच्या आर्षकवींशी कल्पिता येईल. प्रभावी राज्यसंस्था अस्तित्वात नसल्याने त्यांना तसे लोकश्रयी व्हावे लागले. व्युत्पन्नता जरी होती तरी ती पूर्वीच्या चाकोरीत बसणारी नव्हती. त्यांना आत्माविष्कारप्रधान असा अभंग, प्रवचन, कीर्तन असा मार्ग चोखाळावा लागला. ह्यांपैकी अनेकजण जनसामान्यांतून निर्माण झाले होते. पुढे राजपद स्थिरावले, तेव्हा परत राजाश्रयी अशा पंडितकवींची मालिका निर्माण झालेली दिसून येते. ह्या साऱ्या कवींच्या शिक्षणाची तशी सार्वजनिक तरतूद काही नव्हती, तरी आपापल्यापरीने प्रत्येकाने प्राचीन भारतीय परंपरेच्या अधिष्ठानभूत तत्त्वज्ञानाचा नीतिपरंपरेचा अभ्यास केलेला होता.

इंग्रजी राजवटीनंतर मध्यमवर्गातून लेखक पुढे येऊ लागले. सर्वांसाठी सार्वत्रिक शिक्षणाची तरतूद झाली, तरी पहिले शतक तरी विशिष्ट समाजथरातले लोक शिकून बाहेर पडले, त्यांच्यावर इंग्रजी विद्येचे संस्कार झाले होते, नवीन ज्ञानसंपादनाचे मार्ग त्यांना उपलब्ध झाले होते, तरी पहिल्या व्याख्यानात स्पष्ट केल्याप्रमाणे या शिक्षितवर्गाचे संबंध प्राचीन भारतीय परंपरेशी व्यापकतेने मिळतेजुळते असेच राहिले. त्यामुळे आधुनिक विज्ञान जरी आले तरी ह्या वर्गातून पुढे

आलेले लेखक विचारवंत प्राचीन परंपराविचार यांच्या संस्कारांपासून अलिप्त नव्हते. स्वातंत्र्योत्तर कालात शिक्षणाचा जो झपाट्याने प्रसार झाला आहे वा होत आहे त्याचे एक अंग असे आहे की, प्राचीन विद्येचे दृढ संस्कार न झालेला वर्ग मोठ्या प्रमाणात विद्यापीठांच्या व उच्च शिक्षणाच्या कक्षेत आलेला आहे. त्यांच्यांपैकी जो विज्ञानशास्त्रे व सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासास वाहून घेतो त्याचे बौद्धिक भरणपोषण त्या त्या क्षेत्रातील ज्ञानाने वा परिशासनाने होते.

वाङ्मयीन क्षेत्राकडे येणाऱ्यांसाठी या क्षेत्रीय ज्ञानसाधनेसाठी नव दिशा-दर्शनाची जरूरी आहे, त्यातूनच हा उपक्रम हाती घेतला आहे, हे पहिल्या व्याख्यानात आलेले आहे. याच वर्गातील, व वाङ्मयाकडे येणाऱ्यांपैकी ज्यांच्या ठिकाणी सर्जनशक्ती सुप्तपणाने वसत आहे, त्यांच्या त्या शक्तीच्या विकसनासाठी ललितवाङ्मयाच्या शिक्षणाची सोय हवी. तसेच त्यासाठी त्याच्या प्रकृतीशी मिळतेजुळते असे अनुशासन असावयास हवे आहे. सुधारलेल्या देशांत तशी तरतूद निरनिराळ्या प्रकारांनी केली जाते. आपल्याकडेही आता तशी वेळ आलेली आहे. ज्यांच्यावर पूर्वकालीन विद्या–कला–वाङ्मय यांचे संस्कार झालेले नाहीत, अशा अनेकांना लेखनकला जन्मतः स्फुल्लिंगरूपात आत्मसात असेल, पण तो स्फुल्लिंग फुलवून त्याला अधिक संस्कारक्षम रूप देणे हे काम व्हावयास हवे. तसे झाले नाही तर त्याची ती निर्मितिशक्ती वेगळ्याच दिशांनी कार्यवाही होईल व अतिशय नवे नवे प्रश्न निर्माण होतील. प्रत्यक्षात आज तसे होत आहे.

नवलेखकांना ह्या प्रकारची ज्ञानशाखा उपलब्ध करून देऊन त्यांची अभिरुची परिष्कृत करणे अवश्य आहे. नव्हे ती आजची गरजही आहे. ललितवाङ्मयाचे ज्या ललितकलांशी साम्य कल्पिले जाते, त्यांच्याबाबत काय वस्तुस्थिती आहे? त्याही आपापल्या परीने अधिक संघटित होत आहेत, आपल्या अभिवृद्धीसाठी त्या निरनिराळ्या 'अकादमी'सारख्या उच्चसंस्था निर्माण करीत आहेत. त्या संस्थांच्या योगाने त्या कलांना समाजात अधिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, ही जशी इच्छा आहे, तसेच त्या त्या कलेचे अध्यापन, प्रशिक्षण अगर संशोधन अधिक साक्षेपाने व उच्चस्तरावर व्हावे अशीही एक इच्छा असते. त्या कला, ह्या व्याख्यानात थोड्या वेळेपूर्वी पाहिल्याप्रमाणे प्रामुख्याने ऐंद्रिय पातळीवरच आस्वाद्य होतात. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण वा कलासंपादनकार्य त्याच पातळीवर कष्टपूर्वक, मेहनतपूर्वक, रियाझपूर्वक चालू असते, त्याची वारंवार आवश्यकता असते, त्यामुळेच त्या कलेशी अविभाज्यत्वे निगडित झालेले 'तंत्र' आत्मसात होत असते, ते झाल्यानंतर कलावंत म्हणून त्या त्या क्षेत्रातील कलावंताचा स्वतंत्र विकास सुरू होतो. कोणत्याही अवस्थेत कलेशी प्रत्यक्ष रूपाने, सरावाच्या रूपाने सतत संपर्क ठेवावा लागतो.

पण ललितकलांपैकी ज्या कलांना थोडेफार बौद्धिक अंग असते, अशा चित्र-कलेसारख्या कला नवे नवे संप्रदाय निर्माण करतात, त्या संप्रदायांची विशिष्ट बौद्धिक दृष्टीने जाणून घेण्यासारखी भूमिका असते, याचाच अर्थ वरच्या अवस्थेत या कला आपले स्वत:चे असे 'अनुशासन' करून घेण्याच्या प्रयत्नात असतात. त्या दिशेने जवळ जवळ प्रत्येक ललितकला प्रयत्नशील आहे. मग ललितवाङमयाने तसे का नसावे, मागे का रहावे असा प्रश्न निर्माण होतो. दृक्प्रधान कलांनी तर या दिशेने खूपच मजल मारली आहे. इतकेच नव्हे त्यांच्या तांत्रिक प्रगतीला 'तंत्रविद्या' असे म्हणणे अन्वर्थक होईल. (अहमदाबाद येथे 'डिझाईन' या संस्थेतर्फे चालू असलेल्या विविध उपक्रमांचे स्वरूप पाहिले तर ह्याची जाणीव कोणालाही होईल.) दृश्यकला ह्या नवनिर्मितिशीलतेच्या दृष्टीने विलक्षण विविधतासंपन्न आहेत. त्यांना साजेसे अनुशासन करणे हे अत्यंत कठीण आहे. तरीही त्या दिशेने त्यांनी केलेली प्रगती नेत्रदीपक अशी आहे. केवळ ऐंद्रीय पातळीवर वावरणाऱ्या कलांना जर स्वत:चे असे स्वतंत्र 'ज्ञानक्षेत्र' निर्माण करता येते, स्वत:च्या प्रकृतीला साजेसे अनुशासन करता येते, तर साहित्यासारख्या अधिक सर्वंकष व समावेशक विद्यांगाला ते का करता येऊ नये, हा खरा प्रश्न आहे.

अशा प्रकारे आतापर्यंत ललितवाङमय हे वाङमयीन विद्वत्तेचे स्वतंत्र परिक्षेत्र मानणे का आवश्यक आहे व ललितवाङमय हे प्रकृतीने निर्मितिप्रधान असले तरी निर्मितीमागील जी मानसिक प्रक्रिया आहे ती इतर वाङमयीन विद्व-त्तेच्या परिक्षेत्रांना सर्वसामान्य असणाऱ्या चिंतनप्रधान प्रक्रियेशी मिळतीजुळती कशी आहे हे आपण पाहिले. त्याचप्रमाणे ललितवाङमय हे अधिकाधिक प्रमाणात ललितकलांच्या जवळ कसे जात आहे, आणि यापुढे त्याचा चेहरामोहरा ललित-कलांशी कसा मिळताजुळता राहणार आहे, तेव्हा त्याही दृष्टीने ललितवाङमयाचे स्वतंत्र अनुशासन् कसे अपरिहार्य ठरते हे पण आपण विचारात घेतले आहे. शेवटी, लेखकाचा सामाजिक अन्वय संस्कृतिविकासाबरोबर कसा बदलत आलेला आहे, आणि आजच्या परिस्थितीत पुढे येणाऱ्या लेखकाला त्या दृष्टीने दिशादर्शन व्हावे अशी आवश्यकता कशी निर्माण झाली आहे, हे पण आपण विचारात घेतले आहे. अगदी शेवटी ललितकला या दिशेने प्रयत्नशील कशा आहेत आणि ललित वाङमयाला मागे राहून कसे चालणार नाही हेही पाहिले आहे.

: ९ :

अशा रीतीने वाङमयीन विद्वत्तेच्या क्षेत्रात ललितवाङमयलेखन हे परिक्षेत्र आहे असे मान्य केले व त्याचे स्वतंत्र अनुशासन मान्य केले तरी सर्वात महत्त्वाचा

प्रश्न हे सारे प्रत्यक्षात उतरावयाचे कसे हा होय. कारण नुसती तात्त्विक आवश्यकता मानून फारसे काही भागणार नाही. अमेरिकेत हा प्रयोग सुरू झाल्याला दोन तीन दशके झाली आहेत. त्यांनी तेथे कांही विद्यापीठांनी अध्यासने निर्माण करून प्रथितयश व तोलामोलाच्या लेखकांना सरळ प्राध्यापक म्हणून नेमले. अर्थात त्यांना अभ्यासक्रम इ. तयार करण्याचे स्वातंत्र्य दिले. त्यांच्याकडे व इंग्लंडमध्येही श्रेष्ठ ललितलेखकांना विद्यापीठांत सामावून घेण्याची पूर्वी प्रथा होती, पण नंतरच्या काळात विद्यापीठातून ललितवाङमय-लेखकांना वगळण्याचे धोरण स्वीकारले गेले. कित्येक दिवस समकालीन वाङमय त्याला 'ऐतिहासिक' महत्त्व प्राप्त होईपर्यन्त विद्यापीठांतून वगळले जाई. कारण विद्यापीठातील अभ्यासक्रम हे इतिहास व प्राचीन वाङमयाला प्राधान्य देणारे असत. या शतकाच्या तिसऱ्या चवथ्या दशकात जेव्हा विशिष्टता-प्रधान (स्पेशलाइज्ड) अभ्यासक्रम इतर विषयांच्या बरोबरीने निर्माण होऊ लागले. तेव्हा त्यात वाङमयविद्येचा ऊर्फ वाङमयीन इतिहास व समीक्षेचा समावेश विद्यापीठातील अभ्यासविषयांत होऊ लागला. आणि मग हलके हलके वाङमय-प्रकार, कालखंड यांच्या अभ्यासाच्या अनुषंगाने समकालीन व विशेषत: ललित-वाङमय विद्यापीठाच्या कक्षेत आणले गेले. हे जवळ जवळ या क्रमाने आपल्याकडे झालेले आहे. आधुनिक भारतीय भाषांना व त्यांतील आधुनिक वाङमयाला विद्यापीठांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळून जेमतेम निदान महाराष्ट्रात तरी पाव शतक लोटले असेल.

आणखीही एक वस्तुस्थिती अशी की, हा सर्व अभ्यासक्रम तयार करण्याचा भाग झाला. शिकविण्याचे महत्त्व तर स्वातंत्र्यकाल उजाडेपर्यन्त पटलेले नव्हते. म्हणजे तोपर्यन्त जवळ जवळ सर्व विद्यापीठे केवळ परीक्षा घेणारी होती. निरनिराळे अधिविभाग (डिपार्टमेंटस्) निर्माण करून तेथे व्यासंगी प्राध्यापक नेमणे, हे तर हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या विद्यापीठांतून व एक दोन विषयांपुरते व शास्त्रांपुरते म्हणजे केवळ अपवादभूत स्वरूपात चालू होते. भाषा व त्यांचे वाङमय यांच्या विद्यापीठीय प्राध्यापनाकडे लक्ष गेले ते केवळ अगदी अलीकडे—म्हणजे गेल्या दहावीस वर्षांत. तेव्हा विचार करावयाचा तर केवळ या व्याख्यानाच्या विषयापुरता (ललितवाङमयापुरता) न करता या व्याख्यानमालेत चर्चिलेल्या सर्वच परिक्षेत्रांपर्यन्त त्याची व्याप्ती वाढवावी लागेल.

साहजिकच विद्यापीठीय अधिविभागांचा विकास करताना वाङमयेतिहास, (प्राचीन व अर्वाचीन) वाङमयसमीक्षा, भाषा व भाषाशास्त्र या परिक्षेत्रांचा पद्धतशीर अभ्यास व विकास होईल, या दृष्टीने या विषयांची स्वतंत्र अध्यासने पद्धतशीर निर्माण करणे अवश्य आहे. ही किमान गरज आहे. एवढे

झाल्यानंतर मग या विद्याशाखांतर्गत जे नवनवीन विषय किंवा अनुशासने निर्माण होतील. त्यांसाठी स्वतंत्र अध्यासने तयार करणे ही अर्थात आपणाकडील परिस्थितीच्या दृष्टीने खूपच पुढची पायरी होय. ते केव्हा शक्य होईल ते होवो, पण त्या दिशेने आपणास वाटचाल करावयाची आहे, हे लक्षात ठेवणे अवश्य आहे कारण तसे झाले तरच 'वाङमयीन विद्वत्ता' खऱ्या अर्थाने व निरनिराळ्या दिशांनी विकसित होऊ शकेल.

अर्थात मा. मधुकरराव चौधरींसारखा एखादा वाङमयप्रेमी शिक्षणमंत्री लाभला, अगर ह्या ठिकाणी मांडलेल्या कल्पना-विचारांना जोराची चालना मिळाली तर कदाचित हे सारे नजीकच्या भविष्यात घडू शकेलही. तसे झाले तर वाङमयीन विद्वत्तेच्या इतर परिक्षेत्रांबरोबर ललितवाङमयाच्या स्वतंत्र अध्यासनाची व प्रशिक्षणाची तरतूद होऊ शकेल. हा एक पर्याय झाला.

## : १० :

प्रथम अभ्यासक्रमाविषयी थोडे विवेचन करणे अवश्य आहे. ललितलेखना-विषयीचा हा अभ्यासक्रम असल्याने त्याचे आरेखन अतिशय स्थूल असेल व त्यात विविधतेला प्रयोगशीलतेला वाव असण्याइतका समावेशकपणा असेल. ललितवाङमयाचे विविध प्रकार प्रसिद्ध आधुनिक व प्राचीन कृतींच्या आधारे अभ्यासले जातील, हे अध्ययन अर्थातच टीकात्मक वा समीक्षापर असे न राहता त्या ललितकृतीशी लेखकाच्या दृष्टीने कसकशी घडण घडली हे मध्यवर्ती सूत्र लक्षात ठेवून अभ्यास केला जाईल. वाङमयीन ललितकृतीचे अंतरंग कसकसे घडत जाते हे आतून (फ्रॉम इन्साइड) पाहिले जाईल, त्याचप्रमाणे एकंदर निर्मितिप्रक्रियेचा पद्धतशीरपणे अभ्यास करण्यावर भर राहणे, हे अर्थातच अपरिहार्य आहे.

ललित वाङमय हे ललितकलांच्या अधिकाधिक जवळ जात आहे हा उल्लेख मागे अनेकदा आलेलाच आहे. साहजिकपणेच इतर ललितकलांच्या अभ्यासास अवलोकनास महत्त्वाचे स्थान यात राहणार आहे. त्याचा पूर्वेतिहास व आधुनिक स्वरूप जाणून घेत असता त्यांचे असे काही प्रश्न असतील (विशेषत: निर्मिति-क्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचे) त्यांचीही माहिती अपेक्षित असेल. विद्यापीठाशी संबद्ध असा हा अभ्यासक्रम राहणार असल्याने वाङमयीन विद्वत्तेशी संबद्ध असणारे जे इतर विषय आहेत त्यांचेही सहकार्य फायद्याचे होऊ शकेल.

पण या बाबतीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षक हा होय. हा अभ्यासक्रम ललित वा निर्मितीशील लेखनाचा असल्याने मार्गदर्शनासाठी नाणावलेल्या ललितलेखकाची योजना होणे अवश्य आहे. "The most important requirement is that the 'Master' be a wise man who has been or is a practicing artist and has learned to read with an artist's eyes.[11] असे डब्ल्यू. एल्. श्रॅम म्हणतात, ते लक्षणीय आहे.

अर्थात फार मोठा लेखक हे काम घेणार नाही. घेतले तर ठीकच. पण उत्साही लेखक अधिक बरा. कारण मोठ्या लेखकाचे मन मोकळे असणे कठीण असते. तो स्वतःच्याच तंत्रविशेषांच्या आहारी जाण्याचा संभव असतो. विख्यात लेखकाचे सतत मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे असते. तो नुसताच मार्गदर्शक नसतो तर विद्यार्थ्यांशी समरस होणारा, निरनिराळ्या प्रयोगांची मनमोकळेपणाने चर्चा करणारा, व त्यांना स्फूर्ती देणारा असा असणे अवश्य आहे. ह्याबाबतीत हा विशिष्ट वर्ग असण्यापेक्षा छोटे गट असणे अधिक बरे. विद्यार्थ्यांच्या लेखनाचे सामुदायिक वाचन, त्यावर चर्चा, एखादे नाटक एखाद्याने लिहिले असेल तर त्याचा प्रयोग करण्याची तरतूद विद्यापीठाच्या खर्चाने व्हावी. त्याचप्रमाणे त्यावर चर्चा, त्याशिवाय इतर विद्याशाखांशी साधला जाणारा संबंध इत्यादींनी व प्रत्यक्ष अनुभवाने ह्या शिक्षणास एक प्रकारचा आकार येत राहील. आपण निवडलेल्या निर्मितिप्रकारापेक्षा इतर प्रकारांशी संपर्क साधण्यास विद्यार्थ्यास कोणताही मज्जाव नसावा. आणि अभ्यासक्रमाच्या शेवटी एखाद्या विद्यार्थ्याने प्रबंधाऐवजी वा उपप्रबंधाऐवजी (डिझर्टेशन) जर एखादी प्रकाशित करण्यायोग्य व चांगली अशी कादंबरी अगर नाट्यकृती सादर केली तर त्याबद्दलही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ती मान्य करून त्याला विद्यापीठाची पदवी देण्यास प्रत्यवाय नसावा, त्याचप्रमाणे वाङ्मयासंबंधी परिसंवाद, चर्चा, इत्यादींना अवसर असावा. या चर्चांची व्याप्ती केवळ ललितवाङ्मयाच्या विद्यार्थ्यांपुरती मर्यादित न ठेवता वाङ्मयीन विद्याशाखेच्या इतर परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांचाही त्यात समावेश असावा. म्हणजे ललितलेखनकृतीची चर्चा अधिक सर्वंकष व त्यादृष्टीने उद्‌बोधक ठरेल. हे स्पष्ट करताना प्रा. श्रॅम म्हणतात,

"The scholar, critic and artist will be encouraged to work, side by side, each learning from, each teaching the other, since art including the literature will be stimulated to each other to mutual advantage"[12] असे परस्पर साहाय्य उपयुक्त ठरेल.

या अभ्यासक्रमाची पूर्णता केलेले विद्यार्थी चांगले ललितलेखन करतील वा न करतील, ते त्यांच्यांवर अवलंबून असणार, परंतु त्यांना वाङ्मयलेखनकलेचे

'आतून' दर्शन घडलेले असेल आणि तिच्यासंबंधी इतके बरेचसे नवीन कळलेले असेल की, त्यांची वाङ्मयीन निर्मितिक्षमता व जाण अधिक सखोल होईल.

ललितवाङ्मय ही ललितकला असल्याने ललितकलांमध्ये रियाझ, प्रत्यक्ष सराव आणि तंत्रात्मक बाह्य गोष्टींत वाकबगारपणा व प्राविण्य, ह्या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे उदंड ललित लेखन प्रत्येक अध्यायीकडून करवून घेणे हे केवळ अपरिहार्य आहे. त्याच्या ठिकाणी वाङ्मयदृष्टचा उच्च लेखनगुणांचा विकास होवो अगर न होवो ललितवाङ्मयाला लालित्य प्राप्त करून देणारे जे विशेष आहेत ते त्याच्याकडून आत्मसात केले गेले पाहिजेत, व त्यादृष्टीने हे करवून घेतलेले ललितलेखन त्याला अतिशय उपयुक्त ठरेल. एकदा हे कौशल्य साध्य झाल्यानंतर एक चांगला लेखक म्हणून नाव मिळविणे व ते चरितार्थाचे साधन म्हणूनही उपयोगी पडणे हे केवळ शक्य व्हावे. कारण त्याशिवाय अभ्यासक्रमाला प्रात्यक्षिक महत्त्व राहणार नाही, तो जीवनोपयोगी राहणार नाही, जीवनाच्या गरजेतून तो निर्माण झाला असे दाखवून देता येणार नाही. त्याचप्रमाणे वाङ्मयविषयाला वाहिलेले एखादे नियतकालिक संपादन करणे हा अनुभवही त्या ठिकाणी विचारात घेता येईल. वाङ्मयीन क्षेत्रातील कर्तृत्वाचे (करीअर) ते एक महत्त्वाचे अंग आहे. अनेक श्रेष्ठ व अव्वल दर्जाच्या लेखकांनी वाङ्मयीन कालिकांच्या संपादनाने आपल्या वाङ्मयीन कार्यास प्रारंभ केलेला आहे. आणि त्याच्या वाङ्मयक्षेत्रीय कर्तबगारीस या संपादनकार्याचा वाटा मोठा आहे. संपादनाने फार मोठे शिक्षण मिळते.

लेखक म्हणून त्याचे महत्त्वाचे काम शब्दांकनाचे वा आविष्करणाचे असले तरी त्या शब्दप्रभूमागे चिंतक असावयास हवा. तसे झाले तरच वाङ्मयक्षेत्रात महत्त्वाचे कार्य त्याला करता येईल. आपले म्हणणे आग्रहाने प्रभावशाली रीतीने आणि बिनचूकपणे मांडणारे अनेक लेखक आढळून येतील. पण त्या लेखनात चिंतनामुळे येणारा सखोलपणा असेलच असे नाही. त्याचे लक्ष तत्कालिकावरच खिळलेले असते. ज्यावेळी एखादा विषय चिंतनशीलतेला आव्हान देणारा असतो त्यावेळी ही उणीव स्पष्टपणे दिसून येते. अशा वेळी ते अर्धपक्व सिद्धान्ताचा अवलंब करतात व लोकप्रिय मतांचा पुरस्कार करतात. या अंगाकडे अशा प्रकारच्या अभ्यासक्रमात भर देता येईल.

या बाबतीत आणखी एक दक्षता घेणे आवश्यक आहे, विषयाकडे आकृष्ट होण्यासाठी मोठमोठी बक्षिसे ठेवणे जरूर नाही, नव्हे ते टाळले पाहिजे. बक्षिसाच्या लालसेने लेखनकलेचे अंतरंग जाणून घेण्याकडे वाङ्मयाध्यायीचे दुर्लक्ष होईल. बक्षिसांच्या मागे लागलेले लेखक निर्माण करण्यापेक्षा लेखनगुणांची

साधना करणारे लेखक तयार करणे हे महत्त्वाचे आहे. बक्षिसांची उणीव अभ्यास व परिश्रमपूर्वक मिळविलेल्या पदवीने त्यांना भरून काढता येईल. कारण ती त्यांच्या ठिकाणच्या खऱ्या वाङ्मयगुणांचा विकास घडवून आणील. वर उल्लेखिलेल्याप्रमाणे त्यांची एखादी तोलामोलाची ललितवाङ्मयकृती पदवी-परीक्षेच्या प्रबंधाऐवजी स्वीकारणे अधिक योग्य होईल. अशा रीतीने हा नवा अभ्यासक्रम एखादा धंदेवाईक अभ्यासक्रम शिकवावा त्या पद्धतीने शिकविला न जाता, या विद्यापीठीय अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट त्या त्या विषयाचे अनुशासन, त्याच्या परिचयाचे करून देणे हे राहील.

प्रत्यक्षात या अनुशासनाचे स्वरूप कसे राहील ते या विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थी त्यादृष्टीने जी जाण दाखवितील व जे उपक्रम करतील, त्यांवर अवलंबून आहे. लेखन, लेखनाला आवश्यक असणारे चिंतन, विचारप्रधान लेखनाला आवश्यक असणाऱ्या चिंतनाशी बरेच मिळतेजुळते असते, हे आपण मागे पाहिले आहे. त्याचा अर्थ या अनुशासनाचे स्थूल रूप विचारप्रधान लेखनाशी मिळतेजुळते राहील. परंतु ललितलेखनाच्या सर्जनशीलतेमुळे त्याची नियंत्रणकेंद्रे अप्रकट मनात (सबकॉन्शस माईंड) असतात, त्यांचा वापर यथार्थतेने कसा करावयाचा हे, ही लेखनकला ज्यांनी अंतरंगातून पाहिली आहे, अशा यशस्वी सर्जनशील लेखक-प्राध्यापकांनी स्पष्ट करावयाचे आहे. त्यातून ललितलेखनाच्या प्रकृतीशी मिळतेजुळते असे त्याचे स्वतःचे अनुशासन पुढेमागे निर्माण होईल.

श्रेष्ठ लेखक कलावंत निर्माण करणे कोणालाच शक्य नसते. तो स्वतःच्या प्रयत्नांनीच मोठा होणार असतो, परंतु आधुनिक जीवनाची गुंतागुंत एवढी वाढली आहे की, मूळात स्फुल्लिंग असून भागत नाही. तर त्याला योग्य मार्गदर्शन होणे, योग्य वातावरणात त्या स्फुल्लिंगाचा विकास होणे हे अवश्य असते. ते प्रयत्न-पूर्वक केले तर मोठे लेखक आपोआप निर्माण होतील. ते होणे न होणे कोणाच्याही हाती नसते, परंतु वाङ्मयाचे कलात्मक अंग सदैव विकसनावस्थेत ठेवणे हे अत्यंत महत्त्वाचे असते ते ह्या उपक्रमाने साध्य होऊ शकेल.

## : ११ :

वर ह्यासाठी विद्यापीठाचा व विद्यापीठीय वातावरणाचा उल्लेख वारंवार केलेला आहे. वाङ्मयीन विद्वत्ता ही विद्यापीठीय ज्ञानसाधनव्यवस्थेतील एक विद्याशाखा आहे आणि त्यादृष्टीने विद्यापीठाचा उल्लेख हा केवळ अपरिहार्यतेने आलेला आहे. परंतु परिस्थितीप्रमाणे त्यात थोडा बदल करावयास हरकत नाही.

आपली विद्यापीठे विकासावस्थेत आहेत. त्यांना सर्वमान्य विद्यापीठीय विषयांच्या अध्यापन–संशोधनक्षेत्रात खूप प्रगती करावयाची आहे. ती झाल्याविना ह्या अभिनव स्वरूपाच्या 'विद्वत्क्षेत्रा'कडे व त्याच्या अनुशासनाकडे विद्यापीठांचे लक्ष जाईल असे वाटत नाही. कारण वाङ्मयविद्याशाखेपेक्षा सामाजिक शास्त्रे व वैज्ञानिक शास्त्रे या दृष्टीने अधिक प्रभाव गाजवितील, ती तशी संघटित आहेत व वर्तमानकेंद्रित आहेत.

भारतातील व महाराष्ट्रातील विशिष्ट परिस्थिती पाहता हा उपक्रम करणे योग्य आहे असे ठरले, त्यादृष्टीने योजना इ. तयार केली तर तिची कार्यवाही विद्यापीठांवर सोपविण्यापेक्षा निरनिराळ्या साहित्य-परिषदांकडे सोपविणे अधिक योग्य होईल असे मला वाटते. नाहीतरी नव्या वातावरणात साहित्य-परिषदांना तसे 'कार्य' काहीच नाही. विद्यापीठाकडे रास्तपणे असणे योग्य अशा एखाद्या प्रकल्पाचे (वाङ्मयीन इतिहासाचे वा एखाद्या कोशाचे) काम हाती घेणे व त्यात विद्यापीठीय प्राध्यापक–अभ्यासकांचा उपयोग करून घेणे, हे सारे ठीक असले, तरी विद्यापीठाशी स्पर्धा केल्यासारखे होते. कारण ह्या उपक्रमामुळे विद्यापीठात वाङ्मयविद्याशाखेची प्रतिष्ठा कमी होते, तिला तसे कार्यच राहात नाही. ह्या योजना घऊ नयेत असे नव्हे, पण त्यापेक्षा या ठिकाणी सुचविलेली ललितवाङ्मय शाखेचे लेखनाध्यापन करण्याचे काम हाती घेणे समुचित ठरेल. साहित्य-परिषदेत ललितलेखकांना प्राधान्य हवे अशी अनेकांची अपेक्षा असते, व ती रास्तही आहे. कारण अभ्यास-पूर्वक पदवी मिळविलेले प्राध्यापक विद्यापीठात स्थान मिळवून येथेही त्याच्याच जोरावर वर्चस्व संपादन करतात. त्यांचे सहकार्य अर्थात अवश्य आहे. पण या ठिकाणी पाहिल्याप्रमाणे ललितलेखनक्रियेच्या अंतरंगाभ्यासाकडे दुर्लक्ष झाले आहे. साहित्य परिषदेसारख्या संस्थांनी त्या दिशेने कार्यवाही केल्यास ललित-लेखनाला आधिवैद्यिक (ॲकॅडेमिक) प्रतिष्ठा लाभेल आणि एक नवे वातावरण निर्माण होईल. आज असल्या उपक्रमाच्या अभावी फक्त समीक्षाच वाढते आहे आणि तीही एकारलेपणाने. तिला जर वाङ्मयीन लेखननिर्मितीच्या प्रशिक्षणाची जोड मिळाली तर एकंदर वाङ्मयीन विद्वत्तेचा कस वाढेल व वाङ्मयक्षेत्र अधिक सुबद्ध होईल. भाषाभ्यास, वाङ्मयेतिहास, वाङ्मयसमीक्षा व ललित-लेखन ही सारी परिक्षेत्रे एकमेकांशी संघर्ष न येता एकमेकांच्या साहाय्य–सह-कार्याने वाढत राहतील व नवप्रवेशकांना ह्या क्षेत्राची कल्पना अधिक सुस्पष्टपणे येईल. त्यांच्या ठिकाणच्या शक्तिबद्धिप्रमाणे त्यांना आपले व्यासंगक्षेत्र निवडता येईल. पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर यांच्यासारख्या मातब्बर लेखकांनी लक्ष घालून येथे मांडलेल्या योजनेसाठी एखादे 'प्रतिष्ठान' निर्माण केले तर या उपक्रमास वेगळीच मान्यता प्राप्त होईल, असे जाता जाता सुचवावेसे वाटते.

आतापर्यंतच्या पाच व्याख्यानांतून वाङमयीन विद्वत्तेचे स्वरूप आणि तिची विविध परिक्षेत्रे व त्यातील आधिवेद्यिक व अनुशासनविषयक विषयांचे प्रश्नांचे विवेचन केले. वाङमयीन विद्वत्तेची ही संकल्पना मान्य केली तर या विवेचनाचे महत्त्व आपणांस पटेल असे वाटते.

अगदी नव्या प्रकारच्या विषयाचे हे विवेचन काही ठिकाणी विवाद्य झालेले असणे शक्य आहे. तरी मी माझे म्हणणे आधारपूर्वक व निराग्रही दृष्टीने मांडलेले आहे. वाङमयीन विद्वत्तेच्या विविध परिक्षेत्रांनी जवळ यावयास हवे ही जाणीव संबंधितांनी ठेवली, तरी पुष्कळ काम होईल. सामाजिक शास्त्रे ही मानव्यशास्त्रांतून बाहेर पडून आपले स्वतंत्र अस्तित्व प्रकट करीत आहेत व एकत्र येत आहेत. त्या शास्त्रांइतकी भिन्नता वाङमयीन विद्वत्तेच्या ह्या परिक्षेत्रांत नक्कीच नाही. तेव्हा आपणांत एकत्वाची जाणीव वाढावयास काय हरकत आहे ? माझ्यापुढे ह्या क्षेत्रात येऊ इच्छिणारा पण बौद्धिक दृष्टीने भांबावून गेलेला धडपडणारा नवागत वर्ग आहे. अर्थात जे विषय किंवा प्रश्न यांची चर्चा मी केली आहे ते तसे चर्चेचे सनातन विषय आहेत. म्हणजे हा अनुबंध सोडला तरी फारसे बिघडत नाही. येथे मांडलेल्या प्रशिक्षणाची योजना थोड्या विचारान्ती स्वीकारार्ह वाटावी असे मला वाटते. किमान विचारार्ह वाटावी. सगळ्याच कला प्रशिक्षणयोग्य ठरल्या आहेत. ललितवाङमय-लेखनकलाही अपवाद मानण्याचे कारण नाही.

□ □ □

# व्याख्यान सहावे

# मराठीतील वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास

: १ :

गेल्या पाच व्याख्यानांपैकी पहिल्यात आपण वाङमयीन विद्वत्तेचे स्वरूप, वशिष्टचे, ध्येये इ. चे स्वरूप पाहिले. त्यानंतरच्या चार व्याख्यानांत वाङमयेतिहास, वाङमयसमीक्षा, भाषा व भाषाभ्यास आणि ललितवाङमयलेखन ह्या तिच्या परिक्षेत्रांचा स्वतंत्र रीतीने विचार केला. त्यानंतर आजच्या या व्याख्यानात मराठीतील वाङमयीन विद्वत्तेच्या विकसनाची पाहणी करावयाची आहे.

या ठिकाणी जी भूमिका घेतली आहे तिच्या दृष्टीने पाहावयाचे तर या चार परिक्षेत्रांतील वाङमयीन विद्वत्तेचा विकास पाहावयाचा म्हणजे सबंध मराठी वाङमयाच्या विविध अंगोपांगांची व या चाललेल्या विविध अभिक्रियांची पाहणी वा समालोचन करणे होय. रेने वेलेकने, चित्रकलेचा इतिहास म्हणजे कालानुक्रमाने मांडलेल्या विविध कलाकृतींचे प्रदर्शन होय. त्यातून एक फेरफटका मारला की कलेचा इतिहास समजतो, असे म्हटले आहे. तसेच वाङमयीन विद्वत्तेचे आहे. म्हणजे या ठिकाणी चर्चिलेल्या विविध परिक्षेत्रांतील ग्रंथ इ. कालक्रमाने अवलोकिले असता वाङमयीन विद्वत्तेचा विकास कसकसा होत आला आहे हे कळेल.

हे येथे शक्य नाही. तसेच गेल्या काही वर्षांत वाङमयासंबंधीची स्वतंत्र जाण निर्माण झाली आहे. व त्या दृष्टीने विविध उपक्रम सुरू झाले आहेत. त्या उपक्रमांची जंत्री करणे व माहिती मिळविणे हे एक स्वतंत्र असे काम आहे. त्यावरून आजच्या वाङमयीन विद्वत्तेचे स्वरूप समजेल. महाराष्ट्रातील विद्यापीठे, साहित्यसंस्था, संशोधन-मंडळे, प्रकाशन-संस्था, व्यक्ती इ. हे सर्वच घटक आपापल्या परीने कार्यवाही झालेले आहेत व हे काम सर्व महाराष्ट्रभर कमीअधिक प्रमाणात चालू

आहे. त्या दृष्टीने खरे सांगावयाचे तर आताच पाहिल्याप्रमाणे एक प्रदीर्घ अशी सूची तयार करणे योग्य होईल. तथापी ते न करता स्थूलमानाने वाङमयीन विद्वत्तेचा विकास-क्रम दाखविता येतो, व तेच येथे योजिले आहे.

मराठीतील वाङमयीन विद्वत्तेचा विकास ऐतिहासिक दृष्टीने पाहणे योग्य होईल. म्हणजे तिची निर्मिती कशी व केव्हा झाली ते आणि तिच्या विकास-क्रमातील निरनिराळे टप्पे त्यांच्या वैशिष्टचांसह विचारात घेता येतील. पहिल्या व्याख्यानात पाहिल्याप्रमाणे वाङमयीन विद्वत्तेची परंपरा जरी तशी प्राचीन असली तरी तिच्या स्वरूपविशेषांची, ध्येयांची सुस्पष्ट जाणीव ही तुलनात्मकतेने अलि-कडची आहे. म्हणून या व्याख्यानमालेत वाङमयीन विद्वत्तेच्या स्वरूपविशेषांचे जे पुनरावलोकन केले ते तसे नवे आहे. विद्वत्तेची ही परिक्षेत्रे तशी नवी नाहीत, पण ह्या ठिकाणच्या विवेचनामुळे त्यांच्या कार्यवैशिष्टचांची व पद्धतींची व परस्पर-संबंधांची अधिक सुस्पष्ट जाणीव होईल असे वाटते.

आधुनिक कालात वाङमयीन विद्वत्तेचा उद्‌भव हा पाश्चात्य राष्ट्रांतील विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीतून झाला आहे, हे आपण पहिल्या व्याख्यानात पाहिले. तेव्हापासून त्यांच्यांकडील वाङमयीन विद्वत्ता कालाबरोबर प्रगल्भ होत आलेली आहे. त्यांच्या समाज व सांस्कृतिक जीवनाची तिने सातत्याने साथ केली आहे. साहजिकच ही परंपरा त्यांच्यांकडे चार शतकांइतकी जुनी आहे. तिच्याशी तुलना करता आपल्याकडील तत्समान कालखंड केवळ एक-दीड शतकाचा आहे. त्यांच्याकडील चार शतकांप्रमाणे हे एक-दीड शतक आपणांकडील विविध अभि-क्रियांनी गजबजलेले असे आहे, परंतु एक फरक लक्षात घेणे अवश्य आहे.

पाश्चात्त्य देशांत सारे संक्रमण त्यांच्या इतिहासक्रमाच्या ओघात झाले. तसेच ते तिकडील समाजाच्या वाढत्या गरजांनुसार झाले, तसे येथे झाले नाही. येथे ते थोडेफार पाश्चात्त्यांच्या अनुकरणाने झाले. विद्वत्तेच्या व वाङमयीन विद्वत्तेच्या आधुनिक कालातील विकासक्रमास एतद्देशीयांचा हातभार लागण्यापूर्वी परकीय धर्मप्रचारकांनी आपल्या विविध उपक्रमांनी, प्रयत्नांनी पूर्वतयारी करून ठेविली होती. आपणांकडील प्राचीन भारतीय विद्वत्-परंपरा केव्हाच थांबली होती, म्हणजे जुन्या ग्रंथांचे पारंपरिक मार्गांनी जतन करणे चालू होते, पण त्यांत नवी भर पडत नव्हती. (याबद्दलची खंत लोकहितवादींनी अत्यंत प्रभावी शब्दांत व्यक्त केली आहे). त्यामुळे वाङमयीन विद्वत्तेच्या विकासाची पाहणी आधुनिक कालाच्या संदर्भातच करता येते. येथे आलेल्या परकीय प्रचारकांची पाश्चात्य विद्येच्या आधुनिक स्वरूपाची चांगलीच जवळीक होती. त्यांचे कार्य त्यांचा परकेपणा लक्षात घेतला तरी बरेच पायाशुद्ध झालेले आहे, असे म्हणता येते. मराठी

भाषेच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी आवर्जून असे काही केले नाही, तरी त्यांनी स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी केलेल्या उपक्रमांपायी मराठी भाषेच्या आधुनिक अभ्यासाचा पाया घातला हे स्पष्ट आहे.

वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाच्या दृष्टीने पाहता आपणांस तीन चार कालखंड विचारात घ्यावे लागतील. पहिला इ. स. १८०० पासून तो नव्या प्रकारच्या विद्यापीठांच्या स्थापनेपर्यंतचा–१८५७ वा १८६० पर्यंतचा, दुसरा कालखंड म्हणजे विद्यापीठातून नवे पदवीधर (विद्वान) निर्माण व्हावयास लागले तेव्हापासून तो मराठी भाषेचा विद्यापीठीय अभ्यासात पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमात मुख्य विषय म्हणून प्रवेश होईपर्यंतचा व त्याचबरोबर पीएच्.डी. सारख्या संशोधनपदवीच्या प्रविष्टतेचा, म्हणजे साधारणतः १९३९–४० पर्यंतचा दीर्घ कालखंड. नंतरचा तिसरा कालखंड म्हणजे १९३९ (पहिले पीएच्.डी.,डी.लिट्. पदवी-प्रबंध मान्य झाले तेव्हा) पासून तो महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर मराठी भाषेला राजभाषा म्हणून मान्यता मिळण्यापर्यंतचा व चवथा त्यानंतरचा गेल्या एक-दीड दशकाचा कालखंड ोय. वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने हे कालखंड त्यांतील प्रवृत्ती, ध्येये, गरजा विविध अभिक्रम इ. बाबतीत बरेचसे 'एकात्म' वा एकसंघ असे वाटतील. आणि संकलित दृष्टीने पाहता मराठीतील वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाचा आलेखही ते दर्शवितील.

: २ :

पहिला कालखंड हा एतद्देशीयांच्या सहभागाच्या दृष्टीने अगदी सामान्य आहे. डॉ. विल्सन, मोल्सवर्थ, कॅ. कॅंडी, मे. केनेडी, कॅरे ह्या परभाषिकांनी केलेले प्रयत्न मराठी भाषेच्या विकासाला पोषक होतील असेच आहेत. कारण यांनी तयार केलेले, करवून घेतलेले कोश-व्याकरणादी ग्रंथ अतिशय कष्टपूर्वक केले आहेत. अर्थात त्यांत त्यांना अपरिहार्यपणे एतद्देशीय विद्वानांचेच साहाय्य घ्यावे लागले आहे.

त्यांच्या ह्या उदाहरणांमुळे एतद्देशीयांच्या साहाय्याने कोश व्याकरण इ. करण्याची इच्छा त्यावेळच्या मुंबई सरकारलाही निर्माण झाली आणि बाळशास्त्री घगवे, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल, परशुरामतात्या गोडबोले, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, रामचंद्रशास्त्री जनवेकर इ. च्या साहाय्याने शासनाने 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार करविला. ह्याला सार्थपणे 'पंडिती कोश' अशी संज्ञा आहे. ह्याविद्वानांच्या साहाय्याने कॅ. जर्विस याने त्याचे संपादन केले आहे.

ह्या मिशनरी विद्वानांनी कोश व्याकरणादी ग्रंथ तयार करून मराठी भाषेची सेवा केली आहे, ह्यात दुमत नाही. पण ज्या मराठी भाषेत त्यांनी ही ग्रंथनिर्मिती केली आहे त्या मराठी भाषेविषयी त्यांचे मत अत्यंत प्रतिकूल होते. माडखोलकर म्हणतात की, मेजर कँडी याने शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे की मराठी या वादाच्या संदर्भात आपले मत देताना " भारतीय भाषांचा विकास कधी करण्यात आला नाही. त्यांच्यांत साहित्य असलेच तर ते अगदीच थोडे, किंबहुना नाही म्हटले तरी चालेल. त्यामुळे त्या भाषा सद्यः-स्थितीत शिक्षणाचे माध्यम व्हावयाला अगदी अयोग्य आहेत. " (चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व पृ. ३३) असा आपला अभिप्राय दिलेला आहे. यावरून त्याची मनोवृत्ती स्पष्ट होते. मिशनरींना ख्रिश्चन धर्माचा प्रसार करावयाचा होता त्यासाठी एतद्देशीय भाषांचा वापर करून घ्यावयाचा होता. त्यामुळे आपल्या कोश, व्याकरण इ. ग्रंथांच्या द्वारे फक्त एक अभ्यासाचे साधन उपलब्ध करून दिले, एवढेच श्रेय त्यांना देता येईल (ते साधन एतद्देशीयांच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते. त्यांना त्याची गरज वाटत नव्हती). परकीय धर्म व संस्कृतीचे ते अभिमानी होते. एतद्देशीयांनी आपल्या धर्मसंस्कृतीचा स्वीकार करावा ही त्यांची इच्छा होती. त्यामुळे आधुनिक कालातील वाङ्मयीन विद्वत्तेच्या विवेचनाच्या संदर्भात त्यांच्या नावाचा प्रथम उल्लेख करावा लागला, तरी तेवढ्यावरच थांबावे लागते.

ह्याला अपवाद एल्फिन्स्टन् व कॅप्टन जर्व्हिस यांचा होता. एल्फिन्स्टनचे भाषाविषयक धोरण जर्व्हिस अमलात आणी. त्याचा भारतीयांच्या बौद्धिक योग्यतेवर विश्वास होता. मातृभाषांतून व एतद्देशीय विद्वानांच्या साहाय्याने ग्रंथनिर्मिती व्हावयास हवी, असे त्याला वाटे. त्या दिशेने त्या दोघांनी खूप प्रयत्न केले. त्यामुळे जर्व्हिस निवृत्त झाला तेव्हा (२२–२–१८३९) मुंबई प्रांतातील सव्वाशे प्राध्यापक, शिक्षक, मामलेदार, इन्स्पेक्टर वगैरे लोकांनी त्याला मानपत्र देऊन त्याचा गौरव केला.*

ह्या कालात इंग्रज सरकारच्या पुरस्कारामुळे व प्रेरणेमुळे अनेक साहित्य-विषयक उपक्रम झाले. इ. स. १८२९ त प्रसिद्ध झालेल्या ' महाराष्ट्र भाषेचा कोश ' ह्या सरकारी प्रेरणेने व शास्त्री-पंडितांच्या सहकार्याने तयार झालेल्या ' पंडिती कोशा 'चा उल्लेख वर आलाच आहे. एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने पुणे येथे पाठ-शाळा स्थापन झाल्यानंतर कृष्णशास्त्री राजवाडे, महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळणकर, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, विष्णुशास्त्री पंडित यांच्यासारखे श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथकार आणि कार्यकर्ते तिच्या विद्यार्थिवर्गातून उदयास आले. या

* चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व, पृ. ३८.

लोकांनी निरनिराळ्या प्रकारचे लेखन करून, निरनिराळी वृत्तपत्रे इ. संपादन करून वाङ्मयीन विद्वत्तेचा एक नवा पायंडा महाराष्ट्रात सुरू केला. इ. १८४२ नंतर म्हणजे पाठशाळेला इंग्रजी वर्ग सुरू केल्यानंतर महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर आदी तिच्या विद्यार्थ्यांनी ती विद्या पण आत्मसात केली, आणि आधुनिक कालातली पंडिती परंपरा निर्माण झाली.

शाळांकरिता पुस्तके तयार करण्यासाठी मुंबईत 'हैंद शाळा, आणि शाळा पुस्तक मंडळी' स्थापन झाली. तिने मराठी व गुजराथी भाषांत स्वतंत्र व भाषांतररूप पुस्तके लिहिणाऱ्यांना बक्षिसांच्या द्वारे उत्तेजन दिले. "बालबोध म्हणजे शालोपयोगी ग्रंथ करणारांना शंभर पासून चारशे रुपयांपर्यन्त प्रती पुस्तकी मिळतील व मोठे ग्रंथाची भाषांतरे करणारांना दोन हजार रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंत बक्षिस मिळेल"* अशी प्रलोभने जाहीर केली गेली. ह्या उत्तेजनामुळे इंग्रजी-संस्कृत ग्रंथांची भाषांतरे होऊ लागली व अशा रीतीने भाषांतर युगास प्रारंभ झाला. अशाच प्रकारचा आणखी एक उपक्रम इ. १८५१ त 'दक्षिण प्रैज-कमिटी' च्या स्थापनेने पुण्यात झाला. या कमिटीचे उद्दिष्ट "उययुक्त विषयांवर मराठी भाषेत नवे नवे ग्रंथ तयार करवावे, होतकरू ग्रंथकारांस त्यांच्या योग्यते-प्रमाणे बक्षिसे द्यावी आणि महाराष्ट्र भाषा प्रौढ आणि ऊर्जित दशेस आणावी" असे होते. अशा रीतीने या विद्यापीठपूर्वकालात वाङ्मयीन अभिवृद्धीची पायाभरणी करण्याच्या दिशेने अनेक उपक्रम झालेले आहेत. अनेक लेखकांनी ग्रंथलेखन केले व मराठी भाषेच्या अभ्यासाचा पाया घातला.

प्रारंभी मुंबईस इंग्रजी शिक्षणास प्राधान्य व पुण्यास पाठशाळेच्या रूपाने संस्कृत शिक्षणास प्राधान्य, असा थोडा फरक होता. परंतु पुण्यास पाठशाळेस अगोदर इंग्रजी वर्ग जोडला व नंतर इंग्रजीचे प्रमाण वाढवीत वाढवीत इ. स. १८५१ त 'पूना कॉलेज' ची स्थापना करून पुणे व मुंबई या दोन शहरांतील हा शैक्षणिक फरक काढून टाकण्यात आला.

या विद्यापीठ-पूर्वकालात जे विद्वान् झाले, लेखक झाले त्यांनी महाराष्ट्रात आधुनिक कालातील वाङ्मयीन विद्वत्तेचा पाया घातला. त्यांत बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, विष्णुबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी, भाऊ महाजन, ज्योतिराव फुले, इ. यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याचप्रमाणे शास्त्री-मंडळींपैकी कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री पंडित, परशुरामपंत गोडबोले, आदींचा समावेश करावा लागेल. विद्यापीठीय विद्वानांची नवी परंपरा निर्माण होऊन ती कार्यवाही होईपर्यंतच्या या कालात या महाभागांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी केलेल्या लेखनातील विविधताही लक्षणीय आहे.

* चिपळूणकर : काल आणि कर्तृत्व, पृ. २२.

मिशनऱ्यांनी मराठी पुस्तके छापण्याचे काम १८०५ पासून सुरू केले तरी, पुस्तके किती मंदगतीने प्रकाशित होत ह्याचे प्रत्यंतर असे : इ. स. १८०५–१८३६ या कालात (३० वर्षात) अवघी दहा मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली.* ह्या वरून हा काल किती बाल्यावस्थेचा होता हे स्पष्ट होईल. हे प्रमाण १८३६–१८५६ या कालात वाढले, पण प्रसिद्ध झालेली पुस्तके शालोपयोगी वा बालवाङ्मयाचीच होती. हरी केशवजी, सदाशिव काशिनाथ छत्रे, विश्वनाथ नारायण मंडलिक, माधव चंद्रोबा डुकले, भाऊ महाजन, मोरोबा कान्होबा इ. चे लेखन या संदर्भात उल्लेखनीय आहे.

इ. स. १८३६–५७ या कालातील वाङ्मयात कसा बदल झाला हे स्पष्ट करताना गं. बा. सरदार आपल्या 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' या पुस्तकात म्हणतात : "या एकवीस वर्षांत गद्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला, त्यातील एकांगीपणा जाऊन त्यात विविधता झाली. नवे नवे वाङ्मयप्रकार रूढ होत चालले. निरनिराळ्या शास्त्रीय विषयांची परिभाषा तयार होऊ लागली. भाषेतील शब्दप्रयोग व वाक्यरचना यांना नियमबद्धतेची जोड मिळाली ....' विविधतेच्या दृष्टीने दादोबांचे व्याकरण, 'यशोदापांडुरंगी' लोकहितवादींचे निरनिराळ्या विषयांवरील लेखन, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा 'वेदोक्तधर्मप्रकाश' ज्योतिराव फुले यांचे विविध ग्रंथ, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचा 'अनेक विद्यामूलतत्त्वसंग्रह' इ. ग्रंथ उल्लेखनीय आहेत. अशा रीतीने या कालात वाङ्मयविषयक व्यापक जाण निर्माण होत होती." (पृ. २४)

ह्या लेखकांची पुस्तके विद्यापीठ स्थापन झाल्यानंतरही प्रकाशित होत होती. परंतु विद्यापीठाच्या संस्थापनेमुळे ज्ञानक्षेत्राचे व्यवस्थापन झाले. निरनिराळ्या विषयांचे आधुनिक दृष्टीने अध्ययन-अध्यापन सुरू झाले. विद्यापीठ-पूर्वकालात विद्वान होण्याच्या दृष्टीने, व्यासंग करण्याच्या दृष्टीने शिक्षणक्षेत्रात तशी तरतूद नव्हती. ज्याला जो विषय आवडीचा जिव्हाळ्याचा वाटेल त्यावर लेखन करावे, वा घरी परंपरा असेल त्याप्रमाणे विद्याव्यासंग करावा. त्या अभ्यासात शास्त्रीयपणा व शिस्त नव्हती. 'शालेय'पणा व लोकोपदेशक वृत्ती ही जाणवल्याविना राहात नाही. वाङ्मयीन जाण म्हणता येईल ती अगदी प्राथमिक अवस्थेत होती. त्याशिवाय मराठी भाषा तेवढी सिद्ध झाली नव्हती असे म्हणता येईल. त्यामुळे एकाच लेखकाचे इंग्रजी व मराठी लेखन ह्यांत तफावत दिसे. बाळशास्त्री जांभेकर यांचे इंग्रजी अतिशय प्रौढ व भारदस्त असे. त्या मानाने 'त्यांचे मराठी भिकार असे,' असे माडखोलकर म्हणतात, ते लक्षणीय आहे.

---

* ग. रं. दंडवतेकृत संक्षिप्त अर्वाचीन मराठी वाङ्मय.

ह्या कालात प्रसिद्ध झालेले ' स्वतंत्र ' ग्रंथ वाङ्मयदृष्ट्या फारसे महत्त्वाचे नाहीत. भाषांतरित ग्रंथ बरेच, पण भाषांतरासाठी निवडलेले इंग्रजी ग्रंथसुद्धा अगदी सामान्य होते. उत्तम ग्रंथांच्या वाटेस कोणी गेले नाही, त्यावरून वाङ्मयीन व वैचारिक जाण किती बेताची होती हे स्पष्ट होते. अभिरुचीही विशेष प्रगत नव्हती. वाङ्मयविषयक जाण बेताची असण्याचे एक कारण विद्यापीठीय पातळीवर अद्याप पद्धतशीरपणे शिक्षण सुरू झालेले नव्हते, हे होय. त्या अभावी अभ्यासाला दिशाच नव्हती आणि विद्यापीठांची स्थापना जर झाली नसती तर अशी स्थिती दीर्घकाल चालली असती. परंतु विद्यापीठस्थापनेनंतर इंग्रजी ही राज्यव्यवहार, व्यापार, शिक्षण, न्यायालये इ. सर्व क्षेत्रांत माध्यम म्हणून रूढ झाली आणि सर्वच चित्र बदलले.

विद्यापीठ-स्थापनेपूर्वी व विद्यापीठ स्थापन झाल्यानंतरच्या नजीकच्या कालात (इ स. १८५० ते १८६७ या कालात) विद्येची व ज्ञानाची उपासना करण्याचे आणखी काही प्रयत्न झाले आहेत. त्यात ' मराठी ज्ञानप्रसारक ' या मासिकाने केलेल्या कार्याला महत्त्वाचे स्थान देणे अवश्य आहे. ज्ञानप्रसाराच्या उद्देशाने निघालेले हे मासिक विद्यार्थी व नवशिक्षित यांच्यांत आपल्या आवडीच्या विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन करण्याची प्रवृत्ती निर्माण व्हावी म्हणून निघाले होते. इ.स. १८६७ मध्ये निघालेल्या ' विविधज्ञान-विस्तार ' या मासिकाची पूर्व तयारी या मासिकाने केली. व विद्यापीठ-पत्रिका काढण्याचा हा अनधिकृत पण महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात ते लक्षणीय आहे. ' मराठी ज्ञानप्रसारक ' व ' विविध ज्ञानविस्तार ' या मासिकांनी आधुनिक कालाला साजेसा वाङ्मयीन विद्वत्तेचा पाया घातला असे म्हणणे योग्य होईल. ' विविधज्ञानविस्तार 'चे कार्य विद्यापीठ-स्थापनेनंतरच्या कालात झालेले आहे. तर ' मराठी ज्ञानप्रसारक ' हा विद्यापीठ–पूर्वकाल व उत्तरकाल यांना जोडणारा दुवा होय असे म्हणता येईल.

## : ३ :

इ. स. १८५७ मध्ये स्थापन झालेली मुंबई, मद्रास व कलकत्ता ही विद्यापीठे त्यांचे स्वरूप, अभ्यासक्रम इ. दृष्टींनी त्यावेळच्या लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर होती. युरोपमधील वा इंग्लंडमधील विद्यापीठीय शिक्षण हे यापूर्वी या व्याख्यानांतून अनेक ठिकाणी पाहिल्याप्रमाणे प्रामुख्याने प्राचीन वाङ्मयप्रधान होते. अर्वाचीन भाषांना (इंग्रजी, फ्रेंच इ.) विद्यापीठांतून तेथेही महत्त्वाचे स्थान नव्हते. परंतु इंग्रजी हे माध्यम असल्याने इंग्रजीतील शेक्सपीअर, चॉसर आदी अभिजात

ग्रंथकारांचे ग्रंथ अभ्यासात असत, पण सारा भर वैचारिक वा तत्त्वप्रधान वाङ्मय शिकविण्यावर असे. त्यामुळे भारतातील विद्यापीठीय शिक्षणाचा 'आकृतिबंध' जवळजवळ ठरल्यासारखा झाला होता. ग्रीक, लॅटिन या भाषांच्या जोडीने भारताची सांस्कृतिक भाषा म्हणून संस्कृतला स्थान देण्यात आले होते. एकोणीसाव्या शतकातील सर विल्यम ज्योन्स यांच्या 'भाषा व भाषाभ्यास' ह्या व्याख्यानात उल्लेखिलेल्या विधानामुळे युरोपीय राष्ट्रांतच संस्कृतच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले होते. त्यामुळे भारतातील शिक्षणक्रमात संस्कृतला महत्त्वाचे स्थान देण्याबद्दल विशेष तीव्र विरोध झाला नसावा. हा संस्कृतचा अभ्यास इंग्रजी माध्यमातून व्हावयाचा होता, व त्याप्रमाणे तो कालपरवापर्यंत जवळजवळ सर्व विद्यापीठांतून केवळ इंग्रजीतूनच होत राहिला !

इ. स. १८६२ साली झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या बी. ए. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात महादेव गोविंद रानडे व रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि दुसऱ्या वर्गात बाळ मंगेश वागळे व वामन आबाजी मोडक असे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पहिल्या पाच वर्षांत पदवीधरांची संख्या चाळीस झाली, व नंतरच्या चार वर्षांत ती ८० वर गेली. अशा रीतीने आधुनिक कालातील पद्धतशीर शिक्षण घेऊन आधुनिक विद्येचे संस्कार झालेल्या विद्वानांची परंपरा महाराष्ट्रात सुरू झाली. पहिली काही वर्षे विद्यापीठात बी. ए. परीक्षेस मराठी विषय वैकल्पिक विषयांत समाविष्ट केला होता, पण विद्यापीठातून इंग्रजीतून शिकलेल्या पदवीधरांची संख्या वाढू लागली, आणि एकंदर वातावरण मराठी भाषेला प्रतिकूल असे होऊ लागले. इ. स. १८७० पासून विद्यापीठातून मराठी काढून टाकण्याच्या कारवाया सुरू झाल्या. न्यायमूर्ती रानड्यांनी आपले वजन खर्च करून ती लाट काही काळ थोपविली, पण त्यांच्या मृत्यूनंतर मराठीची मुंबई विद्यापीठातून हकालपट्टी झाली. पुढे द. वा. पोतदार, कन्हयालाल मुनशी आदी भारतीय भाषांच्या अभिमान्यांच्या प्रयत्नांमुळे परत बी. ए. च्या परीक्षेत मराठी विषयाला प्रमुख विषय म्हणून स्थान मिळण्यास १९३५ हे वर्ष उजाडावे लागले. या (मधल्या) कालात व नंतरही इंग्रजी भाषेच्या अभिमान्यांबरोबर संस्कृत भाषेच्या अभिमान्यांकडून मराठी भाषेला सतत विरोध होत होता, हे लक्षात घेतले पाहिजे. (पहिल्या आठ वर्षांतील ८० पदवीधरांपैकी २३ पदवीधरांनी मराठी घेतले होते व इतर अनेकांनी संस्कृत किंवा दुसरी भाषा ऐच्छिक विषय म्हणून निवडली होती. अशा विद्वानांत शंकर पांडुरंग दीक्षित, अण्णा मोरेश्वर कुंटे, शंकर मोरो रानडे यांच्यांबरोबर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचेही नाव आढळते.)

अशा रीतीने पहिल्या आठदहा वर्षांत नवशिक्षित विद्वानांची संख्या वाढली, त्याबरोबर विद्येच्या प्रसाराच्या व व्यासंगाच्या दृष्टीने नवे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे विद्यापीठाची पायरी चढण्याची संधी न मिळालेल्या अनेकांना वाङ्मयसेवेची व ग्रंथलेखनाची प्रेरणा मिळाली, अशा कित्येकांनीं मराठी भाषेत लक्षणीय भर टाकली आहे. अशांमध्ये विनायक कोंडदेव ओक, रामचंद्र भिकाजी गुंजीकर, जनार्दन बाळाजी मोडक, सोकर बापूजी त्रिलोकेकर, विनायक जनार्दन कीर्तने, बळवंत पांडुरंग किर्लोस्कर इत्यादी अनेकांचा समावेश करावा लागेल. याचाच अर्थ विद्यापीठाची प्रस्थापना झाल्यानंतर दहाबारा वर्षांत विद्याव्यासंगाला व ग्रंथरचनेला पोषक असे वातावरण आणि मनोवृत्ती निर्माण झाली व चौदाव्या पंधराव्या शतकात युरोपात जसे विद्येचे पुनरुज्जीवन झाले तशा प्रकारच्या सर्वांगीण प्रबोधनाची भारतात विशेषतः महाराष्ट्रात पूर्वतयारी झाली. या प्रबोधनाचे एक दर्शन इ. स. १८८५ च्या सुमारास झालेल्या राष्ट्रीय सभेच्या संस्थापनेच्या रूपाने घडते. आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने वाङ्मयीन व सांस्कृतिक महत्त्व असलेले दुसरे दर्शन विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाले' च्या रूपाने घडते. वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाच्या संदर्भात ते अत्यंत महत्त्वाचे आहे.

आताच पाहिल्याप्रमाणे विद्यापीठीय अभ्यासक्रमात प्राचीन भाषांना महत्त्वाचे स्थान असल्यामुळे प्राचीन भारतीय वाङ्मय व संस्कृती यांच्या अभ्यासाकडे लक्ष जाणे स्वाभाविक होते. जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी यांच्या नावाने विद्यापीठाच्या परीक्षांत संस्कृत विषय घेऊन पहिला क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व शिष्यवृत्त्या ठेवल्या कारणानेही संस्कृत विद्येकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले जाणे स्वाभाविक होते. त्याचप्रमाणे डॉ. विल्सन यांच्या नावाने " विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चर्स " ही व्याख्यानमाला संस्कृत व तत्सम भाषांच्या अभ्यासकांसाठी मुंबई विद्यापीठाने ठेविली होती. त्यामुळे प्राचीन भाषा व संस्कृती यांचा अभ्यास हे एकच वाङ्मयीन विद्वत्तेचे अंग विकसित व्हावे अशी तरतूद दिसते. त्या दृष्टीने डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. पां. दा. गुणे आदी विद्वानांनी भारतीय प्राच्य भाषांच्या स्थल–काल–परंपरा आदींवर जो प्रकाश टाकला आहे, तो लक्षणीय आहे. निबंधमालाकारांनी मातृभाषेच्या अभिमानाची जी एक लाट सुशिक्षित जनांच्या मनात निर्माण केली, तिच्यामुळे वाङ्मयीन विद्वत्तेचा एक आगळावेगळा आविष्कार महाराष्ट्रात झाला.

ही एक देशाभिमानाची व व्यापक जागृतीची लाट होती. तिला अनेक अंगे होती. व ती सर्वच अंगे आपापल्यापरीने वाढत होती, परिवर्धित होत होती. वाङ्मयाचे क्षेत्र हे सांस्कृतिक जीवनाशी एकरूपता पावले होते प्राचीन भाषा

व संस्कृती यांचा अभ्यास हा विद्यापीठाच्या कक्षेत आला. परंतु आधुनिक भाषांविषयी विद्यापीठ पूर्ण उदासीन राहिले. आधुनिक संस्कृतीचासुद्धा राज्यकर्त्यांना अनुकूल व सोयीचा असणारा तेवढाच भाग विद्यापीठाच्या कक्षेत बसत होता.

वास्तविक इंग्रजांनी या देशात आधुनिक कालात लोकशाही विचाराची मुहूर्तमेढ रोवली. आणि शिक्षणाचा तोंडवळा सहिष्णुतेकडे (लिबरॅलिझम) झुकणारा असा ठेवला. परंतु त्यांच्या उदारमतवादात सर्वसामान्य मनुष्य, त्याची भाषा, त्याची राजकीय सामाजिक जागृती, गरजा यांना स्थान नव्हते. त्यामुळे लोकांचे हक्क व त्यांची जपणूक करणे, लोकांना ज्ञानी व जागृत करणे, त्यांना त्यांच्या नजीकच्या इतिहासातील कर्तृत्वाची जाणीव करून देणे, खऱ्या आधुनिकत्वाचा प्रचार व प्रसार करणे, आणि सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी कार्यरत राहणे, हे सारे करीत असताना प्राचीन व आधुनिक वाङ्मयाची आवड आणि अभिरुची निर्माण करणे, ही सारी कामे सुशिक्षितांपैकी जे ध्येयवादी होते त्यांना आपल्या अंगावर सरकार-निरपेक्ष रीतीने घेणे आवश्यक होते, एवढेच नव्हे तर सरकारचा रोष पत्करूनही ते करणे जरूर होते. नवशिक्षित मध्यमवर्गाने हे कार्य कशा रीतीने पार पाडले हे वाङ्मयीन विद्वत्तेच्या आधारानेच पाहाता येते. पण त्यामुळेच वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वरूप या कालात एकजिनसी राहणे शक्य नव्हते असे आढळून येईल. इतिहास-संशोधन, प्राचीन संस्कृति–संशोधन, प्राचीन भाषा व आधुनिक भाषांच्या पूर्वकालीन अवस्थांचा अभ्यास, याशिवाय आधुनिक वाङ्मय व आधुनिक समीक्षाविचार, इत्यादींविषयी आवड निर्माण करणे, या साऱ्या अभिक्रियांचा (ॲक्टिव्हिटीज) समावेश होईल, अशी वाङ्मयीन विद्वत्तेची प्रतिमा निर्माण करणे अवश्य होते, व ते कार्य मध्यमवर्गातील एका विभागाने अतिशय साक्षेपाने करून वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास घडवून आणलेला आहे. त्यामुळे या कालातील वाङ्मयीन विद्वत्ता एका दृष्टीने बाल्यावस्थेत व दुसऱ्या दृष्टीने अधिक व्यापक व सर्वंकष आहे, असे दिसून येईल.

हे सारे करण्यासाठी या मध्यमवर्गातील ध्येयवादी लोकांना अनेक नव्या संस्था, संघटना स्थापन कराव्या लागल्या. उदाहरणार्थ लोकजागृती व लोकशिक्षणासाठी निरनिराळी वृत्तपत्रे काढणे, शाळा, विद्यालये स्थापन करणे, प्राचीन वाङ्मय मुद्रित स्वरूपात सादर करण्यासाठी मुद्रणालये व नियतकालिके सुरू करणे, संस्था सुरू करणे, आधुनिक वाङ्मयाच्या प्रकर्षासाठी मासिके, साप्ताहिके काढणे आणि साहित्य व संस्कृतिविषयक व्यापक आस्था निर्माण करण्यासाठी साहित्य-परिषदा, संमेलन इत्यादींसारख्या संघटना निर्माण करणे इ. आणि हे सर्व सरकारनिरपेक्ष व लोकाश्रयी वृत्तीने चालविणे. कारण विद्यापीठ स्थापन झाले तरी ह्या गोष्टी विद्यापीठाच्या कक्षेत येत नव्हत्या. ती एक केवळ परीक्षा घेणारी संस्था म्हणूनच

संवर्धिली जात होती. ज्ञानाचे सातत्य, संवर्धन व संशोधन यांच्यांशी विद्यापीठाचा संबंध केवळ नाममात्र होता, आणि आताच वर पाहिल्याप्रमाणे आधुनिक भाषांचा विद्यापीठाशी संबंध अगदी जुजबी स्वरूपाचा होता. दुसरे जागतिक महायुद्ध सुरू होईपर्यंतच्या दीर्घ काळात हे असे चालले होते. त्यामुळे त्या कालात वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास लोकजागृती, स्वदेशाभिमान, स्वसंस्कृतिप्रेरक इतिहास-संशोधन यांच्या परस्पर सहकार्याने झाला आहे, व तो बह्वंशी शासनसाहचर्य-निरपेक्ष आहे हे लक्षात ठेवणे अवश्य आहे. या कालात राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ जोरात फोफावत होती. इंग्रज सरकारचे आसन ती विविध तऱ्हांनी डळमळीत करीत होती, त्यामुळे ते सरकार विचलितचित्त असल्याने समाजाच्या साहित्य व संस्कृतिविषयक गरजांकडे लक्ष देण्याची गरजच सरकारला भासली नाही. वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने ह्या कालाची व्यापक पार्श्वभूमी अशी होती.

: ४ :

१८७४–७५ पासून तो १९३९–४० पर्यंतच्या या कालाचे दोन भाग करता येतात. पहिला १९२० पर्यंतचा कालखंड व दुसरा नंतरचा. पैकी पहिला कालखंड हा ललित-वाङ्मय व तत्समान वाङ्मयाच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमालेने' जी व्यापक राष्ट्राभिमानाची व स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली, तिच्यातून अनेक लेखक पुढे आले व त्यांनी वाङ्मयाची निरनिराळी दालने समृद्ध केली. कादंबरीच्या क्षेत्रात हरिभाऊ आपटे, काव्याच्या क्षेत्रात केशवसुत व त्यांच्या संप्रदायाची मंडळी, नाटकाच्या क्षेत्रात अण्णासाहेब किर्लोस्कर, गो. ब. देवल, खाडिलकर, गडकरी, इ. हे श्रेष्ठ नाटककार, विनोदाचे दालन संपन्न करणारे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, गडकरी, निबंधाच्या क्षेत्रात टिळक, आगरकर, शिवराम महादेव परांजपे इ. या श्रेष्ठ व्यक्तींच्या वाङ्मयामुळे मराठी भाषा संपन्न झाली. हे (एक निबंध सोडला तर) ललितवाङ्मयाचे प्रकार होत. त्यामुळे या कालखंडात अनेक श्रेष्ठ ग्रंथ व कलाकृती निर्माण होऊन मराठी भाषेला आधुनिक काळाला साजेशी अशी नवी अक्षर वाङ्मयसम्पदा लाभली. साहजिकच या कालास मराठी वाङ्मयाचे सुवर्णयुग म्हटले जाते. त्यात कोणतीही अतिशयोक्ती आहे, असे मानण्याचे कारण नाही.

वाङ्मयीन विद्वत्तेसंबंधी जी भूमिका या व्याख्यानांतून अभिप्रेत धरली आहे, तिच्याप्रमाणे ललितवाङ्मय हा वाङ्मयीन विद्वत्तेचा एक आविष्कारच आहे, असे गृहीत धरले आहे. कालविचाराचा प्रभाव म्हणा अगर अन्य काही कारणे असोत, पूर्वकालाप्रमाणे या कालखंडात जे ललितवाङ्मय लिहिले गेले ते सोद्देश लिहिलेले आहे. म्हणजे या वाङ्मयाला वाङ्मयीन अंगाव्यतिरिक्त सामाजिक, वैचारिक असा आशय आहे. लेखकांनी प्राय: ते त्यासाठी लिहिलेले आहे. त्याचप्रमाणे आता ज्या लेखकांचा उल्लेख केला ते सारे उच्चविद्याविभूषित असे आहेत. कवींना अगर हरिभाऊसारख्या कादंबरीकाराला अगर अन्य काही लेखकांना जरी प्रत्यक्षात विद्यापीठाची पदवी नसली तरी इंग्रजी विद्या व इंग्रजी वाङ्मय यांचा अभ्यास त्यांनी चांगल्या रीतीने केलेला होता असे दिसते. कारण त्यांच्यापुढचे वाङ्मयीन आदर्श आहेत ते सारे आधुनिक इंग्रजी वाङ्मयातून त्यांनी घेतलेले आहेत. विचारशीलतेच्या मूळाशी प्रखर असा ध्येयवादही असल्याचे प्रत्ययास येते. तो ध्येयवाद प्रखर व परिस्थितीशी मिळताजुळता आहेच पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे हे वाङ्मय श्रेष्ठ अशा प्रतिभागुणांनी पूरित आहे. त्यामुळे या कालापर्यन्तच्या आधुनिक मराठी वाङ्मयावर जो परभृततेचा ठसा स्पष्टपणे दिसतो, तो येथे जाणवत नाही. परभृतता जाऊन सर्वार्थाने हे वाङ्मय भारतीय आणि स्वकीय असे झालेले आहे. वाङ्मयीन आदर्श जरी इंग्रजी असले तरी प्राचीन भारतीय व प्राचीन मराठी वाङ्मयीन परंपरेचा तीव्र अभिमान या सर्वांच्या ठिकाणी प्रकर्षाने वसत आहे. भारतीय पुनरुज्जीवनवादाचे हे वाङ्मय म्हणजे एक अपत्य आहे. हे त्याच्या स्वरूपाकडे पाहिले असता सहज लक्षात येते.

याशिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय जनता या कालात ब्रिटिश राज्यकर्त्यांशी लढा देत होती, तिचे नेतृत्वही ज्या मध्यमवर्गातून हे लेखक पुढे आले त्या मध्यमवर्गाकडेच होते, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही, समता व्यक्तिस्वातंत्र्य, बन्धुभाव ह्या नवध्येयांनी हा वर्ग भारला गेला होता. त्यासाठी त्याचा लढा चालू होता. म्हणजे तसे पाहिले तर वाङ्मयीन विद्येच्या प्रकर्षास हा कालखंड मुळीच अनुकूल नव्हता. कारण वाचकवर्गाचे प्रमाण अत्यल्प होते, म्हणजे सुशिक्षित मध्यमवर्गापुरती त्याची व्याप्ती मर्यादित होती. पण वृत्तपत्रीय लेखनातून व आताच उल्लेखिलेल्या निरनिराळ्या लेखकांच्या साहित्यातून वाङ्मयीन प्रज्ञेचे व प्रतिभेचे जे नेत्रदीपक दर्शन घडले ते कोणासही अभिमान वाटावा असेच आहे. शासनाचे लक्ष विद्याप्रसाराकडे या कालात अजिबात नव्हते, याचे एक गमक म्हणजे इ. १८५७ ते १९१६ या जवळजवळ साठ वर्षांच्या कालात १८८७ त निघालेल्या अलाहाबाद विद्यापीठाचा अपवाद करता

खंडप्राय भारतात एकही नवे विद्यापीठ सरकारला काढावेसे वाटले नाही. यावरून परकीय सरकारने ज्ञानप्रसाराचा किती धसका घेतला होता हे दिसून येते.

राष्ट्राभिमानाचा एक भाग म्हणून या कालात प्राचीन वाङ्मय मुद्रित स्वरूपात प्रकाशित करण्याचे उपक्रम झाले. 'काव्येतिहाससंग्रह' या नियत-कालिकातूच प्रमुख बखरी प्रसिद्ध झाल्या, त्याचप्रमाणे 'सर्वसंग्रह', 'ज्ञानचंद्रोदय' यांतून जुन्या मराठी कवितेचे प्रसिद्धीकरण सुरू झाले. 'काव्येतिहाससंग्रह' बंद पडल्यावर 'काव्यसंग्रह' या नावाने जुनी कविता अनेक दिवस प्रकाशित होत होती, या संशोधनाच्या क्षेत्रात साने, खरे, पारसनीस व राजवाडे या चौघांचे कार्य अतिशय मोठे आहे म्हणून त्यांना म. म. पोतदार आधुनिक 'मुनिचतुष्टय' असे म्हणतात ते योग्य आहे.

या कालात इतिहास-संशोधन व वाङ्मयसंशोधन हातात हात घालून चालत असे. जुन्या कवींचे ग्रंथ संपादनपूर्वक प्रसिद्ध करण्याचे काम अनेकांनी केले आहे. वामन आबाजी मोडक, वामन दाजी ओक इ. चे कार्य त्या संबंधात संस्मरणीय आहे. मागील कालखंडात परशुरामपंत गोडबोले यांच्या 'नवनीता' ने मराठी कवितेची गोडी मध्यमवर्गीयांत निर्माण केली. चिपळूणकरांच्या लेखनाने ती अधिक वाढविली व त्यामुळे जुन्या कवींची कविता छापून निघू शकली. प्रसिद्ध संतकवींची व पंडित कवींची कविता अशा रीतीने मुद्रित स्वरूपात प्रसिद्ध झाली. ह्या कार्यात शासनाचा भाग अत्यल्प आहे. बहुतेक सर्व उपक्रम खाजगी प्रयत्नांनीच झाला. विद्यापीठा-नंतर निर्माण झालेल्या सुशिक्षित वर्गाने अशा रीतीने वाङ्मयीन विद्वत्तेचे हे क्षेत्र संपन्न केले आहे, अर्थात हा केवळ प्रारंभ होता. त्यामुळे मिळतील किंवा मिळाले असेल ते हस्तलिखित विशेषशी चिकित्सा न करता छापून प्रसिद्ध करावयाचे येवढेच धोरण होते. आधुनिक पाठचिकित्साशास्त्र हे हलके हलके उत्क्रांत होत होते. राज-वाड्यांनी आपणास सापडलेली 'ज्ञानेश्वरी' मूळ स्वरूपात छापून प्रसिद्ध केली व एत-द्विषयक जाणीव निर्माण केली.

अशा प्रकारचे १९२० पर्यन्तच्या काळातील वाङ्मयीन क्षेत्राचे व वाङ्मय-क्षेत्रीय विविध अभिक्रियाचे (ॲक्टिव्हिटीज) स्वरूप होते. वाङ्मयीन विद्वत्तेची पूर्वतयारी होत होती, पण हे सारे काम ऐतिहासिक किंवा सामाजिक, सांस्कृ-तिक क्षेत्राचे उपांग म्हणून चालत असे. इंग्रजी भाषेचा विद्यापीठात अभ्यास होत होता, तोहि गतकालीन मान्यवर ठरलेल्या अभिजात ग्रंथांच्या स्वरूपातच. तेथेही समकालीन वाङ्मयास विशेष महत्त्वाचे स्थान नव्हते. म्हणजे तेथेही वाङ्मयाचा अभ्यास त्यावेळी सर्वत्र रूढ असलेल्या 'ऐतिहासिक' पद्धतीनेच होत असे. त्याच धर्तीवर एतद्देशीय वाङ्मयाचा (संस्कृत इ.) एक ऐतिहासिक महत्त्वाचे दस्तऐवज म्हणून अभ्यास होई. मराठीला विद्यापीठात स्थान नव्हतेच.

संस्कृतचा अभ्यास हा इंग्रजीतून होत असल्याने ह्या देशांतील भाषांना विशिष्ट घाट देणे व वळण लावणे, हे संस्कृत विद्येकडून अपेक्षित असलेले कार्य होऊ शकले नाही. संस्कृतला विद्यापीठाश्रय होता. पण संस्कृतोद्धारकांची दृष्टी मराठी-कडे तुच्छतेने पाहण्याची होती, हे ही एक कारण आहे.

वाङमयीन विद्वत्तेच्या दृष्टीने आणखी एका महत्त्वाच्या अभिक्रियेचा (अॅक्टिव्हिटी) उल्लेख करावयास हवा. वर अनेक ठिकाणी 'निबंधमाले' चा उल्लेख आलेला आहे. 'निबंधमाला' हा वाङमयीन विद्वत्तेचा एक ठसठशीत आविष्कार आहे. त्यातले निबंधविषय, त्यांची विवेचनपद्धती, संपादकांनी सुरू केलेली 'विनोद आणि महदाख्यायिका', चांगल्या उताऱ्यांचे भाषांतर इ. सारी अंगे संपादकांच्या वाङमयीन साक्षेपाची प्रतीती आणून देतात. म्हणूनच निबंधमालेने एक प्रकारची श्रेष्ठ वाङमयीन अभिरुची, आवड निर्माण केली आणि वाङमयीन विद्वत्तेला एक वेगळेच दिशादर्शन केले. अशा प्रकारच्या विद्वत्तेला व वाङमयीन विवेचनाला वाहिलेली काही नियतकालिके महाराष्ट्रात पूर्वीपासून सुरू होती. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्शन,' 'दिग्दर्शन' पर्यन्त ही परंपरा नेता येते. अशा नियतकालिकांत सर्वांत महत्त्वाचे नियतकालिक म्हणजे 'विविधज्ञानविस्तार' होय. वाङमयीन विद्वत्तेला आणि सर्वसाधारण विद्वत्तेला हातभार लावण्याच्या कामात 'विस्तारा'ला फार वरचे स्थान आहे. त्यानंतर 'ज्ञानसंग्रह', 'केसरी' 'सुधारक', 'करमणूक', 'काळ', 'दीनबंधू' इ. वर्तमानपत्रे निरनिराळ्या कारणांनी मराठी वाङमयाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान मिळवून बसली आहेत.

: ५ :

पहिले महायुद्ध संपल्यानंतर व विशेषत: १९२० नंतर वाङमयीन व सांस्कृतिक वातावरण परिस्थिती यांत फार फरक पडला. इ. स. १९१८ च्या सुधारणांच्या कायद्याने शिक्षण खाते हे एतद्देशीय मंत्र्याकडे आले. त्याचप्रमाणे शिक्षणाचा प्रसारही झपाट्याने होऊ लागला आणि शिक्षण हे केवळ मध्यमवर्गीयांपुरते मर्यादित न राहता त्याचे लोण खालच्या व मागासलेल्या वर्गापर्यन्त पोचले. आताच पाहिल्याप्रमाणे देशी भाषांची वाढही बरीच झाली, त्यांच्यांत चांगले ग्रंथ निर्माण झाले. वाङमयगुणांच्या व विद्वत्तागुणांच्या दृष्टीने महत्त्वाचे असे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले. त्यामुळे मागासलेल्या भाषा म्हणून त्यांची उपेक्षा करणे विद्यापीठालाही अशक्य झाले. माध्यमिक शाळांत माध्यम म्हणून त्यांचा समावेश होण्यास तशी अडचण राहिली नाही. राष्ट्रीय सभेने आधुनिक भारतीय भाषांचे

महत्त्व मान्य केले व त्यांच्या विकासाच्या दृष्टीने जे काही करावयास हवे ते करण्याचे ठरविले. त्यासाठी 'राष्ट्रीय विद्यापीठे'ही तिच्या प्रेरणेने स्थापन झाली.

आणखी एक महत्त्वाचा फरक पडला, म्हणजे वाङ्मयाच्या विशेषतः ललितवाङ्मयाच्या क्षेत्रातील प्रत्येक शाखेत लेखकांची नवी पिढी उदयास आली. ह्या पिढीवर पूर्वकालीन वाङ्मयाचे संस्कार झाले होते, परंतु इंग्रजी वाङ्मयाचा विशेषतः प्रचलित इंग्रजी वाङ्मयाचा व विचारांचा प्रभाव ह्या नव्या पिढीवर पडलेला होता. लेखकांच्याप्रमाणे वाचकांची नवी पिढी उदयास आली. ह्या नव्या वाचकांत शाळा, कॉलेजांतून शिकून बाहेर पडलेल्यांचे प्रमाण मोठे होते. उदाहरणांनी स्पष्ट करायचे तर काव्याच्या क्षेत्रात रविकिरण मंडळातील कवींचा प्रभाव वाढला आणि त्यांनी आपल्या कवितांनी व काव्यगायन इ. उपक्रमांनी नवा काव्यप्रेमी रसिक वाचकवर्ग निर्माण केला. कथा-कादंबरीच्या क्षेत्रात, जुन्या नव्याला जोडणाऱ्या वामनराव जोशींबरोबर, फडके, खांडेकर, माडखोलकर इ. ची पिढी झपाट्याने पुढे येऊ लागली. नाट्याच्या क्षेत्रात पूर्वकालीन नाटककारांची नाटके जरी आवडीने लोक पाहात होते तरी वरेरकर, अत्रे, औंधकर, रांगणेकर आदी नाटककार पुढे आले. निबंधाच्या क्षेत्रात न. चिं. केळकर, अ. ब. कोल्हटकर, वा. म. जोशी, विनोबा, सावरकर आदी लेखक उल्लेखनीय आहेत. याशिवाय राजकारणाच्या क्षेत्रात गांधीवादी विचारवंत पुढे येऊ लागले. तसेच समाजवादी विचारसणीच्या पुरस्कारार्थ विभावरी शिरूरकर, पां. वा. गाडगीळ, ना. ग. गोरे, श्री. अ. डांगे, शंकरराव मोरे, प्रभाकर पाध्ये, ह. रा. महाजनी, साने गुरुजी, अनंत काणेकर इ. स्त्री-पुरुष लेखक पुढे आले. 'किर्लोस्कर' सारख्या मासिकाने हा नवा ध्येयवाद पुरस्कारावयास प्रारंभ केला. अशा रीतीने १९२० नंतरच्या कालात विशेषतः १९३० नंतर सामाजिक व वाङ्मयक्षेत्राचा एकंदर चेहरामोहराच बदलला आणि त्याचा परिणाम वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वरूपही थोडे फार बदलण्यात झाला.

वाङ्मयीन विद्वत्तेच्या या पाहणीच्या दृष्टीने सामाजिक सांस्कृतिक जीवनाची आणखी एकदोन अंगे विचारात घेणे अवश्य आहे. पहिल्या महायुद्धानंतर एकंदर युरोपीय वाङ्मयविचारात फरक पडला. समकालीन साहित्य —जे विद्यापीठाच्या कक्षेबाहेर ठेवले जाई— तसे ठेवणे अशक्य झाले. कारण आधुनिक वा समकालीन वाङ्मयाला दूर ठेवणे हे तिकडे नव्या आलेल्या पिढीला पटेना. त्याशिवाय महत्त्वाचा फरक म्हणजे विद्यापीठात विज्ञानशास्त्रे व इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इ. शास्त्रांचा विद्यापीठीय अभ्यासक्रमावर प्रभाव वाढत चालला. नव्या परिस्थितीत त्या शास्त्राप्रमाणे वाङ्मयाचेही तज्ज्ञताप्रधान (स्पेशलाइजड्) अभ्यासक्रम तयार झाले, त्यात वाङ्मयविचाराला, वाङ्मयेतिहास, समीक्षाशास्त्र यांना विशेष महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. म्हणजे विद्यापीठीय अभ्यासक्रमातील वाङ्मयीन अभ्यास–अध्ययन अध्यापन यांची दिशा बदलली.

े ले शिक्षण इंग्रजी राजवटीत इंग्लंडमधील शिक्षणाशी जोडले होते. तिकडे काही फरक झाला की त्याचे पडसाद येथे पण उमटत असत. पण त्यात थोडे मागेपुढे असे. १९२० नंतर शिक्षणखाते आपल्याकडे आल्यानंतर भारतीय भाषाभिमानी लोकांचे दडपण वाढत गेले. त्यांची विद्यापीठीय अभ्यासक्रमात भारतीय भाषांना महत्त्वाचे स्थान देण्याची खटपट सुरू झाली. तात्यासाहेब केळकर, म. म. द. वा. पोतदार, कन्हय्यालाल मुनशी आदींनी या दिशेने विशेष खटपट केली व थोडाकार तीव्र झगडा होऊन १९३६ पासून विद्यापीठीय अभ्यासक्रमात आर्टस्‌कडील सर्व वर्गात व सायन्स, कॉमर्सकडील पहिल्या दोन वर्गात मराठीला स्थान लाभले. म्हणजे यावेळेपर्यंत वाङमयीन अभ्यास, चर्चा, विद्वत्ता-दर्शन हे केवळ हौसेच्या व अतिरिक्त ज्ञानलालसेच्या पोटी होत असे, त्याला आता विद्यापीठीय स्थान, दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्याचा परिणाम वाङमयाला ' वाङमय ' म्हणून एक प्रकारची स्वायत्तता लाभण्यात झाला आणि वाङमयीन विचार, परंपरा, प्रवृत्ती, ध्येये यांचे महत्त्व वाङमयक्षेत्रात वाढले. त्याचप्रमाणे प्राचीन व अर्वाचीन कालातील अभिजात ठरलेल्या वाङमयकृती, ग्रंथकार इ. चा विद्यापीठीय अभ्यासक्रमांत प्रवेश झाला. वाङमयेतिहासालाही महत्त्व प्राप्त झाले. या सान्यांचा संकलित परिणाम म्हणून ह्या कालात एकंदर वाङमयीन जाणिवेचे व विद्वत्तेचे स्वरूपही अधिक प्रगल्भ झाले.

ब्रिटिश सरकार सांस्कृतिक व वाङमयक्षेत्रीय अभिक्रियांबद्दल पूर्णपणे उदासीन असे. त्यामुळे वाङमयविषयक व सांस्कृतिक क्षेत्रांतील गरजा सरकारपुढे मांडून त्याच्यावर अधिक दडपण आणण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद ह्या संघटनेचा उपयोग करून घेण्यात आला. कारण वाङमयाच्या क्षेत्रातील या गरजांचे राजकारणनिरपेक्षत्व शासनाच्या गळी उतरविणे अवश्य होते. ही साहित्य परिषद राष्ट्रीय सभेप्रमाणेच १९२० पर्यंत प्रागतिक वा तत्सम प्रवृत्तींच्या लोकांच्या हाती होती. हे तोवेळपर्यंत साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद कोणाकोणास मिळाले हे पाहिले तरी स्पष्ट होईल. १९२० साली बडोद्यास संमेलनाचे अधिवेशन झाले. त्यावेळी अध्यक्षपदी राष्ट्रीय वृत्तीच्या व जहालपक्षाच्या तात्यासाहेब केळकरांची निवड झाली. त्यांचे भाषण त्यातील अभ्यासपूर्ण साहित्यविषयक चर्चेमुळे गाजले, त्यानंतर माधवराव अणे, शिवरामपंत परांजपे, वा. म. जोशी, डॉ. केतकर, श्रीमंत सयाजीराव महाराज, कृ. प्र. खाडिलकर, श्रीमंत बाळासाहेब औंधकर, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी राष्ट्रीय वृत्तीच्या लेखकांची व कैवाऱ्यांची तिच्या अध्यक्षपदी वर्णी लागली. या कालात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व नानासाहेब चापेकर हे त्यादृष्टीने थोडे वेगळ्या प्रवृत्तीचे अध्यक्ष झाले. अर्थात त्यांच्या विद्वत्तेमुळे व वाङमयीन कर्तृत्वामुळे त्यांना हा सन्मान मिळालेला होता, हे स्पष्ट आहे. त्यामुळे साहित्यक्षेत्राची राजकारण-निरपेक्षताच स्पष्ट झाली.

अशा रीतीने १९२० नंतरच्या अठरा-वीस वर्षांत वाङ्मयक्षेत्रातील विविध घडामोडी, चळवळी यांचा परिणाम होऊन वाङ्मयक्षेत्र स्वायत्तत्व पावत होते, आणि त्यातील विद्वत्तेला वेगळा आकार येत होता.

एखाद्या विषयाला किंवा भाषेला विद्यापीठीय अभ्यासक्रमात स्थान मिळाल्यानंतर काही फायदा होतो, तसा काही थोडाबहुत तोटाही होतो. फायदा म्हणजे असा की त्या विषयाकडे विद्वानांचे, बुद्धिमंतांचे लक्ष जाते, त्यांचा तो व्यासंगाचा व चिंतनाचा विषय बनतो, आणि त्यामुळे अभ्यासविषय या दृष्टीने त्याची निरनिराळी अंगे उपांगे उजेडात येतात व त्या विषयाच्या प्रकृतीला साजेसे अनुशासन निर्माण होते, व तो विषय 'शास्त्रीय'दृष्ट्या विकासक्षम होतो. उलट थोडासा तोटा असा की, सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या आकलनकक्षेत तो विषय आणून सोडावयाची क्रिया सुरू होते, आणि केवळ विद्यार्थी व त्यांच्या गरजा लक्षात घेऊन भाराभर लेखन होते, ग्रंथ निर्माण होतात. त्यांचे अंतिम महत्त्व ठरविणे कठिण होते. कारण हे लेखन बाळशापेक्षा सुजेच्या प्रकारचे असते. यात काही अपवाद मानावे लागतील एवढेच.

मराठी भाषेच्या बाबतीत असे दिसते की, साधारणत: १९२५ नंतर असे स्पष्ट दिसू लागले की आज ना उद्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात मराठीचा प्रवेश होणार. विद्यापीठातले अभ्यासक्रम हे प्राय: इतिहासप्रधान असतात. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाला साहजिकच महत्त्व येणे अपरिहार्य होते. त्यादृष्टीने वि. ल. भावे व ल. रा. पांगारकर यांचे मराठी वाङ्मयेतिहासावरले ग्रंथ ह्या संदर्भात उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे काव्यशास्त्र हा दुसरा महत्त्वाचा विषय होय, या विषयाच्या दृष्टीने प्रा. रा. श्री. जोग, प्रा. द. के. केळकर, डॉ. के. ना. वाटवे डॉ. मा. गो. देशमुख बाळूताई खरे यांचे ग्रंथ निर्देशनीय आहेत. प्रा. फडके यांचा गाजलेला 'प्रतिभासाधन' हा ग्रंथ त्याचप्रमाणे भाषाशास्त्राच्या क्षेत्रातील कृ. पां. कुलकर्णी यांचे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. पूर्वकालात राजाश्रय वा विद्यापीठाश्रय नसताही मोरो केशव दामले यांचा व्याकरणविषयक ग्रंथराज या नव्या वातावरणात महत्त्वाचा ठरावा हे स्वाभाविक होते. ललित वाङ्मयाच्या अभ्यासाच्या निमित्ताने कवींच्या काव्यरचनेवर (उदा. माडखोलकर कृत आधुनिककविपंचक) एकंदर ललितलेखनावर चर्चा करणारा 'प्रतिभासाधन' यासारखे ग्रंथ निर्माण झाले व त्याचप्रमाणे गडकरी, केशवसुत, हरिभाऊ आपटे इ. मान्यवर ग्रंथकारांच्या वाङ्मयाचा अभ्यास असाच स्वतंत्ररीतीने होऊ लागला. तसेच अभ्यासास नेमलेल्या प्राचीन ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या आवृत्त्या निघण्यास स्वाभाविकपणेच प्रेरणा मिळाली. विशेषत: जेव्हा अभ्यासक विद्यार्थ्यांची संख्या वाढते तेव्हा हे सहज शक्य होते. विद्यापीठीय अभ्यासाच्या निमित्ताने कितीतरी

प्राचीन ग्रंथांच्या संशोधित व संपादित आवृत्त्या निघाल्या आहेत व निघत आहेत. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने पोतदार यांचा ' मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ' व सरदार यांची ' अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका ' हे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. ही सारी ग्रंथरचना विद्यापीठ-संबद्ध असली तरी त्यानिमित्ताने निर्माण झालेले काही ग्रंथ हे खरोखर चिरंतन महत्त्वाचे आहेत. गं. दे. खानोलकर संपादित ' अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक ' ही ग्रंथमालाही ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे.

अशा रीतीने वाङ्मयीन क्षेत्रातील परिस्थिती इ. स. १९२० नंतर जरी बदलावयास लागली तरी तिचे खरे स्वरूप दृग्गोचर होण्यास आणखी आठ-दहा वर्षे जावी लागली, हे वर उल्लेखिलेल्या लेखकांच्या लेखनकालावरून व ग्रंथांच्या प्रकाशनकालावरून स्पष्ट होईल. राष्ट्रीय चळवळ जोरात असणाऱ्या ह्या कालात समाजवादी विचारासारखा, तरुणांचे लक्ष वेधून घेणारा विचार वाढू लागला. त्याने तत्कालीन छोटचा मोठचा लेखकांना एक दृष्टी दिली, एक नवा ध्येयवाद दिला, की ज्याचा परिणाम वाङ्मयावर व विशेषत: वाङ्मयविषयक विचारावर झाल्याविना राहिला नाही. अशा रीतीने अनेक दिशांनी समाजजीवनाचा व साहित्याचा रथ मार्ग आक्रमू लागला.

या सर्व विविध अभिक्रमांत वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाच्या व प्रकर्षाच्या दृष्टीने महत्त्वाची घटना म्हणजे विद्यापीठातून उच्चतर ज्ञानाच्या परिसाधनेसाठी पीएच्.डी. सारख्या संशोधन-पदवीची झालेली तरतूद होय. पदवीपूर्व वर्गांतून मराठीचा प्रवेश झाला, त्याचवेळी उच्च अभ्यासाच्या क्षेत्रात ही तरतूद झाली. मुंबई विद्यापीठातून मराठीचे पहिले डॉक्टर श्री. पु. ग. सहस्रबुद्धे हे १९३९ मध्ये पीएच्.डी. झाले. वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने ह्या पदवीला अत्यंत महत्त्व आहे. एम्.ए. च्या उत्तरपत्रिका मराठीतून लिहिण्याची सवलत पूर्वीपासून होती, तरी त्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठीतून काढल्या जात नसत, ती प्रथा १९३९ पासून सुरु झाली. अशा प्रकारे वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्रातील नवे पर्व इ. स. १९३९ च्या आगेमागे सुरू झाले असे म्हणता येईल.*

या विद्यापीठ संशोधन-पदवी-प्रवेशपूर्व-कालात वाङ्मयाच्या व विद्वत्तेच्या क्षेत्रात इतके विविध प्रकारचे प्रकल्प, अभिक्रम चालू होते की, संशोधनपदवीच्या रूपाने वाङ्मयीन व एकंदर विद्वत्तेचे नवे पर्व निर्माण झाले आहे, हे कोणाच्या

* डॉ. माधवराव पटवर्धन यांनी याच सुमारास डी.लिट्. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी संपादिली. तसेच मराठी ग्रंथलेखनास उत्तेजन म्हणून तर्खडकर पारितोषिक ठेवण्यात आले. ही मराठीला विद्वन्मान्यता मिळाल्याची गमके होत.

लक्षातच आले नाही. विद्यापीठाच्या अनेकविध ठरीव (रुटीन) कामांपैकी हे एक आहे, असे मानले जाते. या विद्वत्क्षेत्रीय अभिक्रमामुळे एकंदर विद्वत्तेचे पाऊल पुढे पडणार आहे, याची जाणीव अल्पांना असते.

संशोधनपदवी प्रविष्ट होण्याची पूर्वतयारी ह्या विविध अभिक्रमांनी केलेली होती हे अमान्य करता येत नाही. हे सारे उपक्रम केवळ खाजगी उपक्रमशीलतेच्या जोरावर व संबंधी व्यक्तींच्या जिद्दीमुळे तडीस नेले जात होते, हेही एक लक्षणीय अंग आहे. काही उदाहरणांनी हे स्पष्ट होईल. हे विविध उपक्रम विद्वत्तेशी संबंध असलेल्या विविध क्षेत्रातील आहेत, त्यांनी या कालात महाराष्ट्रातील विद्वत्तेची प्रतिष्ठा वाढविली आहे. वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाला हे सारे पोषक आहेत.

विशुद्ध ज्ञानसंग्रहाच्या दृष्टीने उल्लेखनीय ऐतिहासिक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे डॉ. केतकरप्रणीत 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हा होय. ह्या ज्ञानकोशामुळे महाराष्ट्रात एक छोटेसे कोशयुग निर्माण झाले असे म्हटले जाते. आज निरनिराळ्या क्षेत्रांत मोठमोठ्या कोशयोजना प्रकल्परूपाने कार्यवाही होत आहेत, झाल्या आहेत, त्यांचे श्रेय या कालातील विविध कोशप्रधान अभिक्रमांना आहे. महाराष्ट्र ज्ञानकोशातून बाहेर पडलेल्या दाते–कर्वे यांनी 'महाराष्ट्र–शब्दकोशा' चा प्रकल्प हाती घेतला आणि उदंड मोलाचे हे काम तडीस नेले. त्यानंतर कर्व्यांनी वाक्प्रचार व म्हणींचे तीन खंड प्रकाशित केले. अशा रीतीने विद्वत्तेच्या क्षेत्रातील हे महत्त्वाचे काम सामुदायिक जबाबदारीने पार पडले. आणि अशी कामे करण्याचा नवा पायंडा पडला.

याच प्रकारचे उल्लेखनीय कार्य म्हणजे प्रा. श्री. म. माटे यांचे होय. त्यांनी 'महाराष्ट्र शतसांवत्सरिक' प्रकाशित करून एका मोठ्या योजनेचे सुतोऽवाच केले. त्यानंतर १९३४ व ३५ या वर्षांची 'सांवत्सरिके' काढून ज्ञानसंकलनाचा आधुनिक मार्ग दाखवून दिला. पण केवळ खाजगी उपक्रमशीलतेवर हे कायम स्वरूपाचे काम तडीस जाणे शक्य नव्हते. त्याशिवाय प्रा. माटे यांनी 'विज्ञानबोध' हे वार्षिक काढण्याचा उपक्रम केला, तोही ज्ञानक्षेत्रीय अभिक्रमाच्या दृष्टीने निर्देशनीय आहे. 'विज्ञानबोधा'च्या 'प्रस्तावने'च्या रूपाने प्रा. माटे यांनी आधुनिक व प्रगमनशील विचारशीलतेचाही प्रत्यय आणून दिला. त्याशिवाय ते 'वादकोशा' च्या तयारीला लागले होते, पण पुढे त्याचे काय झाले ते कळले नाही, तरी आधुनिक ज्ञानाची क्षितिजे किती रुंदावत होती ह्याची कल्पना येते. प्रा. माट्यांचे हे सारे उपक्रम हे सामुदायिक सहकार्यावर आधारलेले होते. आणि

महाराष्ट्रातील विद्वत्तेची शान त्यांनी वाढविली हे म्हणणे चूक होणार नाही. त्याशिवाय चरित्रकोश (सिद्धेश्वरशास्त्री चित्राव) व्यावहारिक ज्ञानकोश (ग. रं. भिडे) व्यायाम ज्ञानकोश (मुजुमदार) इ. कोशांनी महाराष्ट्रातील विद्वत्तेला विधायक मार्गांनी कार्यवाही केले आहे.

ज्ञानाच्या क्षेत्राप्रमाणे इतिहासाच्या क्षेत्रात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' हे चोवीस साधनग्रंथ केवळ आपल्या उपक्रमशीलतेने प्रसिद्ध केले. त्यांना मधून मधून जोडलेल्या प्रस्तावना महाराष्ट्रीय ऐतिहासिक व सर्वंकष विद्वत्तेची शिखरे आहेत. त्याशिवाय 'ज्ञानेश्वरी' ची अधिकृत प्रत संपादन करणे, ज्ञानेश्वरीचे व्याकरण लिहिणे ही सारी कार्ये वाङ्मय-क्षेत्राला श्रेष्ठपणा आणून देणारी अशीच आहेत. राजवाड्यांच्या प्रयत्नांनी व त्यांच्या उदाहरणाने त्या सुमारास महाराष्ट्रात काही ठिकाणी संशोधनमंदिरे स्थापन झाली व त्यांनी इतिहास व प्राचीन वाङ्मयसंशोधनाचे मोलाचे कार्य हाती घेतले. धुळ्याच्या जोडसंस्था, वाईची प्राज्ञ पाठशाळा, पुण्याचे भारत इतिहास संशोधन मंडळ, विदर्भ मराठवाडा येथील तत्सम संस्था इ. च्या कार्याचा या संदर्भात उल्लेख करता येईल. नंतरच्या काळात इतर विद्वानांच्या प्रयत्नाने शासकीय उपक्रमशीलतेमुळे 'पेशवे दप्तराचे' ४७ खंड प्रकाशित झाले. ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टीने ह्या पत्रव्यवहाराचे महत्त्व केवळ असाधारण आहे. याशिवाय पारसनीस, खरे, साने यांच्या इतिहास-संशोधनाचा उल्लेख मागे आलेलाच आहे.

वाङ्मयाचा अभ्यास उच्च स्तरावर होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे प्राचीन कवींकडेही लक्ष गेले. निर्णयसागर प्रेसने प्राचीन कवींच्या बऱ्याच कविता प्रकाशित केल्या. 'यशोदापांडुरंगी' व बा. म. हंस यांचे वामन मोरोपंतांवरले निबंध मागील कालातील आहेत. एकेका मोठ्या लेखक कवींच्या अभ्यासाचा प्रघात सुरू झाला होता. त्यात काही उपक्रम सामुदायिक आहेत. तात्यासाहेब केळकरांच्या षष्टयब्दिपूर्तीनिमित्त 'केळकर' ग्रंथ ह्या प्रकारचा प्रयत्न होय. प्राचीन कवींपैकी उल्लेखनीय उपक्रम म्हणजे "ज्ञानेश्वर दर्शन" हा दोन खंडांतला ग्रंथ, तसेच सत्कार्योत्तेजक सभेतर्फे प्रकाशित झालेले रामदासस्वामींच्या कार्यावर व वाङ्मयावर निरनिराळ्या विद्वानांनी लिहिलेले तीन खंड होत. वाङ्मयाला आलेले महत्त्व लक्षात घेऊन अ. का. प्रियोळकर यांनी रघुनाथ पंडितांचे 'दमयंती–स्वयंवर' पाठचिकित्साशास्त्रीय प्रस्तावनेसह प्रकाशित केले आणि त्यानंतर प्रा. पंगूंनी 'सामराजा' वर आपला ग्रंथ प्रकाशित केला. विदर्भात य. खु. देशपांडे, डॉ. कोलते, वा. ना. देशपांडे आदी विद्वानांनीही आपले महानुभाव पंथावरील असेच मोलाचे संशोधन कार्यसुरू केले. प्राचीन वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा अशा

ल. रा. पांगारकर व वि. ल. भावे यांच्या ग्रंथांचा उल्लेख यापूर्वी आलेला आहेच. आधुनिक मराठी वाङमयाच्या इतिहासाची जरूरी वाटावयास लागली. त्यादृष्टीने बडोदे येथून प्रकाशित झालेला नेने संपादित ' अर्वाचीन मराठी साहित्य ' हा ग्रंथ उल्लेखनीय आहे. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, या ग्रंथाचे नांव ' अर्वाचीन मराठी साहित्य ' असे आहे, तरी त्यात साहित्याच्या, काव्य, नाटक, कादंबरी, कथा, चरित्र, विनोदी वाङमय, बालवाङमय, भाषाशास्त्रीय वाङमय, समीक्षणात्मक वाङमय, कोश वाङमय या वाङमयसंबद्ध ज्ञानशाखांबरोबर, इतिहास व इतिहास-संशोधन, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, शास्त्रीय वाङमय या विषयांवर तज्ज्ञांकडून लिहून घेतलेले लेख ह्या ' साहित्या 'त समाविष्ट केले आहेत. त्याशिवाय साहित्य-संमेलने, नियतकालिके, बंगालीची मराठीस देणगी, हे विषयही निबंधरूपाने मांडले आहेत. वाङमयीन विद्वत्तेच्या विकासास पोषक असा हा ग्रंथ आहे. याच सुमारास इंदूरच्या वि. सी. सरवटे यांनी ' मराठी साहित्य समालोचन ' हाही आधुनिक मराठी वाङमयेतिहासाचा ग्रंथ प्रकाशित केला. अर्वाचीन मराठी वाङमयास येत असलेल्या महत्त्वाचे द्योतक असे हे अभिक्रम होत.

वाङमयीन आणि विद्वत्क्षेत्रीय जाणीव आणखीही काही अभिक्रमांतून व्यक्त होते. राजकीय व सर्वसाधारण विचारक्षेत्रात जे नवे नवे विचार येत होते, त्याच्यावर उलटसुलट चर्चा झाली होती. त्या चर्चेला केवळ तात्कालिक असे महत्त्व नसून वाङमय, विद्वत्ता, सामाजिक शास्त्रे यांना भविष्यकालात उपयुक्त होईल असे काहीतरी ह्या चर्चेत असते, हे लक्षात घेऊन य. गो. जोशी यांनी आपली ' वादविवेचनमाला ' प्रसिद्ध केली. आचार्य शं. द. जावडेकर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वर उल्लेखिलेले समाजवादी विचारांचे अभ्यासक अशां सारख्या विद्वान विचारवंतांकडून वैचारिक भरणपोषणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा अनेक विषयांवर छोटी मोठी पुस्तके प्रकाशित केली बौद्धिकदृष्टया वर्धमान अवस्थेत असलेल्या तत्कालीन विद्यार्थी-पिढीचे ह्या मालेतील पुस्तकांनी चांगले भरणपोषण केले आहे. ' सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाले 'नेही या प्रकारचे अनेक ग्रंथ प्रकाशित केले आणि विद्वत्तेला कालास योग्य असा घाट देण्याचा प्रयत्न केला. आचार्य जावडेकर यांचा ' आधुनिक भारत ' हा ग्रंथ ह्या संदर्भात उल्लेखनीय आहे.

या संदर्भात विद्वत्ता, ज्ञानवर्धन, समीक्षा, साहित्यचर्चा केवळ ललितसाहित्य व ललित आणि विचारप्रधान वाङमय प्रकाशित करणाऱ्या अनेक नियतकालिकांचा व मासिकांचा उल्लेख करावा लागेल. ' विविधज्ञानविस्तारा 'चा उल्लेख मागे आलेला आहेच. त्यानंतर यादृष्टीने नाव घेण्यासारखी मासिके म्हणजे ' मनोरंजन ', ' चित्रमयजगत ', ' रत्नाकर ', ' ज्योत्स्ना ', ' पारिजात ', ' सह्याद्री ', ' नव-

भारत ', 'अभिरुची ' इ. ही विशिष्ट विषय व दृष्टिकोणासाठी प्रसिद्ध असणारी मासिके उल्लेखनीय आहेत· त्याचप्रमाणे केवळ लघुकथा प्रकाशनासाठी वाहून घेतलेली त्यावेळची 'स्फूर्ति ', 'यशवंत ', 'सत्यकथा ' इ. मासिकांनी लघुकथा-लेखकांची नवी पिढी तयार केली व पुढे आणली. त्याशिवाय 'नवयुग ', 'चित्रा ', 'मौज ', 'निर्भीड ' 'साधना' आदी साप्ताहिकांनी व 'प्रतिभा ' पाक्षिकाने वाङमयीन अभिरुचीस विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'किर्लोस्कर ', 'स्त्री ' 'मनोहर ' ह्या तीन मासिकांचे कार्यही वाङमयीन व एकंदर विद्वत्तेच्या आणि, आधुनिक विचारांच्या अभिवर्धनाच्या दृष्टीने अतिशय प्रेरक असे झालेले आहे· 'किर्लोस्कर 'ने विचारवंत कलावंत लेखकांची नवी पिढी महाराष्ट्रास सादर केली.

इ. स. १९३० मध्ये प्रा. ना. सी. फडके यांनी आपले 'प्रतिभासाधन ' प्रकाशित केले. त्या पुस्तकाने एक वाङमयीन गुणवैशिष्टयांची व्यापक जाणीव निर्माण केली आणि महाराष्ट्राला जवळ जवळ तप दीड तप वाङमयीन चर्चेसाठी 'कला: जीवनासाठी की वाङमयासाठी ', हा वाद प्रदान केला. वाङमय व विचार-क्षेत्रातील प्रत्येक अभ्यासकाला ह्या विषयावर आपले मत मांडावे असे वाटावयास लावण्याइतकी या वादाने मध्यमवर्गीय जनमनाची पकड घेतली होती. अत्रे, खांडेकर, माडखोलकर, वरेरकर इ. ललितलेखकांप्रमाणे आचार्य भागवत, जावडकर, रावसाहेब पटवर्धन यांच्यांसारख्या विचारवंतांनाही ह्या वादात सहभागी होण्याची इच्छा व्हावी, इतका हा वाद प्रभावी होता. त्या संदर्भात आचार्य जावडेकर यांचे 'पुरोगामी साहित्य ' हे प्रसिद्ध झालेले छोटे पुस्तक संस्मरणीय आहे. वाङमयीन विवेचन आणि विद्वत्ता यांचा मनोहर संगम त्यात झालेला आहे· या वाङमयीन वादाचे पडसाद संबद्ध विषयावरील लेखांच्या रूपाने निरनिराळ्या मासिकांत उमटले आहेत. लालजी पेंडसे यांच्या 'साहित्य व समाजजीवन ' या ग्रंथाने ह्या वादास वेगळेच परिमाण प्राप्त करून दिले. नंतर आलेल्या पिढयांना हा वाद 'शुष्क ' वाटत असेल, पण तत्कालीन वातावरण लक्षात घेतले तर तसा शुष्कपणा त्यात नव्हता, असे म्हणावे लागेल. त्या पुस्तकाच्या परीक्षणाच्या निमित्ताने पु. य. देशपांडे यांची त्या विषयावरील 'प्रतिभा ' पाक्षिकातील लेखमाला आणि 'रामशास्त्री ' हे संकलन वाङमयीन विद्वत्तेचा आलेख पाहण्यास आजही उपयुक्त ठरेल. या कालातील ह्या उपक्रमांचे उद्दिष्ट वाङमयीन अभि-रुचीला वळण लावणे हे असावे, कारण पाश्चात्य समीक्षेचे उद्दिष्ट तेच होते. प्रा. सेंटसबरी यांच्या समीक्षेचा-इतिहास या ग्रंथाचे उपशीर्षक "वाङमयीन अभिरुचीचा इतिहास " असे आहे· याच विचाराचा आपल्याकडील अभ्यासकांवर प्रभाव पडणे अपरिहार्य होते.

वाङ्मयीन अभिरुचीला विशिष्ट वळण लावणारा एक घटक म्हणजे माध्यमिक शाळेतील भाषाविषयक पाठ्यपुस्तकांचा होय. शिक्षणखाते हे आपणाकडे आल्यानंतर शिक्षकांची जी पिढी निर्माण झाली ती साहित्यिकांची वा साहित्यप्रेमी रसिकांची होय. या पिढीतील, गं. दे. खानोलकर, श्री. बा. रानडे, यांचे 'गद्य वैभव' व 'महाराष्ट्र रसवंती' हे गद्य व पद्याचे संग्रह; त्याचप्रमाणे अत्रे, कानेटकर यांची 'अरुण वाचनमाला' या आरंभीच्या नवीन दृष्टीने केलेल्या संकलनांनी तत्कालीन माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या मनात वाङ्मयाविषयी एक प्रकारची आवड व रुची निर्माण केली. उत्तम उतारे वाचण्यात व अभ्यासात आल्याने त्यांची अभिरुची सुद्धा चांगल्या रीतीने संस्कारित झाली. दोन महायुद्धांच्या दरम्यानचा हा काल एकापरीने वाङ्मय-विचाराला अनुकूल असा होता. शाळेत येणारा विद्यार्थीवर्गही तेथील शिक्षकांसारखा व सहित्यिकांसारखा मध्यमवर्गातूनच आलेला होता. पारतंत्र्य असल्याने व देश स्वातंत्र्यलढ्यात गुंतलेला असल्याने सामाजिक शास्त्रे व विज्ञानशास्त्रे ही केवळ नाममात्र स्वरूपात अस्तित्वात होती. विचार व ज्ञानदृष्टीने महत्त्वाचे 'इतिहास' हे शास्त्रच बुद्धिवंतांना जवळचे वाटत होते. (डॉ. आंबेडकर, धनंजयराव गाडगीळांसारखे अर्थशास्त्रज्ञ मुंबई विद्यापीठात महत्त्व पावल्यानंतर अर्थशास्त्र व सामाजिक शास्त्रे यांना विद्यापीठात महत्त्व प्राप्त होऊ लागले.) त्यामुळे वाङ्मयाभ्यासास महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य होते. अशा रीतीने विद्यार्थी अवस्थेपासून वाङ्मयीन आवड निर्माण व्हावी अशी तरतूद भाषिक अभ्यासक्रमात व नियुक्त पाठ्यपुस्तकांतच होती. घाटे, अत्रे यांच्या वाचनमालेने हे लोण प्राथमिक शाळेपर्यंत पोचविले होते.

दोन महायुद्धांच्या मधल्या कालात महाराष्ट्रातील बुद्धिजीवी वर्गाचे भरणपोषण, कसे होत होते, आवडी-निवडी कशा बनत होत्या, त्यांच्या बुद्धीला व कर्तृत्वाला कोणती क्षेत्रे जवळची वाटली व चालू असलेल्या विविध अभिक्रियांतून विद्वत्तेला वेगळाच घाट कसा आला होता; त्याचप्रमाणे वाङ्मयीन विद्वत्तेचे स्वरूप कसे अधिकाधिक रेखीव होऊ लागले ह्याची कल्पना या विवेचनावरून येऊ शकेल. पूर्वकालात चालू असलेल्या या विविध अभिक्रिया महायुद्धोत्तर कालातही चालू होता व आजही आहेत. कोश-वाङ्मयाच्या संदर्भात 'भारतीय संस्कृति कोश', 'तत्त्वज्ञानमहाकोश' 'सुलभ विश्वकोश' इ. उपक्रम उल्लेखनीय आहेत. साहित्य संस्कृति मंडळातर्फे व्हावयाच्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रयोजित युगप्रवर्तक विश्वकोशाची योजना झपाट्याने प्रगती करीत आहे. त्याशिवाय निरनिराळी विद्यापीठे, साहित्य व संशोधनसंस्था, प्रकाशन-संस्था वाङ्मयाचे इतिहास, वाङ्मय-कोश इ. सारख्या योजना तज्ज्ञांच्याच सहकार्याने आखीत आहेत. प्रा. माटे यांच्या 'महाराष्ट्र शतसांवत्सरिका' चे धर्तीवर महाराष्ट्र

भूमि इतिहास, परंपरा, वाङ्मय, उद्योगधंदे, अर्थव्यवहार इ. क्षेत्रांतील विविध अभिक्रमांचे संकलन करण्याच्या प्रयत्नांची एक मालिकाच दाखविता येते. य. गो. जोशी यांनी तयार करविलेला, 'महाराष्ट्र परिचय', संयुक्त महाराष्ट्र जेव्हा दृष्टिक्षेपात आला तेव्हा, 'संयुक्त महाराष्ट्र कसा असेल, कसा असावा' हा छोटेखानी महाराष्ट्रविषयक लेखसंग्रह, महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर तयार व प्रकाशित झालेले प्रा. गं. बा. सरदार संपादित 'महाराष्ट्र जीवन'चे दोन खंड व अगदी अलीकडे प्रकाशित झालेला 'अस्मिता महाराष्ट्राची' हा ग्रंथ. अशा रीतीने महाराष्ट्रविषयक विविध माहितीचे या सारख्या ग्रंथांद्वारे संकलन चालू आहे. हे सारे विद्वत्ताविकासाला पोषक आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन अशा प्रकारे एकप्रकारच्या साक्षेपाने चालू आहे. महत्त्वाच्या ग्रंथकारांचे ग्रंथ साक्षेपाने संपादित होत आहेत. महानुभावांचे वाङ्मय संशोधनपूर्वक संपादित करून प्रसिद्ध करण्याचे ठिकठिकाणी चाललेले विविध अभ्यासकांचे प्रयत्न असेच लक्षणीय आहेत. य. खु. देशपांडे, शं. दा. पेंडसे, रा. चिं. ढेरे, वि. भि. कोलते, शं. गो. तुळपुळे आदींचा उल्लेख अवश्य आहे. वाङ्मयीनदृष्टचा महत्त्वाच्या प्राचीन ग्रंथांच्या चिकित्सक आवृत्त्याही अनेकांनी काढल्या आहेत. त्याचप्रमाणे कृ. पां. कुलकर्णी, अ. का. प्रियोळकर, सुरेश डोळके, श्री. ना. बनहट्टी, अरविंद मंगरूळकर, स. गं. मालसे, म. वि. धोंड, र. वि. हेरवाडकर, ह. श्री. शेणोलीकर, रा. शं. वाळिंबे आदींचे साक्षेपी संपादन लक्षणीय आहे. ही यादी आणखीही विस्तारपूर्वक वाढविता येईल. साहित्यसमीक्षा हे ज्ञानक्षेत्र स्वायत्त होऊन स्वतंत्ररीत्या विकास पावत आहे. साहित्यक्षेत्रीय वादांचे स्वरूप, पातळी व दृष्टिकोन गेल्या १५।२० वर्षांत संपूर्ण बदलला आहे. व अगदी वेगळ्या प्रकारचे लेखन आजकाल ग्रंथरूपाने व विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध होत आहे. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर जी वाङ्मय भाषा व संस्कृतिविषयक नवी जाणीव झाली आहे, तिचे प्रतिबिंब सर्वत्र दिसून येते. लोकवाङ्मयासारखे दालन अलीकडे डॉ. सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत यांसारख्या साक्षेपी अभ्यासकांच्या प्रयत्नाने समृद्ध होत आहे. हा एक अतिशय मोलाचा अभिक्रम आहे. त्याला विद्यापीठीय प्रतिष्ठा मिळणे अवश्य आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व त्यापूर्वीच्या कालापासून विविध साहित्य-परिषदांनी आपले धोरण वाङ्मयीन अभिवृद्धीला अनुकूल असे केले. मुंबईच्या साहित्यसंघाने वा. म. जोशी व्याख्यानमाला आयोजित करून प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. वि. ह. कुलकर्णी, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे आदी वाङ्मय व समीक्षेच्या साक्षेपी अभ्यासकांना निमंत्रणे देऊन त्यांच्याकडून वाङ्मयाभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची पुस्तके लिहवून घेतली. तर पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने

वाङ्मयाच्या निरनिराळ्या विभागातील वार्षिक प्रगतीचे, वादांचे आढावे घेणाऱ्या व्याख्यानमाला आयोजिण्याचे उपक्रम केले. या संस्थांनी चालविलेल्या वाङ्मय-नियतकालिकांचाही उल्लेख या संदर्भात करता येईल. अशा रीतीने वाङ्मयसंबद्ध विषय महत्त्वाचे झाले. पूर्वकालातील त्याच्यामागील सामाजिक अनुबंध गळून पडला. वाङ्मयास प्राप्त होत असलेल्या स्वायत्ततेचें हे द्योतक होय.

: ६ :

वाङ्मयीन विद्वत्तेच्या विकासाचा चौथा कालखंड महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून सुरू होतो. विशेष म्हणजे मराठी भाषेला राज्यभाषा म्हणून मान्यता मिळाल्याचा हा कालखंड होय. पूर्वकालीन कालखंडांशी तुलना करताना या कालखंडाचे अनन्यपण अनेक दृष्टींनी लक्षात येते. आताच उल्लेखिलेल्या अनेक व्यक्तींप्रमाणे अनेक संस्था संघटना कार्यवाही होत आहेत व योजना हाती घेत आहेत. विशेष म्हणजे या सर्व योजनांचे, अभिक्रियांचे श्रेय महाराष्ट्राच्या प्रगत शासनाला व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांना आहे. साहित्य आणि संस्कृति मंडळाची महाराष्ट्र शासनाने स्थापना करून फार मोठी कामगिरी केली आहे. ज्ञान विज्ञान व वाङ्मय-क्षेत्रीय विविध अभिक्रिया उपक्रम यांना आगळे वेगळे प्रोत्साहन शासनाकडून मिळत आहे. निरनिराळे कोश, महाकोश, वाङ्मयेतिहास व तत्सम योजना, तसेच ग्रंथप्रकाशनाला अनुदान, साहित्य संशोधन व प्रकाशन संस्था तसेच विविध ज्ञानक्षेत्रीय नियतकालिके यांना अनुदान इ. अनेक मार्गांनी अक्षरशः शतमुखांनी धनाचा व साहाय्याचा ओघ वाङ्मय व संस्कृति-क्षेत्राकडे चालू लागला आहे. ग्रंथांना पारितोषिके देणे हाही एक असलाच उपक्रम आहे.

असे असले तरी पूर्वकालीन प्रकल्पाचे अनन्यपण आजही लक्षात घेण्याइतके ठसठशीत आहे. शासनाचे साहाय्य नसताना ज्ञानकोश, शब्दकोश अगर महाराष्ट्र सावंत्सरिक अगर निरनिराळे कोश तयार झालेले आहेत. ते अधिक महत्त्वाचे मानावे लागतात. शासनाचे उत्तेजन उदंड आहे. निरनिराळ्या ग्रंथकारांचे ग्रंथही शासनाच्या उत्तेजनाने मोठ्या इतमामाने व प्रतिष्ठेने बाहेर पडत आहेत. एका दृष्टीने वाङ्मयीन उत्तेजनाचे हे सुवर्णयुगच सुरू झाले आहे असे म्हणता येईल. शासनव्यवहारात मराठी प्रविष्ट करण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनही कार्यवाही झालेले आहे. भाषा संचलनालयाची स्वतंत्र रीतीने स्थापना करून त्या संघटनेतर्फे भाषाविषयक विशेषतः मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने

महत्त्वाचे असे अनेक उपक्रम चालू आहेत. हे सारे विचारात घेतले तर वाङमयीन उत्तेजनाचे हे सुवर्णयुग सुरू झाले आहे असे वर म्हटले ते योग्य आहे असे म्हणता येईल. पण हा सारा सुवर्णाचा ओघ काही प्रमुख शहरांच्या संस्थांच्या परिसरातच साकळला जाऊ नये व इतरत्र असलेल्या खऱ्या अभ्यासकांची वंचना होऊ नये, असेच कोणीही म्हणणार.

या सर्व गोष्टींत वाङमयीन वा तत्सम विद्वत्तेला शिस्त लावण्याचे तिचे संस्कार दृढतर करण्याचे काम तसेच राहिलेले आहे. विशेषतः नवीन शिक्षितांच्या पिढीवर हे विद्वत्तेचे संस्कार करण्याच्या योजना अधिक प्रमाणात हाती घेणे व त्यांच्या ठायींची उपक्रमशीलता वाढविण्याचा प्रयत्न करणे अवश्य झाले आहे. त्या दृष्टीने काही योजना या ठिकाणी मांडण्याचा विचार आहे. यांपैकी वा या चेहऱ्या-मोहऱ्याच्या काही योजना विचारार्ह असतीलही पण तरीही ह्या ठिकाणच्या विवेचनाचे महत्त्व कमी होत नाही.

अशा रीतीने महाराष्ट्रातील वाङमयीन विद्वत्तेचा व्यापक आढावा घेतल्या-नंतर, या दृष्टीने विद्यापीठाच्याद्वारे जे काही उपक्रम होत असतात, त्यांचा विचार करणे अवश्य आहे. कारण त्यांचा तरुण पिढीच्या बौद्धिक भरणपोषणाशी निकट-वर्ती संबंध असतो. आणि त्या क्षेत्रात जर अधिकाधिक साक्षेपी उपक्रम व्हावयास लागले तर त्यायोगे एकंदर विद्वत्तेचा (व विशेषतः वाङमयीन विद्वत्तेचाही) कस वाढतो. ती केवळ ॲकॅडेमिक म्हणजे आधिवैद्यिक न राहता सर्जक होते, एकंदर सामाजिक विकासाच्या दृष्टीने तसे होणे आवश्यक आहे. म्हणून विद्या-पीठीय प्रबंधलेखनात्मक अभिक्रमांचा विचार करणे आवश्यक वाटते.

## : ७ :

महाराष्ट्रातील विद्यापीठे ही केवळ परीक्षा घेणारी न राहता संशोधन व अनुशासन-प्रसरण ह्या दृष्टीने आपल्या विविध अधिविभागांच्या द्वारा कार्यवाही झालेली आहेत. डॉक्टरेटच्या पदवीसाठी प्रबंधलेखन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले आहे. त्याचा विद्वत्तेच्या व वाङमयीन विद्वत्तेच्या आंतरिक जडणघडणीशी घनिष्ट संबंध आहे. साहजिकपणे प्रथम पीएच्.डी. पदवी संबंधाने व त्या पदवीसाठी लिहिल्या जाणाऱ्या प्रबंधांविषयी थोडे विवेचन करणे अवश्य आहे.

पीएच्.डी. पदवी मुंबई विद्यापीठाने प्रविष्ट केल्यास ३५ वर्षांवर काल लोटला. नागपूर व इतर विद्यापीठांनीही त्याच सुमारास ही पदवी सुरू केली. विद्यापीठांनी नुसत्या परीक्षा घेण्याबरोबरच उच्च स्तरांवरील विद्यार्थ्यांना अध्यापन व मार्गदर्शन करण्याचे ठरविल्यानंतर या पदवीची आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यापीठांच्या विविध विद्याशाखा जसजसे आपले अध्यापनाचे व संशोधनाचे क्षेत्र वाढवितात तसतशी संशोधन-विद्यार्थ्यांची संख्याही वाढणे अपरिहार्य असते.

वास्तविक पीएच्.डी. ही पदवी विद्यापीठातील सर्वच विद्याशाखांसाठी उपलब्ध असते, त्याप्रमाणे विविध शाखांतून ही पदवी संपादन केलेले अनेकजण प्रत्यही बाहेर पडत असतात, पण प्रत्यक्षात असे दिसते की, मानव्य विद्याशाखेतील व विशेषत: भाषा व वाङमय विषयांतील पीएच्.डी. विद्यार्थ्यांविषयी, त्यांच्या प्रबंधां-विषयी अनेक गैरसमज दिसतात. असे असण्यात खरोखर सत्याचा भाग किती व पूर्वग्रहांचा भाग किती हा प्रश्न पडतो. संशोधनाने पीएच्.डी.सारखी पदवी संपादावयाची असल्याने, म्हणजे त्या पदवीधारकाला डॉक्टर ही उपाधी लावण्याची प्रथा असल्याने सादर केलेल्या प्रबंधाने ज्ञानात मोठी भर घालणे अवश्य आहे, असे गृहित धरले जात असे. एम्.ए. हीच मोठी पदवी मानली जाई. त्याच्यापुढची ही पदवी असल्याने प्रबंधाबद्दल फार मोठ्या अपेक्षा निर्माण झालेल्या असत. त्यादृष्टीनेच प्रबंधाकडे पाहिले जात असल्याने काही वेळा थोडी फार निराशा पदरात पडणेही स्वाभाविक होते.

विज्ञान-शाखांत संशोधन करून ही पदवी प्रत्यही अनेकजण संपादित असतात. परंतु त्या पदवीधारकांविषयी एवढे गैरसमज नसतात. याचे कारण विज्ञान-विषयातले सामान्यांना फारसे कळत नसते. शिवाय विज्ञानशास्त्रांनी आपल्या संशोधनाचे तंत्र व पद्धती ह्या अशा निश्चित केलेल्या आहेत की आणि संशोधन-विद्यार्थ्यांकडून कोणत्या अपेक्षा करावयाच्या हे त्या क्षेत्राच्या बाबतीत सामान्यत: ठरलेले असते. सामाजिक शास्त्रांनी आपली शोधायुधे वापरून सिद्ध केलेल्या संशोधनपद्धतींचे वैज्ञानिक पद्धतींशी साम्य आहे. आणि सामाजिक शास्त्रांच्या कक्षेतले विषय पुनः तज्ज्ञतेच्या श्रेणीतले असतात. शोधायुधांचा वापर करून सामाजिक शास्त्रे नवी माहितीच उपलब्ध करतात. तशी माहिती मिळविणे व तिचे व्यवस्थापन करणे, इतक्या माफक अपेक्षा सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत ठेवल्या जातात. त्यामुळे त्या क्षेत्रातील ही (पीएच्.डी.) पदवी धारण करणाऱ्यांविषयी तसा विशेषसा पूर्वग्रह नसतो.

वाङ्मयाच्या क्षेत्राचे तसे नाही. एक म्हणजे या क्षेत्रातले विषय सामान्यतः सर्वांना सुगम व समजण्यासारखे असतात. वाङ्मयाचे स्वरूपच समावेशक असे असते, त्यामुळे हे झालेले असते. दुसरे म्हणजे विज्ञान व सामाजिक क्षेत्रांतल्या संशोधनाप्रमाणे आताच पाहिल्याप्रमाणे काही अधिसंकेत रूढ झालेले नाहीत. त्याशिवाय महत्त्वाचे कारण म्हणजे वाङ्मयक्षेत्रामागे फार मोठी अशी विद्वत्तेची परंपरा उभी आहे. ती दीर्घकालाची आहे, एखादा नवीन उपक्रम त्या परंपरेत बसविण्याचा प्रयत्न होतो, आणि मग तो जर कमी पडला तर त्या उपक्रमाविषयी मत कलुषित होते. अर्थात त्या कसोटीला जर एखादा उपक्रम उतरला तर अमाप मोठेपणा लाभतो. मग तो उपक्रम ह्या पदवीकरता केलेला असो अगर नसो. लोकमान्य टिळककृत 'गीतारहस्य' किंवा आचार्य जावडेकरकृत 'आधुनिक भारत' ही अशी उदाहरणे होत. ही पदवी सुरू झाल्यानंतर काही काल असे होणे अपरिहार्य असले तरी, इतक्या दिवसांच्या अनुभवाने तरी पूर्वग्रह कमी व्हावयास हरकत नाही.

ह्या पदवीचा प्रबंध म्हणजे काही भव्य-दिव्य नसून वैज्ञानिक व सामाजिक शास्त्रांतल्याप्रमाणे विशिष्ट विषयावर वा प्रश्नावर सुयोग्य शोधनपद्धतीचा अवलंब करून, शोधक्रियेची विशिष्ट पथ्ये किंवा संकेत पाळून शास्त्रीय पद्धतीच्या निकषांवर उतरेल असे परिश्रम घेऊन केलेले काम व ते करीत असताना ज्ञानात पाडलेली थोडी भर, अशा दृष्टीने जर ह्या विविध अभिकृतींकडे पाहिले तर गैरसमजांनी भरलेले आकाश बरेच निवळेल, असे वाटते. ज्ञानाच्या क्षेत्रात जी वस्तुनिष्ठता अपेक्षित असते ती एक प्रकारच्या बौद्धिक शिस्तीचा परिपाक होय. प्रत्येक क्षेत्राची विशिष्ट अशी/अशा शिस्त किंवा शिस्ती असतात. त्यांनाच येथे अनुशासन किंवा परिशासन असे म्हटले आहे. तो अनुशासन-साक्षेप अंगी बाणला आहे व नवीन ज्ञान मिळविण्याचे जे आधुनिक संकेत आहेत, किंवा उपलब्ध ज्ञानाचे व्यवस्थापन पृथःकरण, पुनर्ग्रथन करण्याचे जे मार्ग आहेत ते प्रयत्नपूर्वक अंगी बाणवून घेतले आहेत, हे सिद्ध करण्याचा वस्तुपाठ म्हणजे वाङ्मयाच्या क्षेत्रातील संशोधनप्रबंध होय. प्रारंभी प्रारंभी पीएच्.डी. प्रबंध म्हणजे विद्वत्तेचे, संशोधनाचे शिखर मानले जाई (त्यामुळेच तो उपक्रम अपूर्ण वाटे). पण ज्ञानाचा जो विकास व विस्तार होत आहे, तो लक्षात घेतला तर पीएच्.डी. प्रबंध म्हणजे संशोधनाच्या प्राविण्यक्षेत्रातले (करीअर) केवळ पहिले पाऊल होय, हे लक्षात घेणे जरूर आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रबंधाविषयीच्या या निरनिराळ्या अपेक्षा अध्येत्याच्याही लक्षात असतात. साहजिकच त्याच्याकडून प्रबंधाचा विस्तार वाढविण्याचा प्रयत्न होतो. त्यासाठी अनेक आधारांचा–उताऱ्यांचा वापर तो सर्रास

करीत असतो. त्यामुळे त्याचे पुरण (पॅडिंग) पुष्कळ वाढत जाते व तोच टीकेचा विषय होतो. आपल्याकडेच हे असे होत नाही, सर्वत्रच हे असे घडते.

ही पदवी जेव्हा विद्यापीठात प्रविष्ट झाली तेव्हा तिच्याबद्दलच्या अपेक्षा मोठ्या होत्या. तांत्रिकदृष्ट्या, घेतलेल्या विषयावर एक ग्रंथ लिहिणे एवढेच त्याचे स्वरूप होते. त्यालाच प्रबंध (थेसिस) म्हटले जाई. म्हणजे त्या प्रबंधामागे शोध–साक्षेप वा पद्धति–साक्षेप हवा, हे आजच्याइतके स्पष्ट झालेले नव्हते. उलट ही शेवटची मोठी पदवी मानली गेल्याने हा ग्रंथ असामान्य गुणवत्तेचा असावा असे अपेक्षिले जाई. उलट आज ही शिक्षणातली शेवटची पदवी असेल, परंतु संशोधनाचा तो आरंभ आहे असे जवळ जवळ स्पष्ट झालेले आहे. वाङ्मय-क्षेत्रातील संशोधन–प्रबंधांविषयीची तक्रार वा त्यांच्यावरील आक्षेप हे तसे त्या प्रबंधांइतकेच जुने आहेत. प्रा. न. र. फाटक यांनी आपल्या हैदराबाद साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून अमेरिकेतील तत्कालीन वाङ्मय-प्रबंधांवर घेतले जाणारे आक्षेप उद्धृत केले आहेत व ते आपल्याकडील प्रबंधांना सध्या लागू पडत नाहीत पण अभ्यासकांची संख्या वाढल्यानंतर तशीच परिस्थिती येथे निर्माण होईल, म्हणून त्यांनी सावधतेचा इशारा दिला आहे. पण "मराठी माध्यमातून मराठी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या संधीच्या किमयेने मराठीचे दैन्य कमी होत आहे." असा त्यांचाही अभिप्राय आहे, तो बोलका आहे. संशोधनपदवीसंबंधीच्या निरनिराळ्या गैरसमजांचे निराकरण केल्यानंतर संशोधन विषयाच्या स्वरूपाकडे वळणे अवश्य आहे.

संशोधन (रिसर्च या इंग्रजी शब्दाचे मराठीकरण) हा शब्द विज्ञान-शास्त्रांमधून सामाजिक व वाङ्मयीन शाखांनी घेतला आहे. विज्ञानशास्त्रांत 'रीसर्च' म्हणजे काय हे परंपरेने सिद्ध झालेले आहे. सामाजिक शास्त्रांनी आपले संशोधनरूप प्रयत्नपूर्वक सिद्ध केले आहे. वाङ्मयाच्या बाबतीत घडले ते वेगळेच. सामाजिक शास्त्रांपैकी इतिहासाच्या ज्ञानशाखेत 'रीसर्च' या शब्दाला वेगळा अर्थ आहे. पूर्वकालीन घटिते, बाबी इ. चे शोधन हाच तो अर्थ होय. वाङ्मयाचा इतिहासाशी घनिष्ठ संबंध आहे. इतिहासाप्रमाणे प्राचीन वाङ्मय, ग्रंथही अभ्यसनीय ठरतात. त्यामुळे संशोधन याचा अर्थ प्राचीन ग्रंथ, भाषा, ग्रंथकार इ. चे संशोधन असा अर्थ प्रारंभी घेतला जात असे. पुणे विद्यापीठात संशोधन विषयाला वाहिलेली एम्. ए. च्या अभ्यासक्रमात मराठी विषयात एक प्रश्नपत्रिका असे. तिचे स्वरूप पाहिले तर या ठिकाणी म्हटले आहे ती संशोधनासंबंधी कल्पना किती दृढमूल झाली होती, हे स्पष्ट होईल. या वृत्तीचा अंगिकार केलेले अध्येते आधुनिक वाङ्मय हा मुळी 'संशोधना'चा विषयच मानीत नसत. त्यांची मनोवृत्ती आजही थोडीफार तशीच आहे. तथापि इंग्रजी भाषेत ह्या

पदवीसाठी लिहिलेले प्रबंध हे आधुनिक ग्रंथकार व वाङ्मय यांवर लिहिले गेले आणि वाङ्मयीन संशोधन म्हणजे केवळ प्राचीन ग्रंथकारांचा काल, स्थल वा तत्सम बाबी निश्चित करणे नव्हे, तर आधुनिक वाङ्मयाचा विस्तीर्णपट 'संशोधना'च्या ऊर्फ 'रीसर्च'च्या कक्षेत येऊ शकतो, हे जसजसे स्पष्ट व सर्वमान्य होऊ लागले, तसतसे आधुनिक विषय प्रबंधासाठी निवडले जाऊ लागले. वाङ्मयीन संशोधनाला निर्माण झालेले हे परिमाण संशोधन-अभ्यासक्रम प्रश्नपत्रिकेपर्यन्त जाणे अवश्य होते.

त्याची दुसरी बाजू अशी की, ह्या प्रकारचे प्रबंध वाङ्मय-समीक्षेशी अविभाज्य मानण्याची प्रवृत्ती निर्माण झाली व त्यामुळे विशुद्ध वाङ्मयीन स्वरूपाचे, समीक्षेत पडणारे विषय प्रबंधासाठी निवडले जाऊ लागले. समीक्षेत काटेकोरपणे न पडणारे परंतु वाङ्मयीन अभ्यासाशी अविभाज्यपणे निगडित असणारे कितीतरी विषय या समजुतीमुळे दुर्लक्षिले जाऊ लागले. त्यामुळे कालखंड, वाङ्मयप्रकार, अगर ग्रंथकार यांच्यांवरच लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती वाढीला लागली. वाङ्मयीन विद्वत्ता समीक्षेपेक्षा खूप व्यापक आहे. समीक्षा हा तिचा एक भाग आहे, हे अद्यापही कित्येकांच्या ध्यानी आलेले दिसत नाही. ते काहीही असले तरी प्रसिद्ध झालेल्या पीएच्.डी. पदवीसाठी लिहिलेल्या प्रबंधांकडे पाहिले तर त्यांनी मराठी समीक्षेत व विशेषतः वाङ्मयीन विद्वत्तेत लक्षणीय भर घातली आहे, असे निश्चितपणे म्हणता येते.

वाङ्मयक्षेत्रीय अध्येत्याने नित्य डोळे उघडे ठेवून नवे नवे विषय शोधावयास हवेत. केवळ कालखंड, वाङ्मयप्रकार, ग्रंथकार यांच्या वर्तुळात अडकून बसण्याची गरज नाही. शोधसाक्षेप, वस्तुनिष्ठता आणि वाङ्मयाच्या स्वरूपाविषयी व्यापक व सर्वंकष जाण ह्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. नवे नवे विषय कसे शोधावे याचेही खरे तर शिक्षण द्यावयास हवे. अशा रीतीने संशोधन-संस्कारांनी पुनीत झालेले आणि वाङ्मयविषयीच्या व्यापक व सखोल जाणिवेने मंडित झालेले लेखनच वाङ्मयीन विद्वत्तेची प्रतिष्ठा या पुढच्या कालात वाढविणार आहे. ते संस्कार न झालेल्यांनी आजपर्यन्त वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास घडवून आणला असला, तरी यापुढे या क्षेत्रात जे नवागत येणार आहेत, त्यांच्यावर शोधक्रियेचे संस्कार होण्यासाठी त्यांना अशा अभ्यासक्रमातून जावे लागणार आहे.

आजच्या काही मान्यवर समीक्षकांना, लेखकांना पदवी नसेल पण त्याचा अर्थ त्यांनी स्वतः प्रयत्नांनी ते संस्करण स्वतःच्या मनबुद्धीवर करून घेतलेले आहे. पण नवागतांना ते जमेलच असे नाही. त्याच्यासाठी कोणकोणते नवे अभिक्रम करावयास हवे हे पाहणे अवश्य आहे. सामुदायिक ग्रंथसिद्धी इ. प्रकारचे जे नवे उपक्रम होत आहेत ते तसेच होत राहाणार आहेत. विद्वत्तावाढीला हातभार लावण्यासाठी तसा त्यांचा काही उपयोग नसून, आलेले विद्वत्तेचे पीक वेटाळण्यासाठी हे प्रयत्न

होत राहाणारच. त्या दृष्टीने व्यक्ती, संस्था यांच्या जीवनातील स्मरणीय प्रसंग, राष्ट्रीय जीवनातील महत्त्वाचे 'मैलांचे दगड' (घटना, प्रसंग इ. ची संस्मरणे) साजरे होत राहाणार, आणि त्या निमित्ताने संकलन समालोचन स्वरूपाचे ग्रंथ प्रकाशित होणार म्हणून वाङ्मयीन विद्वत्तेच्या संदर्भात तिकडे नुसता अंगुलीनिर्देश केला तरी चालण्यासारखे आहे.

सर्वच क्षेत्रांप्रमाणे विद्वत्तेच्या व ज्ञानशाखांच्या क्षेत्रांतही कोणत्यातरी प्रकारचे योजकत्व हवे. तसे झाले नाही तर आर्थिक क्षेत्रात ज्याप्रमाणे संपत्तीचे वाटप योजनाबद्ध नसेल तर काही ठिकाणी शरीरातील रक्त साकळावे तशी संपत्ती साखळते, व आर्थिक संकटांची मालिका सुरू होते, तसेच विद्वत्तेचे होते. विद्वत्तेचेसुद्धा अभिसरण व्हावयास हवे. नाहीतर एकीकडे बहुसंख्य शिक्षितांना भाषेचा साधा सुयोग्य वापर करता येत नाही, एवढी दीनवाणी परिस्थिती, तर दुसरीकडे मोठमोठे ग्रंथ विद्वानांनी जणु एकमेकांसाठी लिहिलेले इतके सामान्य शिक्षितांना दुर्बोध. हे असे काही काल चालले की स्फोट संभवतो हे विद्वानांनीही लक्षात ठेवावयास हवे.

वाङ्मयीन विद्वत्तेच्या दृष्टीने या पदवीचा एक मोठा फायदा की त्या निमित्ताने ज्ञानक्षेत्रात, विद्येच्या क्षेत्रात सतत काहीतरी नवे शोधिले जाते, अभ्यासिले जाते. ते परिष्करण व नवार्थदर्शनपूर्वक पुन:पुन: पुढे मांडले जाते. ज्ञानगंगेचा प्रवाह सारखा वाहात राहतो. ज्ञानाचे प्रत्येक क्षेत्र एवढे व्यापक होत आहे, वाढत आहे की, ज्ञानाचे सातत्य राखण्याच्या दृष्टीने अशी काही व्यवस्था असणे केवळ अपरिहार्य झाले आहे. त्या पद्धतीमुळेच नव्या पिढीपुढे सतत नवे नवे विचार येत राहतात व ज्ञानक्षेत्र सतत प्रवाही राहते. त्यामुळे ज्ञानपरंपरेत सातत्य राखण्याच्या दृष्टीने आजकाल शोधसाक्षेप कसा टिकविला जाईल या दृष्टीने या उपक्रमांच्या रूपाने दक्षता घेतली जाते. या सर्व अभिक्रियांना गती प्राप्त व्हावी व त्या उपक्रमात अधिक रेखीवपणा यावा यासाठी काही योजना, सूचना, कल्पना येथे मांडण्याचे ठरविले आहे.

: ८ :

यापुढच्या कालात विद्वत्ताक्षेत्राला तर विद्यापीठांच्या वरच्या वर्गातील अभ्यासक्रमातून एक प्रकारचा शोधसाक्षेप असावयास हवा, हे मत आज जवळ जवळ सर्वमान्य झालेले आहे. म्हणजे विद्यापीठीय अभ्यासक्रमात ज्ञानसाक्षेप जेवढा महत्त्वाचा तेवढा शोधसाक्षेपही महत्त्वाचा, हेही आज सर्वसंमत झाले आहे.

हा शोधसंक्षेप आणण्याचा पहिला भाग म्हणजे एम्. ए. च्या दर्जाच्या अभ्यासक्रमातून एक प्रश्नपत्रिका त्या विषयातील किंवा ज्ञानशाखेतील शोध-पद्धतीचा परिचय अध्येत्यांना करून देणारी असावी, हा होय. या दृष्टीने इतिहासाच्या अभ्यामक्रमात एम्. ए. ला एक पत्रिका इतिहासाच्या शोधपद्धतींची चर्चा करणारी असतेही. अर्थशास्त्रासारखी काही शास्त्रे पण त्या दिशेने प्रयत्न-शील आहेत, असे दिसते. एम्. एड्. या शिक्षणक्षेत्रीय पदव्युत्तर परीक्षेच्या अभ्यासक्रमातही तशा प्रकारच्या प्रश्नपत्रिकेची तरतूद अनेक वर्षे आहे. योग्य दिशेने चालू असलेला तो प्रयोग आहे.

पुणे विद्यापीठाने काही काल मराठीच्या एम्. ए. च्या अभ्यासक्रमात एका पर्यायी प्रश्नपत्रिकेसाठी 'संशोधन' हा विषय ठेवला होता. उपक्रम फार चांगला होता, पण तो विषय जरी ठेविला होता तरी त्या विषयासंबंधीच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती अधिक व्यापक हवी होती पाठचिकित्साशास्त्र व प्राचीन वाङमयाचे विशिष्ट प्रकारचे संशोधन अशी संशोधनासंबंधी दृष्टी ठेवल्याने संशोधन-विषयक जाणीव व्यापक होण्याच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग झाला नसावा, कारण पुढे त्या अभ्यासक्रमातून तो विषय काढून टाकला गेला. संशोधनाच्या आधुनिक व नवीन कल्पना जर त्या अभ्यासक्रमात अनुस्यूत धरल्या असत्या तर त्याची शोकांतिका अशी झाली नसती. योग्य दृष्टिकोण ठेविला असता तर ती अभ्यासपत्रिका लोकप्रियही झाली असती. तथापि हा प्रयत्न त्याला आधुनिक शोधपद्धतीचा पाया देऊन पुनः करून पाहण्यासारखा आहे. त्यादृष्टीने प्रयत्न चालू राहावेत असे वाटते.

संशोधनविषयक जाण वाढण्याच्या दृष्टीने होऊ घातलेला आणखी एक उपक्रम म्हणजे 'संशोधनशास्त्र' या विषयासाठी एम्. ए. नंतर एक पदवी किंवा पदविका निर्माण करणे हा होय. पुणे व शिवाजी विद्यापीठात या दिशेने काही हालचाली सुरू आहेत, प्रत्यक्षात त्या पदवीचे वा पदविकेचे शिक्षण अद्याप सुरू व्हावयाचे आहे. हा प्रयत्न योग्य दिशेने असून प्रस्तुत अभ्यासकाने एक वर्षाच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाची एक योजनाही शिवाजी विद्यापीठाकडे सादर केलेली होती. त्यासाठी त्याने 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये पूर्वी (१२ एप्रिल १९६९ च्या अंकात) एक लेखही लिहिला होता.

असा अभ्यासक्रम हा सर्वच ज्ञानशाखांसाठी असावा व अध्यायीने आपल्या अभ्यासशाखेतील एखाद्या विषयावर मार्गदर्शकाच्या हाताखाली उपप्रबंध (डिझर्टेशन) तयार करावा. ह्यासाठी जो विषय निवडावयाचा तो केवळ ग्रंथा-लयीन माहितीवर आधारलेला नसावा, तर प्रयत्नपूर्वक नवनवी माहिती उजेडात आणणे, तिचे संकलन, व्यवस्थापन, पृथक्करण करणे या गोष्टींवर भर असावा,

असे त्यात पुरस्कारिले होते. अभ्यासक्रमाचे दोन भाग कल्पिण्यात आले होते. पहिल्यात शोधशास्त्र-पद्धती व प्रक्रिया यासंबंधी कोणत्याही क्षेत्रातील अध्येत्याला उपयुक्त होईल अशा ज्ञानावर भर देण्यात आला होता. दुसऱ्या भागात, अभ्यास-विषयशाखेत समाविष्ट होणारा एखादा विषय निवडून मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली उपप्रबंध (डिझर्टेशन) तयार करण्याच्या गोष्टीला महत्त्व देण्यावर भर दिला होता. त्याशिवाय मौखिकचीही तरतूद करण्यात आली होती. साधारणपणे याच प्रकारचा अभ्यासक्रम आपल्याकडील परिस्थितीशी सुसंगत ठरेल. हा प्रयोग अधिक आस्थेवाईकपणाने व्हावयास हवा. पीएच्. डी. प्रबंधलेखकाला हा अभ्यासक्रम अनिवार्य असावा. तसे झाले तरच त्या अभ्यासक्रमाला महत्त्व येईल.

याशिवाय आणखीही एक उपक्रम पुढे मागे होणे अवश्य आहे. पीएच्. डी. च्या निमित्ताने लिहिल्या जाणाऱ्या शोधप्रबंधांचा दर्जा खालावल्याची तक्रार करताना प्रा. न. र. फाटक यांनी अमेरिकेतील तत्सम प्रतिक्रियेचा आधार दिलेला आहे, हा उल्लेख मागे आलेला आहे. अमेरिकेतील शिक्षणतज्ज्ञांनी ह्या गोष्टीची गंभीर दखल घेतली व वाङ्मयीन विद्वत्तेच्या क्षेत्राचे पुनर्व्यवस्थापन केले. त्यानिमित्त झालेल्या चर्चेच्या आधाराने आपल्या विद्यापीठीय अभ्यासक्रमाचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्या योजनेत एम्.ए. च्या पदवीसाठी छोटेखानी शोध-प्रबंधाची तरतूद केली. त्याचा परिणाम फार चांगला झाला व आज अमेरिकेतील पीएच्. डी. (भाषिक) प्रबंधाचा दर्जा खालावलेला नाही, तर युरोपीय विद्यापीठीय प्रबंधांपेक्षा असेल तर थोडा उच्चच आहे, असे अनेकांचे मत आहे. तशा प्रकारचा उपक्रम आपल्याकडेही करावयास हरकत नाही. म्हणजे असे की, पदवी परीक्षेसाठी व एम. ए. च्या दर्जाच्या परीक्षांसाठी उपप्रबंध (डिझर्टेशन) पीएच्. डी. सारख्या पदवीसाठी प्रबंध (थेसिस) व त्यापेक्षा मोठ्या डी.लिट्. सारख्या पदवीसाठी महाप्रबंध (ट्रीटाइज) असे व्यवस्थापन सुयोग्य होईल. या तीन शब्दांचे इंग्रजीतील अर्थ लक्षात घेतले तर ही श्रेणी सुयोग्य आहे, असे दिसून येईल. अशी काही योजना प्रारंभी वैकल्पिक स्वरूपात (ऑनर्स सारखी तरतूद करून) ठेवावी. आणि काही कालानंतर ती निश्चित करावी. उत्तर भारतातील अनेक विद्यापीठांनी एम. ए. सारख्या परीक्षेसाठी एक उपप्रबंध आवश्यक ठेविला आहे, याचाही येथे निर्देश करतो. डिझर्टेशन, थेसिस व ट्रिटाइज या शब्दांच्या 'वेब्स्टर' च्या न्यू कॉलेजिएट डिक्शनरी (दुसरी आवृत्ती १९५६) मधील व्याख्या येथे उद्धृत करणे योग्य होईल. अर्थात त्यांचे अर्थ तारतम्याने घ्यावे लागतील.

Dissertation (page 211) :—An extensive treatment of a subject expecially in writing essay.

Thesis ( p. 882 ) :—A proposition which a person advances and offers to maintain by argument. A theme, composition, essay or the like, specially a dissertation presented by a candidate for a degree or diploma.

Treatise ( p. 905 ) :—A systematic exposition or argument in writing, a methodical discussion of the fact and principles and conclusions reached.

याशिवाय आणखीही एक उपाय उल्लेखिण्यासारखा आहे. मुंबई विद्यापीठात त्याची तरतूद मागे केलेली होती, पण नंतर ती तरतूद विद्यार्थीप्रिय नसावी या दृष्टीने काढून टाकण्यात आली असावी. ही तरतूद म्हणजे एम्.ए. सारखी परीक्षा ही संपूर्णतया किंवा तिचे दोन भाग करून एक भाग, ही प्रबंधरूपाने देणे, म्हणजे त्या योजनेत नमूद केले असेल त्याप्रमाणे सुयोग्य विषय निवडून प्रबंध तयार करवून घेणे. शोधसाक्षेप वाढविण्याच्या दृष्टीने काही मार्ग वा उपाय स्वीकारण्यासारखे आहेत. अशा रीतीने शोध-साक्षेप वाढीला लावण्याच्या दिशेने काहीतरी योजना केल्याशिवाय विद्वत्क्षेत्राचे व्यवस्थापन नीट होईल असे वाटत नाही.

हे सारे व्हावयाचे असेल तर विद्यापीठीय शिक्षणाचे पुनर्व्यवस्थापन व्हावयास हवे. आधुनिक कालात व्यक्तिगत विद्वत्तेला फारसे महत्त्वाचे स्थान नाही. व्यक्तिगत विद्वत्ता अतिशय प्रगल्भ अवस्थेची द्योतक आहे. आणि तशा व्यक्ती ह्या संख्येने अल्प असतात. पाश्चात्त्य देशांत फार मोठ्या प्रमाणावर सामुदायिक प्रयत्न चालू आहेत. किंबहुना संशोधन व विद्वत्ता हे अंग व्यक्तिगत राहिले नाही. नवीन सामुदायिक महाप्रकल्पांतच व्यक्तीला सहभागी व्हावे लागते. त्यातच व्यक्तीच्या बुद्धिशक्तीला अवसर मिळतो, समाजाची आणि विशेषत: ज्ञानाची प्रगती अविरत चालू राहाते. अमेरिका, रशिया व तत्समान पुढारलेली राष्ट्रे ज्या चंद्रमोहिमा अगर तत्सम प्रकल्प हाती घेतात व पार पाडतात तो सारा एक सामुदायिक उपक्रम असतो. सहभागी व्यक्तीचे ज्ञान, तपस्या, विद्वत्ता, प्रतिभा इ. अतिशय श्रेष्ठ प्रकारची असतात. परंतु ती सारी विशिष्ट उद्देशाने, पद्धतीने मोठ्या प्रकल्पात कार्यवाही झालेली असतात.

वैज्ञानिक शास्त्रांप्रमाणे सामाजिक शास्त्रांच्या व वाङ्मयाच्या आणि विद्वत्तेच्या क्षेत्रासाठीही असेच प्रचंड प्रकल्प हाती घेतलेले असतात. त्यात सुपात्र व्यक्ती सहभागी होतात, तो प्रकल्प कार्यवाही होतो. हे सारे होत असता व्यक्तीही आपली पात्रता वाढवीत असते. त्यांची दखल घेऊन तिला पुन: नव्या

पात्रतेला साजेसे काम दिले जाते. अशा रीतीने प्रकल्पही सतत कार्यवाही राहतो व व्यक्तीही. आणि दोघेही आपापल्या परीने राष्ट्राची आणि पर्यायाने ज्ञान-क्षेत्राची प्रतिष्ठा वाढवीत असतात. हे सारे विद्यापीठे व सार्वजनिक अधिमंडळे (ॲथॉरिटीज) ह्यांच्या द्वारे होत असते.

ब्रिटिशांनी आपणांकडे सुरु केलेले शिक्षण व्यक्तिवादी व व्यक्तिकेंद्रित आहे व आजही तसेच आहे. त्यामुळे या शिक्षणातून बाहेर पडलेली व्यक्ती केवळ स्वत:च्या (स्वार्थाच्या व सोयीच्या) दृष्टीने योजनांकडे पाहात असते. खरे सांगायचे तर शासन निरनिराळ्या योजना हाती घ्यावयास लावीत आहे. परंतु त्या योजनांची कार्यवाही काय होते व प्रत्यक्ष फलश्रुती काय होते, हे गुलदस्तातच राहाते. याचे कारण व्यक्तिनिष्ठ भूमिकेतून ज्ञान घेऊन बाहेर पडलेली व्यक्ती सामुदायिक प्रकल्पात सहभागी होताना हात राखूनच होते.

यासाठी एकंदर विद्वत्तेची आणि वाङमयीन विद्वत्तेची वाढ योजनाबद्ध व्हावयाची असेल तर समाजाच्या तसेच अभ्यासकांच्या सर्व थरांना त्यात सहभागी होता येईल व उपयुक्त ठरेल असे प्रकल्प घेतले पाहिजे. त्या दृष्टीने या ठिकाणी काही विचार, योजना कल्पना मांडणे योग्य होईल.

: ९ :

आजच्या जगात सर्वच क्षेत्रांतील ज्ञान हे झपाट्याने वाढत आहे. व्यासंगा-साठी वा अन्य कारणांसाठी एखादा विषय हा अभ्यास–विषय म्हणून निवडला तरी इतर विषयांची त्यातील ज्ञानाची आवश्यकता कित्येकदा निर्माण होते. अभ्यासक्रम हे विशिष्टताप्रधान (स्पेशलाइज्ड) असले तरी इतर वा संबद्ध क्षेत्रातील ज्ञानाची पदोपदी गरज भासते. ते ज्ञान कित्येकांना अगदी प्रारंभिक असे असते. परंतु ते नेमकेपणाने हवे असते. ही गरज जवळ जवळ सर्वच अभ्यास-कांना असते. त्यादृष्टीने एक महत्त्वाची सूचना अशी की, विद्यापीठाच्या निर-निराळ्या ज्ञानशाखांनी स्वत:च्या क्षेत्रासाठी एक छोटा व एक मोठा अशा दोन कोशांची योजना हाती घ्यावी. तीत निरनिराळ्या पात्रतेच्या अभ्यासकांचा त्यांच्या आवडीप्रमाणे व ज्ञानाप्रमाणे सहभागी करून घेता येईल. हे काम सामुदायिक रीतीने झाले तर ते लवकर होईल आणि स्वस्तातही देणे परवडेल, आणि प्रत्येक महत्त्वाच्या विषयाचे असे छोटे मोठे कोश मराठीतून उपलब्ध झाले तर एकंदर ज्ञानाच्या प्रसाराच्या दृष्टीने ते किती उपयुक्त होईल, हे स्पष्ट करून सांगण्याची गरज आहे असे वाटत नाही. अशा प्रकारचे कोश वा डिक्शनऱ्या

इंग्रजीत उपलब्ध आहेत. हे सर्वच काम नवप्रवेशक तरुणांकडून करून घेतल्याने ते तसे उत्साहाने होईल व त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञांच्या देखरेखीखाली ते होणार असल्याने त्यात मोठ्या उणीवा राहण्याची शक्यता कमी, त्याशिवाय अशा सामुदायिक प्रकल्पांतून बाहेर पडल्याने सामुदायिक स्वरूपाच्या ज्ञानाच्या योजना कशा पार पाडाव्यात, हे शिक्षण मिळेल व एक प्रकल्प सुरू होताना दुसऱ्या प्रकल्पाची चक्रे फिरू लागतील. तसेच परभाषेतील (विशेषतः इंग्रजी) मान्यवर ग्रंथांचे भाषांतर विस्तृत टीपा-टिप्पणींसह असेच सामूहिक रीतीने करून घेता येईल.

महाराष्ट्राची सर्व प्रकारची माहिती जमवून वार्षिके काढण्याचे कामही निरनिराळ्या विद्यापीठांना वाटून देता येईल. त्यामुळे त्या कामात शिस्त, सातत्य, व दर्जा राहील आणि विद्यापीठही समाजजीवनाशी ज्ञानसंवर्धनाच्या बाबतीत समरस होऊ शकेल. अशा काही योजना शोधून काढाव्या लागतील.

योग्य वेळी हे काम झाले नाही तर समाजाच्या गरजेनुसार काही व्यक्ती संघटना, संस्था पुढे येतात, मग ते काम त्या संबंधितांच्या पुरते मर्यादित राहते. परस्पर-साहाय्याचाच भाग त्यात फार असतो. व्यक्तिगत पूर्वग्रह इ. फार असतात. म्हणून विद्यापीठे व तत्सम संघटनांनी अधिक योजनापूर्वक विद्वत्तेचा व वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास घडवून आणला पाहिजे. नवागतांना अधिक अवसर देण्याच्या दृष्टीने विधायक चिंतन सुरू व्हावे, हा माझ्या ह्या प्रयत्नामागला प्रमुख हेतू आहे.

कितीतरी विषय असे असतात की, अभ्यासकांचे त्यांकडे लक्ष जाणे आवश्यक असते, पण एखाद्या विषयाला जेव्हा अन्य, कारणांनी अतिरिक्त महत्त्व येते, तेव्हा एखादा प्रकाशक वा एखादी व्यक्ती तिकडे लक्ष देते व ते काम होते. उदाहरणार्थ, निरनिराळ्या शास्त्रांसाठी भारतातील विविध भाषांतील शब्द तयार केलेले आहेत. त्यांपैकी संबंधी भाषांतील शब्दांचा तुलनात्मक अभ्यास करण्यास काय हरकत आहे? अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. एखाद्या उपप्रबंधाच्या रूपाने हा अभ्यास विद्यापीठात तयार असेल तर त्याचा उपयोग योग्य वेळी करून घेता येईल. काही काही संस्थांतून काही काही अभ्यासगट विविध प्रकारची पाहणी करीत असतात. महत्त्वाच्या पाहणीची माहिती वृत्तपत्रांतून येते. पण वृत्तपत्रांच्या कक्षेत न आलेली कितीतरी माहिती प्रत्यक्षात जमा झालेली असते. अशा रीतीने अभ्यासपोषक व शोधाभिमुख असे वातावरण विद्यापीठे व तत्सम संस्थांत तयार व्हावयास हवे. काही ठिकाणी ते आजही असेल, पण तो अपवाद होय.

□ □ □

## समारोप

गेल्या सहा व्याख्यानांतून ' वाङमयीन विद्वत्ता ' या नव्या विषयाचे व त्याच्या विविध परिक्षेत्रांचे मी विवेचन केले. वाङमयाच्या दृष्टीने आधिवैद्यिक (ॲकॅडमिक) महत्त्वाच्या ह्या विषयाचे हे विवेचन या ठिकाणी एवढचा सलग रीतीने मराठीत प्रथमच होत आहे, त्यादृष्टीने वाङमय-विषयक चर्चेत ही महत्त्वाची भर आहे; तिला ह्या चर्चेने वेगळी परिमिती प्राप्त करून दिली आहे, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही, असे मला वाटते. अगदी प्रारंभीच्या व्याख्यानात वाङमयीन विद्वत्ता या संकल्पनेचे स्पष्टीकरण केले, त्याआधारे नंतरच्या व्याख्यानांतून तिच्या विविध परिक्षेत्रांचे दर्शन घडविले व शेवटी या व्याख्यानात मराठीतील वाङमयीन विद्वत्तेचा विकासक्रम शोधला. आधुनिक मराठीतील अतिशय श्रेष्ठ दर्जाचे वाङमयीन विद्वान साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांच्या स्मरणार्थ चालू केलेल्या या व्याख्यानमालेला अतिशय साजेसा हा विषय आहे, असे मला वाटले व म्हणून दीर्घकाल चिंतनावस्थेत असलेला हा विषय ह्या निमित्ताने मी शब्दांकित केला. त्यातला काही भाग जरी आपणांस स्वीकार्य वाटला तरी मी धन्य समजेन. उच्च माध्यमिक शिक्षणाच्या नव्या आकृतिबंधामुळे विद्यापीठीय अभ्यासक्रमाची नवी आखणी होऊ घातलेली आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या पदव्या व स्वायत्त महाविद्यालयांसारख्या नव्या संस्था येऊ घातल्या आहेत, त्यांच्यांद्वारे विद्वत्तेचा कस व व्याप्ती वाढविण्याचे जे नवे विचार किंवा उपक्रम होतील त्यांना हे सर्व विवेचन पायाभूत वा उपयुक्त ठरावे अशी आशा आहे.

- सर्व व्याख्यानांतून शोधसाक्षेप व अनुशासनाधिष्ठितता या गोष्टींवर अधिक भर दिला आहे. आजचे उच्च शिक्षण हे शोधाधिष्ठित व अनुशासनसन्मुख व्हावे या हेतूने हे केले आहे. निरनिराळचा ज्ञानशाखा ह्या दिशेने पुढे जात आहेत. तेव्हा वाङमयीन विद्वत्तेनेही त्या बाबतीत मागे राहू नये ह्या हेतूने हे विवेचन केले आहे. अनेक व्यक्तींचे व उपक्रमांचे उल्लेख निरनिराळचा संदर्भात या व्याख्यानांतून आलेले आहेत. एखाद्या दुसऱ्या व्यक्तीचा किंवा उपक्रमाचा उल्लेख कदाचित राहून गेला असेल तर तो केवळ अनवधानाने. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे माझ्यासारख्या प्रसिद्धीच्या स्रोतापासून दूर असणाऱ्या सामान्य अभ्यासकाला पुणे विद्यापीठाने ही संधी मिळवून दिली त्याबद्दल मी विद्यापीठअधिकाऱ्यांचा व संबंधी व्यक्तींचा अक्षरशः ऋणी आहे.

□ □ □

UNIVERSITY OF PUNE * PUNE *
JAYAKAR LIBRARY

# संदर्भ

## व्याख्यान पहिले

| क्रमांक | ग्रंथाचे नाव | उल्लेख वा पृष्ठ |
|---|---|---|
| १ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | ११ |
| २ | तेथेच .. .. | ५ |
| ३ | तेथेच .. .. | ५ |
| ४ | प्राचीन साहित्य : .. .. | रामायण लेख |
| ५ | इंग्लिश क्रिटिकल एसेज् : ट्वेंटिथ सेंचुरी : 'पोएट्स अँड स्कॉलर्स' .. .. | १३३ |
| ६ | तेथेच .. .. | १४२ |
| ७ | तेथेच .. .. | १४२ |
| ८ | तेथेच .. .. | १४२ |
| ९ | तेथेच .. .. | १४२ |
| १० | तेथेच .. .. | १४१ |
| ११ | तेथेच .. .. | १४१ |
| १२ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | ९ |
| १३ | 'पोएट्स अँड स्कॉलर्स' .. .. | १५३ |
| १४ | तेथेच .. .. | १५४ |
| १५ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | १६ |
| १६ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | २१ |
| १७ | तेथेच. .. .. | २२ |
| १८ | तेथेच .. .. | २२ |
| १९ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | ३९ |
| २० | क्रिटिकल अॅप्रोचेस टु लिटरेचर .. .. | ८ |
| २१ | क्रायसिस इन ह्युमॅनिटीज .. .. | १०८ |
| २२ | तेथेच .. .. | १०८ |

## व्याख्यान दुसरे

| क्रमांक | ग्रंथाचे नाव | उल्लेख वा पृष्ठ |
|---|---|---|
| १ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | ११९ |
| २ | तेथेच .. .. | ११९ |
| ३ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | २५४ |
| ३-ए. | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १०८ |
| ४ | क्रिटिकल ॲप्रोचेस टु लिटरेचर .. .. | १०७ |
| ५ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | २५२ |
| ६ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १०७ |
| ७ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | २५२ |
| ८ | तेथेच .. .. | २५२ |
| ९ | तेथेच .. .. | २५२ |
| १० | तेथेच .. .. | २५३ |
| ११ | तेथेच .. .. | २५२ |
| ११-ए | तेथेच .. .. | २२३ |
| १२ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १०० |
| १३ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | ४१ |
| १४ | तेथेच .. .. | ४२ |
| १५ | तेथेच .. .. | ४२ |
| १६ | तेथेच .. .. | ४२ |
| १७ | तेथेच .. .. | ४२ |
| १८ | तेथेच .. .. | २५३ |
| १९ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १०३ |
| २० | तेथेच .. .. | १२३ |
| २१ | तेथेच .. .. | १२५ |
| २२ | थिअरी ऑफ लिटरेचर .. .. | २६३ |
| २३ | इंग्लिश क्रिटिकल एसेज् : ट्वेंटिथ सेंचुरी .. | ४१ |
| २४ | क्रिटिकल ॲप्रोचेस टु लिटरेचर .. .. | २८३ |
| २५ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १२९ |
| २६ | म. वा. इतिहास (पांगारकरकृत), आवृत्ती दुसरी .. | प्रस्तावना |

## व्याख्यान तिसरे

| क्रमांक | ग्रंथाचे नाव | उल्लेख वा पृष्ठ |
|---|---|---|
| १ | थिअरी ऑफ् लिटरेचर .. .. | ३९ |
| २ | शिप्लेज डिक्शनरी ऑफ् लिटरेचर .. .. | ३४२ |
| ३ | क्रिटिकल ॲप्रोचेज टु लिटरेचर .. .. | ३८ |
| ४ | तेथेच .. .. | ७९ |
| ५ | इंग्लिश क्रिटिकल एसेज् : ट्वेंटिथ सेंचुरी .. | १४१ |
| ६ | कॅसल्स एनसायक्लोपीडिया ऑफ् लिटरेचर : | 'क्रिटिसिझम' हा विषय |
| ७ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | २३० |
| ८ | तेथेच .. .. | १४२ |
| ९ | तेथेच .. .. | १४५ |
| १० | तेथेच .. .. | १४६ |
| ११ | एसेज् : एन्शंट ॲंड मॉडर्न .. .. | ९३ |
| १२ | लिटरेचर ॲंड सायकॉलॉजी .. .. | २९३ |
| १३ | धार आणि काठ .. .. | १४ |
| १४ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १५१ |
| १५ | एनसायक्लोपीडिया ऑफ् सोशल सायन्सेस .. | १५१ |
| १५ए | फाइव ॲप्रोचेस टु लिटररी क्रिटिसिझम | प्रस्तावना |
| १६ | इंट्रोडक्शन टु स्टडी ऑफ् लिटरेचर .. | ३० |
| १७ | तेथेच .. .. | ३० |
| १८ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | ९५ |
| १९ | तेथेच .. .. | ९५ |
| २० | लिटररी क्रिटिसिझम शॉर्ट हिस्टरी .. .. | ५४२ |
| २१ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १५७ |
| २२ | ऑक्स्फर्ड न्यू इंग्लिश डिक्शनरी<br>वेब्स्टर्स : न्यू इंटरनॅशनल डिक्शनरी<br>शिप्लेज डिक्शनरी ऑफ् वर्ल्ड लिटरेचर<br>ब्रिटानिका : एनसायक्लोपीडिया | 'क्रिटिसिझम' हा शब्द |

## व्याख्यान चवथे

| क्रमांक | ग्रंथाचे नाव | उल्लेख वा पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी | फिलॉलॉजी हा शब्द |
| २ | थिअरी ऑफ लिटरेचर | ३८ |
| ३ | टंग्ज् ऑफ मेन अँड स्पीच | ८ |
| ४ | तेथेच | १४७ |
| ५ | महाराष्ट्र शब्दकोश, प्रस्तावना | १८ |
| ६ | टंग्ज् ऑफ मेन अँड स्पीच | ७६ |
| ७ | फाइव इनॉगरल् लेक्चर्स | ११ |
| ७ए | तेथेच | १४ |
| ८ | तेथेच | १४ |
| ९ | तेथेच | १० |
| १० | तेथेच | १५० |
| ११ | टंग्ज् ऑफ मेन अँड स्पीच | १५० |
| १२ | फाइव इनॉगरल् लेक्चर्स | ५ |
| १३ | तेथेच | ५ |
| १४ | तेथेच | ५ |
| १५ | तेथेच | ५ |
| १६ | तेथेच | १२ |
| १७ | सुबोध भाषाशास्त्र | ११ |
| १८ | व्हॉट इज लिंग्विस्टिक्स | ५ |
| १९ | फाइव इनॉगरल् लेक्चर्स | २५ |
| २० | लिटररी स्कॉलरशिप | ७८ |
| २१ | तेथेच | ७८ |
| २२ | फाइव इनॉगरल् लेक्चर्स | ९२ |
| २३ | तेथेच | २२ |
| २४ | तेथेच | २३ |
| २५ | भाषा व भाषाशास्त्र | ७० |
| २६ | टंग्ज् ऑफ मेन अँड स्पीच | १०४ |
| २७ | तेथेच | १०६ |
| २८ | ब्रिटानिका परस्पेक्टिव्ज खंड ३ | १५१ |
| २९ | तेथेच | १५१ |

## व्याख्यान पाचवे

| क्रमांक | ग्रंथाचे नाव | उल्लेख वा पृष्ठ |
|---|---|---|
| १ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १८१ |
| २ | इंग्लिश क्रिटिकल एसेज् : ट्वेंटिथ सेंचुरी, सेकंड सीरीज .. .. | ६३ |
| ३ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १८३ |
| ४ | तेथेच .. .. | १८४ |
| ५ | तेथेच .. .. | १८४ |
| ६ | इंग्लिश क्रिटिकल एसेज् : ट्वेंटिथ सेंचुरी;.. .. | १४१ |
| ७ | तेथेच .. .. | ५१ |
| ८ | साहित्य आणि साहित्यिक .. .. | ७४ |
| ९ | लिटररी स्कॉलरशिप .. .. | १९३ |
| १० | तेथेच .. .. | २१० |
| ११ | तेथेच .. .. | २१० |
| १२ | तेथेच .. .. | २११ |

व्याख्यान क्र. ६ चे संदर्भ व्याखयानाच्या संहितेतच आलेले आहेत.

---

## काही नवे शब्दपर्याय

या व्याख्यानांतून काही इंग्रजी संज्ञांचे थोडे वेगळे मराठी पर्याय वापरले आहेत. त्यांपैकी काही प्रमुख पर्याय :

| | | |
|---|---|---|
| ॲकॅडेमिक | : | आधिवैद्यिक* |
| ॲक्टिव्हिटी | : | अभिक्रम, अभिक्रिया |
| ॲप्रोचेस | : | अधिमार्ग |
| इंटरप्रिटेशन | : | नवार्थबोधन, नवार्थदर्शन |
| इस्थेटिक | : | सौष्ठवयुक्त |
| इस्थेटिसिझम | : | सौष्ठववाद |
| डिझाइन | : | अभियोजनकला |
| डिसिप्लीन | : | अनुशासन, परिशासन |
| परस्पेक्टिव्हिझम | : | सम्यक्-दृष्टिक्षेपणवाद |
| फॉर्म | : | अभिबंध |
| फिलॉलॉजी | : | भाषाशास्त्र |
| मेथॉडॉलॉजी | : | प्रपद्धती |
| लिंग्विस्टिक्स | : | भाषाविज्ञान |
| स्कॉलर | : | अध्येता, अध्यायी |
| स्कॉलरशिप | : | विद्वत्ता, विद्यावत्ता |
| स्ट्रक्चर | : | संरचना, रूपबंध. |

---

* आधिभौतिक, आधिदैविक याप्रमाणे.

# निवडक साधन-ग्रंथ

## व्याख्यान पहिले व सर्व व्याख्याने

Britannica Perspectives, Vol. III..Pub. William Benton, 1968.

Cassells Encyclopaedia of Literature..Ed. S. H. Steinberg, Cassell Co., London, 1953.

Critical Approaches to Literature..by David Diaches, Longmans,

Crisis in Humanities..Ed. J. H. Plumb, Penguin Books, 1964.

English Critical Essays : 20th Century, 2nd Series..O. U. P., 1958.

Dictionary of World Literature..Ed. J. Shipley, Pub. Littlefield–Adams, 1964.

Encyclopaedia of Social Sciences, Vol. 4.

Introduction to Research..by T. Hillway, Houghton M. Company, Boston.

Literary Scholarship : Its aims and methods .by Foerster Norman and others, The University of North CarolinaPress, Chapel Hill.

Literature as Exploration..by Louise M. Rosenblatt. Heinmann, London.

The Reader's Companion of World Literature..University of Georgia, Mentor Books, 1956.

Theory of Literature..by Rene Wellek and Austin Warren, Penguin Books.

प्रिय आणि अप्रिय : अ. का. प्रियोळकर, विदर्भ मराठवाडा प्रकाशन, पुणे-१९६५.

माझा जन्मभरचा एक उद्योग..न. चि. केळकर, पुणे वि. गृह प्रकाशन, पुणे

संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग..दु. का. संत, पुणे वि. गृह प्रकाशन, पुणे

## व्याख्यान दुसरे

अर्वाचीन मराठी वाङमयाचा इतिहास, खंड १, २..अ. ना. देशपांडे (प्रस्तावना), व्हीनस प्रकाशन, पुणे

टीका-विवेक..श्री. के. क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

पासंग..कुसुमावती देशपांडे, मौज प्रकाशन, मुंबई

महाराष्ट्र साहित्य पत्रिका..अंक १०१ ते ११४

मराठी वाङमयाचा इतिहास (ल. रा. पांगारकर कृत)..प्रस्तावना : रा. शं. वाळिंबे, विदर्भ मराठवाडा प्रकाशन, पुणे

मराठी वाङमयाचा इतिहास खंड ४..संपादक : रा. श्री. जोग (प्रस्तावना), प्रकाशन म. सा. प., पुणे

साहित्य : शोध आणि बोध..वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

साहित्यातील संप्रदाय..रा. शं. वाळिंबे, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे

## व्याख्यान तिसरे

Five Approaches of Literary Criticism..Wilbur S. Scott. Collier Books, N.Y.

Introduction to Study of Literature..W. H. Hudson, George Harrap, London.

Literature and Psychology..F. L. Lucas, Cassell Co., London.

Science and Criticism..by Herbert J. Muller, Yale University Press, London.

Literary Criticism; A Short History..Wimsatt & Brook.

अभिनव काव्यप्रकाश..रा. श्री. जोग, व्हीनस प्रकाशन, पुणे

काव्यशास्त्रप्रदीप..स. रा. गाडगीळ, मोघे प्रकाशन, पुणे

खडक आणि पाणी..गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

टीका-विवेक..श्री. के. क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

मराठी स्त्री..दु. का. संत, मोघे प्रकाशन, पुणे

साहित्य आणि समीक्षा..वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

साहित्य विचार..दि. के. बेडेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

वाङमयीन टीका..रा. शं. वाळिंबे, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे

### व्याख्यान चवथे

Five Inaugural Lectures..Ed. Peter Strevens, O. U. P.
The Story of Language..by Charles Barber, ELBS Books.
The Tongues of Men and Speech ..by J. R. Firth, O. U. P.
भाषा आणि भाषाशास्त्र..श्री. न. गजेंद्रगडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे.
भाषा आणि संस्कृति..ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई.
भाषा : इतिहास आणि भूगोल..ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन, मुंबई.
भाषाविचार आणि मराठी भाषा..गं. ब. ग्रामोपाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे.
मराठी भाषा: उद्गम आणि विकास : कृ. पां. कुलकर्णी, मॉडर्न बु. डे. प्रकाशन, पुणे.
महाराष्ट्र शब्दकोश (प्रस्तावना)..सं. य. रा. दाते, महाराष्ट्र कोशमंडळ, पुणे.
सुबोध भाषाशास्त्र..प्र. न. जोशी, सुविचार प्रकाशन, पुणे.

### व्याख्यान पाचवे

The Crack in Cosmic Egg..by Joseph C. Parce, Julian Press N. Y.
Designs as Art..Bruno Munori, Penguin Books.
Inventive Man..Robert B. Muller, Lancelot Books.
Psychology of Study..by A. C. Mace, Penguin Books.
Synecties ( Development of creative Capacity )..by William J. J Gordon, Colliers Books.
सौंदर्य आणि साहित्य : बा. सी. मर्ढेकर, मौज प्रकाशन, मुंबई.

### व्याख्यान सहावे

Literature and authorship in India..by K. R. Srinivas Iyengar ..George Allen and Unwin.
अर्वाचीन मराठी साहित्य..सं. वि. पां. नेने, बडोदे.
अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका..गं. बा. सरदार, मॉडर्न बुक डेपो, पुणे
अस्मिता महाराष्ट्राची..सं. भीमराव कुलकर्णी, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई.
खंडन-मंडन : गो. म. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

मराठी साहित्य संमेलने, अध्यक्षीयभाषणे खंड १ व २...महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

मराठी टीका : काल, आज उद्या..सं. वसंत दावतर, मुंबई.

मराठी ज्ञानप्रसारक...वा. ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

महाराष्ट्र जीवन खंड १ व २..सं. गं. बा. सरदार, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे

वि. कृ. चिपळूणकर : काल व कर्तृव..ग. त्र्यं. माडखोलकर, ठाकूर आणि कंपनी, अमरावती.

संक्षिप्त अर्वाचीन मराठी साहित्य..ग. रं. दंडवते, सयाजी साहित्यमाला, बडोदे.

संक्रमण–कालाचे आव्हान..सं. गं. बा. सरदार, जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे.

साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न..दु. का. संत, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

---

# सूची


### अ

अणे मा. श्री. १८२
अत्रे कानेटकर ८९
अत्रे प्र. के. ८७, १८१
अनिल (कवि) ५६
अनुकृति सिद्धान्त ७१
अनुभववाद ८८, ९०
अनुशासनमनस्कता ६, १२२
'अनेकविद्यामूलतत्त्व संग्रह' १७२
अभिग्रहण १४२
'अभिरुची' १८७
अभ्युपगम १३८
'अरुणवाचनमाला' ८९
अस्तित्ववाद ८९
'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका' १८३
'अर्वाचीन मराठी साहित्य' १८५, १८७
ॲरिस्टॉटल् ७१, ७३, ८६, ८७
ॲर्नोल्ड मॅथ्यू ८१
ॲलन् डब्ल्यू. एस्. १११, ११२, ११४, ११९, १२२
आकृतिबंध : कलेचा १३९, १४०
आकृतिबंधवादी भूमिका ७९
आगरकर गो. ग. १७७
आधुनिक काल : विद्वत्ता–विकास ६९
आधुनिक वाङ्मय : आदर्श १७७
— विद्यापीठात प्रवेश ६, १०, १८१
— सुवर्णयुग १७४
'आधुनिक भारत' १९३
आपटे ह. ना. १७७, १८४
आर्यभाषागट १०५
आस्वाद-प्रक्रिया १५५
ऑगडेन व रिचर्डस् ९७, ११८

### इ

इतिहास : एक अर्थशून्य संचय ५६, ५७
—वाङ्मयाचा व इतर क्षेत्रांचा ३२, ३३
इतिहासवाद ४५
इतिहास शास्त्र ३३, ३५
इंग्रजी वाङ्मय : एक वैशिष्टय ३९
'इमॅजिनेटिव् लिटरेचर' ७७, १३७, १४७, १५३
इमॅजिनेशन: माहात्म्य १८
'इन्टेन्सिव् विज्डम्' १४३
इरॅजमस्, मूर, कॉलेट १३
इलियट टी. एस्. ३४, ६१, ८१, ९५, १४१, १४२, १४९, १५३

### उ

उच्चतर अभ्यास, संशोधन-केंद्रे ६, २०३
उत्क्रांति तत्त्व ४७, ५४, १०४
उद्देशमिथ्यावाद ४५, ४६, ४७
'उपप्रबंध' १९८

### ए

एकनाथ ४७
एककालिक अभ्यास : भाषेचा १११
एंगल पॉल १४३

एलिझाबेथ कालखंड-५८
एल्टन ऑलिव्हर ४३
एलफिन्स्टन् १७०
ए स्कॉलर, ए जंटलमन ११
'एस्सेंशियल फॉर्म' १४५
ऐतिहासिक दृष्टी ३५, ३६

ओ

ओक वामन दाजी १७९
ओक विनायक कोंडदेव १७५
औंधकर श्रीमंत बाळासाहेब १८१

क

कझामियाँ ३९
'करमणूक' १८०
कर्वे चि. ग. १८४
कलाकृती : अंगोपांगे १४०
— अंतर्दर्शन १६५
— अभिग्रहणवादी भूमिका ७६
— आस्वाद १६१
— रसग्रहणवादी भूमिका ७६
— निर्मितीचे मानसशास्त्र १३८, १३९, १४०
— निर्मितीतील घटक : प्रतीक १४३
— संरचना १४५
कला व अनुशासन १५८, १५९
— प्रशिक्षण १६२ ते १६४
कलेचे रहस्य १४४
कॅक्स्टन विल्यम ७४
कँडी मेजर १७०
कँपियन थॉमस ११४
कॅम्बेल लिली ४६
क्रमवंत जगन्नाथशास्त्री १६९
क्रिएटिव् इमॅजिनेशन ७६, १३७
क्रिटिसिझम : शब्दकोषातील विविध व्याख्या ९५
अर्थव्याप्ती ६६
क्लॅसिसिझम ५९
कंट्रोल्ड थिंकिंग १३८, १३९
काणेकर अनंत १८१
कालखंड : निकष ५८, ५९, ६१
— वाचक संज्ञा ६०
कालिदास ४७
काव्यशास्त्र व भाषासौष्ठवशास्त्र ७२, १०३.
'काव्य-संग्रह' १७४
काव्याचे रसग्रहणच का ? ७६
'काव्येतिहास संग्रह' १७८
'काळ' १८०
किर्लोस्कर अण्णासाहेब १७७
किर्लोस्कर मासिके १८०, १८७, १८८
किर्लोस्कर शं. वा. १८०
कीर्तने वि. ज. १७५
कुरुंदकर नरहर ४३, ८२
कुलकर्णी कृ. पां. १८३, १८९, १९०
कुलकर्णी वा. ल. १७२, १७३, १९०
केतकर श्री. व्यं. १०१, १८२
केनेडी कॅप्टन १६९
केर डब्ल्यू. पी. १७४
केशवसुत १७७
केळकर द. के. १८२
केळकर न. चि. १, ८२, १८२, १८३, २०३
कोर्टहोप ३९
कोलटकर महादेवशास्त्री १७०
कोलते वि. भि. १८५, १९०
कोलरिज सॅ. टे. १४८, ७६
कोल्हटकर श्री. कृ. १७७, १८१, १८२

कोश-कार्य १२६
कोश रचनाशास्त्र १२७
—संज्ञांचे १२६, १२०, २००
कॉनर्प १२५
क्रोचे ७९, ८२, ८३, ८६
क्षीरसागर श्री. के. ८२

**ख**

खंडकाव्य ५६
खरे बाळूताई १८३
खरे वा. वा. १८५
खाडिलकर कृ. प्र. १७७, १८१, १८२
खांडेकर वि. स. ८, २१, ८२, १८७
खानोलकर गं. दे. १८४, १८९

**ग**

गजेंद्रगडकर श्री. न. १२४
गडकरी रा. ग. १७७, १८१
'गद्यवैभव' १८१
ग्रॅमर १११
गाडगीळ गंगाधर १०६, १४६, १५०
गाडगीळ पां. वा. १८०
गॉस् एडमंड ४३
ग्लासिमेटिक्स १२३
'गीतारहस्य' १९३
ग्रिम्म १०६
गुंजीकर रा. भि. १७५
गोडबोले प. ब. १६९
गोरे ना. ग. १८०
गुस्टाव् स्टर्न ११८

**च**

चरित्र—इतिहासाचा भाग ५२ ते ५४, १५१
—कोश १८५
चरित्र : निर्मिती–प्रक्रिया शोधन ५४
—विषयक माहितीच्या मर्यादा ५२
चरित्राभ्यास : विविध भूमिका ५२, ५३
चव्हाण यशवंतराव १९१
'चित्रमयजगत' १८६
चित्राव सिद्धेश्वरशास्त्री १७१
चिपळूणकर कृष्णशास्त्री १७२
—विष्णुशास्त्री १७४, १७५, १७७, १७९
चौधरी बहिणाबाई ५५
छत्रे सदाशिव का. १७२

**ज**

जगन्नाथ शंकरशेट १७५
जगाची विद्वत्परंपरा १०, ११
जर्व्हिस कॅप्टन १६९, १७०
जानवेकर रामचंद्रशास्त्री १६९
जांभेकर बाळशास्त्री १७२
जावडेकर शं. द. १८७, १८८, १९३
जॉन्सन डॉ. सॅम्युअल १३, ७३, १०२
जीवन-तत्त्वशोधक समीक्षा ८०
जीवशास्त्र : वाङ्मयीन विद्वत्तेवर प्रभाव २४
जोग रा. श्री. १८३, १९०
जोग ल. ग. ४३
जोशी प्र. न. ११२
जोशी य. गो. १८६, १८९
जोशी लक्ष्मणशास्त्री १८०, १८७, १८९
जोशी वा. म. ८२, ८३, ९१, १८१, १८२
ज्योन्स सर विल्यम १०४, १०५, १०९, ११०, १७४
'ज्योत्स्ना' १८६

ट

टॅसोचे उदाहरण १६
टागोर रवींद्रनाथ ११
टॉलस्टॉय लिओ ८१
टिळक ना. वा. ९१, १९३
टिळक बा. गं. १७७
टेलर १०९
टॉयेन्बी ॲर्नोल्ड ५६
ट्रिटाइज २००
'ट्रुथ ऑफ सबस्टन्स' ८१

ड

डांगे श्री. अ. १८०
डायचेस डेव्हिड ३०
डार्विन चार्लस ५५, १०७
डॉक्टरेट पदवी १९२
डिझर्टेशन १९९
डिविनिटीज १४
डुकले माधव चंद्रोबा १७२
ड्रायडन जॉन ७३

ढ

ढेरे रा. चिं. १९०

त

तत्त्वज्ञानमहाकोश १८९
तुकाराम ४७
तुलनात्मक भाषाशास्त्र २०, १४८
तुलनात्मक दृष्टीचा उदय १०६
तुळपुळे शं. गो. १९०
ते ँचा सिद्धान्त ३५, ३६, १४६
त्रिलोकेकर सोकर बापूजी १७५

थ

थेसिस १९५, २००

द

'दमयंती स्वयंवर' १८१
'दर्शन-दिग्दर्शन' १७४
दाते य. रा. १०६, १८४
दादोबा पांडुरंग १७१
दामले मो. के. १८२, १८३
'दीनबंधु' १८०
दीक्षित शं. पां. १७४
दुर्बोधता : काव्यातली, पार्श्वभूमी १८
देवल गो. ब. १७७
देशपांडे कुसुमावती १९०
देशपांडे पु. य. १८८
देशपांडे पु. ल. १६६
देशपांडे य. खु. १८७
देशपांडे वा. ना. १८७
देशमुख मा. गो. १८२
द्विविध मनःशक्ती १३८

ध

ध्वनि उच्चारणशास्त्र ११३
ध्वन्यधिष्ठित भाषेची व्याख्या १२१

न

'नवनीत' १७८
'नवभारत' १८७
'नवयुग' १८७
नवागत वर्ग, अभ्यासकांचा ७, १५८
नव्या सांस्कृतिक संघटना १७६
'नादब्रह्म' ९८

'निबंधमाला' १७५, १७७, १७८, १७९, १८०
'नियंत्रणां'चा वापर १३९, १४०

## प

पंडित विष्णुशास्त्री १७१
पंडिती कोश १७९
पदिम ११३, ११४, ११५
पटवर्धन माधवराव १८५, १९७
पटवर्धन रावसाहेब (पु. ह.) १८७
'परस्पेक्टिव्हिझम' ४८, ४९, ९५
परांजपे शि. म. १८२
पहिला समीक्षा प्रयत्न ७४
पांगारकर ल. रा. १८३, १८५
पाठचिकित्साशास्त्र ६२, ६३, १८७
पाध्ये प्रभाकर १८०
पाणिनी १०२, १२३
'पारिजात' १८६
पारसनीस द. ब. १८५
पॉल हर्मन १०६
पीएच्.डी. पदवी-प्रबंध–१६९
— सुरुवात १९०
— स्वरूप-चर्चा १९२, १९३, १९४, १९६
पुणे पाठशाळा १८२
पूना कॉलेज १७१
पेटर, वॉल्टर ८१
पेंडसे लालजी १८७
पेंडसे शं. दा. १९०
पोतदार द. वा. १७४, १७९, १८१, १८२, १८३, १८४
'प्रतिभा' १८७
'प्रतिभासाधन' १८३, १८७, १८८
प्रतिमा १४३
प्रतीक १४३, १४४
प्रबंध १९८
प्रवचन, कीर्तन १५७
'प्राचीन' कालखंड ६०
प्रियोळकर अ. का. १८५, १९०

## फ

फडके ना. सी. १८७, १८८
फर्थ जे. आर. १०२, १०३, १०६, १२४
फाटक न. र. १९४, १९५, १९८
फिलॉलॉजी : शब्दार्थचर्चा ९९
फॉर्स्टर नॉर्मन ११, १९, २५, ९३
फुले ज्योतिराव १७१, १७२

## ब

बनहट्टी श्री. ना. १९०
बाबर सरोजिनी २८, १९०
बायबल ९८
बॉप्प १०५
बॉवरा मॉरिस १६, १४८
बी.ए. ची पहिली तुकडी १७४
बेकन फ्रॅन्सिस १३
बेटसन् एफ्. डब्ल्यू. ३८
बेडेकर दि. के. ८२
बेल् क्लाइव १४२
बेल्स लेटर्स १०७, १४७
बेसिक इंग्रजी ११३
ब्रनेटिअर ५५
ब्रह्मचारी विष्णुबुवा १७१, १७२
ब्रुक्स व विमसॅट ९३
ब्लूमफील्ड एल्. १०२, ११७

भ


भाऊ दाजी १७५
भागवत दुर्गा १८७
भागवत स. ज. १८७
भांडारकर रा. गो. १७१
'भारतीय संस्कृति कोश' १८९
भारतीय विद्यांचे पुनरुज्जीवन १७५
भावे वि. ल. १८३, १८५
भाषा : एक संरचना १२३, १२४
— : उपसंस्था ११४
— : काही व्याख्या ११६, ११७
— : रोजच्या व्यवहारातील १२६
— : ललित वाङ्मयाची ६७
— व गणितशास्त्र १२३
— विषयक पाठ्यपुस्तके व अभिरुची १८८
भाषांतर युग १८७
भाषांतरित वाङ्मयास उत्तेजन १७२, २०२
भाषाभ्यास : अठराव्या एकोणिसाव्या शतकातील ११२, ११३
— आधुनिक आयुधे १२८
— आधुनिक भूमिका १०९
— एककालिक ११०, १११
— दोन अंगे ९९
— प्राचीन भूमिका ९९,१०१,१०३
— योजनापूर्वकतेची गरज १३०
— वाङ्मयीन विद्वत्तेत स्थान ११५, ११६
— विविध शाखा ११५, ११७
— हिंदु ग्रीकांची भूमिका १०३
भाषाविज्ञान–
— अभ्यास-क्षेत्रे ११७, ११८
— अभ्यासाची भूमिका १११, ११४
भाषाविज्ञान :
— भाषाशास्त्रापासून वेगळेपण ११२
— शब्दार्थ चर्चा ९९, १०१
— उपासनेची विविध आयुधे १२८
— एक्सरे, ,,
— ऑसिलोग्रॅफ ,,
— काइमोग्रॅफ ,,
— ब्रीदिंग फ्लास्क ,,
— पिच मीटर ,,
'भाषेचा गुंतवळा' ९८


म


मंडलीक वि. ना. १७२
'मनोरंजन' मासिक ८६
'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' १८४
मराठीचा विद्यापीठात पुनःप्रवेश १८८
मराठी वाङ्मयाचे सुवर्णयुग १७७
'मराठी ज्ञानप्रसारक' १७२, १७३
'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' १८५
महाजन भाऊ १७२
महाजनी ह. रा. १८०
'महाराष्ट्र परिचय' १८९
'महाराष्ट्र रसवंती' १८८
महाराष्ट्र विषयक वाङ्मय १८५
महाराष्ट्रीय ज्ञानकोश १८४
'महाराष्ट्र शत-सांवत्सरिक' १८८, १८९
महाराष्ट्र सांवत्सरिके १८९
महाराष्ट्र साहित्य परिषद १०१, १८२
'महाराष्ट्र शब्दकोश' १८४
मॅक्समूलर १०६
माटे श्री. म. १८५, १८९
माडखोलकर ग. त्र्यं. १७०, १७२,१८०
मानव्यप्रधानशास्त्रे १८३, १८६
मानसशास्त्र : समीक्षेवर प्रभाव ८८, ८९

मार्क ब्लॉक १०८, ११९
मार्क्सवादाचा परिणाम १८८
मॉर्गन चार्लस १३७
मिल्टन १६
मिशनरींचे कार्य १७०, १७१
'मीनिंग—ए डर्टी वर्ड' ११८, ११९
'मुनिचतुष्टय' (आधुनिक) १७०
मुनशी कन्हयालाल १८१
मेकॉले १५, ९३
'मेघदूत' ५१
मूल्टन थॉमस ९२
मोडक ज. आ. १७५
मोडक वामन आबाजी १७९
मोरे शंकरराव १८२
मोरोबा कान्होबा १७२
मोल्सवर्थ कँडी कोश १६९
'मौज' १८८

य

'यशवंत' १८८
'यशोदा पांडुरंगी' १७२
युगप्रभाव कल्पना ४१
येमल्लेव ७१, १०९

र

'रत्नाकर' १८६
रविकिरण मंडळ १८१
रसग्रहण ७६, ७७
रसग्रहणापासून अभिग्रहणापर्यंत ८५
रसेल बर्ट्रंड १०९
रस्किन जॉन ८८
राजवाडे वि. का. १७९, १८५
रानडे म. गो. १७४
रानडे शंकर मोरो १७४
रानडे श्री. बा. १९०
राममोहन रॉय १५
'रामशास्त्री' १८७
रामायण महाभारत ११, १५६
रास्क १०५
राष्ट्रीय विद्यापीठे १८०
रेनेसान्स—
— माणसाची नवी प्रतिमा १२, १४
— वाङमयीन विद्वत्तेत महत्त्व १२,
रोजची भाषा १२५
रोमँटिक रिव्हायवल : 'स्वच्छंदवादी क्रांती' पाहा.
ऱ्हेटॉरिक १०२

ल

लर्निंग ४
ललित-वाङमय-लेखन— १३३–१६०
अभ्यासक्रम वैशिष्टय १६१, १६२,१६३
— प्रक्रिया १३९, १४०
— प्रशिक्षणाची गरज व योजना १६१
— रूढ दृष्टिकोण १३५ १३६
ललितवाङमय व ललितकला ६८
ललितवाङमय-संकल्पना १४०
लॉजिकल पॉझिटिव्हिजम १२५
लाँजिनिअस ७२
लिंग्विस्टिक्स १००, १०७, १०९, ११२
लिंग्विस्टिक्स व फिलॉलॉजी १११,११२
लिटररी स्कॉलरशिप : 'वाङमयीन विद्वत्ता' पाहा.
'लिटरेचर ऑफ नॉलेज' ७७
'लिटरेचर ऑफ पॉवर' ७७
लूकस एफ्. एल्. ८२
लेखक : नावाची युगे ६०, ६१

लेखक: सामाजिक स्थानाची उत्क्रांती
१५६ ते १५९
— टीकाकार, परस्पर-संबंध
१५१, १५२
लेखनकला–प्राध्यापक १६२
लोकवाङ्मय २८
लोकहितवादी १५, १६८, १७१, १७२

व

बरेरकर भा. वि. १०७
बॅटसन १०९
वाक्य-विचार ११४
वाक्यरचनाशास्त्र १२९
वाङ्मय: अखंड विकासक्षम असा ज्ञान-
संचय ३५
— उपांग नव्हे ४०
— एक दस्तऐवज ४१, १७९
— जीवनाशी संबंध ४०, ४१
— ललितकलांशी संबंध ९०
— व इतर शास्त्रे ६८
— व त्याचा अभ्यास ९, १०
— व मूल्याधिष्ठितता ३२,४४,६८
— व विकास कल्पना ५०,५१,५७
— व समीक्षा, फरक ४४
— शब्दांचे विश्व ६७, ६८
वाङ्मयकला:
— व चिंतनशीलता १६३
— शिक्षक १६२
— शिक्षण १६३
— सरावाचे महत्त्व १६३
वाङ्मय–तत्त्वविवेचक व टीकाकार ६६
वाङ्मय–समीक्षा व इतिहास ४४
वाङ्मय–समीक्षा व मूल्ये ३२, ४२
वाङ्मयक्षेत्र :
— अनुशासनाचा प्रश्न २२
— नवागत वर्ग ७–९
— विविध उपक्रम ५
वाङ्मयाची–व्यामिश्रता ७८
वाङ्मयाचे तज्ज्ञताप्रधान अभ्यासक्रम
१८१
वाङ्मयाभिबंध ४४, ५८
वाङ्मयाभिरुची व पाठ्यपुस्तके १८८
१८९
वाङ्मयाभ्यासकांच्या कार्याचे महत्त्व
२१, २२
'वाङ्मयाला इतिहास नसतो' ७१
वाङ्मयाला समीक्षेची गरज ६६
वाङ्मयोत्तेजनाचे सुवर्णयुग १९१
वाङ्मयीन अनुभवास प्राधान्य ९०
वाङ्मयीन कलाकृती–घडण १४४-१४७
— लेखकाचे उद्दिष्ट १४२
— ऐतिहासिक दृष्टीने पाहणी ३५
वाङ्मयीन तत्त्वमीमांसा ९, १०
— नियतकालिके १८७, १८८
वाङ्मयीन विद्वत्ता
— अमेरिकन व युरोपीय कल्पना
७, ८
— आशय चर्चा ७, ८
— इतर क्षेत्रीय विद्वत्तेशी तुलना
३०, ३१
— ध्येये व उद्दिष्टे ३०, ३१
— परिक्षेत्रांचे परस्परावलंबन ३०
— विविध परिक्षेत्रे : १, २७
भाषाभ्यास २७, १३१
— २ ललितवाङ्मयलेखन २८,
१३२-१६६
— ३ समीक्षा-विचार २८, ६५-९६
— ४ संहितानिश्चितीकरण २७

— वाङ्मयीन विद्वत्ता : पुढे चालू
— ५ वाङ्मयेतिहास ३३–६४
— परिक्षेत्रे : प्राचीन वाङ्मयाभ्यासाची २७
— युरोपीय परंपरा ७८
— शब्दचर्चा ३–७
— वैज्ञानिक पद्धतींचा प्रभाव २२–२३
— स्वच्छंदवादाचा प्रभाव १७,१८
— संज्ञा व संकल्पना ३ ते ७
वाङ्मयीन विद्वत्तेचा विकास :
— मराठीतील १६८ ते १९९
— जागतिक संदर्भ १६८–१६९
— दोन महायुद्धांच्या कालातील १८१, १८२
— मिशनरींचा सहभाग १७०
— युरोपीय परंपरेचा अनुबंध १६८
वाङ्मयीन संशोधनाची भूमिका २५-२६
— ज्ञानपरंपरा १०
वाङ्मयेतिहास : ३२–६४
— अनुशासनाचा प्रश्न ४९
— अनन्यत्व ३४, ३५, ३८, ४२
— आणि चरित्राभ्यास ५२ ते ५४
— इतिहासवाद ५०
— म्हणजे भाषाभ्यास ३८
— लेखनातील यक्षप्रश्न ४२
— व मूल्यनिदान ३८
— विविध मते ३४, ३९, ४०, ४३
— व्यापक इतिहासाचा भाग ३७, ३८
— स्वरूप-विशेष ३८
वाळिंबे रा. शं. ६३
विकास-कल्पना व टॉएन्बी ५५
विकास कल्पनेची पाहणी ५४
विद्यांचे पुनरुज्जीवन–युरोपीय १७५
— भारतीय १७५
— व माणसाचा आदर्श १२, २४
— वाङ्मयक्षेत्रावर प्रभाव १३, १४
विद्यापीठे व आधुनिक भाषा १७५
विद्यापीठे व वाङ्मयाभ्यास १७५
'विद्वत्व व कवित्व 'वाद १७
विद्वत्प्रधान लेखन १५०–१५१
'विनोद व महदाख्यायिका' १७९
विनोबा ५५
विंटर्स आयव्हॉर ७८
विरेचन सिद्धान्त ८७
विमसॅट व ब्रुक्स ९३
विल्सन फिलॉलॉजिकल लेक्चर्स १७५
विविध अनुदाने १९१
'विविधज्ञानविस्तार' १७३
विसावे शतक : वैचारिक वेगळेपण ८४
विषय संज्ञा कोश १९९, २००
'विज्ञानबोध', व त्याची 'प्रस्तावना' १८४
वेलेक् रेने, ३७, ३८, ४७, ४८, ५३, ५४, ६२, ६६
वैज्ञानिक पद्धतीचा प्रभाव २२, २३, २४
वॉइल्ड ऑस्कर, ८१
वारेन ऑस्टिन, ८१, ८२, ८३
व्याकरण : भूमिका नवी व जुनी ११५, १२०, १२१
'व्यायाम ज्ञानकोश' १८४
'व्यावहारिक ज्ञानकोश' १८४
व्युत्पत्ति शास्त्र ११८, ११९, १२०
व्हिक्टोरिया कालखंड ५८
व्हिटने १०५, १०६

## श


शतक दशकांचे कालखंड ५९
शब्दब्रह्म ९८
शब्द : वाङ्मयात स्थान ६८, ८५
शब्द-संहतीचे एकीकरण १२६
शब्दार्थशास्त्र ११८, १२८, १२९
— प्रधान समीक्षा १२२
शास्त्र : स्वरूप व विशेष २५
शास्त्रीय दृष्टी : वैज्ञानिक पद्धती पाहा.
शिरूरकर विभावरी १८१
शिक्षणक्षेत्रातील नवा वर्ग १६९
शुद्ध काव्य १८
शोध-पद्धतींचे महत्त्व ३०
शोधबुद्धी २६
शोध-साक्षेप २६
शोधानुशासन २६
शोधायुधे २४
श्रॅम एम्. एस्. १३९, १४१, १४२, १५१, १५३, १६२


## स


समीक्षा :
— इतर विषय संबद्धता ८५ ते ८८
— कोशांतर्गत व्याख्या ९५
— गरज का भासते ६६
— दोन विचारधारा ७७ ते ७९
— ललितकलांशी नाते ८०, ८९, ९०
— व निरनिराळी शास्त्रे :
— तत्त्वज्ञान ८५
— नाटचशास्त्र ८६, ८७
नीतिशास्त्र ८६
— मानसशास्त्र ८९
समीक्षा : समाजशास्त्र ८८
— व अनुशासनाधिष्ठिता ९२ ते ९४
— व मूल्यविचार ९५
— विविध अंतर्भूत अभिक्रिया ६९
— अधिमार्ग ९०, ९१
— विविध व्याख्या ९५
— स्वतंत्र अनुशासनाचा प्रश्न ९२
समीक्षा विचार—
— तीन व्यापक कालखंड ७०
(१) प्राचीन कालीन ७२
(२) विद्येच्या पुनरुज्जीवन-कालीन ७४
(३) विसाव्या शतकातील ८४
(४) स्वच्छंदवादी चळवळीच्या काळातील ७६
सम्यक्‌दृष्टिक्षेपणवाद ४८, ४९, ९५
सरदार गं. बा. १७२, १८३, १८४, १९०
सरवटे वि. सी. १८७
सर्जनशील लेखन-प्रक्रिया १३७, १३८
सस्यूरे फर्डिनंड १०९, ११२, ११३
सहस्रबुद्धे पु. ग. १८३, १९३
संकेत : एक मनोगम्य संस्था ९७
संरचनात्मक भाषाशास्त्र १२४
संशोधन :
— अभ्यासक्रम १९५, १९६, १९८
— अभ्यासपत्रिका १९५, १९६
— पदवीचा प्रारंभ १८२, १८३, १९७
— व समीक्षा १९६
संशोधनातील सामुदायिकता १९९
संस्कृत इंग्रजी शब्दकोश १०५
संस्कृत भाषेचे महत्त्व १०४, १०५
संज्ञाकोश १२७, २००
सामुदायिक अभिक्रमशीलता १३०

सामाजिकशास्त्रे व वैज्ञानिकशास्त्रे १५, १६, २३, २४, २५, ३१
साहित्य संस्कृति मंडळ १९१
साहित्य-संस्थांसाठी कार्य १६५
साहित्याचे आस्वादन १४३
साने का. ब. १८०
साने गुरुजी ५५
'सुधारक' १८०
सूचिग्रंथ व तत्सम साधने ६३
सेंट्सबरी जॉर्ज ४३
सोशल मिल्यू ८०
सौंदर्यवादी भूमिका ७९
स्कॉलर : व्याख्या व आदर्श १०, ११
स्कॉलरशिप ३, १४
स्कॉलॅस्टिसिझम १२
स्वनिम ११३, ११४, १२३, १२४
स्वच्छंदवादी क्रांती :
— कवींवरील पूर्वसंस्कार १७
— दुसरे पुनरुज्जीवन १५, १६, १७, ७६
— पांडित्यांचे अवमूलन १७
— प्रतिभेचे अनन्यत्व १८
— विद्वत्क्षेत्रावर प्रभाव १९
स्वच्छंदवादी क्रांती : विज्ञानाचा प्रभाव ६०
— स्वरूप व विशेष १९, २०

ह

'हंटर्स ऑफ मॅन्युस्क्रिप्टस' १३
हफ् ग्रॅहॅम् ३२
हरी केशवजी १७२
'हॅम्लेट' ४७, ४८, ९३
'हाय सीरियसनेस' ८१
हैंद शाळा व शाळा-पुस्तक मंडळी १७१
हॉप्किन्स २१
हेतुमिथ्यावाद ४७
ह्युमॅनिझम ५९
ह्युमॅनिटीज व डिव्हिनिटीज १४

ज्ञ

'ज्ञानचंद्रोदय' १७८
ज्ञानसंवर्धनविषयक योजना १८४
ज्ञानसंपादन : विज्ञानपूर्व काळी २५
ज्ञानाचे संकलन : प्रा. माटेकृत प्रयत्न १८४
ज्ञानेश्वर ४०
'ज्ञानेश्वरदर्शन' १८६

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | असे आहे | असे हवे |
|---|---|---|---|
| २६ | १५ | humans | human |
| २९ | ९ | वाङमयेभ्यास | वाङमयाभ्यास |
| ४४ | २४ | असताता; | असतात; |
| ८६ | ३१ | विभाव | भाव |
| ९८ | २५ | परस्पेक्टिव्ह | परस्पेक्टिवज् |
| १२६ | २२ | या त्या | त्या त्या |
| १२८ | १५ | अभ्युपागम | अभ्युपगम |
| १६१ | २३ | त्याचा पूर्वेतिहास | त्यांचा पूर्वेतिहास |
| १६५ | १५ | घऊ नयेत | घेऊ नयेत |
| १६९ | १४ | कालखंड ोय. | कालखंड होय. |
| १८८ | १६ | जावडकर | जावडेकर |
| ९६ | ७ | वाङमयीन पिढीचा | पिढीचा वाङमयीन |